म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २०५०

# व्यक्ती आणि विचार

(निबंध)

ले. य. दि. फडके

REFBK-0022669

२५५०
२२६६९
निबंध
शाखा (स्थळ प्रत)

# व्यक्ती आणि विचार

य. दि. फडके

REFBK-0022669

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशनकाल : १ जून १९७९

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

सर्व हक्क सुरक्षित

**मूल्य बावीस रुपये**

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिव-पार्वती ’
टिळक रोड, पुणे ३०

निबंध
२६५०
२४।८।१

ती. आईस —

# प्रास्ताविक

१९६६ ते १९७८ या काळात विविध नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखांपैकी काही लेखांचा हा संग्रह आहे. खरे म्हणजे तीन संकल्पित पुस्तकांचे प्रत्यक्ष लेखन करण्याअगोदर पूर्वतयारी म्हणून जे थोडे संशोधन केले व अभ्यास केला त्यातून या लेखांची निर्मिती झाली. १९७३ पासून गोपाळराव आगरकरांचे चरित्र लिहिण्याच्या दृष्टीने त्या चरित्रास उपयुक्त ठरतील अशा साधनांचा मी शोध करू लागलो. १९७७ साली प्रसिद्ध झालेला 'शोध–बाळगोपाळांचा' हा माझा आधीचा लेखसंग्रह त्या शोधाचेच फलित होते. तो संग्रह प्रकाशित झाल्यानंतर आगरकर–टिळक व त्यांच्या काळातील व्यक्ती यासंबंधी आणखी काही नवी माहिती मिळाली. हाती आलेल्या मूळ साधनांची छाननी करून आगरकर–टिळकांसंबंधी १९७७–७८ मध्ये मी जे लेख प्रसिद्ध केले ते या पुस्तकात प्रथम समाविष्ट केले आहेत.

आजवर रानडे–आगरकर–टिळक–गोखले यांच्या संबंधी बरेच लेखन प्रसिद्ध झाले असले तरी त्यावर विसंबून न राहता मूळ साधने स्वतः धुंडाळून त्यांची चिकित्सा करण्यामुळे अनेक अपसमज दूर होतात. तात्यासाहेब केळकरांसारख्या माहीतगारांनी लिहिलेल्या त्रिखंडात्मक टिळक-चरित्रातील अनेक गफलती व उणिवा अभ्यासकाच्या लक्षात येतात. गेल्या शतकातील इतर अनेक छोट्यामोठ्या व्यक्तींच्या कार्याचे रंगरूप नजरेत भरते. आज ज्यांची आठवणही फारशी राहिलेली नाही अशा उपेक्षित व्यक्तींच्या कामगिरीचे पुन्हा एकदा स्मरण करून देता येते. मूळ साधनांचा तलास केल्यामुळे थोर पुरुषांबद्दल वर्षानुवर्षे भक्तिभावाने सांगितल्या जाणाऱ्या आठवणी–आख्यायिकांतील तथ्य पारखून घेता येते. थोर ऐतिहासिक व्यक्तींच्या मूर्ती मनोभावे पुजणाऱ्यांनी चढवलेले शेंदराचे थर त्यामुळे खरवडले जातात हे खरे! पण ते अटळ असते.

घटनांची शहानिशा करून त्यांची संगतवार मांडणी करण्यासाठी व इतिहासाचे लेखन शास्त्रकाट्याच्या कसोटीवर उतरण्यासाठी मूळ साधने धुंडाळून त्यांची छाननी करण्यास पर्याय नसतो. जुनी वृत्तपत्रे, सरकारी दफ्तरखान्यात धूळ खात पडलेले कागदपत्र, खासगी पत्रव्यवहार, रोजनिशा व अज्ञात कागदपत्र पारखून पाहण्याचे काम अतिशय जिकिरीचे असते. त्यासाठी बरीच भ्रमंती करावी लागते; वेळ व पैसाही खर्च करावा लागतो. हाती घेतलेल्या विषयाचा चिकाटीने वर्षानुवर्षे पाठपुरावा करावा लागतो. इतके परिश्रम केल्यानंतरही त्यातून फार काही हाती लागेल असा अनेकांना भरवसा वाटत नाही. त्यापेक्षा वाचनालयात सहजासहजी मिळणाऱ्या पाचदहा

ग्रंथांच्या आधारे आपल्या विश्लेषणाचा डोलारा रचणे किंवा अन्य कोणाचा तरी मूळ ग्रंथ विश्वसनीय मानून त्या आधारे आपल्या कल्पनाशक्तीस ताण देणे हे सोपे व स्वस्तातले काम असते. म्हणूनच मूळ साधने धुंडाळून त्यांची चिकित्सा करून नंतर इतिहासलेखन करण्याची शास्त्रीय पद्धत अनुसरणे हा अनेकांना प्रचंड खटाटोप वाटतो.

इतिहासाचार्य राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे, पारसनीस, रियासतकार सरदेसाई, शेजवलकर, ग. ह. खरे वगैरेंनी शिवकालापासून ते पेशवाईच्या अस्तापर्यंतच्या काळातील महाराष्ट्राच्या इतिहासलेखनास उपयुक्त ठरतील अशा अनेक साधनांचा जिद्दीने तलास व संग्रह केला. या साधनांची त्यांनी आपापल्यापरीने चिकित्साही केली. हे काम एकट्यादुकट्याचे नसते. अशा कामास अनेकांचा हातभार लागल्याशिवाय त्यास आकार येत नाही. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने गोळा करण्याचे व त्यांचा अन्वयार्थ लावण्याचे हे काम संपलेले आहे असे नाही. ते आजही चालू आहेच व पुढेही चालू राहील. पण राजवाड्यांपासून ते थेट ग. ह. खरे यांच्यापर्यंतच्या इतिहासाच्या अभ्यासकांनी अनेक वर्षे हे काम केल्यामुळे मध्ययुगीन महाराष्ट्रासंबंधी आज जितकी साधार व सविस्तर माहिती उपलब्ध आहे तितकी अर्वाचीन महाराष्ट्रासंबंधी गोळा झालेली नाही.

खरे म्हणजे अर्वाचीन काळातील महाराष्ट्राचा सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास हा आजवर उपेक्षिलाच गेला आहे. शिवछत्रपती किंवा बाजीराव व माधवराव पेशवे यांच्या काळातून बाहेर पडावयास अनेक इतिहासाचे अभ्यासक राजी दिसत नाहीत. पेशवाईच्या अस्तापासून ते आजतागायत महाराष्ट्राची जी जडणघडण झाली आहे तिचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी साधनांची फार कमतरता आहे असे नाही. बहुतेक साधने इतस्ततः विखुरलेली आहेत. त्यांतील काही जीर्ण अवस्थेत आहेत. वेळीच ती झेरॉक्स करून घेतली नाहीत किंवा त्यांची मायक्रो फिल्म घेतली नाही तर ती कायमची नष्ट होण्याचा धोका आहे. अशी साधने शोधून ती जमविण्याचे व इतरांना उपलब्ध करून देण्याचे काम अनेकांनी करण्याची गरज आहे. खासगी संग्रहातील अस्सल कागदपत्रांच्या नकला करून घेण्याची अनुमती मागितली तर अनोळखी माणसेही उत्तम प्रतिसाद देतात असा माझा सर्वसाधारण अनुभव आहे. महाराष्ट्रात अर्धा डझन विद्यापीठे निघाली; आणखीही निघतील. पण आतापर्यंत महाराष्ट्रातील विद्यापीठांमधल्या व महाविद्यालयांतल्या अभ्यासकांनी अर्वाचीन काळातील महाराष्ट्राचा सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास लिहिण्यास आवश्यक ती साधने जमविण्याचे काम सातत्याने व

मोठ्या प्रमाणावर केलेले दिसत नाही.

अर्वाचीन काळातील महाराष्ट्राच्या इतिहासाचे लेखन करताना अभ्यासकाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. अभ्यासकाची जात ही त्याच्या मार्गात पदोपदी आडवी येण्याची शक्यता आहे. जातिव्यवस्थेवर आधारलेल्या समाजात एखाद्या व्यक्तीचा विशिष्ट जातीत झालेला जन्म हा फार तर त्या व्यक्तीच्या मातापित्यांनी केलेला पराक्रम किंवा चूक म्हणता येईल. पण या पराक्रमाचे पारितोषिक किंवा चुकीचे प्रायश्चित्त त्या व्यक्तीच्या वाट्याला येते. जातिबद्ध समाजात संस्कारामुळे जातिविशिष्ट अहंकार, उच्चनीचतेच्या कल्पना यांचा प्रत्येक व्यक्तीवर कळत नकळत जबरदस्त प्रभाव पडतो. त्यामुळे विशेषतः सामाजिक व राजकीय चळवळींचा इतिहास लिहिताना शक्य तितक्या निर्लेपपणे घटनांचे व व्यक्तींचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणे हे वाटते तितके सोपे नसते. याखेरीज आपल्याला गवसलेल्या सत्याशी इमान राखून भरपूर पुराव्यानिशी सामाजिक व राजकीय चळवळीविषयी एखाद्या अभ्यासकाने लिहिले तरी त्याचे निष्कर्ष मान्य नसणारी मंडळी त्याच्या जातीचा निर्देश करून सहज त्याच्यावर हेत्वारोप करू शकतात. टीका करून किंवा निषेधपर ठराव मंजूर करून विरोधक थांबणार नाहीत तर मोर्चे आणून, पुस्तके जाळून, दहशत घालून, झुंडशाहीचे प्रदर्शन करून अभ्यासकावर दडपण आणले जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

विभूतिपूजा ही आपल्या रक्तात इतकी भिनलेली आहे की, थोर पुरुषांना दैवत मानून त्यांचे स्तवन करणे हा आपला नित्यक्रम असतो. महापुरुष झाला तरी तो अखेर माणूसच असतो हे लक्षात न घेता बहुतेक सर्व चरित्रे लिहिली जात असल्यामुळे महापुरुषांच्या चरित्रांना स्तुतिस्तोत्रांची कळा येते. महापुरुष आपल्या परीने इतिहासाला वळण देण्याचा प्रयत्न करीत असले तरी इतिहास म्हणजे हाताच्या बोटावर मोजता येण्याजोग्या महापुरुषांची चरित्रे हे समीकरण चुकीचे असते. अर्वाचीन महाराष्ट्राच्या जडणघडणीला ज्यांनी हातभार लावला त्यांची बरीवाईट चरित्रे आपल्याकडे संख्येने काही कमी नाहीत पण ही चरित्रे विश्वसनीय समजून त्यांच्या आधारे आधुनिक काळातील महाराष्ट्राचा इतिहास लिहिणे शक्य होणार नाही. त्यासाठी अर्वाचीन काळात झालेली जनआंदोलने, नाना प्रकारच्या सामाजिक व राजकीय चळवळी यांचा तपशीलवार अभ्यास करणे आवश्यक आहे.

अलीकडच्या काळात सबंध महाराष्ट्र ढवळून निघाला होता तो संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमुळे! या चळवळीचा अभ्यास करताना आपल्याकडील अन्य सामाजिक व राजकीय चळवळींच्या अभ्यासाची झालेली हेळसांड मला विशेष जाणवली.

राष्ट्रवादी स्वातंत्र्य-चळवळीच्या मुख्य प्रवाहाविषयी व त्यात सामील झालेल्या माणसा-विषयी आपल्याकडे बरीच माहिती मिळते. या उपलब्ध माहितीच्या आधारे काही मीमांसा करण्याचे प्रयत्नही आपल्याकडे झाले आहेत. पण डॉ. गेल ऑमवेत यांनी केलेल्या प्रयत्नाचा एकच अपवाद वगळता सत्यशोधकांच्या व ब्राह्मणेतरांच्या चळवळीचा पद्धतशीर अभ्यास अद्याप झालेला नाही. दलितांच्या मुक्ति-आंदोलनाचाही साधार व सविस्तर इतिहास अजून लिहिला गेलेला नाही. आजवरचे या विषयातले लेखन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चरित्राभोवतीच घोटाळते आहे. खुद्द बाबा-साहेबांनी विभूतिपूजा हा भारतीय समाजाला जडलेला रोग आहे असा नेहमी इशारा दिलेला असला तरी त्यांचा वारसा सांगणारे त्यांच्या पुतळ्याची नित्यनेमाने पूजा करण्यातच समाधान मानतात असे विपरीत दृश्य आज दिसते. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहूमहाराज किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या उपेक्षित महापुरुषांचे महत्त्व अलीकडच्या काळात अनेकांना समजू लागले आहे. ही स्वागतार्ह घटना असली तरी त्याबरोबरच झपाट्याने झालेल्या त्यांच्या दैवतीकरणामुळे त्यांनी निष्ठापूर्वक जपलेल्या मूल्यांच्या वाढीसच धोका पोचण्याचा संभव आहे हे लक्षात घ्यावयास हवे.

सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचा साधार इतिहास लिहिण्याच्या दृष्टीने गेली दोन वर्षे त्यासाठी आवश्यक ती अस्सल व अज्ञात साधने धुंडाळून त्यांची छाननी करण्याचा प्रयत्न डॉ. बाबा आढाव यांच्या सहकार्याने मी चालवला आहे. महात्मा फुले, शाहू महाराज व केशवराव जेधे हे तिघे या चळवळीच्या विविध अवस्थांतील प्रमुख नेते होते. त्यांची केवळ चरित्रे न लिहिता या चळवळीला त्यांनी कसे वळण दिले हे सांगण्याचा प्रयत्न करावयाचा व तसे करताना या सामाजिक चळवळीतील गुंतागुंत व चढउतार, ताणतणाव, बदलती धोरणे व डावपेच, चळवळीमागचा विचार वगैरे गोष्टी स्पष्ट करावयाच्या असे योजून शोध घेऊ लागलो. हे काम पुरे होण्यास आणखी काही वर्षे लागतील. पण हाती जसजशी माहिती लागेल तसतशी ती इतरांना उपलब्ध करून द्यावयाची व मिळालेल्या माहितीच्या आधारे या सामाजिक चळवळी-तील घडामोडींची मीमांसा करण्याचा प्रयत्न करावयाचा असे ठरवले. ‘ शोध सत्यशोधकांचा ’ व ‘ जेधे– जवळकर ’ हे या पुस्तकातील दोन लेख म्हणजे या दिशेने टाकलेली दोन पावले आहेत.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मृत्यूनंतर ‘ सत्यकथा ’ मासिकाने त्यांच्या व्यक्तित्वाचे व कर्तृत्वाचे दर्शन घडवणारे असे काही लेख मे १९६६ च्या अंकात प्रसिद्ध केले. या पुस्तकात समाविष्ट केलेला सावरकरांच्या विचारसृष्टीबाबतचा माझा लेख

सत्यकथेच्या त्या अंकात प्रथम प्रसिद्ध झाला होता. एखाद्या मोठ्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याला श्रद्धांजली म्हणून गौरवपर लेख प्रसिद्ध करण्याची सर्वसाधारण प्रथा असते. मृत्यूनंतर कोणाहीबद्दल वाईट बोलू नये असा एक संकेत असतो म्हणतात. त्यामुळेही अशा प्रसंगी दोष विसरून केवळ गुणसंकीर्तन केले जात असेल. असल्या औपचारिक लेखनात मला मात्र रस नव्हता. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ग्रंथगत विचारांच्या वैशिष्ट्यांचा शक्य तो त्यांच्याच शब्दात परिचय करून द्यावयाचा मात्र लेखाचे स्वरूप केवळ संकलनात्मक न ठेवता विवेचनात्मकही ठेवावयाचे असे योजून हा लेख लिहिला होता.

हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या प्रतिक्रिया ऐकावयास मिळाल्या त्यामुळे आणखी एक कल्पना मनात घोळू लागली. टिळकांच्या मृत्यूनंतरच्या पन्नास वर्षांच्या काळात म्हणजे १९२० ते १९७० पर्यंतच्या कालखंडात वैचारिक क्षेत्रात भर टाकणाऱ्या व समकालीनांना प्रभावित करणाऱ्या विविध विचारसरणीच्या प्रमुख मराठी विचारवंतांच्या विचारसृष्टीचा ओझरता परिचय शक्यतो त्यांच्याच शब्दात करून द्यावा व तसे करताना त्यांचे व्यक्तिमत्त्व तसेच त्यांच्या विचारसृष्टीच्या मर्यादा दाखवून देण्याचा आपल्यापरीने प्रयत्न करावा असे वाटू लागले. तात्यासाहेब केळकर, विठ्ठल रामजी शिंदे, आचार्य जावडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्ञानकोशकार केतकर, 'समाजस्वास्थ्य'कार रघुनाथराव कर्वे, धनंजयराव गाडगीळ, धर्मानंद कोसंबी व त्यांचे पुत्र दामोदर कोसंबी, लक्ष्मणशास्त्री जोशी, पां. वा. गाडगीळ वगैरेंचे प्रकाशित साहित्य कालक्रमानुसार वाचून त्यांच्या विचारसृष्टीचे अशा तऱ्हेने दर्शन घडवावे असा बेत केला. वेळ मिळेल त्याप्रमाणे त्यांच्यापैकी एकेकावर लेख लिहावयाचा प्रयत्न केला. जितके लिहावयाचे ठरविले होते तितके अद्याप लिहून झाले नाही. फक्त सावरकर, केतकर, कर्वे व पां. वा. गाडगीळ यांच्या विचारसृष्टीचा परिचय आजवर करून देता आला. सर्वांबद्दलचे लेख लिहून होण्यास काही काळ लागेल. तोपर्यंत थांबण्यापेक्षा लिहून झालेले लेख या पुस्तकात एकत्रित केलेले बरे म्हणून तेही या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेत. कोणत्याही समाजात जे विचारमंथन झालेले असते त्याची दखल घेऊन त्यासंबंधी आपली प्रतिक्रिया अभ्यासकाने नोंदवावयास हवी. या दृष्टिकोणातून हे लेख लिहिले आहेत.

३, 'आनंदवन', 'साहित्य सहवास'
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

**य. दि. फडके**
३१ मे १९७९

# ऋणनिर्देश

या पुस्तकात समाविष्ट केलेले लेख खालील नियतकालिकांत प्रथम प्रसिद्ध झाले आहेत.

(१) आगरकरांची प्रेतयात्रा – सोबत, २५ फेब्रुवारी १९७७
(२) आगरकरांचे अज्ञात पत्र – सोबत, १३ फेब्रुवारी १९७७
(३) गोपाळराव जोशी यांचे माफीपत्र – सोबत, २५ मार्च १९७७
(४) वामन शिवराम आपटे – रसिक दिवाळी अंक, १९७७
(५) न्यायालयात न गेलेला खटला – केसरी, ३१ जुलै १९७७
(६) वाग्युद्ध बाळ-गोपाळांचे – केसरी दिवाळी अंक, १९७८
(७) शोध सत्यशोधकांचा – मौज दिवाळी अंक, १९७८
(८) जेधे-जवळकर – महाराष्ट्र टाइम्स दिवाळी अंक, १९७८
(९) केतकरांची विचारसृष्टी – मौज दिवाळी अंक, १९७३
(१०) समाजस्वास्थ्यकारांची विचारसृष्टी – मौज दिवाळी अंक, १९७२
(११) सावरकरांची विचारसृष्टी – सत्यकथा, मे १९६६
(१२) पां. वा. गाडगीळ यांची विचारसृष्टी – मौज दिवाळी अंक, १९७०

हे लेख लिहिण्याचा आग्रह करून ते छापल्याबद्दल श्री. ग. वा. बेहेरे, श्री. राजेंद्र बनहट्टी, श्री. जयंतराव टिळक व सौ. इन्दुताई टिळक, श्री. राम पटवर्धन, श्री. गोविंदराव तळवलकर, श्री. दिनकर गांगल यांचा मी ऋणी आहे.

हे लेख लिहिण्यापूर्वी अनेक वृत्तपत्रांचे अंक व दुर्मिळ ग्रंथ धुंडाळावे लागले. ते अभ्यासासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल खालील ग्रंथालयांचा व तेथील ग्रंथपालांचा मी आभारी आहे. (१) मुंबई विद्यापीठ ग्रंथालय (२) एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय (३) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (४) केसरी ग्रंथालय (५) फर्ग्युसन महाविद्यालयाचे ग्रंथालय (६) पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय (७) जवाहरलाल नेहरू स्मृती ग्रंथालय, नवी दिल्ली.

याखेरीज महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागाचे संचालक डॉ. कुंटे, गुजरात राज्याच्या बडोदे येथील दफ्तरखान्यातील अधिकारीवर्ग व दिल्लीच्या नॅशनल अर्काइव्हजमधील अधिकारी वर्ग या सर्वांनी त्यांच्या कार्यालयातील अंक तत्परतेने उपलब्ध करून दिले याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहे.

याखेरीज जुनी वृत्तपत्रे व दुर्मिळ पुस्तके अभ्यासासाठी मिळवून देण्यात अनेक व्यक्तींनी मोलाची मदत केली. बडोद्याचे श्री. सुभाष व अरविंद पाळेकर यांनी 'जागृती'

साप्ताहिकाचे अंक वाचावयास दिले. कोल्हापूरचे आमदार श्री. पी. बी. साळुंखे यानी 'विजयी मराठा' या साप्ताहिकाचे अंक मिळवून दिले तर दीनमित्रकार कै. श्री. मुकुंदराव पाटील यांचे चिरंजीव डॉ. रामचंद्र मुकुंद पाटील यांनी दीनमित्राचे अंक उपलब्ध करून दिले. डॉ. पाटील यांनी त्यांच्या संग्रहात असलेले कृष्णाजी पांडुरंग भालेकरांचे अस्सल व अप्रकाशित कागदपत्रही दिले याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच! हे सर्व साहित्य वाचून टिपणे करून घेताना पाळेकर, साळुंखे व पाटील यांच्या कुटुंबियांनी पाहुणचारही केला. कै. केशवराव जेधे यांचे चिरंजीव श्री. प्रतापराव जेधे, कै. दिनकरराव जवळकरांचे चिरंजीव श्री. शिवाजीराव जवळकर यांनीही शक्य तितके साहाय्य केले. त्याबद्दल मी या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

डॉ. गेल ऑमवेत यांनी त्यांच्या संग्रहातील पुस्तके तत्परतेने दिली. प्रा. सीताराम रायकर यांनीही या कामासाठी वेळ काढला. डॉ. स. गं. मालशे यांनी प्राचार्य गोविंद चिमणाजी भाटे यांचे अप्रकाशित आत्मवृत्त वाचावयास दिले याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार मानतो.

सत्यशोधक नेत्यावरील लेख लिहिण्यासाठी बडोदा व कोल्हापूर येथे काही दिवस मुक्काम करावा लागला तेव्हा श्री. बाबा आढाव बरोबर होते. संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून कागदपत्र मिळविता आले ते श्री. बाबा आढाव यांच्यामुळे! आम्ही दोघेही मिळूनच कागदपत्रांचे वाचन व टिपणे करीत असल्यामुळे त्यांच्याबरोबर होणारी विचारांची देवाणघेवाण वरील लेख लिहिण्यास उपकारक ठरली. बडोदा व कोल्हापूर येथील वास्तव्यात श्री. शांताराम सबनीस व माधव आचवल, श्री. सुरेश शिपूरकर व सौ. शिपूरकर, श्री. शंकरराव पाटील व त्यांचे कुटुंबीय यांनी साहाय्य केले.

नवी दिल्ली येथील मुक्कामात कागदपत्र धुंडाळताना डॉ. नारायण कुलकर्णी यांनी फार मदत केली. श्री. अरुण टिकेकर व प्रा. सौ. मनीषा टिकेकर यांच्या आदरातिथ्यामुळे दिल्लीतील वास्तव्यही सुखद ठरले. या सर्व नव्याजुन्या मित्रांच्या मदतीमुळेच मूळ साधने धुंडाळण्याचा हा उद्योग जिकिरीचा वाटला नाही.

आगरकर व टिळक यांच्यासंबंधी लेख लिहिताना प्रा. न. र. फाटक यांच्याबरोबर वेळोवेळी केलेल्या चर्चेचा उपयोग झाला तर डॉ. केतकरांच्या विचारसृष्टीसंबंधी लिहिण्यापूर्वी श्रीमती दुर्गा भागवत यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली होती. श्री. धनंजय कीर यांनी सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीच्या अभ्यासास आवश्यक त्या साधनांचा तलास करण्यासंबंधी उपयुक्त सूचना केल्या. या तिघाही ज्येष्ठ

अभ्यासकांनी माझी व त्यांची मते मिळतीजुळती नसतानाही नेहमीच माझ्या लेखनाबद्दल आस्था दाखवली व चर्चेसाठी तत्परतेने वेळ खर्च केला याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

श्री. दि. के. बेडेकर, श्री. पां. वा. गाडगीळ, श्री. हरिभाऊ मोटे, श्री. दिनकरराव कर्वे, श्री. भास्करराव कर्वे, डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, डॉ. बा. शं. कदम, प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख, प्रा. श्री. पु. भागवत, प्रा. शंकर वैद्य, विश्वास गंगाधर पाटील, श्री. कालिदास मोहोळकर, श्री. अनिल अवचट वगैरेंनी या पुस्तकातील लेख प्रथम प्रसिद्ध झाले तेव्हा त्याबाबतच्या प्रतिक्रिया पत्ररूपाने कळवल्या किंवा प्रत्यक्ष भेटीत सांगितल्या.

माझे ज्येष्ठ बंधु डॉ. भालचन्द्र फडके व सौ. हेमावहिनी यांचेही साहाय्य मिळाले. त्याचप्रमाणे प्रत्येक लेखाची मुद्रणप्रत तयार करण्याचे काम नेहमीप्रमाणे माझ्या पत्नीने–सौ. वासंतीने–हौसेने व काळजीपूर्वक केले.

श्री. मधुकाका कुलकर्णी यांनी हे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. मुद्रक श्री. लाटकर व त्यांचे सहकारी तसेच चित्रकार श्री. सुभाष अवचट व सूची तयार करणारे श्री. म. श्री दीक्षित यांचेही पुस्तकाच्या निर्मितीतील सहभागाबद्दल खास आभार मानावयास हवेत. या सर्वांच्या साहाय्यामुळेच हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

■

# अनुक्रमणिका

## विभाग १


१. शोध गोपाळरावांचा १–१२

(अ) आगरकरांची प्रेतयात्रा : आख्यायिका व वस्तुस्थिती

(ब) आगरकरांचे अज्ञात पत्र

(क) गोपाळराव जोशी यांचे माफीपत्र

२. वामन शिवराम आपटे १३–२२

३. न्यायालयात न गेलेला खटला २३–३०

४. वाग्युद्ध बाळगोपाळांचे ३१–४०


## विभाग २


५. शोध सत्यशोधकांचा ४१–६४

६. जेधे–जवळकर ६५–७९


## विभाग ३


७. डॉ. केतकरांची विचारसृष्टी ८१–११७

८. ‘समाजस्वास्थ्य’कारांची विचारसृष्टी ११८–१४९

९. सावरकरांची विचारसृष्टी १५०–१६७

१०. पां. वा. गाडगिळांची विचारसृष्टी १६८–१८६

सूची


■

ooooooooooooooooooooooooo

# १

# शोध गोपाळरावांचा

ooooooooooooooooooooooooo

## ( अ ) आगरकरांची प्रेतयात्रा : आख्यायिका व वस्तुस्थिती

प्रत्येक मोठ्या माणसाबाबत आख्यायिका तयार होत असतात व कालांतराने आख्यायिका हींच वस्तुस्थिती समजून त्या त्या मोठ्या माणसाबद्दल लिहिले व बोलले जाते. समाजसुधारक गोपाळराव आगरकरांना जिवंतपणी स्वतःची प्रेतयात्रा पाहावी लागली ही गोष्ट माझ्याप्रमाणेच असंख्य लोकांनीही ऐकली असणार आणि त्यात वस्तुस्थितीपेक्षा कल्पनेचा विलास असण्याची शक्यता आहे असा विचारही अनेकांच्या मनात आला नसेल. माझ्या मनातही अशी शंका आली नव्हती. मात्र आगरकरांच्या चरित्रलेखनासाठी आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी मी जेव्हा गेल्या शतकातील वर्तमानपत्रांचे अंक वाचू लागलो तेव्हा ही आख्यायिका कशी तयार झाली असावी व याबाबतची वस्तुस्थिती काय होती हे माझ्या लक्षात आले.

१८९१ साली संमतिवयाच्या बिलावरून परंपरावादी व सुधारक यांच्यामधील वाग्युद्ध निकराला आले होते. सरकारने असल्या गोष्टीत हस्तक्षेप करू नये व कायदा केला जाऊ नये असे टिळकांचे म्हणणे होते तर समाजसुधारणेसाठी अशा प्रकारचे कायदे करण्यास हरकत नाही असे आगरकर म्हणत होते. टिळक तेव्हा नुकतेच डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा देऊन बाहेर पडले होते. त्यामुळे टिळक व एकेकाळचे त्यांचे सहकारी–वामनराव आपटे, आगरकर, गोपाळराव गोखले वगैरे–यांच्यामधील तेढ विकोपाला गेली होती. अशा तापलेल्या वातावरणात शिमगी पौर्णिमा आली तेव्हा सुधारकांवर चिडलेल्या सनातन्यांनी काय धुडगूस घातला असेल याची पुरेशी कल्पना आज येणे कठीण आहे. त्या काळी ‘ पुणे-वैभव ’ नावाचे एक वर्तमान-

पत्र निघत असे. ते सुधारकांवर कडक टीका करीत असे. १८९१ सालच्या धुळवडीच्या दिवशी काय प्रकार झाला त्याचे वर्णन पुणे–वैभवाच्या अंकात प्रसिद्ध झाले होते ते केसरीच्या ३१ मार्च १८९१ च्या अंकात उद्‌धृत करण्यात आले आहे.

'गेल्या बुधवारी धुळवड होती व त्या दिवशी खेळया मुलांनी एका प्रेताची मिरवणूक काढली होती. हे प्रेत अर्थात भुशाचे होते म्हणतात. या प्रेताच्या उरावर एक दारूची बाटली बांधली होती. तोंडात चिरूट दिला होता. हातात भुस्कुटे (बिस्किटे) होती. छत्रचामराच्या ऐवजी फाटकी खेटरे व केरसुण्या होत्या. गुलालाच्या ऐवजी त्याच्या अंगावर काजळ पसरले होते! व शिकेकटारीत मडक्याऐवजी एक बूट बांधला होता! याप्रमाणे हे प्रेत प्रत्येक सुधारकाच्या दारापुढे विसावा खात खात फरासखान्याजवळ आले. तेथे एका सुधारकाने आपली पुण्याई खर्च करून प्रेतवाहक मुलांस अडविण्याचा प्रयत्न केला पण पोलिस अधिकाऱ्यांनी हा मुलांचा खेळ आहे अशी खात्री करून घेऊन त्यांस जाऊ दिले. नंतर ते प्रेत विसावा घेत घेत ओंकारेश्वराच्या वाळवंटावर पोचले. वाटेने मुलांना 'अरे, हे काय?' म्हणून विचारल्यास कोणी म्हणत हे अनाथ प्रेत आहे, कोणी म्हणत हे सगळ्यांचे प्रेत आहे, कोणी म्हणे हे सुधारकांचे प्रेत, कोणी म्हणत हे कौन्सिलरचे, कोणी म्हणे कायदेबाजाचे व कोणी तर नावदेखील घेत असत! मुलेच ती? त्यांच्या तोंडी लागतो कोण? वाळवंटात गेल्यावरदेखील हे प्रेत ब्राह्मणाच्या स्मशानभूमीत जाळू देणार नाही अशी तेथील ब्राह्मणांनी तक्रार केली. अखेर ते अर्धेमुर्धे अर्धवट जाळलेले प्रेत खेळया पोरांस नदीत मिळालेल्या गावच्या नाल्यात महारांकडून ओढून टाकावे लागले."

'पुणे-वैभवकारांनी केलेल्या या वर्णनात किती तथ्य आहे याबद्दल केसरीने म्हटले आहे : "या उताऱ्यात दिल्याप्रमाणे हकीकत बहुतेक अंशी घडली खरी पण त्यात प्रथमतःच 'खेळया मुलांनी' हे जे शब्द घातले आहेत ते खोटे आहेत. ही प्रेताची कल्पना प्रथमतः कित्येक मुले झालेल्या पोक्त वयाच्या खेळया मुलांच्या डोक्यात उत्पन्न झाल्याचे आम्हास माहीत आहे, व पुणे-वैभवकारांसही ते माहीत असेलच असे आम्हास खात्रीने वाटते. तसेच प्रेतयात्रेबरोबर काही संभावित म्हणवून घेणारी मंडळी काही कालपर्यंत होती हेही आम्हांस माहीत आहे व त्यांपैकी कित्येक नदीतटाकी जाऊन प्रेताची वाट पाहात बसली अशी खरी स्थिती असता शुद्धांतःकरणाच्या पुणे-वैभवकारांनी या कल्पनेची सारी जबाबदारी पोरांच्याच माथी का मारली असावी हे नुकत्याच घडून आलेल्या गोष्टीचा इतिहास जाणणारास कळण्यास फारशी पंचाईत पडणार नाही.

'...या प्रेताच्या मिरवणुकीत काही मुले होती हे खरे. न्यू इंग्लिश स्कुलातील शिक्षकांपैकी काहींच्या घरापुढे प्रेतास विसावा देण्यात आला त्या वेळी त्यांनी कित्येक शिक्षकांच्या नावाने तोंडातून भलभलते अभद्र शब्द काढले. तेव्हा अर्थात त्या मुलांना न्यू इंग्लिश स्कुलापैकी जे कोणी असतील त्याच्यासंबंधाने शिक्षा देण्या न देण्याचा

विचार सुपरिंटेंडेंट यांस करावा लागला. त्यांची नावे कळली आणि त्यांपैकी कित्ये-कांनी कबूलही केले. तेव्हा पुढारी होते त्यांना अशा असभ्य व गैरवर्तनाबद्दल शिक्षा द्याव्या लागल्या. शिक्षा कदाचित फाजील कडक झाली असे कोणास वाटेल त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. ' "

वरील उताऱ्यावरून काही गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे केवळ गोपाळराव आगरकरांची प्रेतयात्रा काढली गेली नव्हती तर संमतिवयाच्या बिलास पाठिंबा देणाऱ्या सर्व सुधारकांचे प्रतीक म्हणून प्रेत सजविले गेले होते. त्यामुळेच ही प्रेतयात्रा सर्व सुधारकांच्या घरासमोर थांबवीत थांबवीत नेण्यात आली. संमतिवयाच्या बिलास पाठिंबा देणाऱ्या मंडळींत रावबहादुर नूलकर, भिडे, डॉक्टर भांडारकर या ख्यात-नाम व्यक्तींबरोबर वामन शिवराम आपटे, गोपाळराव आगरकर, गोपाळराव गोखले हे न्यू इंग्लिश स्कुलातील तरुण शिक्षकही होते. आगरकर त्या वेळी ओंकारेश्वराच्या जवळच्याच वाड्यात राहात हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे त्यांच्या घरासमोरही प्रेत-यात्रा थांबविली गेली असणारच. खेरीज आगरकर त्या वेळी कायदा हवा म्हणणा-ऱ्यांची बाजू हिरीरीने मांडत होते. त्यामुळे आगरकरांच्या घरासमोर प्रेतयात्रा थांबवल्याखेरीज विरोधक पुढे गेले नसणेही समजण्यासारखे आहे.

६ एप्रिल १८९१ च्या ' इंदुप्रकाश'च्या अंकात पुण्याचे बातमीपत्र प्रसिद्ध झाले आहे. इंदुप्रकाश हे सुधारणेस अनुकूल असलेले वर्तमानपत्र होते. त्या पत्रानेही पुणे-वैभव व केसरी या पत्रांनी केलेल्या वर्णनाशी मिळतीजुळती अशीच बातमी दिली आहे. " धुळवडीचे दिवशी गावातील हिंदुधर्माभिमानी व देशाभिमानी म्हणविणाऱ्या लोकांच्या मुलांनी व काही मोठ्या टवाळ लोकांनी आपल्या मनातील सुधारकां-विषयीच्या क्रोधाची शांती करण्याकरिता सुधारकांचे प्रेत काढले व ते सर्व ठळक सुधारणावादी गृहस्थांचे घरावरून स्मशानभूमीत नेले व तेथेही ह्या अपवित्र सुधारकास दहन करणे अपवित्र असे म्हणून ते नाल्यात टाकले व आता सर्व दुनियेतील सुधारक मेले, आपला त्यांचा काही संबंध राहिला नाही असे म्हणून आनंदाने शंखध्वनी करीत पोरे घरी गेली. "

गोपाळराव आगरकरांच्या पत्नी यशोदाबाई यांनी उतारवयात आपल्या आयु-ष्यातील घटना आठवणीने सांगितल्या होत्या. त्या १९३८ साली ' स्त्री ' मासिकाने प्रसिद्ध केल्या होत्या. यशोदाबाईंच्या म्हणण्याप्रमाणे हा प्रकार घडला तेव्हा आगरकर व त्यांचे कुटुंबीय पुण्यात नव्हते. ते सर्व कऱ्हाडला कोणाच्यातरी लग्नाला गेले होते. शिमग्याच्या दिवशी ही प्रेतयात्रा काढण्यात आली होती व हा सर्व प्रकार व उपद्-व्याप एका विलायतेला जाऊन डॉक्टरीण होऊन आलेल्या विदुषींच्या पतिराजांनी केल्याची दाट वदंता होती असेही त्यांनी म्हटले आहे. यशोदाबाईंनी केलेल्या या उल्लेखावरून प्रेतयात्रा काढण्याच्या उद्योगाचे सूत्रधार डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचे पतिराज गोपाळराव जोशी होते हे उघड आहे. गोपाळराव जोशी व पुणे-वैभवकार

यांचे या काळात चांगलेच सूत जमले होते असे तत्कालीन वर्तमानपत्रांवरून दिसते. खेरीज गोपाळराव जोशांचे असलेच अन्य उपद्व्याप लक्षात घेतले तर प्रेतयात्रेच्या प्रकाराला चिथावणी देण्याऱ्यांत गोपाळराव जोशी आघाडीला असतील हे गृहीत धरावयासही हरकत नाही.

एक गोष्ट जाणवते ती ही की खुद्द आगरकरांनी हा पोरकट प्रकार फारसा मनाला लावून घेतला असे दिसत नाही किंवा धुळवडीतल्या या प्रकाराला फारसे महत्त्वही दिलेले दिसत नाही. सुधारकाच्या ६ एप्रिल १८९१ च्या अंकात 'पत्रव्यवहार' या सदरात एका पुणेकराने नाशिकहून पाठवलेले एक पत्र प्रसिद्ध झाले आहे. त्या पत्रातही प्रेतयात्रेचे जे वर्णन आहे ते पुणे-वैभव, केसरी, इंदुप्रकाश या वृत्तपत्रांनी दिलेल्या वर्णनाशी जुळणारे असेच आहे. मात्र या पत्राखाली संपादक आगरकरांनी जी टीप दिली आहे ही लक्षात घेण्यासारखी आहे: "या विषयाची असली चर्चा आता पुरे झाली. याउपर असली पत्रे आम्ही छापणार नाही." खुद्द आगरकरांनी धुळवडीच्या दिवशी काढण्यात आलेल्या प्रेतयात्रेबाबत तेव्हाही काही लिहिलेले आढळत नाही व पुढेही कधी या घटनेचा आवर्जून उल्लेख करण्याइतकी त्यांना ही घटना महत्त्वाची वाटलेली दिसत नाही. आगरकरभक्तांनी मात्र कालांतराने या घटनेला इतके महत्त्व दिले की, आगरकरांना जिवंतपणी पाहाव्या लागलेल्या या प्रेतयात्रेचा निर्देश केल्याखेरीज आगरकरांना श्रद्धांजली वाहणेच आता अशक्य होऊन बसले आहे!

— सोबत : २५–२–७७

## (ब) आगरकरांचे अज्ञात पत्र

अलीकडे मी गेल्या शतकातील वर्तमानपत्रे वाचीत असतो. केसरी किंवा सुधारक ही वर्तमानपत्रे ध्येयवादाने झपाटलेल्या बेडर व तेजस्वी माणसांनी चालविलेली होती. टिळक म्हणत त्याप्रमाणे गुळगुळीत कागदावर बुळबुळीत मजकूर छापण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रे काढली नव्हती. कोणाचेही मिंधे न होता आणि कोणाचाही मुलाहिजा न ठेवता टिळक व आगरकर लिहीत. मात्र एकेकाळचे हे जिवलग मित्र आपापसांतील मतभेदामुळे कायमचे दुरावले आणि प्रतिस्पर्धी बनून एकमेकांवर तुटून पडू लागले. १८९१ साली संमतिवयाच्या बिलाबाबतचा वाद निकराला आला. तेव्हा परंपरा जतन करू पाहणारे टिळक कर्मठ सनातन्यांना पाठीशी घालीत होते तर गोपाळराव आगरकर सुधारणेस विरोध करणाऱ्यांचा हिरीरीने समाचार घेत होते. आगरकरांच्या कडक टीकेमुळे दुखावलेल्या लोकांनी आगरकरांना ठार मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यांची तऱ्हेतऱ्हेने निंदानालस्ती केली. आपल्याविरुद्ध उठल्या जाणाऱ्या कंड्या व कुजबूज ऐकल्यानंतर आगरकरांनी ज्ञानप्रकाशात एक पत्र

प्रसिद्ध केले. ते त्यांच्या प्रांजळपणाची, स्पष्टवक्तेपणाची व निर्भयपणाची साक्ष देते. आजवर आगरकरांची चरित्रे लिहिणाऱ्यांनी किंवा त्यांचे निबंध संपादित करणाऱ्यांनी दुर्दैवाने त्यांच्या या विस्तृत पत्राकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. या पत्रात आगरकरांच्या आयुष्यातील काही महत्त्वाच्या घटनांचा उलगडा स्वतः आगरकरांनीच केला आहे. हे ऐतिहासिक महत्त्वाचे पत्र 'स्पष्ट बोला' या शीर्षकाखाली ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झाले होते. ज्ञानप्रकाशाचे या काळातील अंक मिळाले नाहीत पण खुद्द आगरकरांनी सुधारकाच्या २० एप्रिल १८९१ च्या अंकात हे पत्र समग्र उद्धृत केले आहे, ते खाली देत आहे.

रा. रा. ज्ञानप्रकाशकर्ते यांस,

वि. वि. पुढील चार ओळी वाचून पाहिल्यावर, त्या आपल्या पत्रात प्रसिद्ध करण्यास आपणाकडून अनमान होणार नाही असे वाटल्यावरून त्या आपणाकडे पाठविल्या आहेत. तरी मर्जीप्रमाणे व्यवस्था व्हावी.

धार्मिक सामाजिक विषयावरील माझी बरीच मते सांप्रतकाळी सामान्य लोकांस पसंत पडण्यासारखी नसल्यामुळे व असली मते कोणाचे मन कधीही दुखावले जाणार नाही, अशाच रीतीने प्रसिद्ध करण्याविषयी मी विशेष काळजी घेत नसल्यामुळे पुष्कळ लोकांस माझा राग येत असेल व काही लोक माझा द्वेष करीत असतील याबद्दल मला शंका नाही. तथापि आज नाही उद्या या प्राथमिक रागाचा व द्वेषाचा निरास होऊन वादग्रस्त विषयांतील सत्यासत्याचा शांतपणे विचार करण्याकडे अशा लोकांच्या मनाची प्रवृत्ती होईल अशी मला फार आशा होती. पण कित्येक पत्रांत अलीकडे जे लेख येऊ लागले आहेत त्यावरून ती माझी आशा अगदी निराधार होती अशी माझी पक्की खातरी झाली आहे. ज्याला रूढ लोकमताविरुद्ध बोलावयाचे, लिहावयाचे व वागावयाचे असेल त्याने बराच लोकापवाद साहण्यास तयार असले पाहिजे, हे मी कबूल करतो; आणि याच कारणास्तव सामान्य मनुष्यास असह्य असा जो मजकूर आजपर्यंत माझ्याविरुद्ध लिहिण्यात आला त्याकडे मी दुर्लक्ष केले. परंतु सध्या कित्येक पत्रांच्या लेखात व काही इसमांच्या बोलण्यात जे उद्‌गार निघत आहेत ते इतके अमंगल आहेत की, त्यासंबंधाने उदासीन राहणे म्हणजे हाती धरलेल्या उद्योगास आपल्या तोंडाने आपली अपात्रता कबूल करण्यासारखे होय. माझी मते ज्यांस पसंत नसतील ते त्यापुरते माझ्यावर हवे तितके तुटून पडोत, किंवा ती मोडून काढण्यासाठी पाहिजे तितक्या कटू शब्दांचा वर्षाव करोत, आजपर्यंत मी त्याबद्दल फिकीर केली नाही व पुढेही करणार नाही. परंतु न्यू इंग्लिश स्कुलातील व्यवस्थापक मंडळीचा बेबनाव होऊन त्यांपैकी काही शाळा सोडणार, ही शोचनीय गोष्ट उघडपणे बाहेर आल्यापासून वरील मर्यादा सुटत चालली, आणि थोडथोडे तिचे अतिक्रमण होता होता ती अनिष्ट गोष्ट घडल्यापासून व संमति-बिलाचा वाद उपस्थित झाल्यापासून आपापल्या पक्षाचे मंडन करण्यासाठी, आणि प्रतिपक्षाचा मोड करण्या-

साठी कोणाच्या संबंधाने काय लिहावे आणि काय न लिहावे अथवा काय बोलावे आणि काय बोलू नये याविषयी कित्येकांच्या लेखांत व भाषणांत निर्बंध म्हणून काही उरला नाही. त्यातल्या त्यात विशेष खेद करण्यासारखी ही गोष्ट आहे की, सध्या ज्यांच्या जिव्हा व लेखण्या बेताल झाल्या आहेत ते स्वतःचे वैर साधण्यासाठी आपला नीचपणाचा धंदा करीत आहेत असे नाही तर जे दीर्घद्वेषी, मत्सरी व कपटपटू लोक आपल्या शत्रूंचा सूड घेण्यासाठी धडपडत आहेत त्यांच्या पाशात सापडून ते नाचवतील तसे नाचत आहेत, पण प्रसंग पडल्यास हे पडद्याआड राहणारे सूत्रधार नामानिराळे राहून तोफेच्या तोंडी खुद्द आपणास जावे लागेल हे या मुग्ध लोकांना समजत नाही असे दिसते. माझे मित्र म्हणविणाऱ्या एकदोघांनी मला असा सल्ला दिला आहे की, माझ्याविरुद्ध आलेल्या लेखाविरुद्ध मी आजपर्यंत दुर्लक्ष केले, त्याप्रमाणे सध्याही करावे. पण मला तसे वाटत नाही. ज्यांना प्रसिद्धपणे सुधारकासारखे वर्तमानपत्र चालवावयाचे असेल, ज्यांना शाळेतील व कॉलेजातील शिक्षकांचा धंदा करावयाचा असेल, किंवा कधी काळी नीतिशास्त्राचे अध्यापक होण्याची ज्यांची महत्त्वाकांक्षा असेल, अशांच्या नीतिमत्तेविषयी कोणी शंका घेतली असता आपल्या निष्कलंकपणाविषयी लोकांची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने निराकारण केले पाहिजे, किंवा शिक्षकांचा आणि पत्रकर्त्यांचा विशेषतः सुधारकासारख्या पत्राचा धंदा सोडून देऊन दुसऱ्या हव्या त्या मार्गाने त्यांनी आपला उदरनिर्वाह करण्यास तयार झाले पाहिजे. पण येथे मला इतरांविषयी लिहिण्याची गरज नाही. आपल्या लोकांनी जी तीन महापातके मानिली आहेत, त्यांपैकी कोणतेही पातक माझ्या हातून घडले आहे असे सिद्ध करून देण्यास जर कोणी तयार असतील तर त्यांनी मर्मभेदी अस्पष्ट लेख न लिहिता माझ्याविरुद्ध जे लिहावयाचे असेल ते माझे नाव घालून उघड लिहावे. म्हणजे उभयतांचा मार्ग खुला होऊन दोनही पक्षांतील लोकांची थोड्या दिवसांत संशयनिवृत्ती होईल. कित्येक मत्सरी, दीर्घद्वेषी व निसर्गदुष्ट लोकांनी मजविषयी ज्या कंड्या पिकविण्याचा सपाटा चालविला आहे, तसा मी खरोखरीच असेन तर जितक्या थोड्या दिवसांत न्यू इंग्लिश स्कुलाशी व फर्ग्युसन कॉलेजाशी व सुधारक पत्राशी माझा संबंध तुटून मी सर्व पक्षांच्या, सभ्यांच्या निंदेस, उपहासास पात्र होईन तितका त्या संस्थांचा आणि लोकांचा फायदा आहे. या संस्थांच्या अपकर्षास माझे वर्तन अणुमात्र कारण न होवो असे मी स्वतः अंतःकरणापासून चिंतितो. तेव्हा मजमुळे या संस्थांस दुर्लौकिक येत आहे असे ज्यांना वाटत असेल त्यांना मी करद्वय जोडून अशी प्रार्थना करतो की, कोणत्याही कारणास्तव त्यांनी माझी यत्किंचित मुर्वत न ठेवता, माझ्याविरुद्ध त्यांचे जे आरोप असतील ते त्यांनी मला उघडपणे कळविण्याची कृपा करावी. ज्याकडून ते कळविण्यात येतील त्यांचे मी उपकार मानीन आणि ते निराधार व असत्य आहेत असे दाखविण्याच्या व्यवस्थेस लागेन, किंवा आज दहा-बारा वर्षे ज्या संस्थांच्या उत्कर्षासाठी निरपेक्षबुद्धीने होतील तितके परिश्रम केले त्यांस व त्यांतील

सहकाऱ्यांस प्रणाम करून त्यांचा शेवटचा निरोप घेईन, आणि या आपल्या क्षुद्र जगाच्या सांप्रत स्थितीत सत्यप्रस्थापन किती कठीण आहे याविषयी हा दुसरा मोठा अनुभव आल्यामुळे अत्यंत खिन्न होऊन, अन्य मार्गाने अवशिष्ट आयुष्य कंठण्याच्या प्रयत्नास लागेन. हे विशेष गर्हणीय आरोपांच्या संबंधाने झाले. लहानसहान आरोपांबद्दल सरकारदरबार करण्याची गरज नाही. असले आरोप कोणी कितीही आणले तरी ते सहज साहण्यासारखे असतात, किंवा उघडपणे थोडेसे बोलल्याने किंवा लिहिल्याने त्यांचा परिहार होऊन तत्संबंधाचा चुकीचा ग्रह दूर होण्यासारखा असतो. उदाहरणार्थ, परवा न्यू इंग्लिश स्कुलात जी शिक्षक लोकांना मेजवानी झाली तिला मी गेलो नसल्यामुळे कित्येक लोक मजवर जो दुटप्पीपणाचा व भित्रेपणाचा आरोप आणीत आहेत तो. रा. रामभाऊ जोशी न्यू इंग्लिश स्कुलातील शिक्षकांपैकी एक शिक्षक आहेत. यांच्या वहिणीचा नुकताच पुनर्विवाह झाला आहे व तो घडवून आणण्याच्या कामात रामभाऊंनी केलेल्या खटपटीची तारीफ सुधारकात केली आहे. तेव्हा रामभाऊंशी पंगत होण्याचा प्रसंग आला असता, तो आगरकराने टाळला, तस्मात या सुधारकाचे बोलणे एका प्रकारचे व करणे दुसऱ्या प्रकारचे हे सिद्ध झाले! अशा प्रकारे कुतर्क करून हवे ते बहकत सुटणाऱ्या लोकांस म्हणावे तरी काय हे मला समजत नाही. आगरकर जेवायला गेला नाही हे खरे; पण का गेला नाही, याची चौकशी कोणी तरी केली आहे काय? कोणत्याही रीतीने विशेष व्यक्तीच्या अब्रूचा होईल तेवढा नाश करावयाचा, अशा पणाचा ज्यांनी विडा उचलला आहे, ते खरेखोटे पाहण्याच्या कटकटीत कशाला पडतील? जणो काय ज्या मानाने आगरकराचा दुर्लौकिक होत जाईल त्या मानाने यांची प्रतिष्ठा वाढणारच आहे! वास्तविक पाहता ज्यांनी रामभाऊंच्या पंगतीस बसून त्यांचे गौरव करण्याचे अभिवचन दिले होते, त्यांनी ते मोडल्याबद्दल त्यांच्या तोंडात शेण घालावयास पाहिजे होते! पण प्रेम अंध आहे! ज्याला आपण एकदा काही कारणामुळे भाळलो त्याचे दोष दिसेनासे होतात इतकेच नाही तर त्याचे जागी गुणांचा भास होऊ लागतो! असो. यासंबंधाने माझ्या न जाण्याचे खरे कारण थोडक्यात सांगून झालेला गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करतो.

थोड्या महिन्यांपूर्वी माझी मातोश्री वारली तेव्हा क्षौर करणे मला उचित न वाटल्यावरून मी ते केले नाही. तथापि ही गोष्ट माझ्या मित्रांपैकी कित्येक धार्मिक मित्रांस रुचणार नाही व क्वचित प्रसंगी मला आपल्या घरी जेवावयास बोलवावे तरी पंचाईत व न बोलवावे तरी पंचाईत अशा संकटात ते पडतील असे वाटल्यावरून त्यांना ती पंचाईत न पडू देण्यासाठी, व माझ्या क्षीण प्रकृतीस दुसऱ्याच्या घरी जेवायला जाणे सुखावह होत नसल्यामुळे ते टाळण्यासाठी, मी परान्न न घेण्याचा निश्चय केला व कोणी आमंत्रण देण्यास आला असता, 'माझी मातोश्री वारली आहे. तेव्हा मला परान्न घ्यावयाचे नाही.' असे सामान्यपणे उत्तर देण्याचा प्रघात सुरू

केला. मातोश्रीस सद्गती प्राप्त होईल किंवा मला पुण्य लागेल या आशेने हा नियम मी केला नाही, हे सांगायला पाहिजे असे नाही. तो मी वर सांगितलेल्या दोन कारणांसाठी केला व तदनुसार रा. रा. गणपतराव सोनी, गोपाळराव गोखले, चिंतोपंत भानू, काका जोगळेकर व भाऊसाहेब लेले यांसारख्या अगदी निकट स्नेह्यांनी दिलेली आमंत्रणे पत्करली नाहीत व तोच नियम शाळेतील मेजवानीस लावला. मी क्षौर केले नाही हे या सर्वांस ठाऊक असून यांनी मला आमंत्रण देण्याची मेहेरबानी केली. यावरून त्या पापामुळे मी अपंक्त करण्याइतका पतित झालो आहे, असे त्यांस वाटले नसावे, हे उघड आहे. पण दुसऱ्या एका गृहस्थाने मला सत्यनारायणाच्या कथेस व भोजनास बोलाविले होते. ज्या वेळेस या गृहस्थाने मला प्रथम आमंत्रण दिले त्या वेळेस त्यास 'पाहीन' म्हणून मी सांगितले होते, पण जाण्याचा दिवस येऊन ठेपला, त्या दिवशी 'येत नाही' म्हणून सांगून पाठविले. पुढे त्याची आमची गाठ पडल्यावर, त्याने प्रश्न केला असता न जाण्याचे खरे कारण त्यास सांगितले तेव्हा तो एकाएकी आश्चर्याकुल होऊन असे म्हणाला की, 'शाब्बास! धर्मभ्रष्टा शाबास! माझ्या घरी त्या दिवशी गिळायला आला नाहीस ही माझ्यावर मोठी मेहेरबानी केलीस! तुझ्यासारख्या अपवित्राच्या पंगतीस मी बसलो असतो तर माझ्या हातून मोठे पाप घडते व त्याबद्दल मला प्रायश्चित्त घ्यावे लागते.' तेव्हा ज्या कृत्याने लोकांस प्रायश्चित्त घ्यावे लागून जे स्वतःसही सुखावह नाही, ते करण्यात काही अर्थ नाही, असे समजून हा नियम मी केला आहे. तथापि ज्यांना हा मी रामभाऊंशी पंगत टाळण्यासाठी फक्त ज्या वेळचा त्या वेळेस केला असे वाटत असेल त्यांना मी उघडपणे असे सांगतो की, पुनर्विवाहाच्या पंगतीस बसलेल्यांची आणि माझी पंगत झाली आहे इतकेच नाही; तर रामभाऊंशी पंगत करण्यास मला बिलकुल भीती वाटत नाही, हे खुद्द त्यांच्या प्रत्ययास यावयाला पाहिजे असेल तर त्यांनी मनास येईल तो दिवस कळवावा, म्हणजे त्या दिवशी रामभाऊंस जेवावयास बोलावून त्यांच्या पंगतीस बसतो; आणि असे करण्यास विशेष मानसिक धैर्य किंवा धाडस लागते अशी त्यांची कल्पना असेल तर या धैर्याचे प्रदर्शन पाहण्यास त्यांनी मेहेरबानी करून हजर राहावे अशी त्यांस विनंती करतो! अशा रीतीने 'धीरपद' प्राप्त होण्याचा संभव असेल तर या लोकांनी त्याचा भाव फारच उतरून टाकला आहे असे म्हटले पाहिजे.

वर्तमानपत्रात अशा तऱ्हेचा मजकूर छापून त्याची जागा अडविणे चांगले नाही खरे, पण अलीकडे कित्येक वर्तमानपत्रांत विशेष व्यक्तीस उद्देशून चालू असलेल्या चर्चेच्या स्वरूपाकडे लक्ष घालाल व या पत्रविस्ताराबद्दल माफी कराल, अशी आशा आहे. कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र सेवक

गोपाळ गणेश आगरकर

— सोबत : १३-२-१९७७

## (क) गोपाळराव जोशी यांचे माफीपत्र

सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. ज. जोशी यांच्या 'आनंदी गोपाळ' या चरित्रपर कादंबरीमुळे व त्यावर आधारलेल्या नाटकामुळे गोपाळराव जोशी हे नाव महाराष्ट्रात आता असंख्य लोकांना माहीत झाले आहे. श्री. ज. जोशी यांच्यामुळे एका अर्थाने गोपाळरावांना पुनर्जन्म मिळाला. एरवी गोपाळराव जोशी हे नाव एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा अभ्यास करणाऱ्या मोजक्या मंडळीखेरीज फारसे कोणास माहीत नव्हते. मात्र श्री. ज. जोशी यांनी आपली कादंबरी काशीताई कानिटकर यांनी लिहिलेल्या आनंदीबाई जोशी यांच्या चरित्राच्या आधारे लिहिल्यामुळे व कादंबरी रोचक व रंगतदार करण्यासाठी जाणूनबुजून कालविपर्यास करून आनंदीबाई वारल्यानंतर गोपाळराव जोशी यांच्या आयुष्यात घडलेल्या काही घटनांचा मालमसाला 'आनंदी गोपाळ' या कादंबरीत मिसळल्यामुळे गोपाळराव जोशी या माणसाचे कादंबरीत व नाटकात रेखाटले गेले आहे ते केवळ एक व्यंगचित्र ! गोपाळराव जोशी हे एक विक्षिप्त, जिद्दी, जिभेला हाड नसलेले व कशाचा धरबंध नसलेले सामान्य गृहस्थ होते अशी प्रतिमा कादंबरी वाचणाऱ्या व नाटक पाहणाऱ्याच्या मनावर उमटते.

मात्र त्या काळातील वृत्तपत्रे वाचली तर गोपाळराव हे एक प्रामाणिक, मनस्वी, निःस्पृह, दृढनिश्चयी, स्वार्थत्यागी गृहस्थ होते असे समकालीन थोरामोठ्यांचे मत होते असे दिसते. त्यामुळे वरवर पाहता विचित्र वाटणाऱ्या त्यांच्या कोणत्याही कृतीमागची भावना समजून घेण्याचा त्या काळी प्रयत्न केला जात होता असे लक्षात येते. १० नोव्हेंबर १८९१ च्या अंकात केसरीकर्त्यांनी त्यांच्यासंबंधी लिहिले होते. "गोपाळराव जोशी हे तऱ्हेवाईक असले तरी प्रामाणिक आहेत असा आमचा समज आहे आणि एवढ्याचकरिता स्वामीस खोटे भासविण्याचा प्रयत्न करणाऱ्या रावबहादुरापासून ते लेखणी झिजव्या एडिटरापर्यंतच्या लोकांपेक्षा त्यांची किंमत आम्ही जास्त समजतो." गोपाळराव जोशी ख्रिस्ती झाले ते आनंदीबाई जोशी वारल्यानंतर चार वर्षांनी म्हणजे २९ जून १८९१ रोजी! गोपाळरावांच्या या कृतीवर भाष्य करताना इंदुप्रकाशाच्या पुण्याच्या बातमीदाराने १३ जुलै १८९१ च्या अंकात म्हटले होते, "हा पुरुष आहे निःस्पृह व मनस्वी. मनाला जे योग्य वाटते ते बिनदिक्कत करतो." १८९२ च्या सप्टेंबर महिन्यात गोपाळराव विलायतेस गेले ही बातमी देताना केसरीकर्त्यांनी २७ सप्टेंबर १८९२ च्या अंकात लिहिले, "जोशीबोवाबद्दल कोणाचे काहीही मत असो, त्यांचे अलीकडील वर्तन कोणास पसंत असो वा नसो, आमच्या मते, त्यांच्या हातून सामान्य जनाकडून घडणारी अशी एक तरी गोष्ट घडली हेच विशेष आहे. कै. डॉ. आनंदीबाईच्या बुद्धिमत्तेबद्दल व दृढनिश्चयाबद्दल तिच्या चरित्रात बरीच तारीफ केली आहे पण त्याहीपेक्षा आमच्या इकडील

स्त्रियांची स्थिती लक्षात आणता गोपाळरावजींच्याच दृढनिश्चयाची व स्वार्थत्यागाची जास्त तारीफ केली पाहिजे असे आम्हास वाटते. ”

तत्कालीन वृत्तपत्रे चाळली तर गोपाळरावांसंबंधी असे कितीतरी अभिप्राय आढळतील व श्री. ज. जोशी यांना वाटते तितका गोपाळराव जोशी हा सामान्य माणूस नव्हता हेही लक्षात येईल. थोरामोठ्यांच्या घरी वावर असलेला एक हरकाम्या व चक्रम माणूस एवढेच केवळ पुण्याच्या सार्वजनिक जीवनात गोपाळराव जोशी यांचे स्थान नव्हते. आपल्या कल्पक व खोडकर स्वभावामुळे अनेक क्लृप्त्या योजून गोपाळराव जोशी त्या काळी धमाल उडवीत असत व भल्याभल्यांची भंबेरी उडवीत असत. हे उद्योग करताना अनेकदा त्यांच्या हातून काही माणसांवर अन्याय होई. सज्जनांवर निष्कारण चिखलफेक करण्यातही ते सामील होत पण आपली चूक लक्षात येताच ते सरळ माफी मागून मोकळेही होत. १८९१ साली संमतिवयाच्या बिलावरील वादविवादाच्या वेळी समाजसुधारक गोपाळराव आगरकर यांच्यावर भलभलते आरोप करण्यात आले होते. त्यामुळे आगरकरांनी ज्ञानप्रकाशात पत्र लिहून आपली भूमिका स्पष्ट केली. आगरकरांची निंदानालस्ती करण्यात गोपाळराव जोशी आघाडीला होते पण आपली चूक लक्षात येताच गोपाळरावांनी आगरकरांची जाहीर माफी मागितली. गोपाळरावांचे ‘ भ्रम दूर झाला ’ या शीर्षकाचे माफीपत्र व त्यावरचा संपादकीय अभिप्राय ज्ञानप्रकाशाच्या ४ मे १८९१ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. सुधारकाच्या ११ मे १८९१ च्या अंकात हा सारा मजकूर उद्धृत करण्यात आला होता. तो खाली दिला आहे.

“ रा. रा. ज्ञानप्रकाशकर्ते यांस, वि. वि. प्रोफेसर आगरकर यांस मी खाजगी दोषारोपाचे एक पत्र पाठविले होते हे आपल्यास कळविलेच आहे. एके दिवशी रात्री एकलाच बसलो असता माझे मन मला खाऊ लागले. आपण उगीच दुसऱ्याच्या मनास दुःख दिले. कारणावाचून विकत श्राद्ध हाती घेतले. बरे ते घेण्यास आधार तरी काय? गटारबातम्या हेच सबळ प्रमाण धरले तरी दुसऱ्यास खास दोषी ठरविता येते काय? नाही, नाही असे केले तर एकही मनुष्य निर्दोषी ठरणे कठीण. अरेरे, हा केवढा माझ्या हातून प्रमाद झाला. मनुष्य भ्रमांध झाला. म्हणजे त्यास सदसद्विचार सोडून जातो की काय कोण जाणे. निदान माझे तरी आगरकर यांस पत्र लिहिताना झाले होते. असे वाटते यात काही संदेह नाही. असो. झाले ते झाले. याबद्दल करद्वय जोडून क्षमा मागणे इष्ट असे माझे मनास आले. दुसरे दिवशी ऐन दोन प्रहरी उन्हाच्या तापाने ग्रस्त झालेला घरी आलो. पाहतो तो खिडकीत एक पत्र पडले होते. ते हाती घेतले. त्यावर आगरकरांचे नाव असल्यामुळे हे माझ्या पत्रास उत्तर असे वाटून ते उघडून वाचण्याची छाती होईना. त्यात त्यांनी माझी चांगली खरडपट्टी काढून कानउघाडणी केली असेल. अगोदरच रात्री पश्चात्ताप झाला होता आणि त्यात हे कटुरोमांच आणणारे शब्द वाचले तर जेवण जायचे नाही हे मनात आणून मी जेवावयास गेलो.

भोजनोत्तर निवांतपणी हे पत्र हाती घेऊन वाचण्यास सुरुवात केली. काय सांगू आदी-पासून तो इतिपर्यंत एक की हो रागाचा किंवा मर्मभेदक शब्द पाहण्यात आला नाही. उलटे हे उत्तर इतके शांततेचे व समर्पक होते की, आगरकर जर येथे असते तर मी त्यांच्या पायांवर जाऊन डोकीच ठेवली असती. अशा पुरुषावर दोषारोप करणे म्हणजे पदरी पूर्वजन्माचे महत्पाप असले पाहिजे. त्यावाचून मनुष्यास अशी इच्छा होणे नाही. जे मी निंद्य आरोप त्यांच्यावर घालू पाहात होतो, त्यातून त्यांनी आपली सुटका फारच सुरेख रीतीने करून घेतली आहे. यापेक्षा जास्ती सफाई करून घेण्याचे परमेश्वराने मानवाच्या हाती ठेविले नाही. मनुष्य लबाड नसता तर त्याला जर कोणी तसा आहे म्हणून म्हणेल त्यांनी सर्व उपाय हरल्यावर परमेश्वराकडे बोट दाखवावे हे उचित. पाठीमागे उगीच भागूबाईसारख्या नालस्त्या करण्यापेक्षा आपलेच पंच नेमून कोणी चौकशी करते तर या हिंदुस्थानची लाज राहिली असती. परंतु तसे करण्याचे आमच्या प्रारब्धी नाही. चहोस्यावर बसून, जाईल ती नरनारी दूषित आहे हे म्हणण्याचा आम्ही हिंदूंनी विडा उचलला आहे की काय कोण जाणे. कसेही असले तरी माझा मी अपराध पदरात घेऊन प्रोफेसर आगरकरांपाशी मी आगळीक केली याबद्दल मी त्यांची क्षमा मागतो. प्रोफेसर आगरकर यांचे मला आलेले खाजगी पत्र जे वाचतील त्यांची मजप्रमाणेच त्यांचेविषयी पूज्यबुद्धी होईल अशी माझी खात्री आहे.

गोपाळ विनायक जोशी

पुणे. २-५-९१"

या पत्रासंबंधाने ज्ञानप्रकाशकारांनी पुढील लेख लिहिला आहे. " 'भ्रम दूर झाला' या शिरोलेखाखाली दुसरीकडे रा. गोपाळ विनायक जोशी यांचे पत्र छापले आहे ते वाचकांनी अवश्य वाचावे. प्रो. गोपाळ गणेश आगरकर यांस काही आरोपांच्या संबंधाने खाजगी पत्र रा. जोशी यांनी पाठविले होते. त्या पत्रास आगरकरांचे आलेले खाजगी उत्तरावरून व इतर जी माहिती समजली त्यावरून रा. गोपाळराव जोशी यांनी प्रो. आगरकरांचे मनास दुःख होणारे पत्र आपण त्यास पाठवले असून त्यांची माफी त्यांनी या पत्रात मागितली आहे. रा. गोपाळराव जोशी यांची नेहमीची लिहिण्याची तऱ्हा काही अंशी विनोदासारखी वाटणारी असल्यामुळे सदर माफीचे पत्र गोपाळराव जोशांनी विनोदाने लिहिले आहे की काय अशी कदाचित कोणाची समजूत जर होईल तर त्यांच्या माहितीकरता आम्ही असे कळवितो की, रा. गोपाळराव जोशी यांनी सदर पत्रात जसे लिहिले आहे तसे खरोखरच त्यांचे मनास वाईट वाटले आहे व प्रो. आगरकरांवर विनाकारण आपण दोषारोप केला याबद्दल त्यांस मनापासून पश्चात्ताप झाला आहे असे त्यांनी आम्हास प्रत्यक्ष सांगितले. तेव्हा सदर माफीपत्राविषयी काही एक शंका मनात घेण्याचे कारण नाही. गटारबातम्यांवर विश्वास ठेवून व एकतर्फी हकीकत ऐकून एखाद्या पुरुषावर आरोप करण्यास प्रवृत्त होण्यात किती मोठी चूक होते हे या उदाहरणावरून लोकांस स्पष्ट समजेल. काही कारणाने बहुजनसमाजाला

ज्यांची मते मान्य नाहीत अशा प्रोफेसर आगरकरांसारख्याविषयी खोट्यानाट्या कंड्या हव्या त्या उठवायच्या व सामान्य लोकांचा चटकन त्यावर विश्वास बसण्याचा संभव आहे तेव्हा अशा पुरुषाविरुद्ध आपले मत बनविण्यापूर्वी विचारी म्हणविणाऱ्या लोकांनी तर फारच सावधगिरी ठेविली पाहिजे. कान आणि डोळे यांत चार बोटांचे अंतर आहे, परंतु ते चार हजार कोसांचे अंतर आहे असे मानावे, असे एका विद्वानाचे जे म्हणणे आहे ते काही खोटे नाही. प्रो. आगरकर यांस रा. जोशी यांनी पाठविलेले पत्र आमचे पाहण्यात आले नाही. परंतु प्रो. आगरकरांचा जो जबाब आला आहे तो रा. जोशी यांनी आम्हास कृपा करून वाचून दाखविला. तो वाचून पाहता प्रो. आगरकरांनी सदर जबाब शांतपणाने व फार चांगला लिहिला आहे असे आमचेही मत झाले. ‘ मिल्लसारख्या मोठमोठ्या पुरुषांवर अनेक लोकापवाद झाले मग मजसारख्यांची कथा काय ? ’ अशा अर्थाचे एक वाक्य प्रो. आगरकरांचे पत्रात आहे व आपल्याविषयी मूर्ख व कुत्सित बुद्धीच्या लोकांनी ज्या कंड्या पिकविल्या आहेत त्या कालांतराने खचित खोट्या ठरतील; परंतु आज लोकापवादाचा हल्ला सहन करावा लागत आहे याबद्दल त्यांस फार वाईट वाटत आहे असेही प्रो. आगरकरांचे सदर पत्रावरून दिसते. मनुष्याचे नैतिक वर्तन खरोखरच शुद्ध असून केवळ सार्वत्रिक विषयाच्या मतभेदामुळे लोकांनी हवे तसे आरोप त्याच्या नैतिक वर्तनाविषयी करावे ही गोष्ट कोणाच्या मनास दुःख देणार नाही ? परंतु प्रो. आगरकर यांस आम्ही असे सांगतो की अप्रबुद्ध, कुत्सित व मूर्ख लोकांनी त्यांच्याविषयी कितीही खोट्यानाट्या कंड्या उठविल्या तरी विचारी व समंजस लोकांच्या दृष्टीने आगरकरांची किंमत यत्किंचित कमी झाली नाही किंवा पुढे होणार नाही. उतावीळ माणसास जरी त्या कंड्या सकृद्दर्शनी खऱ्या वाटल्या तरी खरी हकीकत समजल्यावर त्यांस पश्चात्ताप होईल हे गोपाळराव जोशी यांचे उदाहरणावरून प्रो. आगरकरांस स्पष्ट दिसेल. रा. जोशांनी आपले हातून घडलेल्या चुकीबद्दल सरकाररीतीने माफी मागण्याचे भाग पडले नसताही प्रो. आगरकरांची क्षमा मागितली व उताविळेपणाने त्यांचे हातून घडलेल्या पातकाचे क्षालन केले हे फार चांगले झाले. ”

— सोबत : २५–३–१९७७

○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○

# २

# वामन शिवराम आपटे

○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास वाचताना नवल वाटते तसेच दुःखही होते. इंग्रजी राजवट सुरू झाल्यानंतरच्या काळात जीवनाच्या विविध क्षेत्रांत आपल्या त्यागाने, विद्वत्तेने व कर्तृत्वाने मोलाची भर घालून महाराष्ट्राचे व पर्यायाने साऱ्या देशाचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करणारी किती तरी माणसे गेल्या शतकात होऊन गेली. इतकी मोठी माणसे इतक्या मोठ्या संख्येने एकाच काळात वावरत होती याचे जसे आश्चर्य वाटते तसेच जेमतेम तिशी उलटते आहे तोच किंवा चाळिशी गाठण्याआधीच मृत्युमुखी पडलेल्या मोठ्या माणसांची संख्याही काही थोडीथोडकी नाही हे पाहून दुःखही होते. ऐन उमेदीच्या वयात काळाने हिरावून नेलेल्या कर्तबगार व व्यासंगी विद्वानांची संख्या जाणण्याइतकी मोठी असल्यामुळेच आपल्याकडील विद्वान अकाली का मरतात या प्रश्नाची न्यायमूर्ती रानडे, डॉक्टर भांडारकर व लोकमान्य टिळक यांनी जाहीररीत्या चर्चा केली होती. बाळशास्त्री जांभेकर, भास्कर पांडुरंग तर्खडकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, डॉक्टर आनंदीबाई जोशी, गोपाळराव आगरकर, नाटिकाकर्ते वासुदेवराव केळकर ही अकाली गळून पडलेल्या काही मोठ्या माणसांची नावे सहज लक्षात येतात. आपल्याला मिळालेल्या अल्पायुष्यात या मंडळींनी केलेली कामगिरी पाहिली की यांना दीर्घायुष्य लाभले असते तर यांनी केवढे कर्तृत्व गाजवले असते असे वाटल्यावाचून राहात नाही. ज्यांच्या अकाली मरणाने समाजाचे फार नुकसान झाले असे वाटावे अशा एकोणिसाव्या शतकातील मोठ्या माणसांपैकी वामन शिवराम आपटे हे एक होत.

आज वामनराव आपट्यांची आठवण उरली आहे ती त्यांच्या संस्कृत-इंग्रजी शब्दकोशाच्या रूपाने! डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थांमध्ये त्यांची स्मृती

जागवली जाते ती न्यू इंग्लिश स्कूलचे पहिले सुपरिंटेंडेंट व फर्ग्युसन महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म्हणून! अवघ्या चौतीस वर्षांचे आयुष्य वामनरावांच्या वाट्याला आले, पण एवढ्या लहानशा कालावधीत वामनरावांनी चिरस्थायी स्वरूपाची कामगिरी केली. प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीने झगडून वामनरावांनी विद्येच्या क्षेत्रात जे पराक्रम केले व ज्या निष्ठेने त्यांनी न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन महाविद्यालय या महाराष्ट्राला भूषणभूत ठरलेल्या संस्थांना नावारूपाला आणले त्याबद्दल मात्र आज फारच थोड्याजणांना माहिती आहे.

१८५८ साली वामन शिवराम आपटे सावंतवाडी संस्थानातल्या आसोलीपाल या खेडेगावात जन्मले. त्यांचे वडील शिवरामपंत आपटे हे सुखवस्तू पंडित होते. एका मित्राला जामीन राहिल्यामुळे शिवरामपंतांना आपल्या साऱ्या मालमत्तेस मुकावे लागले. त्या धक्क्यातून ते सावरले नाहीत आणि वामनराव सात-आठ वर्षांचे असतानाच शिवरामपंत कफल्लक अवस्थेत वारले. तेव्हा वामनरावांच्या मातोश्रींनी वामनराव व त्यांची भावंडे यांना घेऊन गाव सोडले. मुलांच्या शिक्षणासाठी वामनरावांच्या मातोश्रींनी प्रथम बेळगावला नातेवाइकाकडे आश्रय घेतला व मग त्या कोल्हापूरला आल्या. वामनराव व त्यांचे दोघे मोठे भाऊ शाळेत जाऊ लागले. कोल्हापूरच्या सरकारी शाळेचे मुख्याध्यापक महादेव मोरेश्वर कुंटे यांना या निराधार मुलांबद्दल ममत्व वाटल्याशिवाय राहिले नाही.

वामनरावांच्यावर लहान वयात कोसळलेली संकटपरंपरा कोल्हापूरला आल्यावरही थांबली नाही. त्यांचा सर्वांत थोरला भाऊ कॉलऱ्याच्या साथीस बळी पडला आणि मातोश्रीही त्यानंतर पंधरवड्यातच मृत्युमुखी पडल्या! मात्र वामनराव व त्यांचे वडील बंधू माधवराव या पोरक्या मुलांनी मधुकरी मागून आपले शिक्षण पुरे करण्याचा निर्धार सोडला नाही. वामनरावांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेने व अफाट स्मरणशक्तीने त्यांचे शिक्षक दिपून जात. त्या काळात मॅट्रिक होणाऱ्यांची संख्याही फार मोठी नसे. वामनराव १८७३ साली या परीक्षेस बसले होते तेव्हा फक्त ९९५ विद्यार्थी या परीक्षेस बसले होते. परीक्षेचे निकालही कडक लागत. १८७३ साली मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या फक्त ३५५ होती. संस्कृत विषयासाठी असलेली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळवणे ही मोठी सन्मानाची बाब समजली जात असे. वामनरावांनी ही शिष्यवृत्ती मिळवली आणि ते वडील बंधू माधवरावांच्या पाठोपाठ डेक्कन कॉलेजात दाखल झाले.

विद्यार्थिदशेत वामनराव म्हणजे परीक्षेत अव्वल दर्जाचे यश हमखास मिळवणारे एक यंत्र होते असा अनेकांचा समज झालेला दिसतो. 'दुर्दम्य'कार गंगाधर गाडगिळांनी वामनरावांचे असे चित्र कादंबरीत रंगवले आहे ते खरे म्हणजे वामनरावांना अन्याय करणारे आहे. वामनराव आपटे म्हणजे अभ्यासासाठी नेमलेल्या पुस्तकापलीकडे अन्य गोष्टींत लक्ष न घालणारे एक परीक्षाप्रवीण विद्यार्थी होते हा समज बरोबर

नाही. विद्यार्थी असताना टिळक जसे अभ्यासाखेरीज अनेक उलाढाली करीत त्याचप्रमाणे वामनरावही करीत होते असे दिसते. १८७६ साली पीटर्सन व लार्किन या प्राध्यापकांविरुद्ध डेक्कन कॉलेजातील विद्यार्थ्यांनी तक्रारअर्ज केले होते. विद्यार्थ्यांचे हे आंदोलन बरेच तीव्र स्वरूपाचे असावे. कारण प्राध्यापकांविरुद्ध आंदोलन संघटित करण्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्याची बंदी करण्यात आली व त्यामुळे चळवळ्या विद्यार्थ्यांचे एक वर्ष फुकट गेले. वामनराव आपटे या चळवळ्या विद्यार्थ्यांतले एक असल्यामुळे त्यांचेही एक वर्ष फुकट गेले, असे इंदुप्रकाशने त्यांच्यावरील मृत्युलेखात म्हटले आहे.

डेक्कन कॉलेजातले विद्यार्थी संस्कृत नाटके बसवीत व हे नाट्यप्रयोग पाहण्यास पुण्यातील प्रतिष्ठित मंडळी गर्दी करीत. १८७१ साली विष्णुशास्त्री चिपळूणकर विद्यार्थी असताना 'वेणीसंहार' या नाटकाचा प्रयोग करून त्या वेळच्या विद्यार्थ्यांनी ही प्रथा पाडली. या पहिल्या नाट्यप्रयोगात खुद्द शास्त्रीबुवांनी काम केले होते. वामनराव आपटे विद्यार्थी असताना डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'उत्तररामचरितम्'चा प्रयोग केला होता. या नाट्यप्रयोगातील सीतेची भूमिका वामनरावांनी उत्तम अभिनय करून वठवली होती, अशी हकीकत गोविंद चिमणाजी भाटे यांच्या अप्रकाशित आत्मवृत्तात दिलेली आहे. भाटे म्हणतात, "त्यांची मूर्ती त्या भूमिकेला फार योग्य होती. गोरापान रंग, गोंडस गाल, हसतमुख चेहरा, आकर्षक पाणीदार सतेज डोळे व एकंदर निरोगी प्रमाणबद्ध शरीरयष्टी ही सर्वच स्त्रीवेषाला अनुकूल होती. आपटे कलाकुशल व संस्कृतज्ञ होते, एवढेच नाही तर त्यांची बुद्धी अष्टपैलू होती. डेक्कन कॉलेजात त्या वेळी संजाना म्हणून गणितज्ञ पारशी विद्यार्थी होते. आपट्यांच्या संस्कृतमधील प्रावीण्याबद्दल विद्यार्थ्यांची बोलणी चालली असताना संजाना म्हणाले, 'संस्कृतसारख्या मर्यादित भाषेतील प्रावीण्य कोणीही मिळवील, पण गणिताच्या वाढत्या व कठीण विषयात प्रावीण्य मिळविणे ही निराळीच गोष्ट आहे.' त्यावर आपटे म्हणाले, 'पैज मारता का? मी तुमचा गणित विषय घेऊन तुमच्यावर नंबर मिळवितो.' झाले पैज ठरली. आपट्यांनी आपला संस्कृतचा अभ्यास बाजूस ठेवला आणि गणित विषय घेऊन ते बी. ए. परीक्षा पहिल्या वर्गात पास झाले व त्यांनी संजानांच्या वर नंबर पटकावून दाखविला. अशी अद्वितीय बुद्धिमत्ता व आत्मविश्वास आपट्यांच्या ठायी होता."

वामनराव आपटे १८७७ साली बी. ए. ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले त्याच वर्षी त्यांनी संस्कृत या सक्तीच्या विषयासाठी असलेले भाऊ दाजी पारितोषिकही पटकावले. १८७९ साली ते एम्. ए. चा अभ्यास करीत होते तेव्हा टिळक-आगरकरही डेक्कन कॉलेजच्या वसतिगृहात राहात. शिक्षणसंस्था काढण्याचे संकल्प ते बोलून दाखवीत होते. आपट्यांना हे सारे मनोराज्य वाटे. इंदुप्रकाशकारांनी १५ ऑगस्ट १८९२ रोजी लिहिलेल्या सात कॉलमी मृत्युलेखात आपट्यांच्या या प्रति-

क्रियेचे वर्णन केले आहे. " कॉलेजच्या खोलीमध्ये बसून आगरकर, टिळक वगैरेंचे विचार चालत असत. त्यांच्या विचारास आपटे हे मनात आणि उघड हसत असत, आणि म्हणत की, तुम्ही म्हणता तसे मलाही वाटते. पण हे व्हावे कसे? किती जोखमीचे, किती खर्चाचे हे काम आहे याचा विचार करणे जरूर आहे. अशा रीतीने ते आपली कातरता दाखवीत असत. " म्हणजे न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेचे बेत आगरकर–टिळकांनी केले व विष्णुशास्त्री चिपळूणकरांशी वाटाघाटी केल्या तेव्हा वामनरावांनी एम्. ए. च्या परीक्षेवर लक्ष केंद्रित केले होते. भगवानदास झाला पारितोषिक मिळवून वामनरावांनी एम्. ए. च्या परीक्षेतही उज्ज्वल यशाची परंपरा राखली.

त्या काळात बहुतेकांचे विवाह लहान वयातच होत असत. वामनराव आपट्यांचा विवाहही ते कॉलेजमध्ये शिकत असतानाच गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक काका' यांच्या मुलीशी झाला होता. शिक्षण संपल्यानंतर वामनराव काही दिवस मिशनच्या शाळेत शिकवीत होते. त्यांना हवी तशी व हवी तेथे सरकारी नोकरी मिळत नव्हती. अखेर १८८० च्या ऑगस्ट महिन्यात आपटे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. १८७९ च्या अखेरीस आगरकरांना एम्. ए. परीक्षेत अपयश आल्यामुळे आगरकर १८८० साली न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली तेव्हा शाळेस येऊन मिळाले नव्हते. पण एम्. ए. चा अभ्यास करीत असतानाही शाळा नावारूपाला आणण्याच्या दृष्टीने विष्णुशास्त्री, टिळक व नामजोशी, या संस्थापकांनी चालवलेल्या प्रयत्नांत आगरकरांचाही वाटा असे. वामनराव आपट्यांचे मन वळवून त्यांना आपल्या उपक्रमात सामील करून घेण्यात टिळक-आगरकरांना यश आले. एकदा शाळेचे काम स्वीकारल्यानंतर मग मात्र वामनरावांचे चित्त कधी द्विधा झाले नाही. त्यानंतर मनाजोगी सरकारी नोकरी चालून आली असतानाही वामनरावांनी ती नाकारली व त्याबद्दल शिक्षणसंचालक चॅटफील्ड यांचा रोषही पत्करला; असे विष्णुशास्त्र्यांनी आपल्या बंधूंना सांगितलेल्या आठवणीवरून दिसते.

न्यू इंग्लिश स्कूलच्या उपक्रमात सामील होताना वामनरावांनी काही अटी घातल्या होत्या. शाळेच्या कामाखेरीज ग्रंथलेखन करून पैसे मिळविण्याचा त्यांचा इरादा त्यांनी आरंभीच बोलून दाखवला होता. त्यांनी तसे केल्यास इतरांनी हरकत घेऊ नये असे इतरांकडून कबूल करून घेतल्यानंतरच ते शाळेस येऊन मिळाले होते. वामनरावांच्या अटी मान्य करून आपल्या उपक्रमात सहभागी करून घेणे टिळक-आगरकरांना का आवश्यक वाटले याचे कारणही लक्षात घ्यावयास हवे. या सर्व मंडळींत विष्णुशास्त्री चिपळूणकर वयाने मोठे व बाहेरही त्यांचा निबंधमालेमुळे नावलौकिक असल्यामुळे मुख्याध्यापक पद त्यांच्याकडे असणे साहजिक होते. पण शास्त्रीबुवा लेखणीचे फर्डे असले तरी शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक बेताचाच होता. शास्त्रीबुवांचे एक भक्त व त्याचे पहिले चरित्रकार खंडेराव बेलसरे यांनी लिहिले आहे, " ज्या ज्या कामात शास्त्रीबुवा पडले ह्या सर्वांत त्यांनी आपल्या योग्यतेप्रमाणे चांगले

यश संपादले. पण तसे ते मास्तरगिरीत त्यांस मिळाले नाही. शिक्षकाच्या ठिकाणी जे विशेष गुण असावे लागतात, त्यांचे नेमस्त वास्तव्यही त्यांच्या ठिकाणी दिसून आले नाही. आधी ते वर्गात आले आणि सर्व काही व्यवस्थेशीर असले तर ठीक. मग शिकवणे साधारणपणे बरे होई. परंतु मुले जर का गोंधळ करू लागली व त्यांची शिकण्याची लहरच लागत नसली म्हणजे आटपले. शास्त्रीबुवांनी आपले सांगत जावे, काही बोलत असावे आणि ज्यांना ऐकायचे असेल त्यांनी ऐकावे, असा प्रकार असे. किंबहुना मुले गडबड करू लागताच शास्त्रीबुवांनी आपली खुर्ची फिरवून एखादे हातात असलेले पुस्तक वाचीत बसावे, असेही केव्हा केव्हा घडल्यावाचून राहात नसे. वरिष्ठांशी न पटल्यामुळे सरकारी शाळेत त्यांचे मन लागले नसेल तेव्हा तेथील एक गोष्ट राहो, पण स्वतः त्यांच्या नव्या शाळेतही सरासरी हीच तऱ्हा." शाळा चांगली चालवावयाची असेल तर शाळेला शिस्त लावू शकणारा कोणी तरी प्रमुख असणे जरूर होते व वामनराव आपटेच हे करू शकतील हे जाणून ते वयाने चिपळूणकर, नामजोशी, टिळक व आगरकर यांच्यापेक्षा लहान असतानाही त्यांना शाळेचे सुपरिंटेंडेन्ट करण्यात आले. १८८५ साली फर्ग्युसन महाविद्यालय सुरू होईपर्यंत आपटेच हे पद भूषवीत होते हे लक्षात ठेवावयास हवे. त्याचबरोबर महाविद्यालय काढल्यानंतर त्यांचीच पहिले प्राचार्य म्हणून निवड करण्यात आली हेदेखील विसरून चालणार नाही.

आगरकर, वासुदेवराव केळकर, गोपाळराव गोखले वगैरे मंडळी उत्तम शिक्षक म्हणून नावाजली गेली तरी शिक्षक म्हणून वामनरावांची योग्यता त्यांच्याहीपेक्षा जास्त होती असे त्या वेळच्या विद्यार्थ्यांच्या आठवणीवरून दिसते. "शिक्षकाचे खरे काम केले आपटे मास्तरांनीच!" असे पांगारकरांनी आत्मचरित्रात म्हटले आहे. "माझ्या वेळच्या शिक्षकांमध्ये वामन शिवराम आपटे हे आदर्श शिक्षक होते ....... त्यांना संस्कृत व्याकरणातील अती कठीण भाग सुलभ व सहज समजेल अशा तऱ्हेने सांगण्याची विलक्षण हातोटी साधली होती. संस्कृत वाङ्मय शिकविताना तर त्यांच्या जिव्हेवर मूर्तिमंत सरस्वतीच नाचत आहे की काय असा भास होई," असे गोविंद चिमणाजी भाटे यांनी त्यांच्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. तयारी केल्याशिवाय वामनराव आपटे वर्गात शिकवीत नसत. त्यांच्या टापटिपीची, नियमितपणाची, शिस्तीची व शिकविण्याच्या कलेतील नैपुण्याची ग्वाही त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांनी दिलेली आहे. हुशार विद्यार्थ्यांना जशी त्यांनी प्रेरणा दिली तशी सामान्य विद्यार्थ्यालाही विषय समजेल अशी दक्षता घेतली.

वामनराव आपट्यांचा दराराही फार होता. ते स्वतः शिस्तीने वागत आणि त्यामुळे आपल्या सहकाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी शिस्त पाळली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. टिळक वर्गावर उशिरा जात, त्यामुळे आपट्यांशी त्यांचे खटके उडत असत. चिपळूणकर व आगरकर आपल्या वर्गात अभ्यासाशी संबंध नसलेल्या अवांतर गोष्टी

सांगत; पण आपटे मात्र कधीच असे विषयांतर करीत नसत. हुशार विद्यार्थी हेरून त्यांना दर शनिवारी व रविवारी घरी बोलावून संस्कृत व इंग्रजी शिकविण्याचा आपट्यांचा प्रघात होता. निवडक विद्यार्थ्यांस खास मार्गदर्शन करण्याच्या त्यांच्या या पद्धतीमुळेच जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची एक परंपरा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये निर्माण होऊ शकली. आपटे "अभ्यासासाठी छडी मारीत नसत" असे पांगारकरांनी म्हटले आहे; पण शाळेची शिस्त मोडणाऱ्या विद्यार्थ्याला वठणीवर आणण्यासाठी ते छडीचा उपयोग करण्यासही मागेपुढे पाहात नसत. १८९१ साली संमतिवयाच्या वादाच्या वेळी क्रीडाभुवनात डॉक्टर भांडारकरांची सभा उधळून दंगल माजवण्यात न्यू इंग्लिश स्कूलचे काही विद्यार्थी सामील होते. दंगलखोर विद्यार्थ्यांना आपट्यांनी नंतर शाळेत छडीने झोडपले होते. १२ मार्च १८९१ च्या ज्ञानोदयाच्या अंकात ज्ञानप्रकाशातली एक बातमी उद्धृत केली आहे ती या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे: "येथील न्यू इंग्लिश स्कुलातील विद्यार्थी वासुदेव भिकाजी जोशी याने या शाळेचे सुपरिंटेंडेंट रा. रा. वामन शिवराम आपटे यांनी आपणास फार मारल्याबद्दल फिर्याद केली होती. मिस्तर प्लंकेट यांनी फिर्यादीची जबानी घेतली तेव्हा बुधवारच्या सभेतील दांडगाईत आपण होतो व त्यामुळे सुपरिंटेंडेंटनी आपणास मारले अशी हकीकत पाहून मिस्तर प्लंकेट यांनी समन्स देण्याचे नाकबूल केले. गुरूचा शिष्यावर दाब राहावा म्हणून मि. प्लंकेटने जे केले ते बरोबर केले", असा ज्ञानप्रकाशकारांनी अभिप्राय दिला आहे. शाळेची शिस्त मोडणारांना दंड ठोठावून किंवा त्यांची नावे शाळेतून काढून टाकून वामनराव गैरवर्तन करणाऱ्यांना धडा शिकवीत. त्यामुळे त्यांचा विद्यार्थ्यांना धाक वाटे.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक म्हणून मिळणारे वेतन अपुरे होते. त्यामुळे अनेक शिक्षकांना अवांतर उद्योग करून खर्चाची तोंडमिळवणी करणे भाग पडत असे. मराठा व केसरी ही वृत्तपत्रे काढण्यामागेही जमल्यास मिळकतीचे एक नवे साधन निर्माण करण्याचा हेतू होता. वृत्तपत्रे काढताना टिळकांपेक्षाही चिपळूणकर व विशेषतः आपटे व आगरकर यांचा उत्साह जास्त होता. आपटे व आगरकर या दोघांनाही लिहिण्याची हौस होती. संपादक म्हणून मराठ्यावर टिळकांचे नाव असले तरी लिहिण्याचा टिळकांना जात्याच कंटाळा असल्यामुळे मराठ्यातही फारच थोडा मजकूर त्यांच्या हातचा असे. आपटे व नामजोशी मराठ्यात जास्त लिहीत, तर चिपळूणकर केसरीत दर आठवड्याला एकच लेख लिहीत व केसरीतला उरलेला मजकूर बराचसा आगरकरांच्या हातचा असे. कोल्हापूरचे दिवाण माधवराव बर्वे यांच्यावर आरंभी मराठ्याने झोड उठवली व मग केसरीने! कोल्हापूर-प्रकरणाबाबत मराठ्यात आलेले लेख वामनराव आपट्यांनी लिहिले होते. वामनरावांचे बालपण कोल्हापुरात गेलेले! कागलचे जहागिरदार व छत्रपतींचे नातेवाईक आबासाहेब घाटगे हे त्यांचे सहाध्यायी वामनरावांना बर्व्यांविरुद्ध माहिती पुरवीत. या माहितीच्या आधारे

वामनरावांनी मराठ्यातून व आगरकरांनी केसरीतून बर्वेशाहीवर जोरदार हल्ला चढवला. पुढे बर्व्यांनी अब्रुनुकसानीची फिर्याद ठोकताच टिळक व आगरकर यांनी मराठा व केसरीचे संपादक म्हणून आपल्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या लेखनाची जबाबदारी घेतली आणि १०१ दिवसांचा तुरुंगवासही भोगला.

कोल्हापूर-प्रकरणी झालेल्या खटल्यात वामनराव आपटे गोवले गेले तर शाळेची घडी पार विसकटून जाईल हे लक्षात घेऊन टिळक-आगरकरांनी वामनरावांचा केसरी-मराठ्यातील लेखनाशी काही संबंध नाही असा पवित्रा घेतला व वामनरावांनाही तसे सांगावयास लावले असे खटल्याच्या वृत्तान्तावरून वाटते. बर्व्यांचे वकीलपत्र घेतलेल्या बॅरिस्टर इन्व्हेरॅरिटी या नामवंत कायदेपंडिताने वामनरावांची अतिशय कसोशीने उलटतपासणी घेतली पण वामनरावांनी त्याला दाद दिली नाही. इन्व्हेरॅरिटी व वामनराव आपटे यांच्यामध्ये न्यायालयात जी प्रश्नोत्तरे झाली ती १४ फेब्रुवारी १८८२ च्या केसरीने उद्धृत केली आहेत.

“ इन्व्हेरॅरिटीचा प्रश्न : तुम्ही मराठा पत्रकर्त्यांपैकी एक आहा काय ?

“ आपट्यांचे उत्तर : पत्रकर्ता या शब्दाचा जसा तुम्ही अर्थ घेता त्या अर्थाने मी काही त्या पत्रकर्त्यांपैकी एक नाही. परंतु फक्त त्या पत्रात मी कधी कधी लेख लिहीत असतो.

“ प्रश्न : केसरी पत्रकर्त्यांपैकी तरी एक आहा काय ?

“ उत्तर : त्यातही मी कधी कधी लेख लिहीत असतो. त्या दोनही पत्रांपैकी एका पत्राचाही मी मालक नाही. सरकारकडे पाठवलेल्या अर्जावर टिळकांची, माझी व आगरकरांची सही आहे...त्या अर्जात आम्ही तिघेही मराठा व केसरी या पत्रांचे कर्ते आहोत असे म्हटले आहे ते अगदी पूर्णपणे यथार्थ आहे असे नाही. ”

आपट्यांनी न्यायालयातल्या साक्षीत जरी असे अंग झटकले तरी मराठा व केसरी ही वृत्तपत्रे १८८५ अखेरपर्यंत सर्व आजीव सभासदांच्या मालकीची होती असा पुरावा उपलब्ध आहे. वामनरावांनी ज्या तऱ्हेने साक्ष दिली आहे त्यावरून सर्व सहकाऱ्यांच्या संमतीनेच त्याबाबत निर्णय घेतला गेला असावा असे अनुमान काढले तर चुकीचे होणार नाही.

टिळक-आगरकर तुरुंगात असताना त्यांच्या गैरहजेरीत आपटे, नामजोशी व संस्थेत नव्याने दाखल झालेले वासुदेवराव केळकर व गोळे यांनी वृत्तपत्रे चालवली. या काळात पंडिता रमाबाईंच्या ‘ स्त्रीधर्मनीती ’ या पुस्तकाचे परीक्षण केसरीच्या १ व २२ ऑगस्ट १८८२ च्या अंकात आलेले आहे. त्यातील आशयावरून ते आपट्यांच्यासारख्या संस्कृतच्या जाणकाराने लिहिले असावे असे वाटते. पंडिता रमाबाईंच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या आर्यमहिला समाजाच्या सभेत ‘ बालविवाह ’, ‘ केशवपन ’ या दुष्ट चालींच्या प्रतिबंधार्थ कायदा करावा असा विचार मांडला गेला. त्यासंबंधी ८ ऑगस्ट १८८२ च्या केसरीत आलेली स्फुट सूचनाही वामनरावांच्या

हातची असावी असे वाटते. या स्फुटात म्हटले आहे, "आमच्या धर्मसंबंधी रीतिभातींत सरकारास हात घालू देणे हे तर आमच्या मते मोठे साहस आहे. अशा प्रकारच्या गोष्टीत जी काय सुधारणा करणे इष्ट असेल ती लोकांनी आपली आपणच केली पाहिजे." १८८४ च्या अखेरीस या प्रश्नावर वाद पेटला असतानाही आपट्यांचे मत असेच होते व एकटे आगरकर सोडून बाकी सर्व सहकाऱ्यांना ते मत मान्य होते.

१८९१ साली संमतिवयाच्या बिलाचा वाद निकराला पोचला तेव्हा मात्र वामनराव आपट्यांचे मत बदलले असल्याने ते कायद्याने समाजसुधारणा करण्यास हरकत नाही असे म्हणणाऱ्या आगरकरांच्या बाजूने उभे राहिले. दरम्यानच्या काळात डेक्कन एज्युकेशन सोसायटीतल्या कलहामुळे टिळकांना राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले व सोसायटीतील भांडणात आगरकर, आपटे व गोखले यांच्या गटाचा विजय झाला. सततच्या भांडणामुळे व तडजोडीचे प्रयत्न फसल्यामुळे टिळक व त्यांचे प्रतिस्पर्धी यांच्या संबंधांमध्ये विलक्षण कटुता निर्माण झाली होती व १८९१ च्या आरंभापासून उघडउघड शत्रुत्वाची भावनाही व्यक्त होऊ लागली. त्याच वर्षी फेब्रुवारीत टाइम्स ऑफ इंडिया पत्राने टिळकांवर टीका करताना फर्ग्युसन कॉलेजवरही चिखलफेक केली, तेव्हा टिळकांचा व फर्ग्युसन कॉलेजचा काही संबंध राहिलेला नाही असा खुलासा करणारी पत्रे वामनराव आपट्यांनी टाइम्सला पाठवली. ती प्रसिद्ध होताच केसरीच्या १७ फेब्रुवारी १८९१ च्या अंकात टिळकांनी आपट्यांना धारेवर धरले.

"संमतिवयाच्या बिलावरील वादविवादाचा आणखी एक गौण परिणाम असा झाला आहे की, ज्यांच्या अंगी 'सुधारकपण' जाज्वल्य रीतीने वास करीत असेल असा संशय ध्यानी-मनी-स्वप्नीही यावयाचा नाही अशांनादेखील क्षणिक स्फुरण चढते व ते घटकाभर सुधारकाची कृती–वर्तमानपत्रांत प्रचंड शब्द वावटळ उडवून देण्याची–करतात! अशाच प्रकारचा काही चमत्कार रा. वामन शिवराम आपटे, प्रिन्सिपॉल फर्ग्युसन कॉलेज, यांची गेल्या शुक्रवारच्या व शनिवारच्या टाइम्स ऑफ इंडिया पत्रात छापलेली पत्रे वाचून पुष्कळांस वाटला असेल. आजपर्यंत आमचे आपटेसाहेबांस फारसे कधी असल्या सार्वजनिक उलाढालीत पडून वेळेचा व द्रव्याचा अपव्यय करताना आम्ही कधी पाहिलेले नाही. आपले शाळा व कॉलेज यातले अध्यापकांचे काम आणि राहिलेल्या वेळात ग्रंथकर्तृत्वाचे काम असा त्यांचा क्रम नेहमी असावयाचा. तेव्हा त्यांना सात-आठ तास खर्च करून लांबलचक पत्रे खरडण्याइतका त्वेष आला कशाने?...ज्यांच्याशी आपला विशेष निकट संबंध, जे आपल्या अब्रूचे व उपजीविकेचे साधन, अशा कॉलेजाची बेअब्रू होण्याची पाळी आली तेव्हा वामनरावजींना स्वस्थ कसे बसवेल?...मागील माधव-बागेच्या सभेच्या वेळी ज्यास कायद्याच्या जुलमाने होणाऱ्या सुधारणेपासून काही हितकारक परिणाम होणार नाही असे वाटत होते, त्यांच्या मनात कायद्याविषयी एकाएकी इतका उमाळा उठला,

याचाही तर्क सामान्य बुद्धीच्या लोकांस करता येणार नाही... बरे झाले, टिळक गेल्या वर्षअखेरच राजीनामा देऊन मोकळे झाले. ते जर कॉलेजात असते तर हल्लीच्या प्रसंगी आमच्या वामनरावजींवर कोणता प्रसंग गुदरता याची कल्पनाही आमच्याने करवत नाही..."

केवळ वामनरावांना उद्देशून टिळकांनी आधी कधीही इतके ताशेरे उडवले नव्हते व यानंतरही कधी उडवले नाहीत. खरे म्हणजे वामनरावांची सामाजिक प्रश्नावरची मते बहुंशी टिळकांच्या मताशी मिळतीजुळती होती. संस्थेतील भांडणात मात्र ते एकमेकांचे प्रतिपक्षी होते. कोल्हापूर-प्रकरणात तुरुंगवास भोगून टिळक-आगरकर सुटून येताच म्हणजे १८८२ च्या ऑक्टोबरच्या अखेरीसच यापुढे आपण वृत्तपत्रात लिहिणार नाही असे सांगून आपटे मोकळे झाले. आगरकरांनी सुधारकाचा सवतासुभा निर्माण केल्यानंतर केसरी विरुद्ध सुधारक या झगड्यात आपट्यांनी कोणत्याच बाजूने लेखन केलेले नाही. ते शब्दकोश तयार करण्यात व अन्य पाठ्यपुस्तकवजा लेखन करण्यात गढून गेले होते. हे सारे ते अर्थातच संस्थेचे काम केल्यानंतर फावल्या वेळात करीत. मात्र या कामाचा ताण त्यांच्या प्रकृतीस सोसला नाही.

१८९२ च्या जुलै महिन्यात वामनराव आपटे विषमज्वजराने आजारी पडले. आपट्यांच्या आजारात गोपाळराव गोखल्यांनी त्यांची परोपरीने शुश्रूषा केली. न्यायमूर्ती रानडेही दोनदोन तीनतीन तास त्यांच्याजवळ बसत असत. ९ ऑगस्टला आपटे वारले. त्यापूर्वी चार दिवस त्यांची वाचा बंद झाली होती. आपट्यांच्या निधनानंतर "त्यांच्या तरुण पत्नीचे देहभान जाऊन ती मोठ्याने आक्रोश करीत थडाथड कपाळ आपटून घेऊ लागली. तेणेकरून तिचे कपाळ फुटून सर्व शरीर रक्तबंबाळ झाले आणि तिला आवरता आवरता पुरेवाट झाली." अशी इंदुप्रकाशकर्त्यांनी श्रीमती रमाबाई आपट्यांच्या शोकाची हकीकत दिली आहे.

इंदुप्रकाशकर्त्यांच्या माहितीनुसार "वामनरावजींनी आपल्या पराक्रमावर पुण्यास एक वाडा चार हजारांस खरेदी केला." सोसायटीने उतरलेला त्यांचा तीन हजारांचा विमा व पुस्तकांच्या आवृत्त्यांच्या हक्कासंबंधाने बरीच रक्कम येणे होती ती धरून सरासरी बारा ते तेरा हजार रुपयांची माया त्यांनी आपल्या मागे आपल्या अभागी कुटुंबाकरिता ठेवली होती. आपट्यांच्या मालमत्तेबाबतची ही माहिती संपूर्णतया निराधार दिसत नाही. सोसायटीने तीन हजारांचा विमा उतरवलेला होता हे खरे आहे. वाडाखरेदी किंवा पुस्तकाच्या पोटी येणे असलेली रक्कम हा तपशीलही कदाचित बरोबर असेल. याचा अर्थ आपटे वारले तेव्हा त्यांच्याकडे चांगलाच पैसा होता असा समज करून घेणे मात्र बरोबर होणार नाही. खरे म्हणजे आपटे त्या वेळी पैशाच्या चांगलेच अडचणीत होते. जून, जुलै व ऑगस्ट १८९२ असा तीन महिन्यांचा पगार कधी नव्हे तो त्यांनी आगाऊच उचललेला होता असे डे. ए. सोसायटीच्या दप्तरातील पत्रावरून दिसते. आपटे वारल्यानंतर त्यांचे अंत्यसंस्कार करण्यास आवश्यक

ती रोकड रक्कम रमाबाई आपट्यांजवळ नव्हती. म्हणून त्यांच्या वतीने गोपाळराव गोखल्यांनी इतर आजीव सभासदांकडे दोनशे रुपये मागितले होते. आपट्यांवर केलेल्या औषधोपचारांचा खर्चही डे. ए. सोसायटीने केला होता, असे डे. ए. सोसायटीच्या कागदपत्रांवरून दिसते.

जवळ पैसा नसल्यामुळे आपट्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीची झालेली विचित्र परिस्थिती पाहूनच असेल बहुधा, आगरकरांनी आपल्या उत्तरक्रियेसाठी आवश्यक ती रक्कम वेगळ्या पुरचुंडीत बांधून ठेवली असावी! वामनराव आपट्यांच्या निधनानंतर वर्षभरातच त्यांच्या विधवा पत्नीस नातेवाइकांच्या दडपणामुळे केशवपन करावे लागले. आगरकरांना ज्या दिवशी हे समजले त्या दिवशी ते विलक्षण बेचैन झाले व पतिनिधनाचा प्रसंग ओढवल्यास आपण केशवपन करणार नाही असे वचन त्यांनी घरी आल्यावर आपल्या पत्नीकडून—यशोदाबाई आगरकरांकडून—घेतले. आपट्यांच्या अकाली निधनाने हेलावलेल्या अंतःकरणाने आगरकरांनी १५ ऑगस्ट १८९२ च्या सुधारकात आपट्यांवर हृदयस्पर्शी मृत्युलेख लिहिला आहे. आपल्या मित्राच्या कार्याचे यथार्थ मूल्यमापन करताना आगरकर म्हणतात, " वामनरावांसारख्या बुद्धिमान, अभ्यासी, नेमस्त, निर्व्यसनी, निराग्रही, सततोद्योगी व मनमिळाऊ गृहस्थाने आपल्या पतित देशभूमीच्या उन्नतीसाठी निर्लोभवृत्तीने पूर्ण बारा वर्षे जे अश्रांत परिश्रम केले ते मनात आणून त्यास लोकांचा खरा हितकर्ता असे म्हटल्यावाचून ( लोक ) कधीही राहणार नाहीत. "

— रसिक : दिवाळी अंक १९७७

०००००००००००००००००००००००००

# ३

# न्यायालयात न गेलेला खटला

०००००००००००००००००००००००००

लोकमान्य टिळक व गोपाळराव आगरकर या दोन थोर पुरुषांमधील बेबनावाविषयी दोघांच्याही चाहत्यांनी आजवर इतके एकतर्फी व विपर्यस्त लेखन केले आहे की, अनेकदा याबाबतची वस्तुस्थिती आपण समजतो त्यापेक्षा वेगळी असण्याची शक्यता आहे हे मुळी लक्षातच घेतले जात नाही. सतत दहा वर्षे चाललेल्या या दोघांमधील भांडणाच्या इतिहासात फक्त एकदाच हे भांडण न्यायालयात जाण्याची वेळ आली होती, पण न्यायमूर्ती रानड्यांनी केलेल्या मध्यस्थीमुळे प्रकरण न्यायालयापर्यंत गेले नाही.

या प्रकरणाची, साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांनी टिळक-चरित्राच्या पहिल्या खंडात दिलेली अपुरी हकीगत ( पाहा पृ. २९९–३०० ) बिनचूक नाही एवढेच नव्हे तर ती वस्तुस्थितीवर पूर्णपणे आधारलेली नाही. केळकर म्हणतात, " ता. १४ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकात टिळकांवर अशी टीका आली की, टिळक हे वटवाघुळासारखे आहेत. त्यांना धर्माभिमानी आपल्यात घेत नाहीत व ते एका अर्थाने खरोखर सुधारक असता सुधारकांच्या पंक्तीत उघडपणे जाऊन बसण्याला कचरतात." तात्यासाहेब केळकरांनी सुधारकाच्या अंकाचा तारीखवार निर्देश केल्यामुळे सुधारकात आलेल्या टीकेचा आशयही त्यांनी मूळ मजकुरास धरून दिला असेल असे कोणाही वाचकास वाटते, पण मूळ लेख वाचला तर केळकरांनी केलेला विपर्यास कोणाच्याही लक्षात येईल. १४ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकात प्रसिद्ध झालेला व पुढे वादविषय बनलेला हा लेख आगरकरांच्या निबंधसंग्रहाच्या तिसऱ्या भागात ( फडतरे यांनी प्रकाशित केलेल्या ) समाविष्ट केलेला आहे.

मूळ लेखाचे शीर्षक होते, ' वेळेवर सूचना '. आगरकरांनी लेख लिहिला होता तो

श्रीधरपंत जिनसीवाल्यांनी केलेल्या एका भाषणावर टीका करण्यासाठी. जिनसीवाल्यांवर कोरडे उडवताना जाताजाता आगरकरांनी टिळकांनाही टोला हाणला. "रा. टिळकांसही आमचे तेच सांगणे आहे. ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनावरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेसमनच्या हातचा भात व बिसकुटे झोडून श्रीशंकराचार्यांशी वर्दळ घालीत बसण्यात काही अर्थ नाही!" लेखाच्या पुढील भागात आगरकरांनी शंकराचार्यांना इशारे दिले असून, पुणे-वैभवकार व श्री. बाळासाहेब नातू यांच्यासारख्या 'दांभिक श्रद्धाळूंच्या' नादी लागू नये असे म्हटले आहे. केळकरांनी सुधारकातील टीकेचा ज्या शब्दांत सारांश दिला आहे त्यात त्यांचा कल्पनाविलास अधिक दिसतो.

आगरकरांनी कुरापत काढली की तावडतोब उत्तर द्यावयाचे असा टिळकांचा शिरस्ता होता. एरवी शाब्दिक लढाईवर भागले असते पण ज्या वेळी आगरकरांचा हा लेख प्रसिद्ध झाला त्या वेळी टिळक पंचहौद मिशनातील चहापानामुळे उद्‌भवलेल्या ग्रामण्य-प्रकरणात गुंतले होते. अशा वेळी "मुसलमान किंवा पोर्तुगीज मेसमनच्या हातचा भात किंवा बिसकुटे झोडून" टिळक शंकराचार्यांशी वाद घालतात या आगरकरांच्या आरोपाला नुसते उत्तर देण्यापेक्षा आगरकरांना ते विधान परत घ्यावयास लावणे आवश्यक आहे असे टिळकांना वाटणे साहजिकच होते. सुधारक सोमवारी प्रसिद्ध होत असे तर केसरी मंगळवारी! त्यामुळे १५ नोव्हेंबरच्या केसरीच्या अंकात खरे म्हणजे आगरकरांनी आपल्यावर केलेला आरोप निराधार असल्याचे टिळकांना म्हणता आले असते. पण तसे न करता सुधारककर्त्या आगरकरांना पत्र लिहून त्यांच्या विधानाबद्दल पुरावा देण्याविषयी अगर 'चूक झाली असल्यास तसे प्रसिद्ध' करण्याविषयी टिळकांनी सुचविले म्हणूनच व्यक्तिगत आरोपाबद्दल काही न लिहिता टिळकांनी एक स्फुट लिहून आगरकरांवर १५ तारखेच्या केसरीत सर्वसाधारण टीका केली. "बाकी एम्. ए. झालेल्या गृहस्थाचेही किती कोते विचार असतात हे दाखवण्याकरिता प्रो. जिनसीवाल्यांच्या व्याख्यानाचा विपर्यास करण्याची फारशी जरुरी नव्हती हे एखादे पोरही सांगेल. कारण सुधारणेचा झेंडा मिरविणाऱ्या कित्येक वर्तमानपत्रांच्या फाइलीही ते काम करू शकतील."

मात्र २२ नोव्हेंबरच्या केसरीत टिळकांनी आगरकरांनी केलेल्या आरोपाचा निःसंदिग्ध शब्दांत इन्कार केला. "१४ नोव्हेंबरच्या सुधारकात 'वेळेवर सूचना' या सदराखाली जो असंबद्ध मजकूर आला होता त्यावर आमचे म्हणणे गेल्या खेपेसच थोडक्यात कळविले होते.... पहिल्याने या व्यक्तिविषयक मजकुराबद्दल आमचा काही एक लिहिण्याचा मानस नव्हता, तथापि गोष्ट ओघास आल्यामुळे सदरील लेखात स्टेशनावरील मुसलमान अगर पोर्तुगीज मेसमनच्या हातचे जेवल्याचा रा. टिळक यांजवर जो आरोप करण्यात आला आहे तो अगदी निराधार खोटा आहे असे कळविणे भाग आहे..." आपल्यावरील आरोपाचा इन्कार करण्यास टिळकांनी

एक आठवडा का घेतला याचे उत्तर केळकरांनी लिहिलेल्या टिळक-चरित्रात सापडत नाही. पण या प्रश्नाचे उत्तर आगरकरांचे या वेळचे एक सहकारी व सुधारकाचे सहसंपादक सीताराम गणेश देवधर यांनी दिले आहे.

तात्यासाहेब केळकरांच्या टिळक-चरित्राचा पहिला खंड प्रसिद्ध झाल्यानंतर झालेल्या वादाच्या वेळी सीतारामपंत देवधरांनी आपल्या स्मरणशक्तीवर विसंबून या प्रकरणाबाबतच्या आठवणी सांगितल्या आहेत. बापूराव आंबेकरांनी लिहिलेल्या 'टिळक-जीवनरहस्य' या पुस्तकाच्या परिशिष्टात देवधरांचे हे लेख छापलेले आढळतील. देवधरांनी दिलेल्या हकीकतीनुसार रविवार तारीख २० नोव्हेंबर १८९२ रोजी रात्री ते छापखान्यात सुधारकाच्या २१ तारखेच्या अंकाची मुद्रिते तपासण्यासाठी गेले होते तेव्हा टिळकांचे पत्र व आगरकरांचे उत्तर असा छापील मजकूर त्यांना दिसला. या तंट्याचे पर्यवसान कोर्टकचेऱ्या करण्यात होणार हे लक्षात येऊन सीतारामपंत देवधरांनी प्रथम मध्यस्थी करण्याचे ठरवले. टिळकांनी पाठवलेले पत्र ते परत घेतात का ते पाहावे व तोपर्यंत त्यांचे पत्र व त्याला आगरकरांनी दिलेले उत्तर छापण्याचे तहकूब करावे अशी देवधरांनी आगरकरांना तोड सुचविली. सामोपचाराने हा तंटा मिटविण्याची देवधरांची कल्पना आगरकरांना फारशी पसंत नव्हती असा देवधरांनी दिलेल्या वृत्तान्तावरून अभ्यासकाचा समज होतो. आगरकरांनी दिलेल्या 'अर्धवट संमती'चा फायदा घेऊन सीतारामपंत देवधरांनी टिळकांचे पत्र व आगरकरांचे उत्तर हा मजकूर २१ नोव्हेंबरच्या सुधारकात छापला नाही. मात्र २१ तारखेस सकाळी टिळकांची त्यांनी भेट घेतली. आगरकर विधान परत घेण्यास कबूल नाहीत मात्र दोघांमधील हे भांडण कोर्टात जाऊ नये असे देवधरांनी टिळकांना सांगितले.

त्याच दिवशी दुपारी टिळकांनी देवधरांना बोलावून सांगितले की "तुमच्या माझ्यात झालेली तडजोड आमच्या मंडळींना पसंत नाही. सुधारकात केले गेलेले विधान खरे नसल्याचा उल्लेख सुधारकातच आला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे." आपल्या पाठीराख्यांच्या दडपणामुळे टिळकांनी आगरकरांनी विधान परत घ्यावे असा आग्रह धरला, असा देवधरांच्या लिहिण्याचा झोक आहे. त्यामुळे थोपवून धरलेला मजकूर सुधारकात प्रसिद्ध करण्यावाचून गत्यंतर राहिले नाही असे देवधर म्हणतात. मात्र आपण केलेल्या विनंतीनुसार टिळकांनी त्यांच्या पत्रावरील तारीख बदलण्यास संमती दिली असे देवधरांनी लिहिले आहे. २८ नोव्हेंबर १८९० च्या सुधारकाच्या अंकात टिळकांचे पत्र व सुधारककर्त्यांनी त्याला दिलेले उत्तर प्रसिद्ध झाले आहे. दुर्दैवाने टिळकांच्या व आगरकरांच्या चरित्रकारांनी आजवर हा अस्सल पुरावा मुळाबरहुकूम प्रसिद्ध न करता हे प्रकरण रंगविण्याचा प्रयत्न केला. सुधारकात प्रसिद्ध झालेला मजकूर खालीलप्रमाणे होता. प्रथम टिळकांचे पत्र २३ नोव्हेंबर १८९२ अशी तारीख देऊन छापले होते. (टिळकांचे हे पत्र समग्र टिळक-वाङ्मयाच्या खंडातील टिळकांच्या पत्रव्यवहारातही छापलेले आढळत नाही.)

" आपल्या पत्राचे १४ नवंबरचे अंकात 'वेळेवर सूचना' या सदराखाली रा. टिळकांसही आमचे तेच सांगणे आहे. खिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनवरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेसमनच्या हातचा भात व बिसकुटे झोडून श्रीशंकराचार्यांशी वर्दळ घालीत बसण्यात काही अर्थ नाही " असा मजकूर आहे. यावरून स्टेशनावर मेसमनच्या हातचे जेवल्याचा आरोप आपण मजवर करिता असे उघड होते. चहा व भात यांच्या दोषादोषाबद्दल विवरण करण्याचे हे स्थळ नाही व या बाबतीत तुमचा आमचा मतभेदही असेल. मला माझ्या व इतरांच्या संबंधाने याबद्दल जे काही म्हणावयाचे आहे ते मी अन्यत्र म्हटले आहे. आज आपणास हे पत्र लिहून तसदी देण्याचे कारण एवढेच की, अमुक मनुष्याने अमुक ठिकाणी अमुक पदार्थ सेवन केले असे जे आपल्या लेखात लिहिले आहे ते खरे का खोटे याचा खुलासा व्हावा. माझ्या समजुतीप्रमाणे आपण मजवर जो आरोप केला आहे तो सर्वथैव निराधार आहे. याउपर आपणांस काही माहिती मिळाल्यास ती काय व कोणी दिली ते सविस्तर प्रसिद्ध करावे. म्हणजे मेसमनच्या हातचे जेवण झोडून माझी आता विस्मृती झाली असल्यास आठवण करण्यास अगर मजकूर खोटा असल्यास नाव गाव समजल्याने उत्तर देण्यास ठीक पडेल. आपली चूक झाली असल्यास तसे प्रसिद्ध व्हावे. कळावे हे विनंती

आपला,

बाळ गंगाधर टिळक. "

प्रस्तुत लेखकाने आजवर अज्ञात असलेले टिळकांचे हे पत्र संपूर्ण उद्धृत केले आहे. या पत्रात टिळकांनी कोठेही आगरकरांनी माफी मागावी अन्यथा कायदेशीर इलाज केले जातील किंवा अब्रुनुकसानीची फिर्याद केली जाईल अशी दमदाटी केलेली दिसत नाही. पत्राची भाषाही खूपच सौम्य आहे. असे असतानाही सीताराम-पंत देवधरांनी मात्र " 'तुमच्यावर बदनामी केल्याबद्दल कोर्टात फिर्याद करणे भाग पडेल' अशा अर्थाचे टिळकांचे धमकीवजा पत्र " आल्याचा उल्लेख केला आहे याचे आश्चर्य वाटते.

टिळकांच्या पत्राला आगरकरांनी दिलेले उत्तर मात्र अधिक आक्रमक स्वरूपाचे वाटते. "...जाणूनबुजून चारचौघांसमक्ष केलेली गोष्ट न आठवण्याइतकी क्षीणता आपल्या स्मरणशक्तीस चाळिसीच्या आत आली हे पाहून आम्हांस फार वाईट वाटते ! अशा स्थितीत त्या त्या प्रसंगाच्या खाणाखुणा किंवा हजर असलेल्या इसमांची नावे सांगून आपल्या स्मृतीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केल्याने व न केल्याने आपल्या-सारख्या बहुश्रुत व कल्पक कायदेवाल्याच्या मनावर सारखाच परिणाम होणार आहे असे आमच्या एका वकील मित्राने सांगितल्यावरून, आमचे आपणांस असे सांगणे आहे की, आपल्यासंबंधाने सुधारकाच्या पाचव्या अंकात जी विधाने करण्यात आली आहेत त्यांची सत्यता ज्या ठिकाणी आम्ही सिद्ध करून दिलीच पाहिजे त्या ठिकाणी

ती सिद्ध करून देण्याचा प्रसंग येईतोपर्यंत त्यासंबंधाने आमच्या ताब्यात असलेली माहिती आपल्या स्वाधीन करण्याची आमची इच्छा नाही, याबद्दल माफी असावी–" सुधारककर्ते.

सुधारकाचे मूळ अंक वाचण्याची आजवर कोणी तसदी घेतली नसल्याने आगरकरांचे हे उत्तरदेखील अज्ञातच राहिले आहे. आगरकरांच्या उत्तरात त्यांनी टिळकांबद्दल उपहासाने तर लिहिले होतेच शिवाय वाटल्यास टिळकांनी न्यायालयात जावे असेही सूचित करून आगरकरांनी प्रतिपक्षास सरळ आव्हानही दिले होते. कोल्हापूरचे दिवाण माधवराव बर्वे यांच्यावर टीका करतानाही आगरकरांनी असेच चढाईचे धोरण ठेवले होते हे लक्षात ठेवावयास हवे. आगरकरांच्या या आव्हानालाही टिळकांनी त्यांच्या नेहमीच्या खडखडीत रोखठोक शैलीत उत्तर दिलेले दिसत नाही. २९ नोव्हेंबर १८९२ च्या केसरीतील स्फुट तसे मिळमिळीतच आहे. सुधारककर्त्यांनी 'अप्रासंगिक मजकूर' लिहिला असल्याचा अभिप्राय देऊन केसरीकार म्हणतात, "त्यासंबंधाने आजचे अंकात जास्त टीका करण्याचा आमचा हेतू होता परंतु सुधारकर्त्यांची आम्हास जी माहिती आहे त्यावरून नुसत्या बाजारगप्पा ऐकून वर्तमानपत्रात केलेले आरोप विश्वासास किती पात्र असतात ह्या गोष्टींचा आम्ही त्यांच्याकरिता खुलासा करण्याची काही जरूर नाही. त्यांनीच शांतपणे विचार केला म्हणजे त्यांची चूक त्यांच्या नजरेस येईल अशी आमची खात्री आहे. हल्ली ही गोष्ट ज्या थरास आली आहे त्या स्थितीत आम्ही आजच ह्यापेक्षा काही जास्त लिहू इच्छीत नाही." टिळकांनी इतक्या संयमाने का उत्तर दिले याचा उलगडा सीतारामपंत देवधरांच्या आठवणीवरून होतो.

देवधरांच्या म्हणण्याप्रमाणे तसेच तात्यासाहेब केळकरांच्या माहितीप्रमाणे न्यायमूर्ती रानड्यांनी केलेल्या मध्यस्थीचा हा परिणाम होता. देवधरांनी सांगितलेल्या हकीकतीनुसार गोपाळराव गोखले व शिवराम हरी साठे या दोघांना बरोबर घेऊन रानडे आगरकरांकडे २८ नोव्हेंबरलाच गेले. ग्रामण्य प्रकरणात श्रीशंकराचार्यांबरोबर बोलणे करण्यास टिळकांचा उपयोग करून घेण्याचा रानड्यांनी प्रयत्न चालविला होता. आगरकरांनी टिळकांवर केलेल्या आरोपामुळे आपले राजकारण फसेल अशी रानड्यांची धारणा होती. त्यामुळे आगरकरांनी टिळकांबद्दल केलेले विधान परत घ्यावे असे त्यांनी आगरकरांना परोपरीने सांगितले. रानड्यांनी केलेल्या मनधरणीस आगरकर दाद देईनात तेव्हा रानड्यांनी त्रागा केला. "ठीक आहे. उद्यापासून माझे कचेरीतील काम संपले म्हणजे मीही खुशाल गाडीत बसून बंडावर हवा खाण्यास जात जाईन. सार्वजनिक हितवर्धनाच्या माझ्या साऱ्या उड्या तुमच्यासारख्या चार स्नेह्यांच्या बळावर. ते जर सार्वजनिक हिताला प्राधान्य देऊन प्रसंगोपात अशा तडजोडीला कबूल नाहीत तर ते साधण्याचा हव्यास धरण्यात तरी हशील कोणते?" रानड्यांच्या असल्या भाषेमुळे अखेर आगरकर आपले विधान परत घ्यावयास तयार

झाले असे देवधरांनी सांगितले आहे. त्याच बैठकीत सुधारकात प्रसिद्ध व्हावयाच्या खुलाशाचा मसुदा निश्चित करण्यात आला व रानड्यांनी टिळकांची समक्ष भेट घेऊन त्याबद्दल टिळकांना कल्पना दिली. रानडे भेटावयास आले तेव्हा आगरकरांवर करावयाच्या फिर्यादीचा मसुदा निश्चित करण्यात टिळक गढले होते. पण रानड्यांच्या आग्रहाखातर त्यांनी फिर्यादीचा बेत रद्द केलाच, शिवाय आगरकरांचे मन दुखेल असा एकही शब्द येता उपयोगी नाही ही रानड्यांची शर्त मान्य करून २९ नोव्हेंबरच्या अंकातील स्फुट सूचना टिळकांनी सौम्य शब्दांत लिहिली.

ठरल्याप्रमाणे ५ डिसेंबर १८९२ च्या सुधारकाच्या अंकात 'बोलणे फोल झाले' या मथळ्याखाली आगरकरांनी खालील स्फुट लेख छापला : "ता. १४ नवंबरच्या सुधारकात रा. रा. टिळक यांजवर भात व बिस्कुटे झोडल्याचा आरोप केला असून २८ तारखेच्या सुधारकात रा. टिळकांच्या पत्रास उत्तर देताना अप्रत्यक्ष घर्षणही केले आहे, परंतु चमत्कार पाहा ! ज्या गृहस्थांच्या भरवशावर आम्ही आपल्या टाकास इतके स्वेच्छाचारी होऊ दिले ते आता आम्हास असे सांगतात की 'आमचे बोलणे तुम्हास नीट समजले नाही. टिळकांनी भात व बिस्कुटे झोडली असे आम्ही म्हटले नाही. तर भात व बिस्कुटे झोडणाऱ्या मित्राच्या समागमे टिळक होते एवढेच काय ते आम्ही म्हटले.' कोल्हापूरच्या खटल्याची अद्दल घडली असून नुसत्या तोंडी पुराव्यावर आम्ही इतके कसे विसंबलो याजबद्दल आम्हास मोठा विस्मय वाटतो. खिस्त्याच्या हातचा चहा घेणे व भात आणि बिसकुटे खाणे यात आम्ही जरी फारसे अंतर समजत नाही तरी शेवटच्या दोन वस्तूंचा टिळकांनी स्वीकार केला असे जे आम्ही म्हटले आहे ते आनंदाने परत घेतो."

आगरकर-चरित्रकार अळतेकरांनी हा खुलासा उदधृत करून त्यास आगरकरांनी मागितलेली माफी म्हणणे कसे चुकीचे आहे ते दाखवून दिले आहे. या प्रकरणात आगरकरांचा रानड्यांनी प्याद्यासारखा उपयोग करून घेताना ही गोष्ट "टिळकांनी देवधरांशी केलेली तडजोड मोडली या गोष्टीइतकीच तिरस्करणीय होती." अशी रानड्यांवर त्यांनी कडक टीका केली आहे. आगरकरांनी आरंभापासून चढाईचा पवित्रा घेतला नसता तर कदाचित आगरकरांना अखेर ज्या तऱ्हेने माघार घ्यावी लागली तशी घ्यावी लागली नसती. ही शक्यता मात्र अळतेकरांनी लक्षात घेतलेली नाही.

आगरकरांनी टिळकांची माफी मागितल्याने त्यांची शिक्षा वाचली ही तात्यासाहेब केळकरांची मल्लीनाथी त्यांनी वाजवीपेक्षा जादा उत्साहाने केली आहे. आगरकरांचा खुलासा प्रसिद्ध झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ६ डिसेंबर १८९२ च्या केसरीत स्फुट लिहून टिळकांनी वादावर पडदा टाकला. 'बोलणे फोल झाले' या आगरकरांच्या मथळ्यास जबाब म्हणून 'डोलणेही वाया गेले' अशी जोड देऊन टिळकांनी हा मजकूर प्रसिद्ध केला अशी आख्यायिका अनेकजण सांगतात. तीत तथ्य एवढेच की

बोलणे फोल होते इतकेच नव्हे तर त्याबरोबर डोलणेही वाया जाते असे एक वाक्य स्फुट सूचनेच्या अखेरीस टिळकांनी लिहिले होते, पण तसा मथळा मात्र दिलेला नव्हता हे मूळ अंक काढून पाहिल्यास सहज लक्षात येईल. टिळक विरुद्ध आगरकर, फिर्यादीचे कारण, फिर्याद, प्रतिवादीचा जबाब व निकाल, 'बोलणे फोल झाले' अशा मथळ्याखाली टिळकांनी न्यायालयात न गेलेल्या या खटल्याची हकीकत सांगितली आहे व 'बंधुत्वाच्या नात्या'ने सुधारककारांस सांगितले आहे "...या व्यक्तिविषयक गोष्टी मग त्या खऱ्या असोत किंवा खोट्या असोत, कोणत्याही कारणाकरिता वर्तमानपत्रात घालण्याची जरूर होती अगर आहे असे आम्हांस वाटत नाही. रुचिवैचित्र्यामुळे भिन्न भिन्न मतांचा प्रसार करणे भिन्न भिन्न व्यक्तीस अवश्य वाटत असेल पण त्याकरिता व्यक्तिमात्राची व्यंगे आणि तीही खोटी प्रसिद्ध करण्याचे साहस निदान युनिव्हर्सिटी-तील वरिष्ठ प्रतीची पदवी घेतलेल्या वर्तमानपत्रकारांच्या हातून तरी होईल असे यापूर्वी पुष्कळांस वाटले नसेल. टाकाआगळे हवे तसे चार शब्द लिहिण्याची केसरीच्या माजी एडिटरांची संवय त्यांच्या नवीन आश्रमात तरी सुधारेल अशी आमची उमेद होती, पण 'पळस कोठेही गेला तरी त्याला पाने तीन ती तीनच' अशी जी पुरातन म्हण आहे तिची सत्यता झालेल्या प्रकारावरून अधिकच प्रत्ययास येते.

"अशा तऱ्हेने अप्रमाण व निराधार लेख लिहिण्याचा सुधारककारांचा आजचा पहिलाच प्रसंग आहे असे नाही...रमाबाईचे डिफेन्स देण्याकरिता तिच्या मुलीस खिस्त्याचे हिंदू बनविल्याचे वाचकांस स्मरत असेलच. नागपुरास टिळक व रावबहादूर भिडे ह्यांच्यामध्ये जो संवाद झाला त्याची हकीकत देतानाही सुधारककारांनी कसा सत्यापलाप केला हेही आम्ही मागेच व्यक्त केले आहे. हल्लीचा हा तिसरा प्रसंग होय. सुधारककारांच्या मताप्रमाणे असंबद्ध प्रलाप करणारे काही बी. ए. व एम्. ए. आढळ-तील, त्यात काही विशेष नाही. परंतु आपल्या पक्षाचे समर्थन करण्यासाठी निव्वळ खोट्या गोष्टी दडपून द्याव्या, साधल्या तर वाहवा नाहीतर वाहवा अशा रीतीने सत्याचा उपमर्द करणारे एम्. ए. मात्र विरळा आणि तेही जुन्या आडमुठ्या मार्गा-तले नव्हे तर पक्के सुधारलेले निदान सुधारणेच्या बाजूने लिहिणारे—मग ते कशा-करिता का होईना !

"आपल्या मित्राचे म्हणणे आपणास कळले नाही असे आपले मित्र सांगतात असे सुधारककारांचे म्हणणे आहे पण त्यात दोष कोणाचा ? कोण काय बोलतो आहे याचा भावार्थ काय आहे व पुराव्याच्या कामी त्याचा किती उपयोग होईल हे समजण्यास ज्या ज्ञानाची आवश्यकता आहे ते ज्ञान आमच्या बंधूस दुर्दैवाने त्याच्या चाळिशीत प्राप्त झाले नसल्यामुळे व इतउत्तर प्राप्त करून घेण्याइतकीच त्यांच्या मेंदूत तीव्रता शिल्लक राहिली नसल्यामुळे असले प्रसंग त्यांच्यावर येतात याचे आम्हांस वाईट वाटते. आता आमची त्यांस इतकीच सूचना आहे की, असल्या प्रसंगी नेहमी एखाद्या चांगल्या 'बहुश्रुत व कल्पक' कायदेपंडिताचा सल्ला घेऊन मग काय करावयाचे असेल

ते करावे. उगीच एखाद्या सामान्य वकील मित्राच्या हातात सापडून आपले हसू करून घेऊ नये "....टिळकांच्या या सरबत्तीला आगरकरांनी उत्तर दिलेले आढळत नाही.

टिळक-आगरकरांच्या या वादाची हकीकत केसरी-सुधारकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराच्या साहाय्याने वर दिली आहे. या प्रकरणी टीकाटिप्पणी अगर खुलासा करणारी केसरीतील सारी स्फुटे टिळकांच्या हातची दिसतात. टिळकांनी आगरकरांना लिहिलेल्या पत्राप्रमाणेच वरील सर्व मजकूरही खरे म्हणजे समग्र टिळक वाङ्मयात समाविष्ट व्हावयास हवा. पण आजवर प्रकाशित झालेल्या खंडांत तो आढळत नाही, म्हणून तो विस्ताराने वर उद्धृत केला आहे.

— केसरी : ३१–७–१९७७

oooooooooooooooooooooooooo

# ४

# वाग्युद्ध बाळगोपाळांचे

oooooooooooooooooooooooooo

न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, गोपाळराव आगरकर व गोपाळ कृष्ण गोखले यांच्यासंबंधी आजवर इतके लिहिले गेले आहे की, आता या थोर पुरुषांच्या जीवनातील घडामोडींविषयी फारसे काही लिहिण्यासारखे उरले नसणार असा बहुतेकांचा समज असतो. पण त्यांच्या काळातली वृत्तपत्रे, या नेत्यांचा खासगी पत्रव्यवहार, इंग्रज राज्यकर्त्यांच्या दप्तरातील कागदपत्रे वगैरे अस्सल साधने काळजीपूर्वक पाहिल्यास या चौघा महान व्यक्तींच्या चरित्रकारांनी कित्येकदा किती त्रोटक, अपुरी व एकतर्फी माहिती दिली आहे याची कल्पना येते. एवढेच नव्हे तर, आपापल्या आराध्यदैवताच्या अभिनिवेशाने बहुतेक लेखन आजवर झाल्याने काही अपसमज कसे रूढ झाले हे देखील लक्षात येते. असा एक प्रकार प्रस्तुत लेखकास अलीकडेच आढळला. त्याचा तपशील देणे उद्बोधक ठरेल असे वाटते.

१८९३ च्या ऑगस्ट महिन्यात मुंबईस हिंदु-मुसलमानांचा भयंकर दंगा झाला. हिंदूंनी चालवलेल्या गोरक्षणासारख्या चळवळीमुळे दोन्ही जमातींत वैमनस्य निर्माण होते व त्याची परिणती जातीय दंगलीत होते असे मत अ‍ॅक्स्वर्थ व व्हिन्सेंट यांच्यासारखे तत्कालीन वरिष्ठ इंग्रज अधिकारी व त्यांची री ओढणारे 'टाइम्स ऑफ इंडिया'सारखे सरकारजमा वृत्तपत्र मांडीत होते. वायव्य प्रांताच्या लेफ्टनंट गव्हर्नरसाहेबांनी जाहीररीत्या दंगलींचा संबंध गोरक्षणाच्या चळवळीशी जोडला होता. अशा परिस्थितीत "आपले काय मत आहे ते स्पष्टपणे सरकारास वेळीच कळविले पाहिजे" असे वाटल्यामुळे टिळक व माधवराव नामजोशी यांनी पुढाकार घेऊन १० सप्टेंबर १८९३ रोजी शनिवारवाड्यापुढे हिंदूंची एक जंगी सभा भरवली. ही सभा होऊ नये यासाठी न्यायमूर्ती रानडे यांनी मुख्यतः प्रयत्न केले. त्यांना

गोपाळराव गोखल्यांनी साथ दिली आणि आगरकरांनी टिळकांविरुद्ध रानडे-गोखल्यांची बाजू उचलून धरली. फेरोजशहा मेथा व वाच्छा या मुंबईच्या पुढाऱ्यांमार्फत टिळक-नामजोशी यांच्यावर दडपण आणण्याचेही प्रयत्न झाले तरीही टिळक-नामजोशींनी सभा भरवलीच.

सभेनंतर आगरकरांचे व टिळकांचे जे वाग्युद्ध झाले त्यात दोघांनीही एकमेकांवर जसा अपशब्दांचा वर्षाव केला तसा त्यापूर्वी अनेकदा वाद झाले असताही कधी केला नव्हता व नंतरही कधी केला नाही. टिळक-आगरकरांची भांडणे म्हणजे आकाशातील नक्षत्रांच्या शर्यती असे समजून त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची मोकळीक नाटककारांनी व साहित्यिकांनी घेतली व प्रेक्षकांनीही त्यांना टाळ्या दिल्या. पण इतिहासाच्या अभ्यासकाला वस्तुस्थिती काय होती हे शोधण्याखेरीज गत्यंतर नसते. खेरीज हे केवळ टिळक–आगरकरांचे वाग्युद्ध नव्हते. रानडे, गोखले वगैरे नेतेही त्यात गुंतले होते. टिळकांनी ही १० सप्टेंबर १८९३ ची सभा भरवण्यापूर्वी राजकीय बाबतीत ‘ रानडे बोले व पुणे हाले ’ अशी स्थिती होती. रानड्यांनी कधी नव्हे ते लेखी पत्र पाठवून सभा भरवण्यास विरोध केला असताही सभा भरवण्यात टिळक–नामजोशी यशस्वी झाले. पुण्याच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाला या सभेने एक नवे वळण मिळाले. उदारमतवादी सुधारणावाद्यांवर परंपरा जतन करू पाहणाऱ्यांनी पुढे जी मात केली त्याची ही सुरुवात होती. त्यामुळेच असेल कदाचित सभेनंतरचे वाग्युद्ध फार त्वेषाने लढले गेले.

दुर्दैवाने तात्यासाहेब केळकरांनी टिळक चरित्रात सभेपूर्वीच्या सर्व घटना तपशिलवार सांगितलेल्या नाहीत. रानडे व टिळक यांच्यामधील लढतीचे वर्णन त्यांनी केले आहे. पण सभेनंतरच्या टिळक–विरुद्ध गोखले व आगरकर यांच्या वादावादीबद्दल त्यांनी काहीच लिहिलेले नाही. त्यांच्यानंतरच्या चरित्रकारांनीही केळकरांच्या त्रि–खंडात्मक टिळक-चरित्रावरून आपापल्या कृती बेतल्यामुळे त्यांनीही मूळ अंक वाचून हे प्रकरण समजावून घेण्याची तसदी कधी घेतली नाही. रानडे व गोखले यांच्या चरित्रकारांनीही या प्रकरणाबाबत मौन धारण केलेले दिसते. आगरकरांचे चरित्र लिहिणाऱ्या माधवराव अळतेकरांनी सुधारकाच्या अंकांवर सर्वस्वी विसंबून संपूर्णपणे एकतर्फी हकीकत दिली आहे. अळतेकरांच्या मते या सभेमुळे टिळकांची “ पुण्यात थोडीशी फटफजिती उडाली ” व “ या प्रकरणात टिळकांचे बरेच हसे झाले. ” याबाबतचा उपलब्ध पुरावा पाहिल्यानंतर खरे म्हणजे असले निष्कर्ष काढणाऱ्या आगरकर-भक्त अळतेकरांच्या कल्पनाविलासाचेच हसू आल्याशिवाय राहात नाही.

मुंबईमधील हिंदु-मुसलमानांचा दंगा थांबल्यानंतर इंग्रज अधिकाऱ्यांनी व राज्यकर्त्यांच्या बगलेतल्या पत्रांनी गोरक्षण चळवळीचा व या दंग्यांचा संबंध जोडण्याचा जो प्रयत्न चालविला होता तो टिळकांप्रमाणेच गोखल्यांना व आगरकरांनाही नापसंत होता. ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’त गोखल्यांनी ‘ हिंदु ’ या टोपण नावाने एक पत्र

प्रसिद्ध केले होते हे टिळकांना माहीत होते. १८ सप्टेंबर १८९३ रोजी 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेल्या पत्रात गोखल्यांनी म्हटले होते, "माझे टाइम्सला पाठविलेले पत्र निव्वळ मुंबईच्या दंग्यासंबंधाने असून आक्वर्थ व टाइम्स ऑफ इंडिया यांनी प्रभासपट्टणच्या दंग्यांबद्दल मुंबईत झालेल्या हिंदूंच्या सभा व तेथील गोरक्षणाबद्दलची चळवळ यांजवर जो दोषारोप लादण्याचा यत्न चालवला होता त्याला प्रत्युत्तर म्हणून लिहिले होते." "हिंदू व मुसलमानांचे अलीकडील तंटे पुरातन कारणांमुळेच होत असावे आणि राष्ट्रसभा व गोरक्षण वगैरे चळवळींशी त्यांचा काहीएक संबंध नसावा," असे आगरकरांनीही दंग्यांची मीमांसा करताना म्हटले होते हे लक्षात ठेवावयास हवे.

हिंदूंना काय वाटते ते सरकारला स्पष्टपणे कळवण्यासाठी त्यांची जाहीर सभा पुण्यात भरवण्याचा टिळकांनी घाट घातला. केवळ हिंदूंची सभा भरवणे योग्य होणार नाही असे रानड्यांना वाटत होते. सभा भरवावयाची असेल तर हिंदू व मुसलमान दोन्हीही जमातींची भरवावी असे रानड्यांचे आरंभी म्हणणे होते असे दिसते. २६ सप्टेंबर १८९३ च्या केसरीत टिळकांनी लिहिले आहे, "तुम्ही आपली सभा भरवा, पण मुसलमान आल्यास तुमचे काय जाते? असे रावबहादूर रानडे व रावबहादूर भिडे यांनी आग्रहाने सांगितल्यावरून काही मुसलमान लोकांस मंडळी भेटण्यास गेली होती व त्यापैकी कांही लोक जर आले असते तर त्यांचा समावेश केला असता. रावबहादूर रानडे यांचे मन सर्वस्वी मोडू नये एवढ्यासाठीच मुसलमानांनाही सभेच्या उपक्रमात सामील करून घेण्याचा टिळक-नामजोशी वगैरेंनी प्रयत्न केला. मात्र मुसलमान प्रतिसाद देत नाहीत म्हणून सभा भरवण्याचा बेत रद्द करावयास ते तयार नव्हते. या ना त्या कारणाने ही सभा पुढे ढकलण्याचा रानडे मात्र प्रयत्न करीत होते."

हिंदूंच्या या संकल्पित जाहीर सभेचा कार्यक्रम ठरविण्यासाठी म्हणून २५ ऑगस्ट १८९३ रोजी केशवराव रानडे यांच्या घरी एक 'प्रिलिमिनरी' सभा झाली. पूर्वतयारीच्या या सभेची निमंत्रणे सर्व पक्षांच्या शे-दीडशे लोकांना पाठवली होती. या सभेत टिळकांच्या पाठीराख्यांचे बहुमत होणार हा रागरंग पाहून ही 'प्रिलिमिनरी' सभा भरण्याच्या अगोदर किमान एक आठवड्यापासून रानड्यांनी संकल्पित जाहीर सभा होऊ नये म्हणून हालचाली करावयास सुरुवात केली. गोखले या वेळी कामानिमित्त मुंबईस गेले होते म्हणून रानड्यांनी गोखल्यांना पत्र लिहिले.

ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झालेल्या पत्रात गोखल्यांनी स्वतःच पुढे काय झाले ते लिहिले आहे. "रा. केशवरावजी रानडे यांच्या घरी सभा भरण्याचे अगोदर सुमारे ५-६ दिवस येथील एका सद्‌गृहस्थांचे (रानड्यांचे) मला मुंबईस पत्र आले... त्यात त्यांनी असे लिहिले होते की ... यासंबंधाने मि. मेथा व मि. वाच्छा या तिन्हाईत पारशी गृहस्थांचे मत काय आहे याचा शोध करावा. त्याप्रमाणे मेथा व वाच्छा या

दोन्ही गृहस्थांस ' या बाबतीत तुमचे मत काय आहे ? ' असे मी विचारले, तेव्हा मेथा म्हणाले, ' भलतेच ! सध्याच्या प्रसंगी केवळ एक पक्षाच्याच लोकांची सभा भरविण्याची कल्पनासुद्धा असह्य आहे. ( Oh ! The very idea of a sectional meeting at this juncture is intolerable. ) ' मि. वाच्छा यांनीही आपले मत त्याचप्रमाणे दिले. नंतर एक-दोन दिवसांनी सार्वजनिक सभेच्या काही कामाकरिता मी येथे आलो त्या वेळी येथील युनियन क्लबातील कित्येक गृहस्थांस मेथा व वाच्छा यांचा अभिप्राय कळविला. पुढे ज्या दिवशी केशवरावजी यांच्या घरी सभा व्हावयाची होती त्याच दिवशी सकाळी परत मुंबईस आलो. जाण्याच्या अगोदर रा. टिळक व युनियन क्लबातील काही गृहस्थ यांजमध्ये एके दिवशी जाहीर सभेसंबंधाने बराच कडाक्याचा वादविवाद झाला. त्या वेळी तो ऐकण्यास मी हजर होतो व केशवरावजी यांच्या घरी भरणाऱ्या सभेबद्दल जे निमंत्रणपत्रक निघाले होते तेही मी पाहिले होते.

" मुंबईस गेल्यावर त्याच दिवशी सायंकाळी नेहमीच्या संप्रदायाप्रमाणे मि. मेथा यांस भेटण्यास गेलो. थोडा वेळ इकडले-तिकडले बोलणे झाल्यावर त्यांनी मला येथील सभेबद्दलची हकीकत विचारली. मी सांगितले, ' आज त्या विषयाचा विचार करण्याकरता काही मंडळी जमावयाची आहेत. मी ज्या गोष्टी ऐकल्या आहेत त्यावरून पाहता जाहीर सभा भरावी असा तेथे ठराव होईल अशी मला भीती आहे. ' त्यावर थोडा वेळ विचार करून फेरोजशाह म्हणाले, ' मी सभा भरू नये अशाबद्दल टिळकांना तार करतो.' मी म्हणालो, ' या प्रकरणात आता आग्रहबुद्धीचा जोर विशेष झाला आहे, करिता तुमच्या तारेचा काही उपयोग होईल असे मला वाटत नाही. ' त्यावर फिरोजशहांनी उत्तर केले, ' उपयोग नाही झाला तर नाही. प्रयत्न तर करून पाहावा. ' मि. वाच्छा यांचे मत माझ्यासारखेच पडले, पण टिळक आपले ऐकतील अशी फेरोजशहांस आशा होती व त्यामुळे अखेर त्यांनी तार केली. तारेत, ' जाहीर सभा करण्याचा सध्याचा प्रसंग नव्हे, करिता विचार सोडून द्यावा ' असा मजकूर होता.

" तार पोचल्यावर लगेच दुसरे दिवशी रा. टिळकांनी मि. मेथा यांस एक लांब पत्र लिहिले. त्या पत्रात येणेप्रमाणे मजकूर होता. ' आपल्यास येथे होणाऱ्या सभेची बातमी बहुतकरून गोखले यांनी दिली असावी. गोखले यांनी ही हकीकत जशी सांगावयास पाहिजे तशी सांगितली नसेल असे वाटते. गोखल्यांच्या व आमच्या विचारांत या बाबतीत मतभेद आहे असे मला वाटत नाही....' व शेवटी मि. मेथा यांस कळविले होते की, रा. नामजोशी हे या बाबतीत तुमची समक्ष गाठ घेऊन सर्व हकीकत कळवतील. फेरोजशहांनी टिळकांचे पत्र मला वाचावयास दिले. ते वाचल्यावर मी फेरोजशहांस विचारले, ' टिळकांनी या पत्रात सभेच्या हेतूबद्दल जो मजकूर लिहिला आहे त्यात व मी सांगितलेल्या हकीकतीत तुम्हास कोणता सूर दिसून येतो ? ' मेथा म्हणाले, ' मला तर कोणत्याही प्रकारचा दिसत नाही.' काही वेळाने टिळकांच्या लिहिण्याबद्दल मला थोडे वाईट वाटले आहे असे पाहून मेथा बोलले, ' असल्या-

लिहिण्याकडे तुम्ही लक्ष देऊ नये. खरोखर अशा रीतीने असल्या गोष्टी तुम्ही मनाला लावून घेऊन नयेत. ( Oh, don't mind such remarks. Really you must not be so sensitive.)' पुढे टिळकांनी लिहिल्याप्रमाणे नामजोशी मेथा यांस भेटले. नामजोश्यांचे सर्व बोलणे ऐकून घेऊन मेथा यांनी पुन्हा त्यास सांगितले की, तुम्ही म्हणता अशा प्रकारची जाहीर सभा सध्या भरणे फार चुकीचे होईल. मेथा यांनी असेही सांगितले की, गोखल्यांनी माझा गैरसमज होण्याजोगे काही एक मला सांगितले नाही, इतकेच नव्हे तर तार न करण्याबद्दल माझे मन वळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नामजोश्यांना असे सांगितल्याबद्दल मेथा हे स्वतः दुसऱ्या दिवशी मजजवळ बोलले.

"पुढे एक-दोन दिवसांनी रा. टिळक हे मुंबई येथे आले. ते जेव्हा मेथा यांस भेटण्यास आले त्या वेळी मी तेथे होतो. दिनशा वाच्छा हेही होते. मेथांनी सभेबद्दल टिळकांस काही प्रश्न केले व शेवटी या सभा भरवू नका असे सांगितले. ते म्हणाले, 'सरकार काय करते हे स्पष्ट समजल्याशिवाय असे करणे बिलकुल रास्त होणार नाही.' त्यावर टिळक म्हणाले, 'सरकारबद्दल आम्ही काही म्हणत नाही. पण व्हिन्सेंट, आक्वर्थ यांच्या खटपटीबद्दल त्यांस दूषण देणे अवश्य आहे.' तेव्हा फेरोजशहांनी विचारले, 'या गृहस्थांशी अशा रीतीने तुम्ही सामना करावा इतकी त्यांची योग्यता आहे असे तुम्हांस वाटते काय ? ( Do you think, Tilak, that these men are worth your powder and shot ? )' या प्रश्नास टिळकांनी काही उत्तर दिले नाही. पुढे फेरोजशहा म्हणाले, 'मी आज कायदे कौन्सिलच्या सभेकरिता पुण्यास जाणार आहे व शुक्रवारपर्यंत तेथे आहे. तर सभा भरवावी असे म्हणणाऱ्यांपैकी जे प्रमुख असतील त्यांना तुम्ही घेऊन मजकडे आल्यास मला फार आनंद होईल. मी त्यांची मने वळविण्याचा प्रयत्न करीन.' टिळकांनी असे करण्याचे कबूल केले आणि मेथा यांची रजा घेतली. मेथा पुन्हा मुंबईस परत आल्यावर मी त्यांना मंडळी येऊन भेटली होती काय म्हणून विचारले. त्यांनी सांगितले, 'मी त्यांची वाट पाहात होतो. पण टिळक अगर दुसरे कोणीही यासंबंधाने बोलण्यास मजकडे आले नाहीत !"

फेरोजशहा मेथांना भेटून टिळक मुंबईहून पुण्यास १ सप्टेंबरला परतले. टिळकांनी स्वतःच पुढे काय घडले ते केसरीच्या वाचकांना सांगितले आहे. "त्याच दिवशी सकाळी रावबहादूर रानडे यांची व त्यांची गाठ पडून त्यांस ( टिळकांना ) रावबहादुरांनी असे सांगितले की, 'तुम्ही या रविवारी म्हणजे ३ तारखेस जी सभा भरविणार आहा ती पुढल्या रविवारी म्हणजे ता. १० रोजी भरवा, म्हणजे मध्यंतरी गव्हर्नरसाहेब काय म्हणतात ते पाहावयास सापडेल.'" रानड्यांची ही सूचनाही टिळकांनी कबूल केली व सभा १० सप्टेंबरला घेण्याचे ठरविले. ४ सप्टेंबरला सार्वजनिक सभेच्या वतीने तिसऱ्या औद्योगिक परिषदेस आलेल्या प्रतिनिधींना पानसुपारी-

साठी जोशी हॉलमध्ये बोलावले होते. तेथे हिंदूंबरोबर मुसलमान गृहस्थही हजर होते. मुंबईला ५ सप्टेंबरला हिंदु-मुसलमान दंग्याबाबत विचार करण्यासाठी जी सभा भरणार होती तिचे उद्देश मान्य असल्याची तार करण्याचा निर्णय पानसुपारीच्या वेळी जमलेल्या मंडळींनी घेतला. एवढे करून पुणेकरांनी गप्प बसावे असे रानड्यांना वाटत होते, पण टिळकांना ते मान्य नव्हते. ५ सप्टेंबरच्या केसरीत त्यांनी रानडे-गोखले वगैरेंच्या रोखाने लिहिले, "आमच्याकडे पुढारी लोकांस हा प्रश्न घेण्याची मोठी भीती वाटत आहे, त्यांपैकी कोणीही सरकारच्या कलाविरुद्ध कोणतीही गोष्ट करण्यास अगर बोलण्यास जीव धरीत नाही." टिळकांवर सरकार फिर्याद करणार अशा बातम्या पसरलेल्या असतानाही त्यांनी १० सप्टेंबरची सभा भरवण्याचा बेत सोडून दिला नाही.

दरम्यान टिळकांवर दडपण आणण्याच्या डावपेचातील एक भाग म्हणून मुंबई-पुण्याच्या २९ प्रतिष्ठित गृहस्थांच्या सह्यांनिशी एक पत्र पाठवले गेले व सभेच्या कल्पनेस विरोध केला गेला. दहा तारखेस जेव्हा होणार होणार म्हणून गाजत असलेली ही सभा झाली तेव्हा सहा-सात हजार लोक उपस्थित होते. या जंगी सभेत तीन ठराव मंजूर झाले. त्यांपैकी पहिल्या दोन ठरावांत महाराणी व्हिक्टोरियासंबंधी कृतज्ञता व्यक्त केली होती व गव्हर्नर हॅरिससाहेबांचे आभार मानण्यात आले होते. गोरक्षणाचा व हिंदु-मुसलमान दंगलीचा काही संबंध नाही हा महत्त्वाचा ठराव टिळकांनी स्वतः मांडला व त्याला नानासाहेब भोर वकील व फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर दत्तात्रय चांदोरकर यांनी दुजोरा दिला.

ही सभा पार पडल्यानंतर प्रथमतः ज्ञानप्रकाशकारांनी वादाला तोंड फोडले. १४ सप्टेंबरच्या अंकात ज्ञानप्रकाशकारांनी "तीन खोट्या गोष्टी लिहिल्या" असे टिळकांनी म्हटले आहे. फेरोजशहांना गोखल्यांनी पुण्यातल्या सभेची बातमी दिली. मेथा व नामजोशी यांच्या भेटीच्या वेळी गोखले हजर होते व या गोष्टी खुद्द गोखल्यांनीच ज्ञानप्रकाशकारांना सांगितल्या असे ज्ञानप्रकाशकर्ते रामभाऊ साने यांचे म्हणणे होते. ज्ञानप्रकाशमध्ये अशा आशयाचा मजकूर प्रसिद्ध होताच गोखल्यांनी टिळकांना पत्र लिहिले व ज्ञानप्रकाशातील विपर्यस्त मजकुराबद्दल आपण जबाबदार नाही असा खुलासा केला. १९ सप्टेंबरच्या अंकात टिळकांनी गोखल्यांचे हे मूळ इंग्रजी पत्र जसेच्या तसे छापले व ज्ञानप्रकाशकारांना बिनतोड उत्तर दिले. १८ सप्टेंबरच्या ज्ञानप्रकाशमध्ये गोखल्यांचे एक पत्र प्रसिद्ध झाले व त्यात मेथांनी टिळकांना तार पाठविली ती गोखल्यांच्या उत्तेजनामुळे हा टिळकांचा आरोप निराधार असल्याचे म्हटले होते.

१८ सप्टेंबरच्या सुधारकाच्या अंकात गोखल्यांची कड घेऊन आगरकर वादाच्या आखाड्यात उतरले. "हिंदूंच्या जंगी सभेने कोणता दिग्विजय लावला?" या शीर्षकाच्या संपादकीय लेखात त्यांनी टिळकांवर तुफान हल्ला चढवला. "ज्यांच्या मेंदूस

**धनुर्वात किंवा अर्धांगवायू झाला नाही**; ज्यांचे भाषण, लेखन व आचरण पाहिले असता विधात्याने सर्व शहाणपण एकत्र करून त्याचे हे मूर्तिमंत पुतळे ओतले आहेत की काय असा भास होतो. ज्यांचा **शब्ददुंदुभी** वाजू लागला की सारा समाज ते सांगतील तसे नाचण्यास सज्ज होतो; सारांश, ज्यांना या महाराष्ट्रभूमीचे अनभिषिक्त राजे म्हणण्यास हरकत नाही त्यांनी स्वल्प अडचण दिसल्याबरोबर **ग्रामसिंहाप्रमाणे** आपली शेपटे खाली घालावी आणि आपल्या शीलास अगदी उलट वर्तन करावे ही केवळ्या शरमेची गोष्ट आहे बरे! **ज्यांचा संसर्ग लोकांस महारोग्याच्या संसर्गाप्रमाणे वाटू लागला आहे** त्यांनी त्याशी फिरून सलगी करण्याचा व जे **जात्या खुनशी, घमेंडखोर व अत्यंत नीच** आहेत, त्यांनी वंद्य सज्जनावर निष्कारण तुटून पडण्याचा व त्यावर भलतेच आरोप आणण्याचा अधमपणाचा प्रयत्न करू नये तर केव्हा करावा?"

१४ सप्टेंबरच्या ज्ञानप्रकाशातील निराधार मजकूर, १८ सप्टेंबरच्या ज्ञानप्रकाश-मधील गोखल्यांचे विस्तृत पत्र व त्याच दिवशीच्या सुधारकात आगरकरांनी केलेला अपशब्दांचा अभूतपूर्व वर्षाव यामुळे टिळक प्रक्षुब्ध झाले व त्यांनी ज्ञानप्रकाश-कर्त्याप्रमाणे गोखल्यांचा व आगरकरांचाही समाचार घेतला. "अधीर तरतरीचे व अविचारी अतएव परप्रत्ययनेय बुद्धीचे तरुण सेक्रेटरी" असे टिळकांनी गोखल्यांचे वर्णन केले पण सर्वांत सणसणीत प्रत्युत्तर दिले ते आगरकरांना आणि तेही त्यांच्याच भाषेत! प्रथम आगरकरांनी वापरलेल्या अपशब्दांचा आहेर टिळकांनी त्यांना जसाच्या तसा परत केला. "स्वतः करवत नाही व दुसऱ्याने केलेले पाहवत नाही अशा मनुष्यास गवताच्या गंजीवरील कुत्र्याची उपमा देत असतात. चतुःशृंगीच्या मैदानावरील गंजी जळाल्यामुळे अगर दुसऱ्या काही कारणामुळे आमच्या येथील अशा प्रकारचा एक **गंजीवरील कुत्रा** अगदी पिसाळला आहे व ज्याच्या त्याच्यावर तोंड टाकण्याखेरीज त्यास दुसरा मार्ग काहीच दिसत नाही. सभेचे हेतू, उद्देश आणि ठराव हे या लेखकास मान्य आहेत असे त्याच्याच पहिल्या लेखावरून सिद्ध होते, मग आता सभेच्या चालकास व्यर्थ शिव्या देण्याचा हेतू **एम्. ए. झालेल्या मनुष्याचा मेंदू किती सडका असतो** हे दाखविण्यापेक्षा दुसरा काहीएक नव्हता असे म्हणावे लागते... सुधारकांच्या अग्रणीचे राजकीय बाबतीत अनुकरण न केले तर आमच्या-वर मोठा प्रसंग गुजरेल असे **गावाबाहेर महारोग्याप्रमाणे राहणाऱ्या या सुधारकाच्या पितामह एडिटरास** वाटत आहे ... सभेचे उद्देश व ठराव काय आहेत याची पूर्ण माहिती झाली असताही पुन्हा खोट्यानाट्या गोष्टी लिहून आपल्या व्यवसायबंधूबद्दल सरकारचे मन कलुषित करणे यापेक्षा जास्त नीचतेचा किंवा अधमपणाचा प्रकार मनुष्य अशी संज्ञा धारण करणाऱ्याकडून घडेल असे आम्हास वाटत नाही... गव-ताच्या गंजीजवळ राहून हे राजेश्री गवत खात नाहीत हे भर्तृहरी म्हणतात त्याप्रमाणे पशूंचे भाग्यच समजावयाचे!" (ठळक मजकूर लेखकाचा).

टिळकांनी आगरकरांना 'गंजीवरला कुत्रा', 'गावाबाहेर महारोग्याप्रमाणे राहणारा' वगैरे दूषणे दिली याबद्दल टिळकांच्या टीकाकारांनी आजवर इतका गवगवा केला आहे की, मुळात असल्या अपशब्दांचा वर्षाव करण्यास आगरकरांनी प्रारंभ केला ही वस्तुस्थिती आजवर कोणीच लक्षात घेतली नाही. टिळकांनी आगरकरांच्या संदर्भात 'महारोगी' संज्ञा वापरणे हे निषेधार्ह मानणाऱ्यांनी आगरकरांनी प्रथम टिळकांना ही उपमा दिली या वस्तुस्थितीकडे काणाडोळा केला हे लक्षात घेण्यासारखे आहे. १९ सप्टेंबरच्या अंकात हा सारा मजकूर लिहिताना "आम्हास आपल्या संरक्षणार्थ पुनः आपली लेखणी उचलावी लागत आहे" असे टिळकांनी आरंभी म्हटले आहे. 'उद्धटाशी उद्धट, खटनटाशी खटनट' होण्याचा टिळकांचा शिरस्ता होता. आगरकरांनी कुशब्दांचा भडिमार केल्यानंतर टिळक स्वस्थ बसणे शक्य नव्हते. त्यांनी तसल्याच भाषेत जबाब दिला. दोघांच्याही या पद्धतीच्या लेखनामुळे सार्वजनिक वादाची पातळी पार घसरली असे म्हणणे निराळे आणि या साऱ्या प्रकाराबाबत एकट्या टिळकांना बोल लावणे निराळे हे अभ्यासकांनी लक्षात घ्यावयास हवे.

इतकी शिवीगाळ झाल्यानंतर तरी आगरकरांनी गप्प बसायला हवे होते. पण २५ सप्टेंबर १८९३च्या अंकात त्यांनी गोखल्यांची ज्ञानप्रकाशमध्ये प्रसिद्ध झालेली दोन पत्रे उद्धृत केली. शिवाय "या उघडपणे बोलावयाच्या गोष्टी नव्हेत" या शीर्षकाचा विस्तृत संपादकीय लेख लिहिला. एका वाचकाने आगरकरांनी अपशब्दांचा वर्षाव करणारे लेख लिहू नयेत अशा आशयाचे त्यांना पत्र पाठवले होते त्याला उत्तरादाखल लिहिलेल्या या लेखात पुनः आगरकरांनी टिळकांवर हल्ला चढवला... "येथले व मुंबईचे काही थोर गृहस्थ नको नको म्हणत असता शाळेतली पोरेसोरे, **तेली-तांबोळी,** उदमीव्यापारी, भटेभिक्षुके व काही खातेपिते आणि लिहिणारे व वाचणारे अशांचा एक मोठा थवा शनवारच्या वाड्यापुढे गोळा केल्याबद्दल यांस मोठी फुशारकी वाटत आहे. पण हिंदूंच्या असल्या जंगी सभा रस्त्यात चाललेल्या डोंबाऱ्याच्या किंवा देवजी घसाड्याच्या खेळाला, शिराळशेटाला, तमाशाला, दह्यांडीला आणि बुधवारच्या व रविवारच्या बाजाराला व अशाच प्रकारच्या दुसऱ्या कामालाही भरत असतात! मोठा समाज जमवण्यात काय अर्थ आहे? संख्येशी अकलेचा काही मेळ असता तर ती गोष्ट निराळी होती. अनुभवावरून या दोन गोष्टी उलट प्रमाणात असतात असे दिसून आले आहे...**लोकमान्यता** मिळविण्याची अक्कल अंगी नसून ती मिळविण्यासाठी उतावीळ झालेल्या इसमांचा नेहमी असाच फजिता व्हावयाचा... डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या सोसायटीस रसातळास पोचविण्याचा प्रयत्न करणे असली कामे करण्यास हे मनुष्यांचे अमानुष पुढारी सहज सिद्ध होतील इतकेच नाही तर आपला कोपाग्नी शमविण्यासाठी ते तुमच्या प्रांतिक सभांची व सार्वजनिक सभांची, राष्ट्रसभांची व सामाजिक परिषदांची वाट लावण्यास मागेपुढे पाहणार नाहीत."

१० सप्टेंबरच्या सभेच्या संदर्भात आगरकरांनी लिहिलेले लेख त्यांच्या निबंध-संग्रहात आजपर्यंत समाविष्ट झाले नाहीत त्याचप्रमाणे गोखल्यांची पत्रेही अज्ञातच राहिली. टिळकांनी केसरीत लिहिलेली स्फुटेही समग्र टिळक वाङ्मयाच्या प्रकाशित खंडांत समाविष्ट झालेली नाहीत. त्यामुळे मूळ अंक वाचल्याखेरीज हे सगळे धागेदोरे हाती लागत नाहीत. वर उद्धृत केलेल्या आगरकरांच्या लेखातील ( ठळक टाइपातील मजकुरावरून ) कालांतराने टिळकांच्या संदर्भात वापरल्या गेलेल्या ' तेल्यातांबोळ्यांचे पुढारी ' किंवा ' लोकमान्य ' या शब्दांचे मूळ कोठे आहे हे लक्षात येईल.

आगरकरांनी पुन्हा हल्ला चढवल्यानंतर त्यांच्या विस्तृत लेखाला टिळकांनी २६ सप्टेंबरच्या केसरीत थोडक्यात, पण कडक शब्दांत उत्तर लिहिले आहे. " आमचे बंधु सुधारककार यांनी लोकांस आमच्या संबंधाने इषारत दिली आहे...डे. ए. सोसायटीत फाटाफूट होण्यास कोणत्या गृहस्थाची स्वार्थबुद्धी, आपमतलबीपणा, द्वेष, हेवा, मत्सर आणि नीचपणा ही कारण झाली हे पुण्यातील लोकांस सांगावयास पाहिजे असे नाही. ज्यांनी ती संस्था सोडली त्यांच्या मनातून जर तीस अपाय करावयाचा असता तर तो किंचितही करता आला नसता असे नाही. तथापि त्यांनी तो मार्गच सोडून दिला. यावरून पूर्वी झाले ते झाले पण आता तरी प्रोफेसर होण्यासाठी आपली मते व स्वतंत्रता विकणाऱ्या गृहस्थांनी गप्प बसणे वाजवी होते. ज्यांचे हातून औद्योगिक परिषदेसारख्या संस्था उत्पन्न झाल्या किंबहुना सन १८८० सालच्या जानेवारी महिन्यात मोरोदाबादादांच्या वाड्यात जे हजर राहिले नसते तर आज गावाबाहेर घर बांधून राहण्याचा प्रस्तुतच्या ' अमानुष ' प्रोफेसरांस प्रसंग आला नसता, तेच लोक प्रांतिक सभा, सार्वजनिक सभा व सामाजिक परिषद यांची वाट लावतील. अशा तऱ्हेचे मूर्खपणाचे उद्गार काढण्याइतके हेकेखोर व मत्सरी आमच्या खाजगी कॉलेजाचे प्रिन्सिपाल असतील असे कालचा लेख वाचीपर्यंत आम्हास वाटत नव्हते...न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज या दोन संस्थांच्या हितासाठी यापेक्षा जास्त सांगणे तूर्त इष्ट नाही व आम्ही सांगू इच्छीत नाही. "

टिळकांच्या या उत्तरानंतर वादावर पडदा पडलेला दिसतो. या वादात टिळकांची फटफजिती झाली किंवा त्यांचे हसे झाले हे आगरकर-चरित्रकार अळतेकरांचे म्हणणे संपूर्णतया निराधार असल्याचे दिसते. दोन्ही बाजूंचा उपलब्ध पुरावा पाहिल्यानंतर टिळकांनी योजिलेली सभा होऊ न देण्यासाठी रानड्यांनी शक्य तितके सर्व प्रयत्न केले हेही स्पष्ट होते. नेहमीप्रमाणे गोखल्यांचा या प्रकरणात उपयोग केला गेला. रानड्यांच्या दडपणाला व विरोधाला न जुमानता टिळकांनी जंगी सभा भरवली आणि राजकीय बाबतीतही पुण्यात रानड्यांचे वाक्य प्रमाण अशी स्थिती राहिली नसल्याचे सिद्ध केले. रानडे गटाला हा प्रकार जिव्हारी लागला होता हे आगरकरांच्या लेखातील भाषेवरून स्पष्ट होते. सभेनंतरच्या वादात कुशब्दांची लाखोली प्रथम आगरकरांनी वाहिली व मग टिळकांनी तिची परतफेड केली. मात्र वादाच्या

या धुमश्चक्रीतही आपण स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थांचे हित ज्यामुळे धोक्यात येईल असे काहीही लिहिणे टिळकांनी टाळले हेही उघड दिसते.

— केसरी : दिवाळी विशेषांक, १९७८

०००००००००००० ०००००००००००

# ५

# शोध सत्यशोधकांचा

०००००००००००००००००००००००००

सर्वसामान्य मराठी माणूस शरीराने आधुनिक काळात वावरत असला तरी मनाने भूतकाळातच रमलेला आढळतो, असे म्हटले जाते. मराठी भाषिकांना इतिहासाने पुरते झपाटलेले आहे, असे इतरांनी म्हणण्याइतपत त्यांना इतिहासाविषयी प्रेम वाटत असले तरी त्यांचे हे प्रेम शिवाजीमहाराजांच्या उदयापासून ते पेशवाईच्या अस्तापर्यंतच्या सुमारे दोनशे वर्षांच्या कालखंडापुरतेच मर्यादित आहे. इंग्रजी राजवटीनंतरच्या काळातील आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचा जितका पद्धतशीर अभ्यास व्हावयास हवा होता तितका अद्याप झालेला नाही. इतकेच नव्हे, तर अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासाची विविध अस्सल साधने—जुनी वृत्तपत्रे, सरकारी दप्तरातील कागदपत्र, रोजनिश्या, खाजगी पत्रव्यवहार—धुंडाळून त्यांच्या आधारे घटनांची शहानिशा करावयाचे प्राथमिक पण अत्यावश्यक कामही अजून फारसे झालेले नाही. गेल्या शतकातील सत्यशोधक समाजाची चळवळ किंवा या शतकातील ब्राह्मणेतरांची अगर दलितांची चळवळ यांसारख्या महत्त्वाच्या चळवळींचा साधार व सविस्तर इतिहास अजून लिहिला गेलेला नाही. आज उपलब्ध आहेत ती या आंदोलनाला प्रेरणा देणाऱ्या थोर नेत्यांची–महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांची चरित्रे! कित्येक वर्षे उपेक्षित राहिलेल्या या पुढाऱ्यांची जीवनकहाणी सांगितली गेली तीही अगदी अलीकडच्या काळात! या दिशेने श्री. धनंजय कीर यांनी केलेले कार्य इतके लक्षणीय आहे की, त्यांनी लिहिलेल्या चरित्रांचे अवधान ठेवूनच अभ्यासकांना वाट धुंडाळावी लागते.

पण इतिहास म्हणजे काही केवळ थोर पुरुषांची चरित्रे नव्हेत. चरित्रनायकाच्या कर्तृत्वाचा आलेख काढताना कोणत्याही चरित्रकाराला तत्कालीन घडामोडींची

हकीकत सांगावी लागते हे खरे. मात्र चरित्रनायकास केंद्रस्थानी कल्पून बहुतेक सर्व चरित्रे लिहिली जात असल्याने चरित्रनायकास कळतनकळत झुकते माप दिले जाते. इतिहास घडवण्यात चरित्रनायकाचा वाटा किती मोठा होता हे सांगताना त्याच्या अन्य सहकाऱ्यांनी आपापल्या परीने केलेल्या प्रयत्नांचा तपशील नेहमीच दिला जातो असे नाही. स्वाभाविकच केवळ चरित्रांच्या आधाराने सामाजिक चळवळींचा इतिहास लिहिला गेल्यास त्या चळवळीतील गुंतागुंत व चढउतार, चळवळीच्या नेत्यांमधील मतभेद, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, हेवेदावे, आपल्या हाती नेतृत्व टिकवण्यासाठी चाललेली चुरस, त्यामुळे निर्माण झालेले ताणतणाव, बदलती धोरणे व डावपेच वगैरे अंगांचे पुरेसे दर्शन घडत नाही. म्हणूनच सत्यशोधक चळवळीच्या इतिहासास उपयुक्त अशी मूळ साधने शोधून त्यांची छाननी करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकाने चालवला आहे. हा शोध अद्याप पुरा झालेला नाही. मात्र आतापर्यंत हाती लागलेल्या माहितीच्या आधारे सत्यशोधक चळवळीतील आजवर दुर्लक्षिल्या गेलेल्या किंवा अज्ञात असलेल्या घटनांचा वेध घ्यावा असे वाटते.

जोतीराव फुले व सत्यशोधक समाज यांना ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी दिलेल्या पाठिंब्याविषयी व प्रेरणेविषयी आजवर बरेच लिहिले गेले आहे. मात्र 'वज्रसूची'-सारखे संस्कृत ग्रंथ किंवा कबीराचा 'बीजग्रंथ'–विशेषतः त्यातील 'विप्रमती' हा भाग–वगैरे पुस्तकांतूनही जोतीरावांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्फूर्ती घेतली होती या वस्तुस्थितीकडे बहुधा दुर्लक्ष केले जाते. सत्यशोधक समाजाचे मित्र तुकाराम तात्या पडवळ या भंडारी समाजातील गृहस्थाचे 'जातिभेद विवेकसार' हे पुस्तक १८६१ साली प्रथमतः 'एक हिंदू' या नावाने प्रसिद्ध झाले. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती जोतीरावांनी १८६५ साली प्रकाशित केली होती हे सर्वश्रुत आहे. "हिंदुजन जी संसारात दुःखे भोगितात त्या, किंबहुना सर्व दुःखांचे मूळ हा जातिभेद आहे." असे सांगून प्रस्तावनेत ग्रंथकर्त्याने म्हटले होते, "आपण जे म्हणतो त्याकडेस लोकांनी लक्ष द्यावे म्हणून त्याने हा ग्रंथ शास्त्राधारे लिहिला. वज्रसूची नामे ग्रंथात याच रीतीप्रमाणे जातिभेदाचे अखंडनीय खंडन केले आहे म्हणून त्याचेही भाषांतर या ग्रंथाचे ठायी छापिले आहे. ज्यापेक्षा हे खंडन सयुक्तिक आहे, त्यापेक्षा ते किंचित विस्तृत असले तरी त्याकडेस हा ग्रंथकर्ता लक्ष देत नाही. या ग्रंथाच्या ठायी कोणत्याही ठिकाणी या अर्थान्वयाशिवाय दुसरे काही लिहिले आहे असे या ग्रंथकर्त्यास वाटत नाही."[१] तुकाराम तात्यांनी ज्या ग्रंथाचा आधार घेतला होता त्या 'वज्रसूची' या संस्कृत ग्रंथाचा मराठी अभंगानुवाद संत बहिणाबाईंनी केला होता. तसेच शाहूकालीन संत गोपाळनाथ यांचे बंधू श्रीश्यामराज यांनीही केला होता. पुण्यापासून अठरा मैल अंतरावर असलेल्या निघोजे गावच्या आदिनाथ नावाच्या गुरव गृहस्थांनी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात 'नाथलीलामृत' हा ग्रंथ रचला होता. या ग्रंथातही 'वज्रसूची' तील विचारांचा संक्षेपाने कसा अनुवाद केला आहे

हे प्राचीन साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रा. चिं. ढेरे यांनी दाखवून दिले आहे.[२] एकोणिसाव्या शतकातील राजा राममोहन रॉय, तुकाराम तात्या पडवळ व दादोबा पांडुरंग किंवा विसाव्या शतकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना 'वज्रसूची'ने कसे प्रभावित केले होते हे डॉ. ढेरे यांनी सांगितले आहे. तुकाराम तात्यांचे पुस्तक जोतीराव फुल्यांनी प्रकाशित केले, या वस्तुस्थितीची त्यांनी दखल घेतली आहे. मात्र 'वज्रसूची'तील जातिभेदविरोधी विचारांनी जोतीराव फुले व त्यांचे सत्यशोधक सहकारी प्रभावित झाले असतील ही शक्यता त्यांनी लक्षात घेतलेली दिसत नाही.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपूर्वी काही महिने जोतीरावांच्या दुकानात ते व त्यांचे काही मित्र दर रविवारी जुन्या ग्रंथांचे वाचन करीत असत असे दिसते. अशा प्रसंगी हजर असलेले जोतीरावांचे एक सहकारी तुकाराम हणमंत पिंजन यांची साक्ष या दृष्टीने महत्त्वाची आहे : "ज्ञानगिरी बुवा कबीराने केलेल्या बीजक ग्रंथातील विप्रमती भाग जमलेल्या मंडळीस वाचून दाखवीत. बीजक ग्रंथ ब्रीज भाषेत असल्यामुळे विप्रमती भागाचा ज्ञानगिरी बुवा मराठीत तर्जुमा करून मंडळीस सांगत असत. त्यात ब्राह्मणाच्या स्वार्थाचे, स्वभावाचे, वर्तणूक वगैरेचे फार वर्णन आहे." कबीराने ब्राह्मणावर केलेली टीका ऐकून "ब्राह्मणापासून ब्राह्मणेतराची सुटका कशी होईल हे विचार" जोतीरावांच्या "मनात खेळू लागले" व त्यांची परिणती सत्यशोधक समाजाच्या स्थापनेत झाली असे पिंजन सांगतात.[३] सत्यशोधक समाजात नव्याने दाखल होणाऱ्या सभासदास 'तळी उचलून त्यातील भंडार व गुलाल कपाळास' लावावा लागे, हा संस्कारही अर्थपूर्ण आहे. यावरून महात्मा फुले व त्यांचे सत्यशोधक सहकारी यांच्यावर केवळ खिस्ती धर्मोपदेशकांचा प्रभाव होता असे वाटत नाही. 'वज्रसूची' सारख्या ब्राह्मणावर व जातिभेदावर झोड उठवणाऱ्या ग्रंथातील विचारांनी किंवा कबीरासारख्या संताच्या विचारांनीही सत्यशोधकांना प्रेरणा दिली होती.

जोतीरावांचे एक प्रमुख सहकारी व 'दीनबंधू'चे आद्य संस्थापक-संपादक कृष्णराव भालेकर यांचे 'अंतकाळचे उद्‌गार' या नावाचे हस्तलिखित टिपण प्रस्तुत लेखकास पाहावयास मिळाले. त्यात भालेकरांनी म्हटले आहे, "सन १८६४ ते ६८ पर्यंत मिशनरी शाळेत शिकण्यास जात होतो. त्यामुळे नुसता धर्मसंबंधी खऱ्या-खोट्या गोष्टींचा शोध करण्याचा हव्यास लागला. सन १८६६ ते ७२ पर्यंत माझ्या जन्मगावी भांबुर्ड्यास श्री. साधू जंगलीशा यांच्या अद्वैत व्याख्यानाच्या नित्य श्रवणाने माझे धर्मसंबंधी व ईश्वरासंबंधी घोटाळलेले मन अगदी खुले होऊन गेले आणि लोक अज्ञानामुळे फार बहकले आहेत व त्यांच्या बहकण्यावर ब्राह्मण लोकांच्या निर्वाहाचे तारू चालले आहे अशी खात्री झाली."[४] भालेकरांनी सत्यशोधक समाजात दाखल होण्यापूर्वी 'जंगलीमहाराज' या नावाने विख्यात असलेल्या साधूचा अनुग्रह घेऊन त्यांना गुरू केले होते, तर जोतीरावांचे व्याही हडपसरचे ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांनी लग्नापूर्वी बैरागी बनून बरीच भ्रमंती केली होती. ससाण्यांचे आजोबा कबीरपंथी

होते त्यामुळे घरातच कबीराच्या विचारांची त्यांना माहिती झाली असण्याची शक्यत आहे.[५] सत्यशोधकांच्या विचाराचा वृक्ष विलायती खतपाणी मिळाल्यामुळे तरारला असे वाटले, तरी त्याची पाळेमुळे इथल्या मातीतच रुजली होती असे म्हणणे योग्य ठरेल.

सत्यशोधक समाजात दाखल होण्यापूर्वी व जोतीरावांची ओळख होण्यापूर्वीच भालेकर भांबुर्ड्यास फार्स बसवून त्याच्याद्वारा 'धर्माच्या नावाखाली भोंदू ब्राह्मण भोळ्याभावड्या, अडाणी लोकांना कसे बनवतात' हे दाखवीत होते. सत्यनारायणासारखे विधी म्हणजे कशी थोतांडे आहेत हे लोकांना पटवून देण्यासाठी त्यांनी एक ओवीबद्ध लहानसा ग्रंथ रचला होता व सत्यनारायणाच्या पोथीच्या वेळी लोकांकडून ब्राह्मण करवितात तसा केळीच्या खुंटाचा व रोषणाईचा हुबेहूब थाट करून सत्यनारायणपूजेची यथेच्छ चेष्टा केली होती. जहागिरदार, इनामदार, देशमुख वगैरेंना त्यांच्या हाताखालचे कारभारी किंवा देवऋष्यांसारखे लोक कसे लुबाडतात हे दाखवणारे 'अज्ञानराव भोळे देशमुख' नावाचे नाटक लिहून भालेकरांनी त्याचा एक प्रयोगही केला होता. भालेकरांनी भांबुर्ड्यास चालवलेल्या या उपक्रमांची बातमी कळल्यामुळे जोतीराव त्यांना भेटायला गेले. भालेकरांनी या भेटीचे वर्णन लिहून ठेवलेले आढळले. ते असे : "विठोबाचे देवळात त्यांना बसवून गावातील मंडळी मी बोलावली व त्यांचे भाषण व्हावे म्हणून मी त्यांना आग्रह केला. त्यांनी संप्रदायास अनुसरून बसल्याबसल्याच थोडेसे भाषण केले. त्या भाषणातील दोष दाखविण्यासाठी (माझे त्या वेळी पोरवय होते. सबब वाद घालण्याची हौस म्हणून) उभा राहून भाषण केले. भाषण ते काय! पोराचेच. पण मुद्दे मुख्य उद्देशास धरून होते. सबब भाषण आटोपल्यावर मशारनिल्हे फुले यांनी मला जवळ घेऊन कुरवाळले आणि माझ्या वडिलांविषयी माहिती विचारली. ते व मी अगदी जवळचे सोयरीसंबंधीचे निघाल्यामुळे त्यांना जो आनंद झाला तो फारच झाला."[६]

या पहिल्या भेटीच्या वेळी भालेकरांनी जोतीरावाबरोबर जसा हिरीरीने वाद घातला तसा तो पुढेही अनेकदा घातला. कृष्णराव भालेकर हे सावित्रीबाई फुल्यांच्या नात्यातले असून ते त्यांचे दूरचे भाऊ लागत. हे नाते कळल्यामुळे व भालेकर जोतीरावापेक्षा तब्बल तेवीस वर्षांनी लहान असल्यामुळे जोतीरावांनी आरंभीच्या दोनएक वर्षांत त्यांचे बरेच कौतुक केले. १८७७ पासून मात्र दोघांत प्रथम कुरबूर सुरू झाली, खटके उडू लागले आणि १८८५ मध्ये तर दोघांनीही परस्परांवर जाहीर रीत्या कडक टीका केली व एकमेकांची उणीदुणी काढली. जोतीरावांच्या मृत्यूपर्यंत अधूनमधून त्यांच्या व भालेकरांच्या चकमकी चालूच होत्या. श्री. धनंजय कीर यांनी फुले व भालेकर यांच्यामधील मतभेदांचा निर्देश करून काही तपशील दिला आहे.[७] भालेकरांच्या खाजगी कागदपत्रांवरून व '**दीन-मित्र**', 'शेतकऱ्यांचा कैवारी' यांच्या उपलब्ध अंकांवरून या दोन सत्यशोधकांमधील तेढीचे स्वरूप

अधिक स्पष्ट होते.

स्त्रियांविषयीच्या दृष्टिकोणामधील फरक सोडला, तर अन्य बाबतीत भालेकरांचे जोतीरावांबरोबर मूलभूत स्वरूपाचे वैचारिक मतभेद फारसे झालेले दिसत नाहीत. मात्र सत्यशोधकांची चळवळ चालविण्यासाठी हाती घ्यावयाच्या उपक्रमांबाबत त्यांचे १८७७ नंतर अनेकदा तीव्र मतभेद झालेले दिसतात. नवनवीन उपक्रम उत्साहाने हाती घ्यावयाचे व कमालीच्या कल्पकतेने सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांचा धूमधडाक्याने प्रचार करावयाचा, असा भालेकरांचा खाक्या असे. जेमतेम पंचविशी उलटलेला हा महत्त्वाकांक्षी, बुद्धिमान तरुण सबंध चळवळच आपल्या ताब्यात घेऊ पाहात आहे असे पन्नाशी उलटलेल्या पोक्त जोतीरावांना वाटले असण्याची शक्यता आहे. चळवळीची सर्व सूत्रे आपल्या हाती ठेवण्याचा व आपल्याला हवे तसे त्या चळवळीला वळण देण्याचा कोणताही नेता प्रयत्न करीत असतो. सुभाषचंद्र बोस कॉंग्रेस अध्यक्षपद भूषवीत असता महात्मा गांधींनीही असे केले होते. जोतीराव फुले महात्मा असले तरी अखेर माणूसच होते. त्यांचेही तीव्र रागलोभ होते. कधी आपल्याला न विचारता किंवा कधी आपल्या विरोधाला न जुमानता पुढाकार घेऊन नानाविध कार्यक्रम पुढे रेटू पाहणाऱ्या भालेकरांचे धोरण जोतीरावांना रुचले नसावे त्यामुळे त्यांची भालेकरांबरोबर स्पर्धा व संघर्ष होणे अटळ झाले असावे.

अठराशे पंचाहत्तर साली "जोतीरावांनी सत्यशोधक समाजाचे अध्यक्षपदाची धुरा समाजाचे एक प्रभावी व तरुण नेते डॉ. विश्राम रामजी घोले यांच्या खांद्यावर दिली" असे सांगून फुले-चरित्रकार धनंजय कीर यांनी असा निष्कर्ष काढला आहे: "जो नेता खरा संघटक असतो तो आपल्या चळवळीतील तेजस्वी तरुणांना स्फूर्ती देऊन जबाबदारीने काम करण्याची संधी देतो. तरुण कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा वा बुद्धीचा तो हेवा करीत नाही. अशा खऱ्या नेतृत्वापैकीच जोतीरावांचे नेतृत्व होते."[८] कीरांचा हा निष्कर्ष वस्तुस्थितीवर आधारलेला नाही. एक तर विश्राम रामजी घोले यांची १८८५ साली तरुणांत गणना करता आली नसती. १८३३ साली जन्मलेले घोले जोतीरावांपेक्षा फक्त सहा वर्षांनी लहान होते व १८७५ साली सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष झाले तेव्हा त्यांची चाळिशी उलटलेली होती. घोल्यांना अध्यक्षपद देताना त्यांच्या तारुण्यापेक्षा सरकारदरबारी असलेल्या त्यांच्या प्रतिष्ठेचा व कुशल सर्जन म्हणून त्यांनी कमावलेल्या नावलौकिकाचा विचार अधिक केला गेला असणार हे उघड आहे. खेरीज खुद्द धनंजय कीर यांनीच भालेकर व लोखंडे या फुल्यांच्या सहकाऱ्यांच्या संदर्भात नोंदवलेले मतही लक्षात घेण्यासारखे आहे. कीर म्हणतात, "या तरुण पुढाऱ्यांना मतभेदामुळे स्वतंत्र रीतीने चळवळ करण्यास जोतीराव फारसा वाव देत नसावे असे दिसते."[९] कीरांची ही समजूतच अधिक बरोबर आहे असे उपलब्ध पुरावा पाहिल्यावर म्हणावे लागते.

डॉ. विश्राम रामजी घोले १८७५ पासून १८७७ पर्यंत सत्यशोधक समाजाचे

अध्यक्ष होते. १८७७ साली घोल्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्याविषयी भालेकरांनी लिहिले आहे : " डॉ. विश्राम रामजी घोले हे मागासलेल्या लोकांपैकी होते. इंग्रजी विद्या त्यांना अवगत होती. सुधारलेल्या लोकांपेक्षा धिटाईची बोलणी बोलणारे होते. त्यांना लोकांनी पुण्याच्या सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष बनविले होते. त्यांनी अध्यक्षाचे कामही बरेच दिवस व ते चांगल्या प्रकारे केले, पण १८७७ च्या आरंभास त्यांनी पुण्याच्या ज्ञानप्रकाशात प्रसिद्धपणे प्रसिद्ध करून अध्यक्षाचे जागेचा खरमरीतपणे राजीनामा देऊन वेगळे झाले. कारण समाजातील कोणेका गृहस्थाच्या घाणेरड्या स्वभावास कंटाळून म्हणा किंवा ब्राह्मणांच्या डुरकावणीस चपापून भिऊन म्हणा. "[१०] सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सभासद व काही वर्षे घोल्यांचे सहकारी असलेले हरिश्चंद्र नारायण नवलकर यांनी त्यांच्या आठवणीत घोल्यांच्या राजीनाम्याबद्दल कृष्णशास्त्री चिपळूणकरांना जबाबदार धरले आहे : " कलीने कृष्णशास्त्री चिपळोणकर यांच्या शरीरात संचार केला. शास्त्रीबुवाने डॉ. घोले यांना वेरले आणि त्यांना या समाजातून काढण्याचा यत्न सुरू केला आणि तो यशस्वीसुद्धा झाला. डॉ. घोले यांनी अध्यक्षस्थानी बसून शास्त्रीबुवांनी लिहून दिलेले भाषण वाचून दाखविले. शास्त्रीबुवांनी त्या भाषणात आपला ब्राह्मणी कावा लढवून समाजाच्या मूळ हेतूवरच कुऱ्हाड चालविली."[११]

घोल्यांनी 'सत्यशोधक समाजा'च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला यामुळे साहजिकच निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकरांना आनंद झाला. 'सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' या शीर्षकाच्या परीक्षणात विष्णुशास्त्र्यांनी एका ठिकाणी दिलेली तळटीप बोलकी आहे : " आमच्या ज्ञातीतील एका प्रमुख विद्वानाने गेल्या मे महिन्यातील सप्ताहात एक व्याख्यान दिले...ते विशेषतः 'सत्यशोधक मंडळीने' ऐकण्यासारखे होते....समाजाचे अध्यक्ष येथील लोकप्रिय डॉ. विश्राम रामजी घोले यांच्याखेरीज कोणी प्रमुख मंडळी त्या समयी बहुधा आली नसावी. 'गुलामगिरी'च्या विद्वान कर्त्यांनी जर त्या दिवशी व्याख्यानाची जागा सुशोभित केली असती, तर 'सत्यदीपिका'दी पत्रांच्या द्वारे त्यांच्या डोक्यात साठविलेला गाढ अंधकार बराच दूर होऊन त्यांस खरे 'सत्य' काहीतरी उमजायला लागले असते...वर सांगितलेल्या अध्यक्षांच्या मनावर मात्र त्या दिवशी खऱ्या सत्याचा प्रकाश बराच पडला असावा असे दिसते. का की, त्यांनी यंदाच्या सत्यशोधक वक्तृत्वसमारंभात शेवटी जे भाषण केले ( हे ज्ञानप्रकाशातून आमच्या वाचकांपैकी कित्येकांनी वाचलेच असेल ) त्यात जोतीबांची ज्योत मालवल्यासारखीच दिसली. "[१२] सत्यशोधक समाजाच्या रिपोर्टसंबंधी लिहिण्याचे निमित्त करून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी विखारी टीका केली व फारा दिवसांपासून फुल्यांच्या विषयी मनात धुमसणारा राग ओकून टाकला असे वाटते. १८७३ साली प्रसिद्ध झालेल्या 'गुलामगिरी' या पुस्तकात जोतीरावांनी कृष्णशास्त्री चिपळूणकरांवर आडवळणाने बरीच टीका केली होती.[१३] दक्षिणा प्राइज

कमिटीवर झोड उठविताना किंवा ‘ एकंदर सर्व मराठी वर्तमानपत्रांतील विषयांचे इंग्रजीत गोषवारे काढून सरकारास दाखविण्याचे काम ’ करणाऱ्या भट सभासदाच्या पक्षपातीपणाचा निर्देश करताना त्या काळात ‘ रिपोर्टर ऑन दि नेटिव प्रेस ’ हे अधिकारपद भूषविणारे व बरीच वर्षे दक्षिणा प्राइज कमिटीचे सेक्रेटरी म्हणून काम करणारे कृष्णशास्त्री चिपळूणकर जोतीरावांच्या डोळ्यांसमोर होते हे स्पष्ट आहे.

आपल्या पित्याची टवाळी करणाऱ्या व विशेषतः त्यांच्या बाहेरख्याली वर्तनाबाबत जाहीर वाच्यता करणाऱ्या कोणालाही विष्णुशास्त्र्यांनी कधी क्षमा केली नाही. अशा माणसावरचा राग मनात ठेवून ते संधी सापडताच त्याच्यावर तुटून पडत. “ त्यांचा बराच खुनशी स्वभाव असे ” असे खुद्द त्यांच्या धाकट्या बंधूंनी, लक्ष्मणराव चिपळूणकरांनी म्हटले आहे.[१४] सत्यशोधक समाजाच्या रिपोर्टाबद्दल लिहिता लिहिता ‘ गुलामगिरी ’ या फुल्यांच्या पुस्तकावरही त्यांनी कडाडून हल्ला चढवला आहे, हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. विश्राम रामजी घोले व कृष्णशास्त्री चिपळूणकर याचा स्नेह लक्षात घेऊन, घोले सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते तोपर्यंत ते दुखावले जाऊ नयेत म्हणून, सत्यशोधकांविषयी काही लिहिण्याचे विष्णुशास्त्र्यांनी टाळले असावे. घोल्यांनी राजीनामा दिल्यानंतर कसलीच आडकाठी राहिली नाही व मग मुळीच वेळ न दडवता विष्णुशास्त्र्यांनी शरसंधान करून त्यांच्या दृष्टीने फार दिवस राहिलेला हिशेब चुकता केला असावा !

घोल्यांचा राजीनामा, विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केलेली हेटाळणी याबरोबरच १८७७ साल सत्यशोधक चळवळीच्या इतिहासात महत्त्वाचे ठरते ते आणखी एका महत्त्वाच्या घडामोडीमुळे ! याच वर्षी कृष्णराव भालेकरांनी ‘ दीनबंधू ’ हे वर्तमानपत्र सुरू केले. आपल्याला वर्तमानपत्र काढण्याची स्फूर्ती कशी झाली याबद्दल भालेकर म्हणतात, “ त्या देवळात ( भांबुर्ड्याच्या विठोबाच्या देवळात ) मी गरीबशी लायब्ररी कै. गणेश वासुदेव जोशी ( सार्वजनिक काका ) यांच्या सूचनेवरून स्थापन केली होती. त्या लायब्ररीत अवघी दोनच पत्रे आम्ही घेत होतो. ती म्हणजे ‘ लोककल्याणेच्छू ’ व ‘ ज्ञानचक्षू ’. हीच पत्रे मला पुढे दीनबंधू पत्र काढण्याची स्फूर्ती देण्यास कारण झाली. या पत्रांतील मजकूर वाचून मला वाटू लागले की आपणही असे लिहू. पण आपल्या उद्देशाशी धरून लिहू.[१५] भालेकरांना जात्याच लिहिण्याची व सभेत बोलण्याची हौस होती. सत्यशोधक समाजातर्फे दोन वेळा बक्षीस लावून निबंध मागविले गेले तेव्हा विठ्ठल मारुती शिंदे या आपल्या मित्रास भालेकरांनी लिहून दिलेले निबंधच बक्षिसपात्र ठरले होते. भालेकरांनी निबंध वाचल्याचे, भांबुर्ड्यास ते उपदेश करीत असल्याचे उल्लेख आरंभीच्या वर्षांच्या अहवालातही आढळतात. भांबुर्ड्यास रात्रीची शाळा काढण्याचाही त्यांचा विचार होता असे अहवालावरून दिसते. नवनवीन आकर्षक उपक्रम सुरू करण्यात भालेकर नेहमीच आघाडीवर असत.

व्यंकू बाळोजी कालेवार व रामय्या व्यंकय्या अय्यावारू या मुंबईच्या तेलगू फुलमाळी समाजातील गृहस्थांनी "समाजाचे हेतू आणि गरीब, अज्ञानी, क्षुद्र लोकांची संकटे भटभिक्षुक आणि सरकारी ब्राह्मण कामगार यांजपासून त्यास जे त्रास सोसावे लागतात ते आमच्या दयाळू इंग्रज सरकारास जाहीर करण्याकरिता बाराशे रुपयांचा छापखाना दिला होता."[१६] दोन वर्षे हा छापखाना पडून होता. भालेकर वर्तमानपत्र काढण्यास तयार होते, पण जोतीराव फुल्यांनी त्यांच्या या उपक्रमास निकराचा विरोध केला. एका खासगी पत्रात भालेकरांनी म्हटले आहे, "दोन. वर्षे त्या वेळी कोणाचेही धैर्य होईना त्याच वेळी तो छापखाना मी भाड्याने मागितला व मी वर्तमानपत्र सुरू करतो म्हणून म्हटले. परंतु कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ या म्हणीप्रमाणे खुद्द जोतीबा फुले हे आडवे पडले! इतर सर्व मंडळी मजला छापखाना देण्यास तयार होती. शेवटी तो छापखाना नुकसान सोसून मुंबईकरांनी परत नेला आणि बाजारात विकून टाकला."[१७]

'दीनबंधू' वर्तमानपत्र काढताना व काढल्यानंतरही जोतीरावांनी केलेला विरोध भालेकरांच्या मनात आयुष्यभर खुपत राहिला. तो ते कधी विसरू शकले नाहीत. अनेकदा त्यांनी या प्रकरणाविषयी लिहिले आहे हे त्यांच्या कागदपत्रांवरून दिसते. एका ठिकाणी त्यांनी लिहिले आहे, "मांजराच्या गळयात घाट बांधण्याची कल्पना लढविणारे उंदीर पुष्कळ असतात. परंतु बळी पडणारे थोडेच असावयाचे. त्याप्रमाणे दोन वर्षे मुंबईकरांशी पुणेकरांनी पत्रोपत्री घासाघाशी इतकी काय भागुबाईपणाची व चिवटपणाची केली की त्या छापखान्याच्या सामानास परत मुंबईच्या बंदरात जाऊन विकून घ्यावे लागले. अशा या भित्रेपणाच्या पळापळीत व दडादडीत सत्यशोधक मंडळीस भटाच्या सोवळयातच गुंतून गुरफटून पडावे लागले असते, परंतु याच ऐन आणीबाणीच्या प्रसंगी म्हणजे १८७७ च्या अगदी आरंभासच ब्राह्मणांच्या पुण्यासच 'दीनबंधू' नावाचे वर्तमानपत्र स्वतःच्या ऐपतीवर, स्वतःच्या लेखणीवर ज्यांनी सुरू केले त्या गृहस्थाविषयी तनमनधन यास अत्यंत भिऊन घरच्या घरात चूप असणाऱ्या भ्याड मंडळीस अंतरी वाईटच वाटावयाचे त्याप्रमाणे मत्सरी स्वभाववाल्यांनी भालेकरांस रसतळास घालवून आपण देवबाप्पा ऊर्फ शुक्राचार्य बनण्याची इच्छा धरून कित्येक वेळा कित्येक ठिकाणी खोडसाळपणा केला."[१८] भालेकरांची ही कडवट टीका जोतीरावांना उद्देशून केलेली आहे हे उघड दिसते.

भालेकर ज्याला जोतीरावांचा 'भित्रेपणा' म्हणतात तो कदाचित त्यांचा 'सावधपणा'ही असेल. स्वतंत्र वर्तमानपत्र काढणे योग्य ठरेल की नाही, काढल्यास ते चालेल की नाही याबद्दल जोतीराव साशंक असावेत. भालेकरांना कल्पकतेचे देणे लाभले असल्यामुळे ते नवनवीन उपक्रम हाती घेत. त्यासाठी पदरमोड करीत, जिवापाड कष्ट करीत पण कोणत्याही एका कामाचा वर्षानुवर्षे चिकाटीने पिच्छा पुरवावयाचा व ते तडीला न्यायचे हे त्यांना उभ्या आयुष्यात जमले नाही. अशा

कामासाठी लागणारे संघटनकौशल्य नारायण मेघाजी लोखंडे यांच्याजवळ जसे होते तसे भालेकरांजवळ नव्हते असे वाटते. त्यामुळे एखादा नवा उपक्रम ते हाती घेत, काही दिवस अडचणी सोसून चालवीत, पण विरोधकांच्या डावपेचांना वैतागून अगर प्रतिकूल परिस्थितीमुळे कंटाळून ते आरंभिलेला उद्योग सोडून देत असत व नित्य नव्या कल्पनेच्या मागे धावत असत. भालेकर धरसोड वृत्तीचे आहेत असे जोतीरावांना वाटत असावे. १८७५ साली रामचंद्र शिंदे व जोतीराव फुले यांच्या बरोबर भागीदार म्हणून निरा राइट बँकेच्या कंत्राटाचे काम भालेकरांनी केले होते. या भागीदारीतल्या व्यवहाराच्या बाबतीत आलेल्या अनुभवामुळे फुले व भालेकर यांची मने परस्परांविषयी कलुषित झाली असावीत. कारणे कोणतीही का असेनात, जोतीरावांनी 'दीनबंधू' काढताना भालेकरांना अडथळेच जास्त आणले हे स्पष्ट दिसते. मात्र हा अंतर्गत कलह लक्षात न घेता भालेकरांनी जोतीरावांवर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केलेल्या टीकेचा १८७७ साली लगेच समाचार घेतला आणि शास्त्रीबुवांनाही 'दीनबंधू'कारांच्या आक्षेपांना "असल्या पत्रात आलेल्या आक्षेपावर उत्तर देणे म्हणजे अक्षरजननीस व्यर्थ शिणविणे होय" असे, नाक मुरडून का होईना, उत्तर द्यावे लागले.[१९]

मुंबईच्या सत्यशोधकांनी छापखाना दिला असताही वृत्तपत्र काढण्यास १८७७ साल उजाडावे लागले याची आणखी काही कारणे भालेकरांनी स्वतःचा संक्षिप्त इतिहास लिहून ठेवला आहे, त्यात दिलेली आहेत. १८७५ साली ऑगस्ट महिन्यात स्वामी दयानंदांची व्याख्याने पुण्यास झाली, खुद्द भालेकरांनी स्वामीजींचे एक व्याख्यान भांबुर्ड्यास आयोजित केले होते. ५ सप्टेंबर १८७५ ला स्वामीजींच्या चाहत्यांनी त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढली तेव्हा पुण्यातल्या सनातन्यांनी धिंगाणा घातला. निबंधमालेतील 'वक्तृत्व' या निबंधातल्या एका तळटिपेत विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी हर्षभरित होऊन या प्रकाराचे वर्णन केले आहे ते त्यांच्या शैलीचा एक खास नमुना म्हणून प्रख्यात आहे. भालेकरांनी याच गर्दभानंदांच्या मिरवणुकीचे काय परिणाम झाले ते सांगितले आहे: "त्या गाढवाबरोबर माळी-कुणब्यातील पट्टेवाले होते व जहाल ब्राह्मण मंडळी दुरून दुरून चालली होती. पुढे या अशा गाढवाकडून जहालेल्या अपमानाबद्दल कोर्टात फिर्याद जाहली तेव्हा लोकांस चिथावून देणारे, लोकांस सांगणारे, लोकांकडून करविणारे जहाल ब्राह्मण अचूक बाजूस राहावयाचे त्याप्रमाणे राहून बिचारे ब्राह्मणांनी छू म्हणावे व आमच्या मराठ्यांनी, माळ्यांनी भुंकण्यास लागावे व डसावेही. त्याप्रमाणे गाढवांच्या मिरवणुकीत पुढाकार घेण्यास लावलेल्या शिपायांना फडाफड शिक्षा जहाल्या तेव्हा जहाल ब्राह्मण मंडळी आपापले घरात स्वस्थ मजा ऐकत बसली होती. हा प्रकार व असे पूर्वी कित्येक वेळी जहालेले प्रकरण म्हणजे पुनर्विवाहाचा पुण्यास शंकराचार्याबरोबर कडाक्याचा वाद व त्या वेळी झालेली लट्टालट्टी, श्री. अलिजा बहादर ग्वाल्हेर सरकारची स्वारी पुण्याच्या

प्रसिद्ध सुशील गृहस्थ भाऊ मनसाराम नाईक कुंभार यांच्या सुशोभित ( वाड्यात ) उतरल्याबद्दल ज्ञानप्रकाशचे तेव्हाचे एडिटर बाबासाहेब गोखले या जहाल वकिलाने शिंदे सरकारवर तोंडसुख घेतले वगैरे प्रकार नुकतेच घडलेले. तेव्हा सत्यशोधक समाजातील नूतन सभासदास जहाल ब्राह्मण पुणेरी वस्तीचे भय वाटतच होते. वर्तमानपत्र काढावे पण पत्र कोण चालवणार ? हा म्हणे तुमचे नाव असू द्या, तो म्हणे फलाण्याचे नाव असू द्या. मुंबईकर मंडळी म्हणे प्रेसचा उपभोग घ्यावा. लायबल होऊन पत्रावर अरिष्ट आले तर पुणेकरांनी प्रेसास तोषिस न लागू देता टाळावे वगैरे नाना प्रकारच्या तेव्हा क्लृप्ती निघून दोन वर्षेपर्यंत प्रेसचे सामान एका दुमजली भाड्याचे घरात लोळत पडले".[२०]

वर्तमानपत्र काढण्यासाठी आवश्यक ते छापखान्याचे सामान जोतीरावांनी मिळवून दिले नाही, तरी कृष्णराव भालेकर व त्यांचे बंधू रामचंद्रराव भालेकर हे डगमगले नाहीत. मुक्ताजी अप्पाजी कांबळे या मुंबईच्या गृहस्थांच्या मदतीने त्यांनी शिळा प्रेस विकत घेतला व १८७७ च्या जानेवारीत 'दीनबंधू' पत्र सुरू केले. जाया कराडी लिंगू नावाच्या मुंबईच्या सत्यशोधक कंत्राटदारांनी साहाय्य केल्यामुळे सहा महिन्यांनंतर 'दीनबंधू' टाइपावर निघू लागला. 'दीनबंधू'च्या अवस्थेचे वर्णन करताना, भालेकर म्हणतात, "१८७७ चा भयंकर दुष्काळ हा तर पत्र सुरू केल्यावर खाण्यास धावला ! आरंभी खुषीने व प्रसिद्धपणे दीनबंधू आम्हांस चालू करा म्हणणारे पुण्याचे ८ गृहस्थ व मुंबईचे ५ गृहस्थ १३ वर्गणीदार ! या १३ नी इतरांस सांगसांगू व धैर्य देऊ देऊ मिळवलेले वर्गणीदार पुणे व मुंबई १८७७ च्या अखेरपर्यंत ८२, पुढे १८७८ अखेरीस एकूण १९२, १८७९ अखेर २६० आणि १८८० च्या मे पर्यंत ३२० वर्गणीदार झाले होते. यात शिफारसीचे वर्गणीदार फार होते. प्रत्येक पत्रास पोस्टाबद्दल अर्ध्या आण्याचे टिकीट लावावे लागत होते. वर्गणी मागता मागता बेजार ! लोकांत गोडी उत्पन्न करण्यात व लोकांना सत्यशोधक समाजाची तत्त्वे उपदेशातच सर्व गेले. शिवाय संकटे सहन करावी लागली ती वेगळीच."[२१] 'दीनबंधू' चालवण्याच्या जिद्दीमुळे भालेकरांचे घर गेले, जमीन गेली तसेच त्यांना दागदागिने विकावे लागले.

अखेर नारायणराव लोखंडे यांनी 'दीनबंधू' चालवावयास घेतला. ९ मे १८८० रोजी मुंबईहून निघालेल्या पहिल्या अंकात नव्या संपादकांनी लिहिले, "...फुकटदेखील पत्रे वाचण्याची गोडी व ईर्ष्या नाही....बाहेरगावचे राहणारे नामांकित गृहस्थास टपालहशील भरून जात असत त्यांजकडून पैसे येण्याची मारामार तेव्हा अर्थातच रा. रा. रामचंद्रराव व कृष्णराव पांडुरंग भालेकर यांस हातपाय गाळणे भाग पडले. या उभय बंधूंनी आपले मानवीपणाचे कर्तव्यकर्म या सव्वातीन वर्षांत उत्तम प्रकारे बजाविले त्याबद्दल त्यांची जेवढी प्रशंसा करावी तेवढीच.. हे दीनबंधू बंद होऊ नये म्हणून मुंबईतील बरेच मंडळींच्या मनात येऊन त्यांनी हे पत्र पुण्याहून

मुंबईस आणून सुरू ठेविले आहे व ह्यापुढे ते सदोदित चालावे अशी व्यवस्था आमचे मुंबईतील व बाहेरगावचे ब्राह्मणांखेरीज करून इतर जातींतील सुज्ञ व विद्वान लोकांकडून होईल अशी पूर्ण आशा आहे. "[२२] लोखंड्यांनी त्यांच्या मृत्यूपर्यंत ( ९ फेब्रुवारी १८९७ ) 'दीनबंधू'चे संपादन केले. पण वृत्तपत्र चालवण्यासाठी आवश्यक ते पैशाचे पाठबळ डॉ. संतूजी रामजी लाड यांनी दिले नसते तर 'दीनबंधू' केव्हाच बंद पडले असते. सत्यशोधक समाजाचे एक प्रमुख सभासद हरिश्चंद्रराव नवलकर यांनी १९१६ साली लिहिलेल्या संतूजी लाडांच्या मृत्युलेखात म्हटले आहे : "भालेकरांना जो अनुभव आला तोच लोखंडे यांनाही आला. डॉ. लाड यांनी पैशाची भरपूर मदत करून दीनबंधू पत्र बंद पडू दिले नाही. त्या वेळी दीनबंधूस इतके थोडे वर्गणीदार होते की, वर्गणीतून दोन महिने दीनबंधू चालणे महामुष्किल होते. डॉ. लाड यांनी स्वतः सर्व नुकसान सोसून आणि रा. ब. लोखंडे यांचा सारा प्रपंच चालवून दीनबंधू पत्र बंद पडू दिले नाही. दीनबंधूप्रीत्यर्थ डॉ. लाड यांनी आपली सारी स्वकष्टार्जित संपत्ती अर्पण केली. "[२३]

ज्या तीन वर्षांच्या काळात भालेकर 'दीनबंधू' चालवीत होते त्या काळात 'हितोपदेश' या नावाची एक लहानशी पद्यावलीही त्यांनी प्रसिद्ध केली. जोतीरावांप्रमाणेच त्यांनीही विचारप्रसाराचे एक साधन म्हणून आपल्या कवित्वशक्तीचा उपयोग केला. जोतीराव आपल्या रचनेस 'अखंड' म्हणत, तर भालेराव 'श्रीखंड'! भालेकरांनी हिंदीमधूनही पद्यरचना केली आहे. भटांचे दुराचरण, ढोंग, लबाडी, शूद्रांचा अडाणीपणा, भोळसटपणा हे त्यांच्या काव्याचे विषय आहेत. एका कवितेत त्यांनी परमेश्वराला सांगितले आहे :

"आम्ही सकळ शूद्र अज्ञान, आहोत मतिमंद विद्याहीन, तेणे गेलो तुज विसरून, नाही स्मरण केले देवा !....तुज सर्वस्वी त्यजून, देव झाले हे ब्राह्मण, तुज ऐसे लेख दाऊन, घेतला मान आम्हाकरवी।' हे तुझे तूच पाही, आम्ही मूढ पशुवत राही, आयुष्य काही कळेना। नीच मानूनी आम्हासी, शूद्र नाव दिले सर्वांशी, ऐसे केले का आम्हासी, पाही त्यांशी विचारूनी।...आम्हा नाही राजाश्रय, नाही विद्वज्जन साह्य, आम्हा नाही द्रव्यसंचय, मात्र अपाय धूर्तांचा। आमुचे आम्हा हक्क देवबी, जगामाजी सत्य जागवी, कुटुंबा ऐसे जना वागवी, काय लाघवी तुजपुढे।"[२४]

'शेतकऱ्यांचे मधुर गायन' या संग्रहात १८८९–९० पर्यंतच्या काळातील कविता त्यांनी एकत्रित केल्या आहेत. शेतकऱ्यांना फसविणारे भट पुजारी, पाटलाला बनविणारे कुळकर्णी यांच्यावर जशी त्यात टीका आहे तशीच "शेतकऱ्यांना पिळणाऱ्या शेट सावकारांवर व व्यापाऱ्यांवर त्यात हल्ला चढवला आहे :

"झाले कशाने हो मोठे शेट सावकार ॥ धृ. ॥

भांडवल त्यांचे तुंबारस्सी। शरीर कपडे जणो उदाशी। नव्हते येथे घरदार ॥१॥
आमचे घेऊनि आम्हा देती। व्याजाचेही व्याज खाती। करिती झट ऋणदार ॥२॥

खोटे लेख करूनि ठेवी। कोर्टामध्ये रोखे दावी। मिंधे साक्षीदार ॥३॥

‘ भोळ्यां ताक मिळेना, धूर्तां तूप गिळेना’ या शीर्षकाच्या कवितेत ते सांगतात :

“ शेटजीची मोठी हवेली झाली झाली कशाने। भोळया जनांची घरे हजारो घेऊन व्याजाने।”[२५]

भटजीबरोबर शेटजी हेही भालेकरांच्या माऱ्याचे लक्ष्य आहे.

भालेकरांच्या कागदपत्रांत एक नोंद सापडली ती काहीशी गूढ आहे. ‘ अंतकाळचे उद्गार ’ या हस्तलिखित टिपणात त्यांनी लिहिले आहे. “ फडक्याच्या बंडाच्या वेळी झाडा—जोतीबाचे वॉरंट ता. माहे १८ चे ५० रु. देऊन चुकते केले.” नोंद एवढीच आहे. त्यावरून १८७९ सालातील वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडाच्या वेळी भालेकरांची झडती घेतली गेली होती असे दिसते. जोतीरावांचाही फडक्यांच्या उलाढालीशी संबंध असावा. भालेकरांच्या उपलब्ध कागदपत्रांत या एका नोंदीखेरीज अन्य कसलाच तपशील आढळला नाही. त्यामुळे पुरेशा पुराव्याअभावी कल्पनाशक्ती लढविण्याखेरीज अभ्यासकास या प्रकरणात अन्य पर्याय नाही.

१८८३ साली ‘ शेतकऱ्याचा असूड ’ या महात्मा फुल्यांच्या निबंधाच्या प्रकाशनावरून ‘ दीनबंधू ’कर्ते नारायणराव लोखंडे व फुले यांच्यामध्ये तीव्र मतभेद झाले. या निबंधाचे पहिले दोन भाग ( प्रकरणे ) लोखंड्यांनी आपल्या वृत्तपत्रात छापले. पण नंतरची प्रकरणे छापण्यास नकार दिला. या मतभेदासंबंधीचा खुलासा स्वतः लोखंड्यांनीच केला आहे व तो १८९३ साली भालेकरांनी ‘ शेतकऱ्याचा कैवारी ’ या पत्रात उद्धृत केला आहे. भालेकरांच्या म्हणण्यानुसार लोखंड्यांनी २८ ऑक्टोबर १८८३ च्या ‘ दीनबंधू ’त एडिटोरियलखाली म्हटले होते : “ मे. जोतीराव यांनी मोठी मेहनत घेऊन जे शेतकऱ्यांचे उन्नतीस्तव प्रकरण तयार केले आहे ते वाजवीपेक्षा फाजील झाल्याकारणाने लाभाऐवजी तोटा होण्याचा विशेष संभव आहे. ह्या निबंधाचे जे दोन भाग आमच्या पत्रात पूर्वी प्रसिद्ध होऊन गेले त्यांचे आणि ह्या तीन भागांचे लक्षपूर्वक अवलोकन केल्याने त्वरित दिसून येईल की, हे तीन भाग फारच कडक रीतीने लिहिले गेले असून ह्यापासून ( लायबल ) अब्रू घेतल्याचा खटला सहज उत्पन्न होणारा आहे असे आम्हांस खास वाटते. ईश्वरकृपेने हे तीन भाग आमचे पत्रात न येण्याविषयी ज्या आडकाठ्या आल्या त्या उत्तमच होत व त्याबद्दल जगदीशाचे आम्ही आभार मानतो. ”

“ हा विषय आटोपताना मे. जोतीराव फुले यांचा आमच्या पत्राबरोबर कितपत संबंध आहे तो त्यांच्याच थोडे दिवसांवरच्या सूचनेप्रमाणे आमच्या आश्रयदात्यांच्या पुढे सादर करतो.

“ मे. जोतीराव हे जसे इतर वर्गणीदार आहेत तद्वत हेही आहेत. यांचा आमचे पत्राबरोबर खाजगी रीतीने कोणताच संबंध नाही. जास्त कशास. ते आमच्या दीनबंधूचे खरोखरचे हितचिंतकही नाहीत. ...कित्येक लोक अज्ञानात पतन होऊन म्हणतात

की जोतीराव यांची दीनबंधू छापखाना व पत्राबरोबर पाती असून जो काही त्यांचा वारंवार मजकूर प्रसिद्ध होत असतो त्यासंबंधी त्यांस आम्हांकडून पैसे मिळतात, परंतु असा मुळीच प्रकार नाही. दीनबंधू छापखान्यापासून किंवा पत्रापासून हल्ली असलेल्या व्यवस्थेवरून फायदा होईल हे किमपिही कोणी लक्षात वागवू नये. उलट थोड्याबहुत उदार व ज्ञातिअभिमानी अशा गृहस्थांचे साह्य घ्यावे लागते म्हणून हे आनंदाचे दिवस आम्हांस पहाण्यास मिळत आहेत. नाहीपेक्षा ह्या पत्राचा लय कधीच होऊन गेला असता, कारण ह्यास प्रसिद्ध शत्रू, जळी, काष्ठी व पाषाणी असे भरले आहेतच, परंतु जेथून शत्रुत्व होण्याचा संभव स्वप्नातही नव्हता तेथूनही उत्पन्न झाले आहेत."

'शेतकऱ्याचा असूड' या निबंधातली जोतीरावांची भाषा जळजळीत, कमालीची तिखट होतीच, शिवाय स्पष्ट नामनिर्देश न करता पण तत्कालीन वाचकास सहज लक्षात येईल अशा तऱ्हेने त्यांनी प्रतिष्ठित पुढाऱ्यांचे काही ठिकाणी वाभाडे काढले होते. त्यामुळे अब्रुनुकसानीच्या खटल्यांना तोंड द्यावे लागेल असे भय लोखंड्यांना वाटत होते हे स्पष्ट आहे. २ जून १८८६ रोजी मामा परमानंदांना लिहिलेल्या पत्रात "आजच्या शूद्रांत भेकडबाहुले छापखानेवाले असल्यामुळे ते पुस्तक (शेतकऱ्याचा असूड) छापून काढण्याचे काम तूर्त येके बाजूला टेविले आहे"[२६] असे जोतीरावांनी म्हटले आहे. लोखंड्यांच्या रोखाने हा मजकूर लिहिलेला आहे असा ग्रह होतो. 'शेतकऱ्याचा असूड' या निबंधाच्या चौथ्या प्रकरणातील दोन टिपाही या संदर्भात लक्षात घेण्यासारख्या आहेत. त्यांपैकी एक टीप अशी आहे : "हे येथील लाल अथवा हिरव्या बागेतील उपदेश करणाऱ्या शूद्र टीकोजीस माहीत कसे नाही ?"[२७] लालबाग-भायखळा हा लोखंड्यांचा बालेकिल्ला होता. लोखंड्यांच्या लालबागेतील वास्तव्याला अनुलक्षून जोतीरावांनी हा प्रश्न विचारला होता असे वाटते.

निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर, केसरीकर्ते टिळक, सुधारककर्ते आगरकर यांच्याप्रमाणेच महात्मा फुलेही प्रतिपक्षाशी वाग्युद्ध खेळताना संबंधित व्यक्तीचा नामनिर्देश सरळसरळ न करता, पण वाचकांना सहज समजेल अशा तऱ्हेने विरोधकांच्या वर्मावर घाव घालीत असत, व त्यांची उणीदुणी काढीत असत. त्या वेळच्या सर्वच वृत्तपत्रांचा व सार्वजनिक जीवनात हिरीरीने वाद खेळणाऱ्या मातबर व्यक्तींचा हा शिरस्ताच होता. निबंधमाला, समग्र फुले वाङ्मय, अगर टिळक-आगरकरांचे लेख वाचताना त्यातील अनेक परिच्छेद नेमके कोणास उद्देशून लिहिले असतील याचा उलगडा करण्यासाठी म्हणूनच तत्कालीन वृत्तपत्रे बारकाईने नजरेखाली घालावी लागतात. मग वरवर पाहता दुर्बोध वाटणारे काही परिच्छेद अनेकदा स्पष्टपणे उलगडू लागतात.

काही ठिकाणी मात्र निश्चित पुराव्याअभावी अभ्यासकाची अडचण होते. उदाहरणार्थ, 'शेतकऱ्याचा असूड' निबंधाच्या चौथ्या प्रकरणातील जोतीरावांची खालील तळटीप पाहण्यासारखी आहे : "मी हा चवथा भाग गतवर्षी सन १८८३ एप्रिल

महिन्यात मुंबई शहरात वाचला. त्या दिवसापासून शूद्रांत निरनिराळ्या विद्वानांनी आपापल्या तारुण्यात लग्नाच्या कुलशील स्त्रिया फक्त गोऱ्यागोमट्या नसल्यामुळे मोकळल्या आहेत. ह्या सर्वांस माझा मोठा राग आला आहे व ते आपआपल्या अनाथ स्त्रियांपाशी मनाच्या लज्जेस्तव क्षमा मागून त्यांस आपआपल्या घरी परत आणण्याचे एकीकडे ठेवून माझीच ते उलटी चोरून छापून वर्तमानपत्रद्वारे निंदा करू लागले आहेत. त्यांच्या तोंडाला हात कोणी लावावा ?"[२८] "दोन वायकांचे कारभारी, माळ्यांच्या आळीआळीनी" कसे फिरतात याचे वर्णनही जोतीरावांनी 'शेतकऱ्याचा असूड'चा याच चौथ्या प्रकरणात केलेले आहे. त्यावरून माळी समाजातील विशिष्ट व्यक्ती त्यांच्या डोळ्यांपुढे होत्या हे उघड आहे. भालेकरांप्रमाणे लोखंडेही माळी समाजातीलच होते. लोखंडे १८८३ साली जोतीरावांवर टीका करीत होते, याला पुरावा सापडतो. जोतीरावांच्या विरुद्ध या वेळी भालेकरही लोखंड्यांच्या बाजूला होते असे निःसंदिग्धपणे म्हणण्यास मात्र आधार सापडत नाही.

१८८५ साली भालेकरांबरोबरच्या जोतीरावांच्या. भांडणाला जाहीररीत्या तोंड फुटले तेव्हा जोतीरावांनी 'सत्सार' नावाचे दोन अंक काढले होते. बुलढाण्याच्या ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्रीपुरुषतुलना' या पुस्तकाचे समर्थन करताना व पंडिता रमाबाईंवर टीका करणाऱ्यांना उत्तर देताना जोतीरावांनी पुन्हा एकदा बायकोस टाकणाऱ्या नवऱ्याचा उल्लेख केला आहे "माझे ऐकण्यात असे आले आहे की, त्याने आपल्या स्वजातीचा अव्हेर करून आपले लग्नाचे खाशा स्त्रीस काळ्या पाण्यापलीकडील पतिविरह वनवासनामे बेटात, नाना प्रकारचे शोकरसांचा अभ्यास करण्याकरिता ऐन ज्वानीचे भरात जबरीने पाठविले आहे म्हणून पूर्वी वदंता उडाली होती. ती सर्व खरी असल्यास त्या लग्नाचे खासे बाईस आपल्या घरात परत आणून तिजकडून चि. ताराबाईचे पुस्तकाचे अक्षरशहा खंडन करवावे परंतु तसे करण्याचे अगोदर त्याने वंगणी क्षेत्री नेऊन, तेथील भलत्या एखाद्या अशिक्षित कोळणीचे पायाचे तीर्थ पाजून शुद्ध करण्याचे भरीस पडू नये."[२९]

याच अंकांत 'सत्सार पुस्तककर्ते' या नावाने जोतीरावांनी भालेकरांबद्दल लिहिले आहे : "सर्वगुणसंपन्न आमचे भालेकर, जर तूर्त व्यवहार सुधारक मंडळीत काय आहे ? काय पाहिजे ? असे पुकारून सर्व गावभर गवगवा करण्याचे एके बाजूला ठेवतील आणि आपल्या मुंबईकर यजमानास वंगनी क्षेत्री तावडतोब नेऊन त्याजपासून आपल्या कलमी सुशिक्षणास प्रायश्चित्त देतील तर बरे होईल, नाहीतर जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ नन या म्हणीप्रमाणे त्यांचे सर्वच आंधळे गारुड उघडकीस येणार आहे."[३०]

सत्सारच्या दुसऱ्या अंकात भालेकरांवर जोतीरावांनी दोन-तीन कारणांमुळे हल्ला केलेला दिसतो. ताराबाई शिंद्यांनी लिहिलेल्या 'स्त्रीपुरुषतुलना' या पुस्तकातील विचारावर त्याचप्रमाणे पंडिता रमाबाईंवरही भालेकरांनी कडक टीका केली असावी.

जोतीरावांनी पंडिता रमाबाईंचे नेहमीच कौतुक केले असले तरी त्यांची ही तारीफ सर्वच सत्यशोधकांना रुचत होती असे दिसत नाही. सत्यशोधक समाजाशी संबंधित असलेल्या रामजी संतूजी आवटे, विठ्ठलराव कृष्णराव वंडेकर, माधवराव सावंत व दामोदर सावळाराम यंदे वगैरेंनी सयाजीराव गायकवाड व त्यांचे नायब दिवाण सत्यशोधक रामचंद्र विठोबा धामणकर यांच्या प्रेरणेने काढलेल्या 'बडोदावत्सल' या पत्रातही रमाबाईंना धर्मभ्रष्ट म्हटले जात असे व त्यांना भ्रम तर झाला नाही ना, असे विचारले जात असे.[३१] स्त्रीपुरुष-समानतेचा नेहमीच जोरदार पुरस्कार करणाऱ्या जोतीरावांचा पंडिता रमाबाईविषयीचा उदार दृष्टिकोण त्यांच्या सर्वच अनुयायांना स्वीकारार्ह वाटत होता असे दिसत नाही.

स्त्रीविषयक सर्वसाधारण दृष्टिकोणाबद्दलचे दुमत हेच एक केवळ वादाचे कारण असते तर फुले-भालेकरांमधील सवालजबाबांना १८८५ साली इतका कडवटपणा आला नसता. भालेकरांनी काढलेल्या बोर्डिंगाच्या व्यवस्थेवरूनही भांडणे विकोपाला गेली होती. ब्राह्मणेतरांत विद्येचा प्रसार व्हावा यासाठी योजावयाच्या उपायांपैकी बोर्डिंग स्कूल काढणे हा एक उपाय आहे, असा विचार सत्यशोधक समाजाने आरंभाच्या वर्षातच केला होता.[३२] या विचाराला प्रथम मूर्त रूप दिले ते भालेकरांनी. ५ मे १८८५ रोजी त्यांनी याबद्दल एक निवेदन केले : "हे सुशिक्षणगृह आम्ही पुणे पेठ कसबा येथे ता. १८ नोव्हेंबर १८८४ रोजी स्थापन केले आहे. याचा मुख्य उद्देश इतकाच की व्यापार किंवा नौकरीच्या नात्याने फिरण्यात दिवस काढणारांस व लहानमोठ्या खेड्यांतील पाटील, देशमुख, इनामदार वगैरे कित्येक लोकांसही अनेक अडचणींमुळे आपल्या मुलांची रात्रंदिवस खबरदारी ठेवून त्यांस विद्येविषयी सतत उत्तेजन देण्यास आणि सुनीतीच्या गोष्टी त्यांच्या मनात ठसविण्यास फावत नाही... विद्येच्या आवश्यकतेविषयी त्यांची मने तयार करण्याकडे आमचा मुख्य प्रयत्न असतो... ह्या सुशिक्षणगृहात अन्नव्यवहाराच्या सोईकरता मराठे, माळी, कुणबी अशा आपसात अन्नव्यवहार असणारांची दहा वर्षांवरील मुले घेतली जातात."[३३] सुशिक्षणगृहातील मुलांची व्यवस्था पाहण्याच्या कामात डॉ. विश्राम घोले व गंगारामभाऊ म्हस्के हे भालेकरांना मदत करीत असत.

१८८५ सालच्या सप्टेंबरपासून सुशिक्षणगृहाच्या व्यवस्थेवरून फुले-भालेकरांमधील दुहीने उग्र स्वरूप धारण केले. १ ऑक्टोबर १८८५ रोजी 'इशारा' नावाचा अंक जोतीरावांनी काढला. त्यात 'इशारा' हा १५ जून १८८५ ला लिहून पुरा केलेला निबंध होताच, त्याखेरीज 'पत्रव्यवहार' या सदराखाली मजकूर होता. हा मजकूर धनंजय कीर व प्रा. मालशे यांनी समग्र फुले वाङ्मयात समाविष्ट केलेला नाही. प्रस्तुत लेखकाला ऑक्टोबर १९०५ मध्ये छापलेली 'इशारा'ची एक आवृत्ती पाहावयास मिळाली, त्या आवृत्तीत हा मजकूर आढळला. सुशिक्षणगृहाच्या कारभागाविषयी तक्रार करणारे मुंबईच्या एका पालकाचे पत्र जोतीरावांनी छापले होते व खुलासा

केला होता : " पुण्यातील भालेकरांचे सुशिक्षणगृहाच्या व्यवस्थेविषयी लोकांचे मनात दुष्ट ग्रह भरविल्याबद्दल आमचा काही एक त्याच्याशी संबंध नसता आम्हावर विनाकारण त्याचे मालकांनी आणलेला आरोप दूर करण्याकरिता हे पुढील एका मुंबईच्या थोर गृहस्थांपैकी एक पत्र अक्षरशः वाचकांच्या अवलोकनाकरिता सादर केले आहे. याप्रमाणे जर स्थिती असेल तर तिची सुधारणा होऊन आपले शूद्र जातीचे मुलांस खरोखरच सुशिक्षण मिळेल अशाबद्दल योग्य तजवीज ठेवतील अशी आमची त्यांस विनयपूर्वक प्रार्थना आहे. पाहिजेल त्याला लिहिता येईल की वर नाव, सत्सार आणि आत निंदा व मत्सर; परंतु वर सुशिक्षणगृह आणि आत कुशिक्षण असू नये म्हणजे बस आहे." [३४] 'सत्सार'चा जो दुसरा अंक समग्र फुले वाङ्मयात कीर व मालशे यांनी समाविष्ट केलेला आहे त्यातही असेच एक तक्रारीचे पत्र छापलेले आहे.

जोतीरावांच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी म्हणजे १८९३ साली भालेकर व लोखंडे यांच्यामध्ये जाहीर वाद पेटला. त्या वेळी दोघांनीही मागल्या उखाळ्यापाखाळ्या काढल्या. तेव्हा 'पुणे सुशिक्षणगृहाची खरी कहाणी' सांगताना भालेकरांनी लिहिले: "सुशिक्षणगृह मोडण्याच्या इरायाने जेव्हा जोतीबांनी प्रयत्न केले त्यांत त्यांनी सत्सार वगैरे पुस्तके सूड उगविण्याकरिता काढली. त्यांत सुशिक्षणगृहाच्या संबंधाने नसता आरोप लादल्यावरून सुशिक्षणगृहातील वयातील विद्यार्थ्यांनी ते दोष घालवण्यासाठी 'सूचना' म्हणून लेख लिहून वर्तमानपत्रात सह्यासुद्धा प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्न केला होता. परंतु भालेकरांनी तो लेख प्रसिद्ध होऊ न देता तसाच ठेवून घेतला. तो आताही प्रसिद्ध केला नसता परंतु लोखंड्यांकरिता प्रसिद्ध करणे भाग पडले." हे स्पष्टीकरण देऊन भालेकरांनी सात विद्यार्थ्यांच्या. सह्यांनिशी मुळात १८ ऑक्टोबर १८८५ रोजी लिहिलेले एक पत्र 'शेतकऱ्यांचा कैवारी' या वृत्तपत्राच्या १६ नोव्हेंबर १८९३ च्या अंकात प्रसिद्ध केले आहे. पत्रावर सह्या करणाऱ्यात नाना नारायण भोर हे पुढे प्रसिद्धीस आलेले पुण्याचे अंध वकील व रघुनाथ विठूजी जाधवराव ( भास्करराव विठोजी जाधवांचे बंधू ? ) हे दोघे होते. या पत्रात विद्यार्थ्यांनी म्हटले होते, " सर्व लोकांस कळविण्यात येते की, हे गृह स्थापन होऊन अकरा महिने झाले. या मुदतीत आम्हा ब्राह्मणेतर जातीचे विद्यार्थ्यांची खबर घेण्यासाठी फुले हे कधीही आले नाहीत. असा ज्या गृहस्थाचा हट्टी स्वभाव त्याने सुशिक्षणगृहास कुत्सित बुद्धीने नावे ठेवणे व लोकांकडून विरुद्ध पत्रे मागवून अथवा घेऊन सत्सार पुस्तकात प्रसिद्ध करणे हे सुधारक म्हणविणारांस शोभते काय ? आपणास आता कोणी विचारीत नाही म्हणून कुचेष्टेने प्रतिष्ठा वाढवू लागल्यास त्याचीच अप्रतिष्ठा होणार आहे..." [३५] पदरचे पैसे खर्च करत असताही सुशिक्षणगृह चालविण्यात होत असलेल्या विरोधामुळे वैतागून भालेकरांनी हे बोर्डिंग स्कूल अखेर जोतीरावांच्या ताब्यात दिले. जोतीरावांनी काही महिने ते चालवल्यानंतर अखेर बंद पडले असे दिसते. महात्मा फुल्यांच्या कोणत्याही चरित्रकाराने आजवर ही हकीकत न

दिल्यामुळे या घटना अज्ञात राहिल्या आहेत.

जोतीरावांच्या मृत्यूनंतर वाद करताना या कटू व दुर्दैवी घटनांचा ऊहापोह करावा लागला यामुळे भालेकरांना दुःख झालेले दिसते. आपल्या वाचकांना त्यांनी विचारले आहे, "अशा उखाळयापाखाळया काढण्याबाबत आम्हांस फार वाईट वाटत आहे. त्यात मित्रमंडळीकडून आम्हांस याच वादविवादाच्या संबंधाने पत्रे आली आहेत. परंतु करावे कसे ? ब्राह्मणांच्याच लबाड्या शोधणे म्हणजे सत्याचा शोध करणे आणि इतरांच्या लबाड्या शोधल्यास सत्याचा शोध लावणे होत नाही असे नाही. ब्राह्मणांच्या लबाड्या शोधणारांकडून लबाड्या होत नाहीत ? होत असतील तर त्या सुधारू नयेत काय ?"[३६]

सत्यशोधक चळवळीच्या इतिहासात १८८५ साल अनेक कारणांनी संस्मरणीय ठरले. याच वर्षी गुढी पाडव्याला सत्यशोधक समाजाचा झेंडा मिरवीत नेण्याचा कार्यक्रम भालेकरांनी पार पाडला. या मिरवणुकीचे वर्णन भालेकरांनी स्वतःच्या संक्षिप्त इतिहासात दिले आहे : "सोमवार पेठेतून उंटावर सत्यशोधकाचे निशाण काढून पुढे बोर्डिंगची मुले व त्यापुढे ब्यांड, त्यापुढे छडीपट्टयाचे खेळ, मागे लोकांचा मोठा समुदाय काढला. त्या वेळी दीनबंधूत आगाऊ प्रसिद्ध केले होते त्यावरून मुंबईहून रामय्या व्यंकय्या अय्यावारू, रामचंद्र तुकाराम हेजीब वगैरे मंडळी मुद्दाम आली होती. निशाण वाजतगाजत सोमवार पेठ, डॉ. सदाशिव गावडे यांच्या येथून निघून साततोट्याहून व्यवहारगल्लीतून रविवार फडक्याच्या गेटावरून मोती चौक, पुढे बुधवार चौक, पुढे कोतवाल चावडी, पुढे वेताळपेठ मेमाने यांचे घरी, पुढे भवानी पेठ, खंडोबाचे देऊळ तेथून मिरवत मिरवत पुन्हा सोमवारात येण्यास निघाले तो डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, न्यायमूर्ती माधवराव रानडे हे पायी पायी निशाणाच्या मिरवणुकीस येऊन मिळाले. पुढे जोतीबा फुलेही हळूहळू भीतभीत घोड्याच्या तांग्यात बसून आले. मंडळी जमल्यावर कृष्णराव यांनी सत्यशोधक समाजासंबंधी रिपोर्टादाखल लेख वाचून दाखवला."[३७] भालेकरांनी दिलेल्या हकीकतीवरून जोतीराव ही मिरवणूक काढण्याच्या उपक्रमाबाबत साशंक होते असा ग्रह होतो.

अठराशे पंचाऐशीच्या ऑक्टोबर महिन्यात 'बडोदावत्सल' हे वृत्तपत्र सुरू झाले. या वृत्तपत्राच्या प्रवर्तकांत रामजी संतूजी आवटे व विठ्ठलराव वंडेकर यांच्यासारखे सत्यशोधक नेते होते. हे पत्र कसे सुरू झाले त्याची हकीकत कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी सांगितली आहे : "श्रीमंत सरकार सयाजीराव गायकवाड यांनी दिवाणबहादुर रामचंद्र विठोबा धामणसकर हे त्या वेळी बडोद्यास सुभे ( कलेक्टर ) होते, त्यांना असे सांगितले की, शेतकऱ्यांच्या कैवारीसारखे एक मराठी वर्तमानपत्र आपल्या राजधानीत काढण्याची व्यवस्था करवावी. त्याप्रमाणे दि. ब. धामणसकरांनी रा. रामजी संतूजी आवटे यांना प्रसिद्ध कॉंट्रॅक्टर शेट रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांच्या घरी बोलाविले आणि महाराजांचा विचार त्यांस समजून सांगितला. प्रस्तुत लेखक त्या वेळी तेथे

होता. आवट्यांनी सांगितले की, महाराज मला दरमहा तीनशे रुपये देतील व वर्तमानपत्राला अन्य रीतीने मदत करतील तर आपण बडोद्यास छापखाना घालून पत्र काढण्याचे धाडस करू. ह्या त्यांच्या अटी दि. ब. धामणसकरांनी मान्य केल्यावर आम्ही असे ठरविले की, मुख्यतः ज्यांच्या लेखामुळे गायकवाड महाराजांना शेतकऱ्यांचा कैवारी एवढा आवडला त्यांना म्हणजे अर्थात माधवरावांना ( माधवराव राघोजी रोकडे ) त्या पत्राचे संपादक म्हणून आवट्यांनी घेऊन जावे व त्यांना प्रथम दरमहा साठ रुपये द्यावे. ही गोष्ट आवट्यांनी दि. ब. धामणसकरांकडे कबूल केली, परंतु त्यांनी बडोद्यास गेल्यावर त्याप्रमाणे वर्तन केले नाही." [३८] धामणसकरांनी जोतीरावांच्या नावाचा विचार केला होता की नाही कळावयास मार्ग नाही. बडोदावत्सल या पत्राची मालकी सुरुवातीस आवटे, बंडेकर वगैरे भागीदारांच्या हाती असली तरी काही वर्षांनी ते पत्र सर्वस्वी दामोदर सावळाराम यंदे शेटजीच्या ताब्यात गेले.

भालेकरांनी स्थापन केलेल्या 'दीनबंधू सार्वजनिक सभे'ने १८८५ पासून पुण्यात धामधूम चालवली होती. 'सार्वजनिक सभा' ही ब्राह्मणादी वरिष्ठवर्णीयांच्या हातचे बाहुले असल्याने, दीनदलितांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्यासाठी भालेकरांनी दीनबंधू सार्वजनिक सभा काढली होती. या सभेचे सेक्रेटरी हरिश्चंद्र नारायण नवलकर यांनी आपल्या आठवणी सांगितल्या आहेत : "दीनबंधू सार्वजनिक सभेची दर शनिवारी रात्री आठ वाजता सभा भरत असे. कधी कधी तर रात्रीचे एक एक वाजेपर्यंत वादविवाद चालत असे. वादविवाद करण्यासाठी ब्राह्मण लोकांच्या झुंडीच्या झुंडी ( येत ). पुढे एका सभेत फुकट आणि सक्तीचे शिक्षण हा विषय निघाला. भालेकर, गणपतराव पाटील आणि मी असे आम्ही तिघेजण काय ते या शिक्षणास अनुकूल होतो. आमची समाजाभिमानी मंडळीही विरुद्ध होती. या विषयावर सातआठ महिने वादविवाद चालला होता....एक लक्ष सह्यांचा अर्ज पार्लमेंट सभेस पाठवावा असा विचार ठरला. त्याप्रमाणे भालेकर यांनी सह्या घेण्याकरिता हजारो छापील पत्रे काढली आणि ती गावोगाव पाठवली. सुमारे तीनचार महिन्यांच्या आतच एक लक्षावर सह्या गोळा झाल्या. पार्लमेंट सभेस अर्ज पाठवावयाचा तो हजारो लोकांची प्रचंड सभा भरवून तो मंजूर होऊन पाठवावा असा भालेकराने विचार काढला. लोखंडे ( मुंबईस ) सभा भरविण्याचे काम लांबणीवर टाकीत चालले म्हणून शेवटी भांबुर्ड्याच्या मैदानात सभा भरविली. या सभेस दहा हजारावर मंडळी जमली. दोन ठराव पास केले. पहिला ठराव : राष्ट्रीय सभा ( काँग्रेस ) ही सर्व जातींच्या लोकांची सभा नाही, फक्त थोड्या शिकलेल्या लोकांची आहे. तिच्या मागण्यांना आमची मुळीच संमती नाही. दुसरा ठराव : आम्हास फुकट आणि सक्तीचे शिक्षण देण्यास त्वरित सुरुवात करा." [३९] भालेकरांनी ही सह्यांची मोहीम १८८९ साली काढली होती असे दिसते. यासाठी ७ नोव्हेंबर १८८९ रोजी पुण्याच्या मंगळवार पेठेतील महारांच्या महादेवाच्या देवळात झालेल्या अस्पृश्यांच्या सभेचे वृत्त 'अंबालहरी'

या पत्रात प्रसिद्ध झाले होते.[४०] दीनबंधू सार्वजनिक सभेच्या वतीने चाललेल्या या मोहिमेत जोतीराव सहभागी झाल्याचा निर्देश आढळला नाही.

'दीनबंधू सार्वजनिक सभे'ची स्थापना करण्यात व नंतर या सभेतर्फे कार्यक्रम आयोजित करण्यात भालेकर पुढाकार घेत असल्यामुळे असेल कदाचित, आरंभापासून जोतीरावांनी सक्रिय भाग घेतला नसावा. १८८६ साली भालेकरांचे भाचे गणपतराव पाटील यांच्या दीनमित्राने जोतीरावांवर केलेल्या टीकेचे नमुने धनंजय कीरांनी फुलेचरित्रात दिले आहेत. १८८९ साली फुले व भालेकर यांचा बेबनाव पुन्हा एकवार उघड्यावर आल्याने जोतीराव या मोहिमेपासून अलिप्त राहिले असावेत. 'दीनमित्र' मासिकाच्या जुलै १८८९ च्या अंकात 'स्वदेश सुधारणेच्छू लोकांच्या पायात लुडबुडणारे वृद्ध पोर' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेले कवन जोतीरावांना उद्देशून लिहिले आहे :

" हीतकर्ता तू बंधु या जनाचा ।। ओघ वाहे पुस्तकी लेखनाचा ।।
दीनबांधव तसा तू दीनबंधु ।। नको कधिही कोणास नको निंदू ।।
निंद्य बुद्धीची वृद्धि व्हावयाला ।। वेळ न लगे दुष्कर्म शिकायाला ।।
तार रमवी तूझिये दुर्गुणाला ।। कडू सार तुझा नीट दे मनाला ।।
द्वेष नक्कल यामध्ये जया गोडी ।। पापराशी दिवसानुदिवस जोडी ।।
प्रकाशाते द्यावया ज्योत जाती ।। बुडी बसतो अंधार येशवंती ।। "

या कवनातील अखेरच्या चरणात जोतीराव व त्यांनी पुत्र म्हणून वाढविलेला अनाथ मुलगा यशवंत या दोघांचीही नावे गुंफून श्लेष साधला आहे. खेरीज सत्साराला कडू सार म्हटले आहे. कवनाच्या प्रास्ताविकात म्हटले होते : " ठिकठिकाणच्या मंडळ्या व सभा एखाद्याच्या मत्सरी व गर्विष्ठ स्वभावामुळे बंद पडल्या आहेत. व अशाच्या ह्या घाणेरड्या वर्तणुकीवरून सभासदांस व लोकांस फार त्रास असतो. तर अशा दुष्ट लोकांतील एका वृद्धास लक्षून हे अंजन सिद्ध केले आहे."[४१] वरील उल्लेखावरून सत्यशोधक समाजाचे कार्य थंडावले होते व त्यास मुख्यतः जोतीराव जबाबदार होते, असा आरोप भालेकर व गणपतराव पाटील करीत होते असे दिसते.

वस्तुतः १८८८ च्या उत्तरार्धात जोतीराव पक्षाघाताने अंथरुणाला खिळूनच होते. त्यानंतर १८८९ च्या पूर्वार्धात त्यांची प्रकृती हळूहळू सुधारू लागली होती. अशा स्थितीत सत्यशोधक समाजाच्या चालत्या गाड्याला खीळ घालण्याचा जोतीरावांनी प्रयत्न कसा केला असेल हे समजत नाही. फार झाल्यास भालेकरांनी हाती घेतलेल्या उपक्रमात ते सहभागी झाले नसतील. तसे पाहिले तर प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा भालेकरांचा विचार जोतीरावांना अमान्य नव्हता. बोर्डिंग स्कूल काढण्याच्या कल्पनेसही त्यांचा विरोध नव्हता. त्यामुळे भालेकरांनी जेव्हा त्यासाठी प्रयत्न केले तेव्हा त्यांना जोतीबांनी केलेला विरोध हा तात्त्विक कारणापेक्षा व्यक्तिगत कारणामुळे केला असला पाहिजे, असा अभ्यासकाचा ग्रह होतो.

शिक्षण फुकट दिले पाहिजे अशी एक लाख सह्यांनिशी मागणी करणारा अर्ज करण्यातच भालेकरांनी कृतकृत्यता मानली नाही. त्यांनी पुण्यात एक फ्री स्कूल चालविले होते. या शाळेत एक हजार विद्यार्थी होते. या फुकट शाळेचा सर्व खर्च रे मार्केटातील व्यापारी मंडळी करीत असत. या व्यापाऱ्यांचे एक पुढारी शिवराम-बुवा धायरकर यांनी त्यासाठी एक धर्मफंड काढला होता व त्या धर्मफंडावर शाळेचा खर्च भागवला जात असे. न्या. रानडे, लोकहितवादी गोपाळराव देशमुख, रा. ब. नारायणभाई दांडेकर वगैरे तत्कालीन प्रतिष्ठित पुढारी या फुकट शाळेच्या व्यवस्थापक मंडळात होते. लोकहितवादींनी तर "दीनबंधू सार्वजनिक सभेच्या फ्री स्कुलात मुद्दाम येऊन मुलांची परीक्षा घेतली व त्या शाळेस द्रव्यद्वारा (ते) मदतही करीत होते" असे भालेकरांनी १८९२ साली लिहिलेल्या लोकहितवादींच्या मृत्यु-लेखावरून दिसते. लोकहितवादी दीनबंधु सार्वजनिक सभेच्या वतीने गव्हर्नरला भेटावयास जाणाऱ्या शिष्टमंडळाचे नेतृत्वही करीत असत. म्हणूनच भालेकरांनी लोकहितवादींच्या मृत्युलेखात कृतज्ञतापूर्वक गौरवोद्गार काढले होते : "देशामध्ये असे सत्पुरुष होतील तेव्हाच हा देश उर्जितदशेत येईल. आमच्या लोकांविषयी ब्राह्मण मंडळीत खरी कळकळ बाळगणारे काय ते एवढेच पुरुष होते."[४२] लोकहित-वादींसारख्या ब्राह्मण सुधारकांचे साहाय्य भालेकर घेत होते हे जोतीरावांना रुचत नसे, म्हणूनच "सर्वगुणसंपन्न भालेकर तूर्त व्यवहार सुधारक मंडळीत" असा जोतीरावांनी खोचक उल्लेख केला आहे.

भालेकरांच्या या फ्री स्कुलास सयाजीराव गायकवाड महाराजांनी भरघोस आर्थिक मदत द्यावी म्हणून प्रथम प्रयत्न करण्यात आले होते. हरिश्चंद्र नवलकरांनी त्या-बाबतची आठवण सांगितली आहे : "त्यांच्याकडून शाळेत मदत मिळावी म्हणून गोपाळराव देशमुख वगैरे थोर थोर मंडळी श्रीमंतांकडे गेली. महाराज म्हणाले, 'मी मोठ्या आनंदाने आश्रय देईन.' पुढे सरदार देशमुख भेटावयास गेले. 'दरमहा शंभर रुपये द्यावे' [महाराज म्हणाले] आम्ही महाराजांस मदत मिळण्यासंबंधी अनेक पत्रे लिहिली. शेवटी सहा महिन्यांनंतर महाराजांकडून एकदाची देणगी म्हणून पन्नास रुपये आले ! आणि त्यातच मनीऑर्डरीचा खर्च आठ आणे कापून घेतला !!" पुण्याच्या म्युनिसिपालिटीत ब्राह्मणांचे प्राबल्य होते. त्यांनी कसलीच मदत या शाळेला केली नाही, उलट नारायणराव जोगळेकरांसारख्या त्यांच्या अध्वर्यूंने रे मार्केटातील व्यापाऱ्यांना हैराण करण्यासाठी आपले कायदेकानूंचे ज्ञान वापरले. या त्रासाला कंटाळून व्यापाऱ्यांनी अखेर धर्मफंड बंद केला. नवलकर म्हणतात : "सर-कारच्या विद्याखात्याकडून शाळेस विशेष मदत नाही. म्युनिसिपालिटीकडून मदत मिळण्याची आशा नाही. श्री. गायकवाड सरकारकडे इतकी थोर थोर मंडळी जाऊन त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले. मार्केटातील लोकांकडून जी उदार मदत मिळत असे ती ब्राह्मणांनी बंद केली, त्यामुळे ही फुकट शाळा फीची करावी लागली."[४३]

भालेकरांनी आरंभिलेले सगळेच उद्योग त्यांना एक तर असे सोडून द्यावे लागले किंवा दुसऱ्यांच्या हवाली करावे लागले.

मात्र सत्यशोधक समाजाच्या मतांचा प्रचार ज्या कल्पकतेने ते करीत असत तिला खरोखरच तोड नव्हती. उदरनिर्वाहासाठी कधी कंत्राट घे तर कधी ओव्हरसिअरचे काम कर असे उद्योग करतानाही संधी मिळेल त्याप्रमाणे ते आपल्या मतांचा प्रचार करीत. तान्सा तलाव बांधण्याचे काम १८८७–८८ साली चालले होते. या बांधकामाचे एक पोट-कंत्राट भालेकरांनी घेतले होते. तलावात पाणी सोडण्याचा समारंभ गव्हर्नरसाहेबांच्या हातून झाला. हरिश्चंद्र नवलकरांनी लिहिले आहे : " रस्त्यावर भालेकरांनी एक सुंदर कमान उभी केली आणि त्यावर अशा अर्थाची इंग्रजी अक्षरे काढली होती की, तान्सा तलावाने मुंबईतील तृषित जनांची तृषा भागणार; पण जे ज्ञानतृषेने तळमळत पडले आहेत त्यांची तृषा भागविण्याकडे तुमचे लक्ष केव्हा जाणार ? " १८८९ साली प्रिन्स अल्बर्ट व्हिक्टर हिंदुस्थानात आले असताना त्यांनी पुण्यासही भेट दिली. त्यांची स्वारी ज्या रस्त्यावरून जाणार होती त्या रस्त्यावरच भालेकरांचे फ्री स्कूल होते. शाळेसमोर भालेकरांनी एक सुंदर कमान उभी केली आणि त्यावर अशा अर्थाची इंग्रजी अक्षरे काढली होती की, " आजीला ( व्हिक्टोरिया महाराणीसाहेबांना ) आमचा असा निरोप सांगा की, ' आम्ही सुखी राष्ट्र आहोत, पण एकोणीस कोटी लोकांना विद्या नाही. ' कमानीजवळ दीनबंधू सार्वजनिक सभेच्या फुकट शाळेतील एक हजार विद्यार्थी रांगेने उभे होते. "[४४]

तत्कालीन वृत्तपत्रांचे उपलब्ध अंक पाहिले की १८८८–८९ साली ' सत्यशोधक समाजा'पेक्षा भालेकरांची ' दीनबंधू सार्वजनिक सभा'च अधिक क्रियाशील होती असा ग्रह होतो. १८८९ साली भालेराव व बंडोबा मल्हारबा शेट हे ' दीनबंधू सार्वजनिक सभे'चे कार्यकर्ते मुंबईस गेले होते व त्यांच्या प्रयत्नामुळे सभेची एक शाखा मुंबईस स्थापन झाली होती. या शाखेशी विठ्ठलराव वंडेकर, माधवराव रोकडे, कृ. अ. केळुसकर वगैरेंचा संबंध होता. दीनबंधू सार्वजनिक सभेसंबंधी जे उल्लेख आतापर्यंत प्रस्तुत लेखकाला आढळले त्यात जोतीराव फुले किंवा नारायणराव लोखंडे यांची नावे अभावाने तळपतात. याचा अर्थ फुले व लोखंडे या सभेच्या उपक्रमात सहभागी नव्हते असा करावा लागतो. मात्र तात्त्विक मतभेदापेक्षा व्यक्तिगत मतभेदामुळे स्वभावदोषामुळे अगर स्वभावभेदामुळे असे घडले असावे.

जोतीरावांच्या हयातीपर्यंतच्या काळाचा विचार केला तर सत्यशोधक समाज म्हणजे जोतीरावांच्या विचारापासून स्फूर्ती घेऊन आपापल्या परीने त्या विचारांना चळवळीद्वारा मूर्त रूप देऊ पाहणाऱ्या मंडळींचा एक काहीसा विस्कळीत समूह होता असा समज होतो. आरंभीच्या काही वर्षांत वार्षिक समारंभ नियमित होत असत, हिशेब व्यवस्थित सादर केले जात व वर्षभरात केलेल्या कामाचे अहवालही दिले जात. पण पुढे हे सातत्य राहिलेले दिसत नाही. याबद्दलचे आपले असमाधान भालेकरांनी

१८८७ साली व्यक्त केले होते असे दिसते. भालेकरांच्या कागदपत्रात त्यांच्या एका पत्राची प्रत आढळली ते त्यांनी कोणास उद्देशून लिहिले आहे ते कळत नाही. त्यावर तारीखही नाही. फक्त ' प्रिय-मित्र ' असा त्यावर मायना आहे. पत्रातील मजकुरावरून भालेकरांचा हा प्रिय मित्र खिस्ती असावा असे वाटते. या खिस्ती मित्राला त्यांनी लिहिले आहे, " सत्यशोधक समाज म्हणून जोतीराव फुले यांनी पुण्यास पंथ काढला होता. त्यातही शिरून मी काही वर्षे राहून पाहिले. परंतु सुतार, लोहार, सोनार, पाथरवट, कासार इत्यादी पांचाळ हिंदू लोकांप्रमाणेच सत्यशोधकांनी फक्त ब्राह्मणास बाजूस सारून बाकी हिंदू रिवाज म्हणजे मूर्तिपूजा, जातिभेद वगैरे सर्व प्रकारच्या घातक रूढी जशाच्या तशाच चालविल्या आहेत! दुसरे असे की, या सत्यशोधकास कोठेच मुख्य स्थले नाहीत. समाजास अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस वगैरे कोठे सर्वानुमते निवडलेले व नेमलेले नाहीत. वार्षिक रिपोर्ट कधी प्रसिद्ध होत नाही. फंडाचे पैशाचा हिशेब नाही वगैरे येथून तेथून सर्वच गोंधळ. म्हणून मी 'दीनमित्र' मासिक पुस्तकात १८८७ (?) मध्ये सत्यशोधक समाजाच्या एकंदर चालकांची कानउघाडणी केली होती. त्यावरून भटाप्रमाणे तेही माझा द्वेष करू लागले. "[४५] वरील मजकुरातील सन चुकीचा आहे, कारण 'दीनमित्र' मासिक १८८८ साली सुरू झाले.

सत्यशोधक समाजातील सभासद जोतीरावांच्या काही विचारांबद्दल उघडउघड मतभेदही दर्शवीत असत. अशा एका प्रसंगी हजर असलेल्या कृष्णाजी अर्जुन केळुसकरांनी माधवराव रोकडे यांच्या चरित्रात दिलेली एक आठवण लक्षात घेण्यासारखी आहे : " सत्यशोधक समाजाचे मूळ प्रवर्तक जोतीराव फुले हे पुण्याहून येथे आले; तेव्हा त्यांचे एक व्याख्यान समाधीच्या जागी झाले. रा. ब. लोखंडे अध्यक्ष होते. प्रकृत लेखक त्यांचे व्याख्यान ऐकावयास गेला होता. रा. फुल्यांनी आपले म्हणणे थोडक्यात पण मुद्देसूद रीतीने लोकांपुढे मांडले. आणि कोणाच्या काही शंका असल्यास त्या त्यांनी विचाराव्या असे ते म्हणाले तेव्हा आमच्या माधवरावांनी ( माधवराव रोकडे ) त्यांच्या सर्वसाधारण सिद्धान्तासंबंधाने आपली अनुकूलता प्रगट केली पण ब्राह्मण उपाध्यायांऐवजी आपले उपाध्याय झाले पाहिजेत असे जे जोतीरावांनी प्रतिपादन केले ते माधवरावांना रुचले नाही. कारण परिणामी ही एक उपाध्यायांची नवी जात निर्माण केल्यासारखे होणार आहे; आणि हल्लीच्या ब्राह्मण उपाध्यायाप्रमाणे तेही शिरजोर होऊन बसतील अशी भीती आहे असे ते म्हणाले. याशिवाय आणखी सत्यशोधनाचे दुसरे कोणकोणते प्रकार उपस्थित करावयाचे आहे ते लोकांना स्पष्टपणे कळणे उचित आहे. ते कळून लोकांच्या पसंतीस उतरणार नाहीत तोपर्यंत सत्यशोधक समाजाचा प्रसार होणे शक्य नाही आणि ब्राह्मण उपाध्याय नको म्हणण्याचा उपक्रम केल्याने ब्राह्मणजातीशी नाहक द्वेष माजविल्याचे अपयश माथी येणार आहे असा माधवरावांनी आपला स्पष्ट अभिप्राय सांगितला. तो प्रकृत लेखकाला सर्वस्वी पटला; आणि आज मितीला हे त्याचे मत कायम आहे. "[४६]

कोणत्याही बाबीत जोतीरावाचा शब्द अखेरचा व प्रमाण मानण्याची प्रवृत्ती आरंभीच्या काळात तरी सत्यशोधक समाजात नव्हती. जोतीराव आणि सत्यशोधक यांच्यामधील संबंध जोतीराव गुरू व इतर सर्व चेले अशा स्वरूपाचे नव्हते. आपापल्या कुवतीनुसार सत्य शोधण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत होता. उदाहरणार्थ, स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी 'ईश्वरास प्रार्थना' नावाचे एक पुस्तक १८८९ साली प्रसिद्ध केले होते. त्यावरील 'बडोदावत्सल' कारांचा अभिप्राय वाचून मूळ पुस्तकाविषयी कुतूहल वाटते. पुस्तकाचा परिचय 'बडोदावत्सल'कारांनी करून दिला आहे तो असा : "या पुस्तकात जगाच्या कर्त्याविषयी व जगाविषयी साधारण मनुष्यास शंका उद्भवण्याचा संभव आहे त्यांपैकी बऱ्याच एकत्र करून प्रश्नस्वरूपाने वाचकास सादर केल्या आहेत. त्यांची उत्तरे देवबाप्पाच्या लाडक्या निस्सीम भक्ताकडून मिळावी असा हे पुस्तक प्रसिद्ध करणाऱ्यांचा हेतू दिसतो. काही प्रश्न : ईश्वर न्यायी आहे तर जगात अन्याय का? न्यायी नाही तर मग तो ईश्वर कसला? ईश्वर दयाळू म्हणावा तर जगात अन्याय का? बरे, दयाळू नाही तर मग तो देव कसला? जगाचा कर्ता जर ईश्वर आहे तर ईश्वराचा कर्ता कोण?"[४७]

स्वामी रामय्या अय्यावारू, लोखंडे, भालेकर, धोंडीराम नामदेव कुंभार वगैरे सत्यशोधकांनी जोतीरावांच्या हयातीत त्याचप्रमाणे नंतरच्या काळात केलेल्या कार्याची व मांडलेल्या विचारांची आपल्याला अद्याप पुरेशी माहिती नाही. 'जोतीराव फुले म्हणजे सत्यशोधक समाज' असे सोपे समीकरण मांडल्याने नकळत सत्यशोधक समाजाच्या उभारणीतील व वाढीतील अन्य सभासदांचा वाटा दुर्लक्षिला जातो, त्यांना जे श्रेय द्यावयास हवे ते दिले जात नाही. इतरांनी केलेली कामगिरी काही वेळा जोतीरावांच्या खात्यावर मांडली जाते. सत्यशोधक समाज म्हणजे काही एकखांबी तंबू नव्हता. तसा तो असता तर जोतीरावांच्या मरणानंतर सत्यशोधक समाजाचे नावदेखील ऐकावयास मिळाले नसते. सत्यशोधक समाज ही एक चळवळ होती याचे भान ठेवावयास हवे. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या दीनदुबळ्यांची दुःखे, गाऱ्हाणी व आशाआकांक्षा यांना जोतीरावांनी प्रथम वाचा फोडली. त्यांच्या मृत्यूने सत्यशोधक समाजाच्या रूपाने झालेल्या चळवळीच्या इतिहासातील एक पर्व संपले एवढेच!

## संदर्भ

१. एक हिंदु; 'जातिभेद विवेकसार', दुसरी आवृत्ती, १८६५, जोतीराव फुले पृष्ठ ३; २. रा. चिं. ढेरे; 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध' १९७८, श्रीविद्याप्रकाशन, पृष्ठे १०२–११५; ३. मुकुंदराव पाटील पत्रव्यवहार; तुकाराम हानमान पिंजन यांचे पत्र, ११–७–१९२३, 'पुरोगामी सत्यशोधक', जानेवारी ते मार्च १९७७, पृष्ठ ४८ वर हे पत्र छापलेले आहे.; ४. भालेकरांचे कागदपत्र 'अंतकाळचे उद्गार', हस्तलिखित टिपण; ५. मुकुंदराव पाटील संग्रह, ग्यानोबा

ससाणे ह्यांच्या चरित्राचे हस्तलिखित; ६. भालेकरांचे कागदपत्र, 'अंतकाळचे उद्गार' हस्तलिखित टिपण; ७. धनंजय कीर, 'महात्मा जोतीराव फुले', दुसरी आवृत्ती, १९७३, पॉप्युलर प्रकाशन, पृष्ठे २६२–२७१; ८. कित्ता, पृष्ठ १६०; ९. कित्ता, पृष्ठ २६२; १०. भालेकरांचे कागदपत्र, हस्तलिखित; ११. 'दीनमित्र', ६ डिसेंबर १९१६; १२. वि. कृ. चिपळूणकर; 'निबंधमाला' १८८९, रामचंद्र भिकाजी कुलकर्णी, पृष्ठे ५११–५१२; १३. धनंजय कीर, स. गं. मालशे (संपादक), 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' १९६९, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृष्ठे १३७–१४०; १४. ल. कृ. चिपळूणकर, 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र' दुसरी आवृत्ती, १९२१, चित्रशाळा, पृष्ठ १००; १५. भालेकरांचे कागदपत्र, 'अंतकाळचे उद्गार', हस्तलिखित टिपण; १६. 'सत्यशोधक समाज; दुसऱ्या वार्षिक समारंभाची हकीगत' : 'पुरोगामी सत्यशोधक', मार्च १९७८, पृष्ठ ४३; १७. भालेकरांचे कागदपत्र, कृ. पां. भालेकरांचे रामराव परशराम पाटील यांस पत्र, ४-३-१९०९; १८. कित्ता, हस्तलिखित टिपण; १९. वि. कृ. चिपळूणकर, उपरोक्त, पृष्ठ १०२७; २०. भालेकरांचे कागदपत्र. संक्षिप्त इतिहास; २१. कित्ता; २२. 'शेतकऱ्यांचा कैवारी' या वृत्तपत्राने १६ नोव्हेंबर १८९३ च्या अंकांत 'दीनबंधू' मधील उतारा उद्धृत केला आहे.; २३. 'दीनमित्र' १५ नोव्हेंबर १९१६; २४. कृ. पां. भालेकर; 'हितोपदेश', दुसरी आवृत्ती, १९२३, बाबुल कृष्णाजी भुजबळ, पृष्ठे १४–१५; २५. कृ. पां. भालेकर; 'शेतकऱ्याचे मधुर गायन', तिसरी आवृत्ती, १९२५, मुकुंदराव पाटील, पृष्ठे १८–१९ व २५; २६. धनंजय कीर व स. गं. मालशे, उपरोक्त, पृष्ठे ३२५–३२६; २७. कित्ता, पृष्ठ २४९; २८. कित्ता, पृष्ठ २५२; २९. कित्ता, पृष्ठ २९८; ३०. कित्ता, पृष्ठ ३०४; ३१. 'बडोदावत्सल', २४–२–१८८९ व ९–६–१८८९; ३२. धनंजय कीर व स. गं. मालशे, उपरोक्त, पृष्ठ १५९; ३३. भालेकरांचे कागदपत्र, पुणे सुशिक्षणगृहासंबंधीचे निवेदन, ५–५–१८८५; ३४. मुकुंदराव पाटील संग्रह, 'इशारा' अंक १ ला, ऑक्टोबर १९०५ ची आवृत्ती; ३५. 'शेतकऱ्यांचा कैवारी', १६–११–१८९३; ३६. कित्ता ३०–११–१८९३; ३७. भालेकरांचे कागदपत्र, संक्षिप्त इतिहासाचे हस्तलिखित; ३८. कृ. अ. केळुसकर, 'माधवराव राघोजी रोकडे यांचे संक्षिप्त चरित्र', १९२७, पृष्ठ २९–३०; ३९. 'दीनमित्र', १७–१–१९१७; ४०. कित्ता, २८–४ १९२० च्या अंकात 'अंबालहरी' पत्रातला हा उतारा उद्धृत केला आहे.; ४१. 'दीनमित्र' (मासिक) जुलै १८८९.; ४२. 'शेतकऱ्यांचा कैवारी' १३–१०–१८९२; ४३. 'दीनमित्र', १७–१–१९१७; ४४. कित्ता; ४५. भालेकरांचे कागदपत्र, 'प्रिय मित्रास' पत्र, हस्तलिखित प्रत; ४६. कृ.अ. केळूसकर, उपरोक्त, पृष्ठे ३३–३४; ४७. 'बडोदावत्सल' १०–३–१८८९.

— मौज : दिवाळी १९७८

०००००००००००००००००००००००००

# ६

# जेधे-जवळकर

०००००००००००००००००००००००००

एकेकाळी वादविषय बनलेल्या व त्यामुळे प्रसिद्धीच्या प्रखर झोतात सतत वावरणाऱ्या नामवंत माणसांची कालांतराने समाजाला आठवणही राहात नाही. पन्नास वर्षांपूर्वी केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर या बहुजनसमाजाच्या नेत्यांनी महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात केवढी धमाल उडवून दिली होती याची आज फारच थोड्यांना कल्पना आहे. अलीकडे डॉ. गेल ऑमवेत-पाटणकर यानी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे मार्क्सवादी दृष्टिकोणातून विश्लेषण करताना जेधे-जवळकरांची दखल घेतली तोपर्यंत खरे म्हणजे जेधे-जवळकरांच्या कामगिरीकडे अभ्यासकांनीही दुर्लक्षच केले होते. सर्व घटनांची शहानिशा करून महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचा साधार व समग्र इतिहास अद्याप लिहिला गेला नाही. त्यामुळे जेधे-जवळकर या जोडगोळीने केलेल्या चळवळीची आज भल्याभल्यांना फारशी माहिती नसल्याचे आढळते. या जोडीपैकी जवळकर अल्पायुषी ठरल्याने त्यांची आठवण तर आता पार पुसली गेली आहे. केशवराव जेध्यांचा नामनिर्देश केला जातो तो काकासाहेब गाडगीळ व शंकरराव मोरे या त्यांच्या नंतरच्या सहकाऱ्यांच्या संदर्भात! पण या जोड्या जमण्यापूर्वी किमान एक दशकाच्या ( १९२२ ते १९३२ ) काळातली जेधे-जवळकरांची आरंभीची युती व नंतरची दुफळी ही महाराष्ट्राच्या ब्राह्मणेतर चळवळीतील एक महत्त्वाची घटना होती हे विसरून चालणार नाही.

जेधे ( १८९६–१९५९ ) व जवळकर ( १८९८–१९३२ ) दोघेही समवयस्क! दोघांचे शिक्षणही तसे बेताचे! जवळकर जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिकलेले तर केशवराव जेध्यांनी इंटरमध्ये असताना कॉलेज सोडलेले! जोतीराव फुले व शाहूमहाराजांपासून प्रेरणा घेतलेल्या तरुणांनी टिळकांच्या प्रस्थापित नेतृत्वाला १९१७ नंतर मवाळ

पक्षाच्या मदतीने जबरदस्त आव्हान दिले. पुण्याच्या शुक्रवार पेठेतील जेधे मॅन्शन हा टिळक-विरोधकांचा बालेकिल्ला बनला. टिळकांना पुणे शहरातर्फे मानपत्र देण्यास विरोध करणाऱ्यांत व किर्लोस्कर थिएटरमधील त्यांची सभा उधळण्यात धायगुडे, पालकर ( गवंडी ) बंधू या मंडळींचा पुढाकार होता. केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांची ओळख झाली ती याच काळात! हिंदूंतील आंतरजातीय विवाहास मान्यता मिळावी यासाठी १९१८ साली विठ्ठलभाई पटेलांनी मांडलेल्या विधेयका-विरुद्ध टिळक पक्षाने मोहीम उघडली होती. त्या वेळी पटेल-बिलाची तरफदारी करणारे ' प्रणय-प्रभाव ' नावाचे एक नाटक जवळकरांनी लिहिले. पण ( बंदी घातली गेल्याने ) त्याचा पहिला प्रयोगही होऊ शकला नाही अशी जवळकरांचे मित्र संदेशकार अच्युतराव कोल्हटकर यांची साक्ष आहे. मात्र जवळकरांच्या लेखणीचे गुण हेरून बाबूराव यादव या विश्वासू अनुयायामार्फत शाहू छत्रपतींनी जवळकरांना कोल्हापूरला बोलावून घेतले. जवळकर हे केशवराव जेध्यांप्रमाणे धनाढ्य व वतनदार देशमुखांच्या घराण्यात जन्मलेले नव्हते. ते होते चोराच्या आळंदीचे पाटील. त्यांची सांपत्तिक स्थिती जेमतेमच होती. शाहूमहाराजांच्या आश्रयामुळे त्यांना प्रथमच चैनीत राहता येऊ लागले. स्वतः जवळकरांनीच म्हटले आहे, " शाहूमहाराजांच्या आश्रयाखाली सार्वजनिक चळवळीला मनुष्यस्वभावाची माहिती आणि निर्भयता या अनेक गोष्टी जरी मला लाभल्या, तरी कसलेही श्रम न करता खर्च होतील तेवढे पैसे लहान वयात माझ्या हाती येऊ लागल्यामुळे सार्वजनिक कार्यात घातक होणारी डामडौलाची सवय जडली होती. "

जवळकर कोल्हापूरला असताना ' तरुण मराठा ' हे वृत्तपत्र चालवीत. पत्राची भाषा भडक, तिखट असे. टिळक पक्षावर व विशेषतः त्यातील नारायणराव गुंजाळ वगैरे मराठा पुढाऱ्यांवर लिहिताना तर त्यांच्या लेखणीस धरबंद राहात नसे. १९२१ साली गुंजाळ यांच्या सहीचे एक पत्र जवळकरांनी छापले ते बनावट होते. गुंजाळ हे लेकावळे आहेत, अक्करमाशे आहेत अशा शब्दात जवळकरांनी गुंजाळांबाबत लिहिताच ' दीनमित्रा 'सारख्या जुन्या सत्यशोधक पत्रालाही जवळकरांचा निषेध करावासा वाटला, तर ' तरुण मराठा ' पत्राचे मुद्रक सावंत यांनी गुंजाळांना अखेर माफीपत्र लिहून दिले. " दिनकर शंकर जवळकर, राहणार कोल्हापूर यांचेवर विश्वास ठेवून सपशेल फसलो आहे व त्यामुळे सदरचा मजकूर छापला गेला. " जवळकर या वेळी बाबूराव यादवांच्या तालावर नाचत असावेत! त्यांच्या एका मित्राने दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांना लिहिलेले खासगी पत्र स्वतः दीनमित्र-कारांनीच पत्रलेखकाचे नाव गाळून प्रसिद्ध केले आहे. आपली व जवळकरांची अवस्था बाहुल्यासारखी आहे असे सांगून हा पत्रलेखक म्हणतो, " टोणगा गाभणा तर नववा महिना एवढेच बोलून भागत नाही! तर त्या टोणग्याच्या दुधाचा खवा करून हा बघा पेढा आणला येथपर्यंत आम्हाला धूम ठोकावी लागते... आमच्या

पत्रात कधी कोणता मजकूर छापला जाईल हे आम्हासच पुष्कळ वेळा माहीत नसते." औंधच्या पंतप्रतिनिधींविरुद्ध प्रक्षोभक मजकूर छापला गेला तेव्हा पंतप्रतिनिधींनी इंग्रज रेसिडेंटकडे तक्रार केली. उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात ( १९ एप्रिल १९२१ ) शाहूमहाराजांनी 'तरुण मराठ्या'च्या संपादकास आपण कोल्हापूर सोडून जाण्यास सांगितले आहे असे रेसिडेंटला कळवले असल्याची शाहूचरित्रकार धनंजय कीर यांची साक्ष आहे.

'तरुण मराठा' बंद झाला असून "जवळकर कोठे गडप झाले ते समजत नाही" अशी बातमी 'दीनमित्रा'च्या कोल्हापूरच्या बातमीदाराने ४ जानेवारी १९२२ च्या अंकात दिलेली दिसते. शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर ( ६ मे १९२२ ) जवळकरांचा आधार पुरता तुटला. या काळात ते श्रीपतराव शिंद्यांच्या 'विजयी मराठा' या पुण्याच्या साप्ताहिकात 'भवानी तलवार' या टोपण नावाने अधूनमधून लिहीत. पुण्यास परतल्यावर ते पुन्हा पुण्यातल्या राजकीय उलाढालींत उत्साहाने भाग घेऊ लागले.

दरम्यान ब्राह्मणेतर पक्षाची व प्रागतिक किंवा मवाळ पक्षाची युती संपुष्टात आली होती. जेधे मॅन्शन विरुद्ध गायकवाडवाडा ही लढत सुरू होतीच. त्याबरोबरच बहुजनसमाजातील नेमस्त नेतृत्वाविरुद्ध आघाडी उघडली गेली. पुण्यात होणाऱ्या शिवछत्रपतींच्या संकल्पित स्मारकाबाबतचा वाद पेटला आणि 'तरुण मराठा मंडळा'-ची स्थापना करून जेधेबंधू, पालकरबंधू, जवळकर, विठ्ठलराव झेंडे वगैरेंनी ग्वाल्हेरचे राजे अलिजाबहाद्दर माधवराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवस्मारक समिती-विरुद्ध बंडाचे निशाण फडकावले. तसे पाहिले तर १९१७ साली ग्वाल्हेरचे खासेसाहेब पवार व बडोद्याचे खासेसाहेब जाधव यांनी प्रथम श्रीशिवाजीस्मारकाची योजना मांडली तेव्हाच बडोद्याच्या 'जागृती'कार पाळेकरांनी इषारा दिला होता, "शिव-स्मारक संस्था फक्त क्षत्रिय मराठ्यांकरिता असणार किंवा महाराष्ट्रातील मागासलेल्या सर्व जातींनाही त्याचा फायदा मिळणार याचा अगोदर खुलासा व्हावा. मागाहून गैरसमज किंवा तंटेबखेडे होण्यास जागा राहू नये." पुण्याचे शिवस्मारक "निव्वळ मराठ्यांचे करावे" असे शाहूछत्रपतींना वाटत होते, पण तसे केले तर प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्ते स्मारकाची कोनशिला बसवण्याचा समारंभ साजरा होणे शक्य नव्हते. हे लक्षात घेऊन श्रीशिवाजीस्मारकाला अखिल भारतीय स्वरूप देण्यास शाहूमहा-राजांनाही संमती द्यावी लागली व १९ नोव्हेंबर १९२१ ला म्हणजे गांधीजींच्या असह-कारितेची चळवळ ऐन भरात असताना ब्रिटनच्या युवराजांच्या हस्ते कोनशिला बसवण्यात आली होती. शाहू छत्रपतींच्या मृत्यूनंतर मात्र शिवस्मारक समिती अलिजा-बहाद्दर शिंदेसरकारांच्या कह्यात गेली. २५ मे १९२२ रोजी शिंदेसरकारांच्या मुंबईतील समुद्र-महालात समितीची सभा भरून सांगलीकरांसारख्या ब्राह्मण संस्था-निकांचा समावेश करण्याचे व गोपाळराव देवधरांना समितीचे चिटणीस नेमण्याचे

ठरले. तेव्हा श्रीशिवस्मारक शिवाजी मराठा सोसायटीच्या मालकीचे असावे आणि मराठेतर लोकांना त्यांच्या व्यवस्थेत हात घालता येऊ नये असा जेधेबंधू, पालकरबंधू, जवळकर वगैरे तरुण मराठ्यांनी आग्रह धरला.

तरुण मंडळाने १९२२ सालच्या गणेशोत्सवात काढलेल्या छत्रपती मेळ्यानेही खळबळ उडवून दिली. तोपर्यंत गणेशोत्सवातील मेळयातून टिळकपक्षाची स्तुती करणारी व सुधारक, नेमस्त पुढारी आणि स्त्रिया यांची टवाळी करणारी पदे म्हटली जात.

"अहो हे सुधारक नव्हे।
पण असती वेडझवे।
यांचे कळेनात काय कावे।
मारा यांना पैजार।"

किंवा

"बट आय ॲम रिफॉर्मर।
आय डोंट लाइक सच मर्मर।
आय वुइल टेक माय वाइफ नियर।
साहेबाच्या। "

असली पदे फार लोकप्रिय होती.

"बिस्कुटे उष्टी त्वा खावी।
साहेबी लक्तरे ल्यावी।
सर्वदा लाळ घोटावी।
रात्रंदिन जी जी करावी॥"
"तुज मिळेल म्हारीण कोणी।
वाकडी जी सात ठिकाणी।
काळुन्द्री घुबडावाणी।
तू राजा मग ती राणी॥"

असल्या लोकप्रिय पदात ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करणाऱ्याबरोबरच अस्पृश्य मानल्या गेलेल्या स्त्रियांची हेटाळणी केली जात असे. असल्या प्रचाराला तसल्याच भाषेत प्रत्युत्तर दिले तरच त्याला आळा बसेल असे केशवराव जेधे यांना वाटले.

केशवरावांचे त्या काळातले एक सहकारी दिनकरराव माने यांनी जेध्यांच्या आठवणी सांगताना म्हटले आहे, "मेळा काढून हा पहिला हल्ला करण्याची कल्पना केशवरावांची! जेधे मंडळींनी पदरचा पैसा घातला. तरुण कॉलेजिअन्स, पूर्व पुण्यातील तालमी यांचा हळूहळू पाठिंबा मिळाला, आणि छत्रपती मेळ्याची पडघम टिपरी झडली की 'अरे आला छत्रपती मेळा, पळा भटांनो! पळा, पळा!!' हा ठेका सुरू! आम्हाला रात्र रात्रभर जागरणे, मेळ्यांची पालुपदे घोळून घोळून घसे बसलेले. तुफान

गर्दीचा सहानुभूतीचा घेराव, हसऱ्या पोलिसांचे स्वयंसेवक दल, जाईल त्या भागात जयनाद, मेळेवाल्यांचा भगव्या रंगाच्या फेट्यांचा थाट, किती आकर्षक होता. 'सारा नकट्यांचा बाजार,' 'कुठेही आडवा भट आला, राज्याचाही निकाल होईल, जाईल नाशाला' अशा कवी केशवरावांच्या हिट चाली." केशवरावांनी छत्रपती मेळ्यासाठी नुसती पदे रचली एवढेच नव्हे तर

"शिवाजी आमुचा राणा,
मराठी आमुचा बाणा"

हा गझल म्हणून त्यांनी तो लोकप्रियही केला. जेध्यांच्या या उपक्रमात जवळकरही सामील होते. 'छत्रपती-पद्य-संग्रह' ही पुस्तिका जवळकरांनी प्रकाशित केलेली आहे.

छत्रपती मेळ्याचा हल्ला कसा परतवावा असा तत्कालीन ब्राह्मण नेत्यांना पेच पडला. त्यांनी सामोपचाराचे तसेच धाकदपटशाचे उपायही योजून पाहिले. मेळ्याच्या धुरीणांना कायद्याच्या कचाट्यात पकडण्याचाही प्रयत्न झाला, पण छत्रपती मेळ्याची लोकप्रियता वाढतच गेली व अखेर इंग्रज सरकारला हस्तक्षेप करावयास लावून मेळ्यांची पदे सेन्सॉर करण्याची कल्पती योजण्याची पाळी आली. ही धामधूम चांगली पाच-सहा वर्षे चालली होती.

ब्राह्मण विशेषतः चित्पावन ब्राह्मण, हेच तेवढे जेधे-जवळकरांच्या माऱ्याचे लक्ष्य होते असे नाही. बहुजनसमाजातील बड्याबड्या धेंडांचा मुलाहिजा न ठेवता त्यांच्यावरही ते अशीच झोड उठवीत. श्रीशिवस्मारक समितीतल्या बुजुर्गांना घायाळ करणारे एक 'श्रीशिव-स्मारक-पुराण' जवळकरांनी ४ सप्टेंबर १९२३ रोजी लिहून पुरे केले व 'आग्यावेताळ' या टोपणनावाने ही सतरा अध्यायांची पोथी प्रकाशित केली.

"ज्या नराला चाड नाही।
जो निर्लज्ज भाड खाई।
जो सदा द्रव्य पाही।
तो एक षंढ जाणा॥"

अशा शब्दात जवळकरांनी विरोधकांची पूजा बांधली आहे.

"कोल्हापूरचा जाधव भास्कर।
विद्वत्तेने झाला क्रूर।
श्रीमंत पक्षातला शिरजोर।
तयार शिव विकण्याला॥
नित्य मता सोडी नवोनव।
सत्याची जया नाही चव।
हा पुढारी की स्वार्थी मानव।
कळो न देईल या जन्मी॥

गंभीर मुद्रा वदे शांत।
अंतरी कुचका सदा भिजत।
ही अर्वाचीन त्रिशंकु जात।
या उपमा दुजी नाही ॥ ”

अशा शब्दांत भास्करराव जाधवांसारख्या प्रतिष्ठित पुढाऱ्याचे वाभाडे काढण्यास जवळकरांनी मागेपुढे पाहिले नाही.

१९२२ च्या नोव्हेंबरात जवळकरांनी पुण्याहून पुन्हा ‘ तरुण मराठा ’ पत्र सुरू केले. पहिल्याच अंकातील अग्रलेखात त्यांनी कोल्हापूरच्या वास्तव्यात आलेल्या अनुभवांचे खडे बोल वाचकांना ऐकवले. “ पाहुण्यांच्या हातून साप मारून स्वतःची बायको गरोदर आहे अशी सबब सांगणाऱ्या चांडाळ मुत्सद्यांचा आम्हांला अगदी पुरापुरा वीट येऊन गेला आहे....तरुण रक्ताचे सरळ आत्मे भावनांच्या भरात बेगुमान पुढचा पाय पुढे ठेवतात पण त्याचा फायदा कोण कसा घेईल, गूळ-खोबऱ्याची दुकाने कोठे आहेत याचा पत्ता त्याला नसल्यामुळे ते प्राणी कसे कसे फशी पडतील हे सांगण्याचा अधिकार आज ‘ तरुण मराठ्या’ला स्वानुभवाने प्राप्त झाला आहे. ” आपल्या प्रभावी वाणीचा व तिखट लेखणीचा उपयोग करून घेतला जातो हे जवळकरांना कळल्यासारखे वाटले तरी नंतरही त्यांचा उपयोग करून घेणारे मुत्सद्दी त्यांना भेटलेच ! आणि एकदा आलेल्या अनुभवाने जवळकर शहाणे झाले नाहीत.

जवळकर आणि जेधे दोघेही सरळ स्वभावाचे. मनात येईल ते भीडभाड न ठेवता स्पष्टपणे बोलून दाखवीत. ओठात एक आणि पोटात एक ही पाताळयंत्री मुत्सद्यांची कला त्यांना अवगत नव्हती. भालाकार भोपटकरांसारख्या जेधे-जवळकरांच्या कडव्या विरोधकानेही ‘ भाला ’ पत्रात ( ४ एप्रिल १९२७ ) या दोघांसंबंधी लिहिले आहे ते या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. “ श्री. जेधे व जवळकर ब्राह्मणद्वेषी असले तरी त्यांच्या मनाची ठेवण बिनलपंडावी ( sincere ) आहे. त्यांच्यातील हा सद्‌गुण आम्हांस अत्यंत प्रिय आहे..त्यांच्यासारख्यांच्या उघड्या अंतःकरणात आतबाहेर काही नसते. जे पोटात रसरसते ते ओठातून बाहेर पडते पण श्री. जाधवरावांची ( भास्करराव जाधव ) गोष्ट निराळी होय. ते सत्यसमाजी लोकांतील मवाळाग्रणी होत.” इंग्रज राज्यकर्त्यांना सांभाळून त्यांच्या सहकार्याने राजकारण खेळणाऱ्या भास्करराव जाधवांसारख्या नेमस्त पुढाऱ्यांना जेधे-जवळकरांचे जहाल राजकारण अनेकदा गैरसोयीचे होत असे. त्यामुळे ते जाहीररीत्या या तरुणांच्या उद्योगाबद्दल नाराजी व्यक्त करीत व त्यांच्या उपक्रमाशी सत्यशोधक समाजाचा काहीही संबंध नाही असा ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’ या सरकारजमा पत्रात भास्करराव जाधव खुलासा करून मोकळे होत.

केशवराव जेधे १९२५ साली पुणे नगरपालिकेचे सभासद म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी तऱ्हतऱ्हेचे ठराव मांडून तत्कालीन ब्राह्मण नेत्यांना चांगलेच कैचीत

धरले आणि सामाजिक प्रश्नाबाबतचे त्यांचे प्रतिगामी धोरण उघडकीस आणले. पुणे नगरपालिकेच्या खर्चाने चालणारे सार्वजनिक हौद व नळ स्पृश्यास्पृश्य वगैरे भेदाभेद न ठेवता सर्वांना मोकळे ठेवावेत या आशयाच्या जेध्यांच्या ठरावावर चर्चा झाली तेव्हा जवळकरांच्या शब्दांत सांगावयाचे तर, ‘ जहाल, मवाळ, टवाळ, गबाळ ’ अशा सर्व पक्षांचे ब्राह्मण एक झाले व त्यांच्या कच्छपी लागलेल्या काही ब्राह्मणेतर सभासदांच्या मदतीने त्यांनी हा ठराव फेटाळला. खरे म्हणजे नगरपालिकेतील बहुमत आपल्या पाठीशी नाही याची पूर्ण कल्पना असतानाही केशवराव जेधे एकामागोमाग एक ठराव पाठवीत आणि ठरावावरील चर्चेच्या निमित्ताने बहुजनसमाजाला जागृत करण्यासाठी ते आणि त्यांचे सहकारी कधी मेळ्याच्या पदातून तर कधी छोट्या पुस्तिका प्रकाशित करून प्रचार करीत. जवळकरांनी आपल्या झणझणीत लेखणीने आणि भडक भाषणांनी या प्रचारमोहिमेत मोठा वाटा उचलला होता. त्यांनी पुण्याहून पुन्हा चालू केलेले ‘ तरुण मराठा ’ पत्र बंद पडले तरी रामचंद्र नारायण लाड यांनी काढलेल्या ‘ मजूर ’ पत्रात जवळकर बरेच लिहीत.

केशवराव जेध्यांनी १९२५ सालच्या जुलै महिन्यात महात्मा फुले यांचा पुतळा पुणे नगरपालिकेने बसवावा अशा आशयाचा ठराव पाठवला आणि एकच रणधुमाळी माजली. त्याआधी पुणे नगरपालिकेने विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक यांचे पुतळे बसवले होते; पण जोतीरावांचा पुतळा बसवण्यास पुणे नगरपालिकेतील ब्राह्मण सभासदांचा सक्त विरोध होता. त्या वेळी नगरपालिकेत ब्राह्मण-सभासद अल्पसंख्य असले तरी अनेक ब्राह्मणेतर सभासद त्यांच्या तंत्राने चालत असत. अशा सभासदांमध्ये महात्मा फुले यांचे नातेवाईक बाबूराव फुले आणि रंगोबा लडकत हे दोघे होते. तसेच गुंजाळ, किराड, मुदलियार, नायडू ही प्रमुख मंडळीही होती. जेध्यांच्या ठरावाला होणारा संभाव्य विरोध लक्षात घेऊन जवळकरांनी ‘देशाचे दुष्मन ’ हे पुस्तक प्रसिद्ध केले. “ महात्मा जोतीरावांच्या ‘ गुलामगिरी ’ पुस्तकानंतर आज पन्नास वर्षांनी या निर्भीड पुस्तकाचा महाराष्ट्राला लाभ होत आहे ” असे या पुस्तकाचे प्रकाशक केशवराव जेधे यांनी जवळकरांच्या या कृतीबद्दल म्हटले होते. टिळकांविषयी जेध्यांनी लिहिले, “ कोठे बाबू चित्तरंजन दास आणि कोठे टिळकासारखे खाबू निपटनिरंजन डांस ! कोठे महाराष्ट्राच्या हृदयसिंहासनावर आचंद्रार्क विराजमान होणारे रणगाजी शिवबा आणि कोठे भटी पंचपात्रीत खडबडणारा भटांचा टिळकोबा ! ! कोठे मृत महाराष्ट्रातून कडव्या सत्यनिष्ठेचा झंझावात उत्पन्न करणारा प्रखर प्रभावी फुले महात्मा आणि कोठे महाराष्ट्राच्या हाती पुराणाच्या कापूसवाती देणारा चिपळूणकरी टिळक दुरात्मा ! ! ! ”

केशवराव जेध्यांनी ज्या भाषेत चिपळूणकर-टिळकांवर हल्ला चढवला त्याच भाषेत जवळकरही त्यांच्यावर तुटून पडले. टिळक-चिपळूणकर देशभक्त नसून अत्यंत नीच कोटीतले ‘ देशाचे दुष्मन ’ होते असे म्हणून जवळकरांनी टिळकांना जी

शेलकी विशेषणे लावली त्यामुळे पुण्यात विलक्षण खळबळ उडाली. 'सोंगाड्या चोर', 'राष्ट्रीय दरोडेखोर', 'मनाचे कुजकट आणि कृतीचे हलकट', 'ब्रह्ममुखोत्पन्न जंत' वगैरे शब्दांत टिळक-चिपळूणकरांची संभावना करताना आपण कडक व भडक भाषा वापरीत आहोत याची जवळकरांना पुरेपूर जाणीव होती. पण खुद्द जोतीरावांचा हवाला देऊन जवळकरांनी आपल्या भाषेचे समर्थन केले होते. "या भटासारख्या त्रिलोकतर्कट, 'मुके मुजूर' लोकांशी जोतीरावांनी नरम शब्दात गरम चहा पीत जर वादविवाद केला असता तर काही एक कार्य झाले नसते. आपण सत्यशोधक कडक भाषेत भडक सत्याच्या जोरावर बेधडक भटावर हल्ला चढवितो. म्हणूनच ब्राह्मण वठणी येत चालले आहेत. आपल्या कडकपणातच आपला विजय आहे. ब्राह्मणाच्या चुका सरळ शब्दात मऊ मऊ लिहून दाखविता येतील. पण ब्राह्मणासारख्या ब्रह्मांड टोणप्यांना सरळ सांगून पटणारच नाही."

जवळकर ज्या तऱ्हेने चिपळूणकर-टिळक यांच्यावर चिखलफेक करीत होते त्याच तऱ्हेने महात्मा फुले यांच्यावरही विरोधकांकडून चिखलफेक होत होती हे विसरून चालणार नाही. फुल्यांचा पुतळा बसवू नये असे म्हणणाऱ्यांनी जोतीरावांची प्रतिमा कलंकित करण्याचे निंद्य प्रयत्न चालविले होते. 'सत्यशोधक का खिस्तशोधक?' या शीर्षकाची एक पुस्तिका गणपतराव नलावडे यांनी प्रकाशित केली होती व ती पुणे नगरपालिकेच्या सभासदांना वाटण्यात आली होती. विश्वनाथ महादेव फुले या नावाच्या जोतीरावांच्या चुलतभावाच्या नातवाने या पुस्तिकेस प्रस्तावना लिहिली होती. "असा स्वधर्म व स्वकुल बाटगा पुरुष आपल्या वंशात होऊन गेला हे सांगणेदेखील मोठे लाजिरवाणे आहे" असे विश्वनाथ फुल्यांनी जोतीरावांबद्दल प्रास्ताविकात म्हटले होते. पुस्तिकेच्या लेखकाने पुरावे न देता ऐकीव माहितीवर विसंबून जोतीरावांवर खोटेनाटे आरोप केले होते. "जोतिबांनी प्रत्यक्ष धर्मांतर केले होते की नाही याचा पुरावा अद्याप मिळाला नाही तथापि तो लवकरच मिळेल" असा विश्वास व्यक्त करून जोतीराव फुले म्हणजे खिस्त्यांनी हिंदुधर्माविरुद्ध सोडलेले एक पगारी प्रचारक होते असे त्याने सांगितले होते. या लेखकाने महात्मा फुल्यांच्या चारित्र्यावर बिनदिक्कतपणे शिंतोडे उडविलेले होते. जोतीरावांनी आपल्या घरी वाढविलेले अनाथ मूल हे त्यांच्यापासून एका विधवेला झालेले मूल होते असल्या बेछूट आरोपांनी जोतीरावांची बदनामी करण्याचा निंद्य प्रयत्न त्या वेळी राजरोस केला गेला. सनातनधर्माभिमानी म्हणवणाऱ्या ब्राह्मणेतरांचे 'संग्राम' नावाचे एक वृत्तपत्रही निघू लागले. या पत्राचे संपादक गणपतराव नलावडे असले तरी त्यात गोखले, हरिभाऊ जोशी, काका गाडगीळ वगैरे मंडळी लिहीत. 'संग्राम'मधील मजकूर शिवराळ भाषेत लिहिलेला असे आणि जवळकर व लाड यांनी चालवलेल्या 'मजूर' पत्रातील लेखांना त्यात उत्तरे दिली जात.

असल्या प्रक्षुब्ध वातावरणात पुणे नगरपालिकेच्या ४ सप्टेंबर १९२५ च्या सभेत

केशवराव जेध्यांनी पुतळ्यासंबंधीचा ठराव मांडला. पुणे नगरपालिकेने टिळक व चिपळूणकर या दोन भटांचे पुतळे उभे केले असे त्यांनी म्हणताच अध्यक्ष रावबहादुर लक्ष्मणराव आपट्यांनी ' भट ' हा शब्द परत घेण्याबद्दल त्यांना इषारा दिला. केशवरावांनी जबाब दिला, " टिळक व चिपळूणकर हे भट जातीत जन्मले नसून इंग्रज, जर्मन, जपानी इत्यादी कुळात जन्मले असे जर अध्यक्षांस वाटत असेल, तर त्यांनी तसे जाहीर करावे. " महात्मा फुले यांच्या कार्याची माहिती सांगताना त्यांनी विधवा स्त्रियांच्या बाळंतपणाची सोय केली असे जेध्यांनी म्हणताच विधवा बाया पोटची मुले टाकतात यास आधार काय असा रावबहादुर आपट्यांनी सवाल केला. तेव्हा एकच खडाजंगी जुंपली आणि अध्यक्षांचा निषेध करीत केशवरावांनी सभात्याग केला. त्यांच्या पाठोपाठ वायाळ, विठ्ठलराव झेंडे व सणस यांनीही सभागृह सोडले. त्यानंतर अर्थातच प्रचंड बहुमताने जेध्यांचा ठराव फेटाळला गेला, एवढेच नव्हे तर जेध्यांविरुद्ध निंदाव्यंजक ठराव पसार होऊन नगरपालिकेची ही गाजलेली सभा संपली.

नगरपालिकेची सभा संपल्यानंतर उभय पक्षांच्या जाहीर सभा धूमधडाक्याने भरू लागल्या. नगरपालिकेतील चर्चेच्या वेळी महात्मा फुले यांची बदनामी करणारी विधाने बाबूराव फुले यांच्यासारख्या त्यांच्या भाऊबंदांनी केली म्हणून त्यांना ज्ञातीतून बाहेर काढण्यासाठी माळी समाजाची सभा भरली. माळी ज्ञातीच्या या सभेत जोतीरावांचे व्याही ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांनी जोतीरावांवरील आरोप खोटे असल्याची ग्वाही दिली. फुले पुतळा प्रकरणी पुण्यात जेधे-जवळकरांनी चालवलेल्या चळवळीला भास्करराव जाधवांचा पाठिंबा आहे की नाही याबद्दल त्यांनी खुलासा करावा अशी सूचना ' टाइम्स ऑफ इंडिया 'ने केली तेव्हा या चळवळीशी सत्यशोधक समाजाचा काहीएक संबंध नाही असा भास्कररावांनी सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष या नात्याने खुलासा केला. केशवराव जेध्यांनी मांडलेले ठराव नगरपालिकेतील बहुसंख्य सभासदांनी फेटाळल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी झालेल्या सभेत " ' देशाचे दुष्मन ' हे पुस्तक म्हणजे शिव्यांचे नरककुंड आहे. मोल्सवर्थच्या कोशातील सर्व अश्लील व गलिच्छ शब्द यात आले आहेत " असा ठराव पसार झाला. मस्तानीचा पुतळा उभारावा म्हणून जेधे यांनी ठराव पाठविल्याबद्दल याच सभेत जेध्यांचा निषेध केला गेला. हा निषेधाचा ठराव काही वर्षांनी केशवरावांचे स्नेही बनलेले श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी मांडला होता.

मात्र जेधे-जवळकरांच्या निषेधाच्या सभा भरवून ब्राह्मण पुढारी व त्यांचे गुंजाळासारखे ब्राह्मणेतर अनुयायी स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी जेधे, जवळकर, लाड, केशवराव बागडे यांच्यावर खटले भरून त्यांना तुरुंगात अडकवण्याचा घाट घातला. दंडवते वकील, गुंजाळ, बाबूराव फुले यांनी ' मजूर ' पत्रावर फिर्यादी केल्या तर ' देशाचे दुष्मन ' पुस्तकात निबंधमालाकारांची बदनामी केल्याबद्दल विष्णुशास्त्री चिपळूण-

करांचे दूरचे नातेवाईक असलेल्या कृष्ण महादेव चिपळूणकर वकिलांनी लेखक जवळकर, प्रकाशक जेधे, प्रस्तावनाकार बागडे व मुद्रक लाड यांना न्यायालयात खेचले. याखेरीज छत्रपतीपद्यसंग्रहातील पदांमुळे लोकमान्य टिळकांची बदनामी होते म्हणून टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत यांनी पद्यसंग्रहाचे प्रकाशक जवळकर व मुद्रक लाड यांच्यावर खटला भरला होताच. छत्रपतीपद्यसंग्रहावरील खटल्यात प्रथम जवळकर व लाड यांना प्रत्येकी पाचशे रुपये दंड ठोठावण्यात आला, पण अपिलात तो कमी करण्यात येऊन प्रत्येकी पन्नास रुपये दंडावर निभावले. ‘देशाचे दुष्मन’ या पुस्तकावरील खटल्यात फ्लेमिंग या मॅजिस्ट्रेटने जवळकर व लाड यांना प्रत्येकी एक वर्ष सक्तमजुरी व अडीचशे रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली तर केशवराव जेधे व केशवराव बागडे यांना प्रत्येकी सहा महिने सक्तमजुरी व शंभर रुपये दंडाची शिक्षा फर्मावली.

‘देशाचे दुष्मन’ वरच्या खटल्याची सुनावणी चालू असतानाच घडलेल्या एका प्रकारामुळे पुणे शहरातील वातावरण अधिकच प्रक्षुब्ध झाले. १९ ऑगस्ट १९२६ रोजी सरदार बावडेकरांची द्वारकाबाई ही शाळकरी मुलगी आपल्या घरी परतत असताना मेहुणपुऱ्याच्या बोळाच्या तोंडाशी हरी नारायण धनवडे नावाच्या मराठा तरुणाने तिच्यावर हात टाकला. त्यामुळे ही ब्राह्मण मुलगी बेशुद्ध पडली. आजूबाजूच्या लोकांनी धावत येऊन मुलीस सोडविले व धनवडेला पकडून पोलिसांच्या हवाली करण्यात आले. या घटनेमुळे खवळलेल्या ब्राह्मणांनी प्रचंड सभा भरवल्या. “सत्यशोधक चळवळीच्या नावाखाली पुणे शहरातील व बाहेरील काही ब्राह्मणेतर मंडळी ब्राह्मण जातीविषयी व विशेषतः ब्राह्मण स्त्रियांविषयी अश्लील व बीभत्स वाङ्मय प्रसिद्ध करून सदर जातीवर अत्याचार करण्याविषयी प्रोत्साहन देत आहेत” असा ठराव २७ ऑगस्ट १९२६ रोजी भरलेल्या ब्राह्मणांच्या सभेत मंजूर झाला. हा ठराव मांडताना तात्यासाहेब केळकरांनी विरोधकांना इषारा दिला, “सांभाळा, कोब्राच्या शेपटीवर पाय दिला तर तो त्याबरोबर चावा घेईल.” ब्राह्मणांना जे वाङ्मय आक्षेपार्ह वाटत होते त्यातले बरेचसे जवळकरांच्या लेखणीतून उतरलेले होते. ‘देशाचे दुष्मन’वरील खटला सुरू असतानाच जवळकरांनी आणखी चार पुस्तिका प्रसिद्ध केल्या व त्यामुळे त्यांना आणखी एका खटल्यात गोवण्यात आले.

‘मर्द हो, नाके कापून घ्या’ या पुस्तिकेत तात्यासाहेब केळकरांवर व त्यांच्या प्रतियोगी सहकाराच्या धोरणावर जवळकरांनी कडक टीका केली होती. ‘जाहीर सवाल’ नावाने काढलेल्या दोन पुस्तिकांत ‘शूद्रकमलाकर’सारख्या ग्रंथाच्या आधारे ब्राह्मणांचे प्रस्थ माजवण्याच्या प्रवृत्तीवर जवळकर तुटून पडले होते तर ‘१९५० सालची ब्राह्मण परिषद’ या पुस्तिकेत जवळकरांनी भावी काळात ब्राह्मणांच्या परिषदा भरून त्या कसले ठराव मंजूर करतील याचे काल्पनिक व काहीसे विनोदी वर्णन केले होते. असल्या पुस्तिका प्रसिद्ध करून जातीजातींत द्वेष माजवण्याच्या

आरोपाखाली जवळकरांना आणखी एका खटल्यात न्यायासनासमोर उभे करण्यात आले. 'देशाचे दुष्मन' वरील खटल्यात अपील केल्यावर बागडे, जेधे, जवळकर अखेर सुटले तरी अपिलाचा निकाल लागेपर्यंत जवळकरांना महिनाभर तुरुंगवास घडलाच. कारण बागडे व जेधे यांना जामिनावर सोडले तरी जवळकरांना मात्र जामीन नाकारण्यात आला होता. त्यानंतर महिनाभरात दुसऱ्या खटल्यात शिक्षा झाल्यामुळे जवळकर पुन्हा येरवड्याच्या तुरुंगातील परिचित बराकीत दाखल झाले. "अरेरे, मास्टरभाई फेर लौट आये" असे ओरडत बराकीतील कैद्यांनी आपले कसे हसत स्वागत केले याचे जवळकरांनी आपल्या कैफियतीत गमतीने वर्णन केले आहे.

तुरुंगाच्या कोठडीतही 'शिवाजी आमुचा राणा, मराठी आमुचा बाणा' हे पद खड्या सुरेल आवाजात म्हणणाऱ्या केशवराव जेध्यांचे हृद्य चित्र आपले तुरुंगातील अनुभव सांगताना जवळकरांनी काढले आहे. "त्यांच्या तुरुंगातही गाणे म्हणण्यापर्यंत प्रफुल्लित होणाऱ्या आनंदी वृत्तीला पाहून कौतुकासह आश्चर्यही वाटल्यावाचून राहिले नाही. आज ज्यांना परमेश्वराच्या कृपेने कसलीही ददात नाही, संतती, संपत्ती, कीर्ती, लोकप्रीती आणि गोकुळासारखे गजबजलेले घर सोडून ते सहा महिने तुरुंगवास पत्करण्यास तयार झाले तर माझ्यासारख्या गरीब माणसाला एक वर्ष म्हणजे सहज आहे या कल्पनेने मला अवसान चढत असे.... जेध्यांची पुण्याई हे ब्राह्मणेतर पक्षाचे भांडवल आहे... माझ्या स्वतःविषयी विचाराल तर मला मातापित्याने जन्म दिला, शाहूमहाराजांनी तत्त्व दिले आणि जेधेबंधूंनी चारित्र्य (Life) दिलेले आहे."

दुसऱ्या खटल्यात जवळकरांना प्रथम सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली असली तरी तीही अपिलात कमी झाली व दंड तेवढा कायम ठेवण्यात आला. त्यामुळे जवळकर १९२७ च्या जानेवारीतच बंधमुक्त झाले. निरनिराळ्या खटल्यांचे शुक्लकाष्ट मागे लागल्यामुळे जेधे-जवळकरांना बराच त्रास झाला व काही दिवस तुरुंगवास घडला तरी त्यामुळे बहुजनसमाजातली त्यांची लोकप्रियता वाढलीच. आपल्या कैफियतीत जवळकरांनी म्हटले आहे, "ब्राह्मणेतर चळवळीत तुरुंगात जाणारे आम्ही पहिलेच व आम्हावरही हा पहिलाच प्रसंग असल्यामुळे सर्व ब्राह्मणेतरांचे आमच्या खटल्याबरोबरच आमचे धैर्य कितपत टिकते याकडे लक्ष लागले होते.... सत्यशोधकांचे भाग्य म्हणूनच की काय ब्राह्मण पुढाऱ्यांना सरकारी कोर्टकचेऱ्या पाहण्याची आणि अधिकाऱ्यांकडे डेप्युटेशन नेण्याची बुद्धी सुचली आणि त्यामुळेच सत्यशोधकांचे दहा वर्षांचे कार्य एका वर्षात पार पडले."

जवळकर तुरुंगातून बाहेर आल्यानंतरच्या वर्ष-दीडवर्षाच्या काळात जेधे-जवळकरांनी डॉक्टर आंबेडकरांच्या चळवळीला पाठिंबा दिला तसेच लोकमान्य टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत यांच्याबरोबरही घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले. गायकवाडवाड्यातील गणपतीपुढे अस्पृश्यांचा मेळा नेण्याचा बेत श्रीधरपंत व त्यांचे बंधू रामभाऊ

टिळक यांनी केला. जवळकरांनी स्वतःच या घटनेची अपूर्वाई वार्णिली आहे. " जेधे यांचेकडे जाऊन पाहतो तो तेथे आमची वाट पाहात श्रीधरपंत बसलेले ! ' जेधे मॅन्शन-मध्ये जवळकरांची वाट पाहात टिळकांचा मुलगा बसला आहे ' असे वाक्य त्यापूर्वी जर कोणी उच्चारले असते तर त्याला लोकांनी वेड्यात काढले असते. परंतु या वेळी श्रीधरपंत -टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत- ब्राह्मणेतर तत्त्वावर सत्यशोधक चळवळीवर प्रेम करणारे बनले होते. अस्पृश्य मेळा वाड्यात नेण्याचा त्यांनी आपला मनोदय व्यक्त केला त्याच वेळी जेध्यांच्या मारुतीच्या देवळातही तोच मेळा आम्ही आत घेऊ असे श्री. जेधे यांनी कबूल केले. " श्रीधरपंतांचे विचार झपाट्याने पालटत होते. महात्मा फुल्यांची जन्मशताब्दी १९२७ साली साजरी झाली तेव्हा मुंबईस झालेल्या सभांमध्ये श्रीधरपंत टिळकांनी फुल्यांच्या स्मृतीस अभिवादन करणारी भाषणे केली. त्याच वर्षी २५ डिसेंबरला महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह सुरू करण्याची बाबासाहेब आंबेडकरांनी घोषणा दिली होती. या सत्याग्रहास सर्व ब्राह्मणेतरांनी पाठिंबा द्यावा असे पत्रक काढूनच जेधे-जवळकर स्वस्थ बसले नाहीत तर सत्याग्रह करून तुरुंगात जाण्याच्या तयारीने दोघेही महाडला गेले होते. डॉ. आंबेडकरांनी काढलेल्या समाज-समता-संघासही दोघांचा पाठिंबा होता. श्रीधरपंत टिळकांनी तर समाज-समता-संघाची शाखा गायकवाडवाड्यातच स्थापन केली व वाड्यात सहभोजन घडवून आणले. एका नव्या वाटेने चाललेल्या श्रीधरपंतांनी २५ मे १९२८ रोजी आत्महत्या केली तेव्हा जेधे, जवळकर, डॉ. आंबेडकर वगैरे त्यांनी जोडलेले नवे मित्र फार हळहळले.

दुर्दैवाने याच सुमारास जेधे-जवळकरांची युती संपून दुफळीला सुरुवात झाली होती. १९२८ च्या फेब्रुवारीत जवळकरांच्या संपादकत्वाखाली मुंबईत ' कैवारी ' पत्र निघू लागले. ' कैवारी 'च्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष भास्करराव जाधव होते, उपाध्यक्ष बाबूराव जेधे. इतर सल्लागारांत केशवराव जेधेही होते. जवळकर मुंबईस आल्यानंतर व ब्राह्मणेतर पक्षाचे सरचिटणीस झाल्यानंतर ते हळूहळू भास्करराव जाधवांच्या तंत्राने चालू लागले. सायमन कमिशनवर बहिष्कार घालू नये असे जाधव-जवळकरांचे मत होते, तर विठ्ठल रामजी शिंदे, बागडे, भाऊराव पाटील, केशवराव जेधे वगैरेंना सायमन कमिशनशी सहकार्य करण्याचे धोरण नापसंत होते. जाधव व जवळकर यांनी कल्याणला ब्राह्मणेतर पक्षाची खास सभा भरवून आपल्याला अनुकूल असे ठराव मंजूर करून घेतले. याच वेळी जमीन तुकड्यांचे एकीकरण व सारावाढ करण्यासाठी इंग्रज राज्यकर्त्यांनी दोन विधेयके मांडली होती. ही विधेयके शेतकऱ्यांच्या हितास विघातक आहेत म्हणून चाललेल्या सर्वपक्षीय चळवळीत केशवराव जेध्यांनी हिरीरीने भाग घेतला. पाच हजार शेतकरी मिरवणुकीने कौन्सिल हॉलकडे गेले तेव्हा त्यांचे नेतृत्व करणाऱ्यांत तात्यासाहेब केळकर, शिवरामपंत परांजपे यांच्याबरोबर विठ्ठल रामजी शिंदे, जेधेबंधू आणि जवळकरही होते. पण या काळात जवळकर इंग्रज सरकारला विरोध करण्यापेक्षा सरकारशी सहकार्य करण्या-

वरच अधिक भर देत होते. १९२८ च्या ऑक्टोबरात बाबूराव जेध्यांनी ‘ कैवारी ’ पत्राच्या सल्लागार मंडळाचा राजीनामा दिला आणि जवळकर व जेधेबंधू यांच्यामधील दुफळी जगजाहीर झाली.

जेधे व जवळकर एकमेकांवर १९२९ साली उघडउघड आरोप-प्रत्यारोप करू लागले. या वर्षी जवळकरांनी डांगे, निमकर, जोगळेकर, पेंडसे व घाटे या पाच कम्युनिस्ट पुढाऱ्यांवर झोड उठवली आणि आळवे व कासले या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची भलावण करून मुंबईतल्या कामगारांनी भट नेत्यांपासून सावध राहावे असे सांगितले. पुढे विठ्ठल रामजी शिंदे यांच्याविरुद्ध ‘ कैवारी ’ने असाच विपर्यस्त मजकूर प्रसिद्ध करताच केशवराव जेध्यांनी ८ ऑक्टोबर १९२९ च्या ‘ केसरी ’च्या अंकात पत्र प्रसिद्ध करून जवळकरांचा समाचार घेतला. “ ‘कैवारी’ने गिरणी कामगारांचा लटका कैवार घेऊन त्यांच्या चळवळीचे कसे तीन तेरा वाजविले हे जगजाहीर झाले आहे. एके काळी ‘ कैवारी ’ पत्र आम्हीच आमचे समजत होतो, पण तो आमचा भ्रम गेल्या नऊ महिन्यांपासून पार गेला. ‘कैवारी’ पत्रात नेहमी मोहीम सुरू होते तिच्या मुळाशी कावेबाजपणा असतो असे ठाम समजावे. ”

जेधे-जवळकर या दोघांनाही ओळखणाऱ्या दिनकरराव मान्यांच्या म्हणण्याप्रमाणे जेधे-जवळकरांची “ दोस्ती फार काळ टिकली नाही. जवळकरांचा द्वितीय विवाह, ना. जाधवरावांचे मंत्रिपद आणि मग जवळकरांचा परदेशप्रवास अशा तीन तुकड्यांत ही मैत्री सलग राहिली नाही. ” जवळकरांचे दारूचे व्यसन मुंबईस आल्यावर फार वाढले असावे. हातात बराच पैसाही खेळू लागला असावा. त्यामुळे चैन करण्याची, छानछोकीने राहण्याची त्यांची मूळ प्रवृत्तीही पुन्हा बळावली असावी. जवळकरांनी १९२९ साली दोनदा विलायतची वारी केली. भास्करराव जाधवांचा वरदहस्त असल्यामुळेच जवळकरांना विलायतयात्रा घडली होती. मार्च १९२९ मध्ये ते पहिल्यांदा विलायतेस गेले तेव्हा फारच थोडे दिवस तेथे राहून लगेच का परतले हे गूढच आहे. मात्र इंग्लंडहून परतल्यावर ब्राह्मणेतर पक्षाचे नाव बदलून ‘ शेतकरी पक्ष ’ असे नाव देण्याची सूचना करून जवळकरांनी एक नवीन वाद सुरू केला. या वादावर पडदा पडतो न पडतो तोच राजकीय सुधारणांच्या बाबतीत ब्राह्मणेतर पक्षाची बाजू मांडण्यासाठी जवळकर व के. एस. गुप्ते वकील या दोघांचे शिष्टमंडळ इंग्लंडला पाठवावे या भास्करराव जाधवांच्या निर्णयावरून धूमश्चक्री सुरू झाली.

या वेळच्या लढतीत केशवराव जेधे जवळकरांविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले. दोघांमधली तेढ इतकी विकोपाला गेली की, ‘देशाचे दुष्मन’ पुस्तकाची जवळकरांनी दुसरी आवृत्ती काढू नये म्हणून केशवरावांनी त्यांना जाहीररीत्या कायदेशीर नोटीस दिली. एकीकडे पर्वतीच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून होणाऱ्या सत्याग्रह मोहिमेत केशवराव जसे हिरीरीने उतरले होते तसेच ते जाधव व जवळकर यांच्याविरुद्धही झुंज घेत होते. “ रा. जवळकर यांना पक्षातर्फे पाठवणे म्हणजे

आपल्या पक्षाची नालायकी सिद्ध करण्यासारखेच आहे. जेथे सप्रू, नेहरूंसारखे हिंदुस्थानचे पुढारी जाणार आहेत तेथे त्यांच्या तोडीचा, इंग्रजीचे चांगले ज्ञान असणाऱ्या इसमास पाठविला पाहिजे; नाहीतर, ब्राह्मणेतर पक्षाची छीः थू आणि हसे होईल" असे केशवरावांनी जाधवांना लिहिलेल्या अनावृत पत्रात फटकळपणाने बजावले होते. ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकारी मंडळात यामुळे निर्माण झालेला प्रक्षोभ लक्षात घेऊन भास्करराव जाधवांनी खुलासा केला. "रा. गुप्ते व जवळकर हे आपल्या स्वतःच्या कामाकरिता विलायतेस जात आहेत." तेव्हा शंभरावर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी जेधे मॅन्शनमध्ये सभा घेऊन जवळकर व गुप्ते हे पक्षातर्फे विलायतेस कोणतीही चळवळ करण्यास पूर्ण नालायक आहेत असा ठराव मंजूर केला. केशवरावांनी भास्करराव जाधवांना जाहीर सवाल करताना म्हटले, "रा. जवळकरांची स्थिती आमच्या डोळ्यांसमोर आहे. थोड्या दिवसांपूर्वी मुंबईला जाण्यासाठी त्यांना आम्हांस टांगा व गाडीभाड्याकरता पैसे द्यावे लागत होते! त्याच जवळकरांना इंग्लंडच्या वाऱ्या करण्याइतका पैसा कोठून आला याचा नामदारांनी स्पष्ट खुलासा करावा... या दुकलीचे इंग्लंडमध्ये कोणते काम आहे व त्यांना हजारो रुपयांचा तनखा झऱ्यातील पाण्याप्रमाणे कोठून मिळतो हे आपणास पूर्णपणे माहीत असले पाहिजे." काही पारशी दारू मक्तेदारांबरोबरच्या 'मदिरायण' संबंधामुळे व गिरणीमालकांची मेहेरनजर असल्यामुळे जवळकरांच्या हातात 'हजारो रुपयांच्या रकमा नाचतात' असे बडोद्याच्या जागृतिकरांनी स्पष्टच लिहिले होते.

या दुसऱ्या विलायत-वारीमुळे एवढे वादळ उठले असतानाच जवळकर विलायतेस जाऊन आले. मात्र विलायतेहून परतल्यानंतर त्यांनी जाहीर केले, "सरकारशी सहकार करणाऱ्या कार्यक्रमाचे मोहपटल माझ्या डोळ्यांवरून तरी साफ दूर झाले आहे." स्वदेशी, ब्रिटिश मालाचा बहिष्कार, खादीप्रसार वगैरे कार्यक्रमांपैकी आपल्याला रुचेल तो कार्यक्रम आपण नेटाने चालविला पाहिजे असा त्यांनी सल्ला दिला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने चालवलेल्या स्वातंत्र्य-आंदोलनाकडे जवळकर ओढले जाऊ लागले. त्याआधी केशवराव जेध्यांनी कायदेभंगाकरिता फुले-पथक उभारण्याची जाहिरात 'ज्ञानप्रकाश'च्या ५ एप्रिल १९३० च्या अंकात दिली होती. ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकारी मंडळात केशवराव एकाकी पडत चालले होते. मात्र केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर दोघेही स्वातंत्र्यचळवळीकडे ओढले जात असले तरी दोघांमधली तेढ कायम होती. जवळकरांचे वर्तन पक्षाच्या शिस्तीस सोडून आहे या कारणाने त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्याचा ठराव १९३० च्या सप्टेंबरच्या अखेरीस चर्चेला आला तेव्हा जवळकरांना पाठीशी घालू पाहणाऱ्या भास्करराव जाधवांना भर सभेत केशवरावांनी सरळसरळ खडसावले. पण केशवरावांचे मन आता ब्राह्मणेतर पक्षात नव्हते. ते गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीत रमू लागले. १८ नोव्हेंबर १९३० ला केशवरावांना सरकारने अटक केली व त्यांना तीन महिने

सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. जवळकरही फार दिवस बाहेर राहिले नाहीत. १६ जानेवारी १९३१ ला सोलापूरच्या हुतात्म्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्याकरता मुंबईत कडकडीत हरताळ पडला. लाठीहल्ला, गोळीबार झाला. या दिवशी आझाद मैदानावर झालेल्या सत्याग्रहाचे नेतृत्व जवळकरांनी केले आणि जवळकरांना सव्वा वर्ष सक्तमजुरीची शिक्षा दिली गेली.

गांधी-अर्विन समेटामुळे जवळकर लवकर सुटले आणि ९ मे १९३१ पासून त्यांनी मुंबईत 'तेज' हे नवे साप्ताहिक सुरू केले. जेधे-जवळकरांचा परस्परांत स्नेह राहिला नव्हता तरी दोघेही तुरुंगातून सुटल्यावर काँग्रेसच्या चळवळीशी समरस होऊ पाहात होते. मात्र जवळकरांची आधीच तोळामासा असलेली प्रकृती आता रक्तक्षयामुळे पार खालावली होती. आजारपणातच 'क्रांतीचे रणशिंग' या त्यांच्या अखेरच्या पुस्तकातील मजकूर ते सांगत असत. या पुस्तकात त्यांनी समाजसत्तावादी विचारसरणीचा पुरस्कार केला होता. मात्र हे पुस्तक पुरे व्हायच्या आधीच ते नाशिकच्या काळाराम मंदिर-प्रवेशाबाबत डॉ. आंबेडकरांनी चालवलेल्या सत्याग्रहात सहकुटुंब उतरले. नाशिकलाही ते आजारी अवस्थेतच गेले होते. १९३२ सालच्या आरंभी पुन्हा जेव्हा काँग्रेसची मोहीम सुरू झाली तेव्हा केशवराव जेधे पुन्हा पकडले गेले आणि त्यांना १ जुलै १९३२ पर्यंत तुरुंगवास भोगावा लागला. केशवराव तुरुंगात असतानाच ३ मे १९३२ ला जवळकर वयाच्या अवघ्या चौतिसाव्या वर्षी कालवश झाले.

जवळकरांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना ज्ञानप्रकाशकारांनी म्हटले होते, "जी गोष्ट कै. वा. जोतिबा फुले यांना घडवून आणता आली नाही, जी घडवून आणण्यासाठी श्रीशाहू छत्रपतींची सत्ता व संपत्ती अपुरी पडली, जी साध्य करण्यासाठी लठ्ठे जाधवरावांचे पुढारीपणही कमकुवत ठरले ती ब्राह्मणेतर शेतकरी वर्गाची– बहुजन-समाजाची– जागृती श्री. दिनकररावांनी आपल्या वक्तृत्वाने, जिवापाड मेहनतीने व कमालीच्या युक्त्याप्रयुक्त्यांनी अगदी अल्पकाळात घडवून आणली." या जागरूक बहुजनसमाजातील फार मोठा गट. काँग्रेसच्या चळवळीत आणून महाराष्ट्रातील तत्कालीन काँग्रेसला खेड्यापाड्यांत विखुरलेल्या गरीब जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षाचे रूप देण्यात केशवराव जेधे यांच्याबरोबरच दिनकरराव जवळकरांचाही हातभार लागला आहे.

महाराष्ट्र टाइम्स
दिवाळी अंक १९७८

०००००००००००००००००००००००००

# ७

# डॉ. केतकरांची विचारसृष्टी

०००००००००००००००००००००००००

ज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीला असलेल्या कोणत्याही प्रगत आधुनिक देशात नव्या दिशा धुंडाळण्याचे धाडस करणाऱ्यांना विकसनशील देशातील अभ्यासकांच्या तुलनेने फार कमी समस्यांना तोंड द्यावे लागते. विकसित देशातील संशोधकांना साधन-सामग्रीचा तुटवडा सहसा जाणवत नाही. त्यांना संशोधनासाठी अधिक पैसा मिळू शकतो व त्यांना अधिक संधी उपलब्ध करून दिल्या जातात. त्यांना प्रसिद्धीच्या साधनांची वाण भासत नाही. विकसित समाजात ज्ञानसाधनेस उपकारक ठरतील अशा संस्थांचे जाळे आधीच विणलेले असते. विविध विषयांतील उपलब्ध ज्ञानाची संगतवार मांडणी करणारे नाना प्रकारचे कोश तयार होत असतात. मूलग्राही संशोधनाला आवश्यक ती ऐतिहासिक साधने, आकडेवारी किंवा अन्य माहिती गोळा करून प्रकाशित करण्याचे जिकिरीचे काम पद्धतशीरपणे केले जात असते. पहिल्या दर्जाच्या स्वतंत्र संशोधकास पूरक, आपल्या परीने उपयुक्त पण दुय्यम प्रतीचे संशोधनही अखंड चालू असते.

याउलट विकसनशील देशांत मूलगामी संशोधन करण्याची धमक असलेल्या अग्रगण्य ज्ञानवंतालाही अनेकदा साधनांचा संग्रह करण्यात, त्यांची व्यवस्थित मांडणी करण्यात किंवा मुख्यतः संकलनात्मक ग्रंथनिर्मिती करण्यात आपली प्रतिभा खर्ची घालावी लागते. विकसनशील देशांतील परिस्थितीच्या संदर्भात हे सारे अटळ असते. ते कमी मोलाचे असते असेही म्हणता येत नाही. मात्र एरवी त्याच्या हातून ज्ञानाच्या क्षेत्रात जेवढी भर घातली गेली असती तेवढी घातली जात नाही. एवढेच नव्हे तर आपल्या प्रतिभेला साजेसे काम करण्याऐवजी व नवनवीन बौद्धिक आव्हाने स्वीकारण्या-ऐवजी तो या सापेक्षतः कमी महत्त्वाच्या कार्यात गुंतून जातो आणि त्याची वाढ खुरटते.

ज्ञानकोशकार डॉक्टर श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे ग्रंथ आज कोणी काळजीपूर्वक वाचले तर त्यालाही, महाराष्ट्रीय ज्ञानकोशासारख्या मूलतः संकलनात्मक स्वरूपाच्या प्रचंड ग्रंथाच्या निर्मितीत केतकरांनी ऐन उमेदीची वर्षे घालवल्यामुळे त्यांचेही असेच झाले की काय, असे वाटल्याशिवाय राहणार नाही. ज्या जबरदस्त आत्मविश्वासाने, जिद्दीने, धडाडीने, कल्पकतेने, एकाग्रतेने व वेगाने केतकरांनी हा अभूतपूर्व उपक्रम हाती घेऊन तडीस नेला, त्याने त्यांचे जाणते समकालीन दिपून जाणे स्वाभाविक होते. आजच्या पिढीला तर केतकरांचा हा कामाचा झपाटा व अवाढव्य कर्जाचा बोजा उचलून ज्ञानकोशाचे तेवीस खंड खपवण्याचा उद्योग अद्भुत कथेसारखाच वाटतो. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व प्रकारची साधने दिली गेली असतानाही अनेक कोशांची कामे पुरी झालेली नाहीत. राजसत्तेचा वरदहस्त असताना, डझनावारी संशोधन सहायकांचा, अभ्यागत संशोधकांचा आणि प्रभारी संपादकांचा लवाजमा दिमतीला असताना, आणि लाखो रुपयांचा चुराडा करूनही, मी मी म्हणणारे प्रकांडपंडित नाना सबबी सांगून कोशाचे काम रेंगाळण्याचे समर्थन करताना दिसतात. खरे म्हणजे ज्ञानकोशासारखी कामे तहहयात चालवायची असतात ! पण पारतंत्र्याच्या प्रतिकूल परिस्थितीतही, राजाश्रयाची अपेक्षा न धरता केतकरांनी आर्थिक विवंचना, उपासमार सहन करीत आणि मधुमेहाने पोखरलेल्या शरीराची काळजी न करता हा साहसी उद्योग ज्या निर्धाराने अवघ्या बारा वर्षांच्या अवधीत पुरा केला त्याला खरोखरच तोड नाही. वामनराव आपटे, रघुनाथशास्त्री गोडबोले, गीर्वाणलघुकोशकार ओक व निळोपंत रानडे आणि महाभारताचे भाषांतर प्रसिद्ध करणारे बाळशास्त्री ठकार, या आधीच्या पिढीतील विद्वानांचे स्मरण करून स्वतः केतकरांनी त्यांना न शोभणाऱ्या विनयाने, आपली कामगिरी अपूर्व नाही असे म्हटले आहे हे खरे ! पण केतकरांच्या या पूर्वसूरींनी हाती घेतलेले काम जिकिरीचे व जबाबदारीचे असले तरी ते वादविषय होण्यासारखे नव्हते. आधीच, आपली मते लोकांना धक्के बसतील अशा प्रक्षोभक पद्धतीने मांडण्यात मौज मानणारे, असा केतकरांचा लौकिक ! तशात ज्ञानकोशात लोकभावना प्रक्षुब्ध होतील असे कितीतरी नाजूक विषय हाताळलेले ! त्यामुळे दुखावलेल्या व चवताळलेल्या गटांचा रोष ओढवून घेण्याचा धोकाही होताच. पण त्याची फारशी फिकीर न करता केतकरांनी आपले काम पुरे केले. या घटनेची अपूर्वता, त्यांची मते मुळीच मान्य नसणाऱ्या मंडळींनीही मोकळेपणाने मान्य करावयास हरकत नाही.

हे सारे श्रेय केतकरांना देऊनही सारखे जाणवत राहते की, त्यांच्यासारखा प्रतिभाशाली समाजशास्त्रज्ञ ज्ञानकोशासारख्या मूलतः संकलनपर ग्रंथाच्या निर्मितीत इतका गुंतला नसता तर बरे झाले असते. नाहीतर समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी प्रत्यक्षतः जेवढी मजल मारली त्यापेक्षा कितीतरी मोठा पल्ला त्यांना गाठता आला असता. या अर्थाने महाराष्ट्राला ज्ञानकोशकार मिळाला, तरी भारताने मात्र एक

थोर समाजशास्त्रज्ञ गमावला असे म्हणावे लागते. आरंभीच्या काळात त्यांनी इंग्रजीत जे समाजशास्त्रविषयक लेखन केले त्यामुळे या क्षेत्रातील देशोदेशींच्या अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले होते. पण ज्ञानकोशाचे काम हाती घेतल्यानंतर ते आयुष्याच्या अखेर-पर्यंत, राजकीय विषयासंबंधीचे प्रासंगिक लेखन वगळता, केतकरांनी इंग्रजीत फारसे काही लिहिलेच नाही. त्यामुळे आपल्या आवडीच्या अभ्यासक्षेत्रातील मंडळीबरो-बरचा त्यांचा संवाद संपुष्टात आला, विचारांची देवघेव थांबली. आपल्या मतप्रति-पादनावर होणाऱ्या टीकेच्या प्रकाशात आपली मते पारखून पाहण्याऐवजी त्यांचा स्वमताभिमान दृढ होत गेला. परकीय टीकाकारांनी केलेली प्रशंसा आपल्या संशो-धनाविषयीच्या ज्ञानाच्या अल्पतेवर आधारलेली आहे असे त्यांना आधीच वाटत होते आणि समकालीन महाराष्ट्रात त्याची पारख करण्याची कुवत असलेले लोकच नाहीत अशी त्यांची खात्री होती. त्यामुळे टीकेस उत्तर देण्याचे प्रसंगही फारसे येईनासे झाले : “ १९१४ सालचे अंतापासून माझे इंग्रजीतील लिहिणे बंद झाले आणि तेव्हापासून शिष्टवर्गीय टीकाकारांशी माझा संबंध सुटला आणि माझ्या लेखांचे व ग्रंथांचे परीक्षण नुकत्याच शाळेतून सुटलेल्या पोरापासून ते फार तर ज्यास बऱ्या प्रकारचे सुशिक्षित असे म्हणता येईल एवढ्याच वर्गाकडून होऊ लागले. अर्थात या वर्गामध्ये उत्तर देण्यालायक लोकही थोडेच असत. ” १

तसे पाहिले तर केतकरांचे हे म्हणणेही तितकेसे बरोबर नव्हते. १९१४ नंतर त्यांनी मराठीत — विशेषतः ज्ञानकोशात — केलेल्या लेखनातील काही विधानांबाबत आक्षेप घेणाऱ्या टीकाकारांत डॉ. धनंजयराव गाडगीळ, नानासाहेब पावगी, अप्रबुद्ध, चिं. वि. जोशी, द. के. केळकर, मा. के. काटदरे, श्री. म. वर्दे अशा नामवंत अभ्यासकांचा समावेश होता. प्राचीन महाराष्ट्रासंबंधीच्या त्यांच्या संशोधनाचे प्रा. अ. स. अळतेकरांसारख्या तज्ज्ञाने वाभाडे काढले. वा. वि. मिराशींनी विदर्भ व कालिदास यासंबंधीच्या केतकरांच्या मतप्रतिपादनाला हरकत घेऊन त्यांच्याशी जाहीर वाद घातला. केतकरांनी या टीकेतील ग्राह्याग्राह्यता लक्षात घेऊन आपल्या भूमिकेचा फेरविचार करण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. ‘ जितं मया ’ या वृत्तीनेच ते लहानांपासून थोरापर्यंत सर्व प्रतिस्पर्ध्यांशी वाद खेळत असावेत असा ग्रह होतो. ‘ जातिभेद व त्यासंबंधाचे राष्ट्रीय धोरण ’ या विषयावरील त्यांची एक लेखमाला १९१३ साली ‘ केसरी ’त प्रसिद्ध झाली. त्यातील एका लेखात केतकरांनी गौतम बुद्धावर हल्ला चढवला. त्यामुळे रागावून धर्मानंद कोसंबींसारख्या जाणकाराने त्यांच्या विधानांना हरकत घेतली. या सवालजबाबांच्या अखेरीस वादाचा समारोप करताना केतकरांनी जे दोन शब्द लिहिले ते लक्षात घेण्यासारखे आहेत : “ हा बुद्धा-वरील वादविवाद अपूर्ण राहिला असे वाचकांस वाटणारच. माझी सर्व प्रमाणे मी दिली नाहीत, कारण मला सध्या या वादात जास्त पडण्याचे कारण नाही. बुद्धि-मत्तेने, प्रामाणिकपणाने व निर्भीडपणे वादविवाद करणारा एकच प्रतिस्पर्धी जरी

महाराष्ट्रात असता तरी तेवढ्यासाठी मराठीत एक सविस्तर लेख लिहिण्यास मला हरकत वाटली नसती. या प्रकारचा प्रतिस्पर्धी मिळाला तरी वादविवाद करिताना ऐतिहासिक वाचकवर्ग देखील बराच प्रगत लागतो, आणि दोन्ही पक्षांच्या चुकांचे लक्षपूर्वक अवलोकन करून त्यावर स्वतंत्रपणे शेरा लिहितील अशी दोनचार माणसे तरी त्या वाचकवर्गात हवी असतात. प्रस्तुतचा उलट लेख लिहिणाऱ्या मनुष्याच्या अंगी योग्य प्रतिस्पर्ध्याचे गुण नाहीत व महाराष्ट्रीय वाचकांमध्ये स्वतंत्र व तज्ज्ञ माणसे नाहीत व असली तरी गप्प बसली आहेत असे दिसते. ”[२]

प्रा. गोविंद चिमणाजी भाटे यांनी केतकरांच्या जातिसंस्थेवरील प्रबंधाची दखल घेऊन टीका करताच केतकरांनी ठणकावून सांगितले : “ प्रो. भाटे यांचे ऐतिहासिक संशोधनाच्या तत्त्वासंबंधी व काही इतिहाससिद्ध गोष्टींसंबंधाने पूर्णपणे अज्ञान प्रत्येक पृष्ठाच्या प्रत्येक ओळीत दिसून येते...जातिभेदाची जी उपपत्ती रा. भाटे यांनी दिली तिला मुळीच किंमत नाही. रा. भाटे यांनी माझे पुस्तक काळजीपूर्वक वाचले नाही किंवा वाचले असल्यास त्यांस समजले नाही...प्रो. भाटे यांना जातिभेदासंबंधाने जे काय संशोधन झाले आहे त्याचे अवाक्षरही माहीत नसावे असे दिसते...ऐतिहासिक संशोधन म्हणजे काय हे देखील रा. भाटे यांस समजत नाही...रा. भाटे यांनी ऐतिहासिक संशोधन करण्यास शिकावे...”[३] हे ताशेरे उडवताना केतकरांनी उदाहरणे किंवा प्रमाणे दिली असली तरी प्रतिपक्षाबद्दलची त्यांची वृत्ती कशी होती हे त्यावरून समजण्यास हरकत नाही. धर्मानंद कोसंबी किंवा गो. चि. भाटे यांच्यासारख्या वडिलधाऱ्यांची ही स्थिती तर मग मिराशींसारख्या, केतकरांहून वयाने लहान असलेल्या, तरुण संशोधकाच्या टीकेची त्यांनी वासलात कशी लावली असेल याची कल्पना केलेली बरी ! “ मूळ काळजीपूर्वक न वाचता किंवा मुळाची फिरवाफिरव करून टीकाकाराने ( म्हणजे वा. वि. मिराशींनी ) लेख लिहिला आहे व मुख्य मुद्दा कबूलच केला आहे ” असे म्हणून केतकरांनी वादाचा निकाल जाहीर केला.[४] आपणांस तुल्यबल असा प्रतिपक्षी नाही हे त्यांचे मत जवळजवळ आरंभीपासून अखेरपर्यंत कायम असावे असा ग्रह होतो.

ज्ञानकोशाचे काम हाती घेतल्यावर आधीचे बहुतेक सर्व संशोधनाचे संकल्प सिद्धीला गेले नाहीत. “ मला चारही वेद काळजीपूर्वक वाचावयाचे होते व त्यावर संशोधन करावयाचे होते. ते करण्याची संधी मला ज्ञानकोशाने दिली. ”[५] असे केतकरांनी म्हटले आहे हे खरे, पण त्याबरोबरच त्यांनी स्वतःच दिलेली आणखी एक कबुलीही लक्षात घ्यावयास हवी : “ ज्ञानकोश चालू असता जी बारा वर्षे खर्च झाली, त्यांपैकी फक्त तीनच वर्षे मजकडून संशोधनाचे काम झाले. उरलेला वेळ सामान्य लेख लिहिणे, इतरांचे लेख तपासणे व त्यास योग्य पुरवण्या जोडणे, ज्ञानकोशासाठी पैसा उभा करणे, मुद्रणाकडे लक्ष ठेवणे इत्यादी क्रियांमध्ये बहुतेक वेळ गेला व त्याच वेळापैकी निम्मा वेळ जवळजवळ गिऱ्हाइकी मिळविण्यात गेला.

इतिहाससंशोधनाचे काम असे असते की, ते काम करताना पूर्ण लक्ष तिकडे द्यावे लागते आणि त्यामुळे इतर कार्यास वेळ मिळत नाही."[६] तीन ते चार हजार वर्षांचा कालखंड व्यापणाऱ्या जातिसंस्थेचा पद्धतशीर इतिहास लिहिण्याची त्यांनी उमेद बाळगली होती. त्यासाठी विविध विषयांवरील स्वतंत्र पुस्तके लिहिण्याचा विचारही त्यांनी बोलून दाखवला होता. ब्राह्मणवर्गाचा उदय, चार वर्णांचा उदय व विकास, गौतम बुद्ध व जातिसंस्था, बृहत्तर भारतात झालेला हिंदू कायद्याचा प्रसार, आर्थिक बदलामुळे धर्माच्या इतिहासात घडून येणारे परिवर्तन वगैरे अनेक विषयांवर विस्ताराने लिहिण्याचा त्यांचा बेत होता, असे आरंभीच्या त्यांच्या ग्रंथांवरून दिसून येते. ज्ञानकोशाची प्रस्तावना लिहिताना यांपैकी काही विषयांवर त्यांनी लिहिले असले तरी या अभ्यासविषयांना त्यांनी पुरेसा न्याय दिला असे वाटत नाही. अखेरच्या वर्षांत तर वैचारिक क्षेत्रात आपण मिळवलेल्या यशाबद्दल केतकरांना वाटणारा आत्मसंतोष अधिकच वाढला होता असा समज होतो.

ज्ञानकोशाचे बारा वर्षांचे काम पुरे झाल्यानंतर केतकरांनी लिहिले : "आज जरी माझे संशोधनफल जगप्रसिद्ध झाले नाही तरी ते उद्या होईल आणि वेदाच्या अत्यंत मोठ्या अभ्यासकांत माझे नाव केव्हा तरी होईल ही माझी खात्री आहे. मी असे म्हणू शकतो की, ज्ञानकोशमंडळात नवीन वैदिकसंशोधन प्रसिद्ध झाले आहे ते जगातील अत्यंत मोठ्या, वेदाच्या अभ्यासकांच्या सबंध आयुष्यातील कामाइतके मोठे ठरेल आणि याचे कारण दहाबारा माणसे हाताशी घेऊन वेदाभ्यास करण्याची संधी मला मिळाली हे होय...मला समकालीनांनी जरी योग्य अभिज्ञता दाखविली नसली तरी त्याबद्दलदेखील खंत मुळीच नाही. मला असे वाटते की, मी जे काय लिहिले आहे त्याची उत्तम प्रकारे जाणीव होण्याइतका ज्ञानविकास भोवतालच्या जनतेत नाही त्यामुळे लोकांच्या स्तुतिनिंदेचीही मला फारशी फिकीर वाटत नाही. जो पुढे वेदाभ्यास वर्ग निघेल तो माझे कर्तृत्व ओळखील ही माझी खात्री आहे. तसेच ज्ञानकोशामध्ये जे समाजशास्त्र घातले आहे ते जगातील प्रचलित समाजशास्त्रज्ञांच्यापेक्षा काही बाबतींत वरच्या दर्जाचे आहे हाही मला आत्मविश्वास आहे. तथापि त्याची पारखदेखील समकालीन महाराष्ट्राकडून होणे शक्य नाही. जे मी लिहिले आहे ते इंग्रजीत लिहिले असते तर त्याचे महत्त्व लोकांस पटले असते...या सर्व गोष्टी केल्या त्या अर्थात कीर्तीच्या आशेने केल्या नाहीत...सध्याच्या पिढीत जो समाजशास्त्रज्ञ वर्ग आहे तो मला फारच अल्प कर्तृत्वाचा वाटतो व त्यामुळे त्यांच्या प्रशंसेची लालसा माझ्या कार्यक्रमात बंध उत्पन्न करू शकत नाही."[७]

मुळात बेताचा मगदूर असताना केतकर उगाच लंब्याचौड्या बढाया मारीत होते असा याचा अर्थ नाही. समकालीनांना कदाचित हे उद्दाम अहंकाराचे प्रदर्शन वाटेल याची पर्वा न करता, ते भावी पिढ्यांना आपल्याला कोणते श्रेय द्यावे लागेल हे आधीच बजावून सांगत होते. त्यांचा हा दावा सर्वथैव गैरवाजवी होता असे म्हणता

येत नाही. त्यात स्वतःच्या कर्तृत्वाविषयीचा जबर आत्मविश्वास व्यक्त होताच, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा होता तो त्यांचा दुर्दम्य आशावाद! आपल्या संशोधनकार्याची म्हणावी तशी बूज राखली जात नाही या भावनेने पछाडलेले अनेक संशोधक निराशेने कडवट बोलू लागतात. एखाद्या ज्ञानक्षेत्रात नव्या पाउलवाटेने आपण प्रथम गेलो असताना अन्य कोणी त्या श्रेयाचे धनी होत असलेला दिसला की मग या कडवट प्रतिक्रियेला आणखीच धार चढते. आपल्या विषयात काम करीत असलेल्या पण आपल्यापेक्षा लौकिक यश अधिक मिळवणाऱ्या इतरांची कुचाळकी करणे, प्रच्छन्न निंदा करणे या उद्योगात असले लोक मग गढून जातात. केतकरांचे असे काही झाले नाही. परनिंदा करून आपले महत्त्व किंवा वेगळेपण आडवळणाने प्रस्थापित करता येत असले तरी परनिंदेपेक्षा सरळसरळ आत्मश्लाघा बरी असते. ती कंटाळवाणी असली तरी इतरांना त्यामुळे इजा पोहोचत नाही. केतकरांच्या आत्मश्लाघेला हसणाऱ्या लोकांनी हे लक्षात ठेवावयास हवे.

खरे म्हणजे कोणास आत्मश्लाघा वाटणाऱ्या या उद्‌गारांतील कमालीचा आत्मविश्वास व अदम्य आशावाद यामुळे संकटाशी झगडण्यास केतकरांना बळ मिळाले असावे. ज्ञानकोश पुरा झाल्यानंतरची अखेरची दहा वर्षे केतकरांच्या आयुष्यातील कसोटीची वर्षे होती. सावकारांचे तगादे, हजारो रुपयांच्या कर्जफेडीची एकट्याने उचलावी लागणारी जबाबदारी, मतभेदामुळे एकामागून एक दुरावत चाललेले सहकारी, पैशाच्या अभावी स्थगित करावे लागलेले वर्तमानपत्राचे व मासिकाचे प्रकाशन, गांधीजींच्या विरोधामुळे थबकलेली गुजराती ज्ञानकोशाची प्रसिद्धी, भरीला कौटुंबिक अडचणी यांच्या चक्रात केतकर जे एकदा सापडले ते आयुष्याच्या अखेरीपर्यंत! अशा अवस्थेत दुसरा एखादा लेचापेचा माणूस केव्हाच कोसळला असता! केतकरांची मनःस्थिती कोणाही सहृदय माणसाला समजण्यासारखी असली तरी एका तऱ्हेने ती करुणास्पदही होती. मात्र या सगळ्या अडचणींनी खचून न जाता ते नवनवीन संशोधनांचे संकल्प कथन करीत होतेच.

ज्ञानकोश छापण्यासाठी घेतलेल्या कर्जाची जिम्मेदारी आपण घेतली असल्याचे वाचकांना 'विद्यासेवका'मार्फत कळवीत असतानाच त्यांनी प्राचीन महाराष्ट्राच्या संकल्पित इतिहासाची जाहिरातही त्याच अंकात फडकवली: "प्रस्तुत प्रसंगी मी असे योजिले आहे की, इतिहास जितका सविस्तर सांगता येईल तितका सांगावयाचा आणि ग्रंथविस्ताराचे भय मनात मुळीच ठेवावयाचे नाही आणि पाने वाढली तर ती खुशाल वाढू द्यावयाची, पण कोणतीही उपलब्ध किंवा लभ्य माहिती वगळावयाची नाही. याशिवाय ज्या अनेक अंकित लेखांवरून इतिहास लिहावयाचा ते लेख मूळच्या स्वरूपात व त्यांचे भाषांतर ही दोन्ही द्यावयाची."[८] आपल्या या महत्त्वाकांक्षी योजनेची रूपरेषा सांगताना त्यासाठी किमान एक लाख रुपये उभे करण्याचा इरादाही त्यांनी बोलून दाखवला: "२५ रु. तीन वर्षांत भरणारी चार हजार मंडळी मिळविणे

शक्य झाले तर हे मोठे कार्य केवळ लोकाश्रयावर झाले असे होईल... हे कार्य करण्यासाठी कंपनी नोंदावी लागेल. तिला 'इतिहाससंवर्धक मंडळ लिमिटेड' असे नाव योजिले आहे. ही कंपनी 'एक मनुष्याची कंपनी' या स्वरूपाची राहील."[९]

प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा हा महत्त्वाकांक्षी संशोधनप्रकल्प आर्थिक पाठबळ न मिळाल्याने कधीच पुरा होऊ शकला नाही. त्याहीपेक्षा दुःखदायक घटना होती ती वेगळीच! प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा जो काही भाग प्रसिद्ध झाला त्याचे स्वरूप इतके "अव्यवस्थित, असंगत व विकीर्ण" होते की दा. ना. आपटे यांच्यासारख्या जाणकारानेही सौम्य पण स्पष्ट शब्दांत आपली तक्रार नोंदवलीच: "...अशा प्रकारच्या ऐतिहासिक लेखनपद्धतीचा पुरेसा परिचयही डॉ. केतकरांना जणू नसावा असे वाटण्यासारखी विचित्र लेखनपद्धती त्यांनी अनुसरली आहे. त्यामुळे केवळ टाचणांपलीकडे कसलेही व्यवस्थित स्वरूप या ग्रंथास आलेले नाही. याचा परिणाम असा झाला आहे की, या ग्रंथाचा वाचक क्षणोक्षणी अडखळल्यासारखा होतो, बुचकळ्यात पडतो व ग्रंथकर्त्याला म्हणावयाचे तरी काय आहे यासंबंधी अज्ञ राहतो. जर खरोखर महाराष्ट्राचा इतिहास पद्धतशीर व सुसंगत असा जनतेपुढे मांडावयाचा असेल, तर या ग्रंथाचे समग्र स्वरूप बदलून त्यातील माहिती टाचणवजा समजून तिचे पुनर्ग्रथन केले पाहिजे, तरच त्यापासून सामान्य वाचकवर्गास बोध होईल."[१०]

ज्या काटेकोरपणाने व शिस्तीने आरंभीच्या काळात त्यांनी संशोधनपर सुस्पष्ट लेखन केले ते गुण ज्ञानकोशानंतरच्या लेखनात हळूहळू दिसेनासे झाले. 'भारतीय समाजशास्त्र' या १९३६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकातील "विचारांची व लेखनाची शिथिलता" इरावती कर्वे यांच्यासारख्या अभ्यासकांना खुपल्याशिवाय राहिली नाही. 'व्हिक्टोरियस इंडिया' या केतकरांच्या अखेरच्या पुस्तकात तर त्यांचा तोल पार गेलेला दिसतो. त्यांच्या बुद्धीला आलेल्या विशिष्ट क्षीणतेच्या छायांनी त्यांचे अखेरचे लेखन झाकाळून गेले आहे, असे केतकरांचे चरित्रकार डॉ. द. न. गोखले यांनाही वाटल्यावाचून राहिले नाही. कोणत्याही संवेदनक्षम अभ्यासकास हळहळ वाटावी, रुखरुख लागावी असाच हा प्रकार होता. केतकरांचे निधन अकाली व आकस्मिक होते. जेमतेम पन्नाशी उलटते आहे तोच त्यांचा मृत्यू ओढवला, पण खरे म्हणजे त्यापूर्वीच अव्वल दर्जाचा समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांची कारकीर्द संपत आली होती. नवे काही सांगण्याचे त्राण उरले नव्हते. उद्ध्वस्त वास्तू पाहून मन विषण्ण व्हावे आणि एकेकाळच्या तिच्या भव्यतेची नुसती कल्पना करीत राहावे तसे त्यांचे अखेरचे लेखन वाचताना वाटत राहते. या अस्ताव्यस्त लेखनात मधूनच एखादी नवी कल्पना लख्खकन चमकून जाते, नाही असे नाही. पडझड झालेल्या लेण्यात एखादी अपुरी पण अप्रतिम मूर्ती दिसावी तसे एखादे विचारशिल्प केतकरांनी पुरे न करता मध्येच सोडून दिलेलेही आढळते. पण त्यांचे अखेरचे लेखन

वाचताना जास्त जाणवते ते त्यांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेचे होत चाललेले विघटन! ज्ञानकोशाने केतकरांचा बळी घेतला असे म्हणावेसे वाटते ते या अर्थाने!

केतकरांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या चाहत्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहणारे विशेषांक काढले. त्यानंतरच्या गेल्या तीन तपांच्या काळात त्यांच्या कादंबऱ्यांचा विस्ताराने परामर्श घेण्यात आला. त्यांचे विस्तृत चरित्र प्रसिद्ध झाले. त्यांच्या थोर सहचारिणीने वर्षानुवर्षे जपलेल्या आठवणींचे भांडार खुले केले. पण ज्या बारकाईने केतकरांच्या वैचारिक भूमिकेची छाननी व्हावयास हवी होती तशी त्यांच्या भक्तांनी किंवा विरोधकांनीही कधी केली नाही. त्यांच्या विद्वत्तेचे मूल्यमापन करण्यापेक्षा त्यांच्या विक्षिप्तपणाच्या खऱ्याखोट्या सुरस व चमत्कारिक गोष्टीच जास्त सांगण्यात आल्या. विद्यापीठातल्या लब्धप्रतिष्ठित समाजशास्त्रज्ञांनी फार झाल्यास तळटीपा देऊन किंवा जाताजाता एखादुसरा परिच्छेद त्यांच्यासंबंधी लिहून त्यांची बोळवण केली. चिं. वि. जोशी यांच्यासारख्या त्यांच्या टीकाकाराला, केतकरांचे निष्कारण स्तोम माजवले जात आहे असे वाटले व त्यांनी "केतकरांचा प्रचंड ज्ञानकोश हे एक भाषांतरवजा भारूड आहे"[११] असे निष्ठुर प्रहार केले. याउलट श्री. के. क्षीरसागरांसारख्या केतकरभक्ताने दुसरे टोक गाठले : "या प्राचीन देशात राष्ट्राभिमानी म्हणून कार्य करण्यास शास्त्रीय दृष्टी सोडण्याची आवश्यकता नाही व आत्यंतिक समाज-सुधारणा पुरस्कारतानाही आगरकरांप्रमाणे नास्तिक किंवा धर्मविरोधी होण्याची आवश्यकता नाही. हे या देशात दोनच पुरुषांनी अत्यंत प्रभावीपणे पुकारले. एक स्वामी विवेकानंद व दुसरे डॉ. केतकर."[१२] केतकरांच्या प्रतिमेला असे स्तुतीचे हार घालणाऱ्यांनी किंवा त्यांच्यावर मूर्तिभंजकाच्या आवेशाने टीकेचे प्रहार करणाऱ्यांनी त्यांच्या वैचारिक लेखनाची चिकित्सा अधिक कसोशीने करावयास पाहिजे होती, असे वाटल्यावाचून राहत नाही.

१९०९ ते १९१४ या पाच वर्षांच्या काळात केतकरांनी जी चार पुस्तके प्रसिद्ध केली त्यांतील विचारसंपदा विशेष महत्त्वाची आहे. त्यातही ज्या जातिसंस्थेच्या इतिहासाबद्दल त्यांना पीएच० डी० मिळाली त्या प्रबंधाचे दोन खंड नीट तपासून पाहावयास हवेत. जातिसंस्थेसंबंधी केतकरांनी केलेला विचार हा त्यांच्या विचारविश्वाच्या केंद्रस्थानी आहे. "अगदी अर्वाचीन म्हणजे गेल्या वीस वर्षांच्या आत अत्यंत थोड्या अभ्यासकांनी समाजाचा शास्त्रीय अभ्यास, विशेषतः ऐतिहासिक अभ्यास करून जे वाङ्मय तयार केले आहे त्यातच प्रस्तुत लेखकाचे वाङ्मय समाविष्ट होईल." एवढेच म्हणून केतकर थांबत नसत तर "जातीचा आणि समाजघटनेच्या इतिहासाचा अभ्यास प्रस्तुत लेखकाचा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीपेक्षा अधिक झाला आहे असे त्याचे स्वतःचे मत आहे"[१३] असे सांगण्यास ते लाजत नसत. परकीय अभ्यासकास जातिसंस्थेचे गूढ समजावून घेणे कठीण जाते. विशेषतः मनुस्मृतीतील वचनांच्या अर्थाबाबत पाश्चिमात्यांनी सतत गैरसमज प्रसृत केले असे त्यांना वाटे,

म्हणूनच प्रबंधाच्या पहिल्या खंडात त्यांनी मनुस्मृतीचे परीक्षण करून, इसवी सनाच्या तिसऱ्या शतकातील भारतातल्या सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. प्रबंधाच्या दुसऱ्या खंडात जातिव्यवस्थेचे हिंदू धर्माशी कोणते नाते असते या वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नाच्या संदर्भात हिंदुसमाजाची जडण-घडण व भवितव्य यांचा त्यांनी विचार केला आहे. हिंदू कायद्यासंबंधीच्या पुस्तकात हिंदू कायद्याचा इतिहास लिहिण्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब केला पाहिजे हे सांगण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी केवळ धर्मशास्त्राचा इतिहास लिहून भागणार नाही, कारण धर्मशास्त्र म्हणजे कायदा नसून कायदा करण्यासाठी धर्मशास्त्राचा उपयोग केला जात असे, असे त्यांचे मत होते. भारतीय अर्थशास्त्राविषयीच्या पुस्तकात हिंदूंच्या समाजरचनेचे, सांस्कृतिक परंपरेचे व परतंत्र स्थितीचे आर्थिक रचनेवर होणारे परिणाम दाखवून स्वतंत्र भारतीय अर्थशास्त्राची आवश्यकता आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. या चारही इंग्रजी पुस्तकांतील मजकूर केतकरांनी ज्ञानकोशात व इतर मराठी पुस्तकांत वापरला आहे. काही ठिकाणी तर तो सरळसरळ अनुवादित केला आहे.

आपल्या पूर्वजांनी जातिव्यवस्था स्वीकारली त्याअर्थी ती चांगली असणारच असे मानणाऱ्या सनातन्यांसाठी आपण प्रबंध लिहिलेला नाही, असे त्यांनी प्रबंधाच्या आरंभीच सांगितले आहे. आपले पूर्वज आपल्यापेक्षा शहाणे होते, प्राचीन काळातील ऋषी त्रिकालदर्शी होते असे न समजता, त्यांच्याविषयी योग्य तो आदर बाळगून त्यांच्या चुका झाल्या असल्यास दाखवण्यास हरकत नाही, अशी त्यांची भूमिका होती. प्रचलित समाजरचनेत बदल करावयाचे असतील तर ते एकतर परंपरासंमत मार्गाने करावे लागतील किंवा त्यासाठी परंपरापतित मार्ग अवलंबता येतील. जैन, बौद्ध, महानुभाव, लिंगायत किंवा ब्राह्मो संप्रदायांच्या अनुयायांची गणना परंपरा-पतितांच्या वर्गात करता येईल, तर भागवत-संप्रदायाच्या अनुयायांचा समावेश परंपरा-संमत मार्गाने जाणाऱ्यांच्या गटात होईल. परंपरापतित मार्गाने समाजाची पुनर्रचना करणे आपल्याला मुळीच मान्य नसून परंपरासंमत मार्गाने हिंदु-समाजाची पुनर्रचना करणे शक्य आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे.[१४] परंपरासंमत मार्गाने जावयाचे असेल तर प्रचलित समाजरचना ज्या जातिसंस्थेवर आधारलेली आहे तिचे नेमके स्वरूप लक्षात घेतले पाहिजे व बदलती परिस्थिती ओळखून असंख्य छोटे बदल घडवून आणले पाहिजेत असे त्यांना वाटे. मात्र ते घडवून आणणाऱ्यांची एक नवी जमातच तयार होईल अशा तऱ्हेने हे असंख्य छोटे बदल घडवून आणता उपयोगी नाही. जैन, बौद्ध, महानुभाव, लिंगायत किंवा ब्राह्मो पंथांच्या अनुयायांनी ही पद्धत अनुसरली नाही, त्यामुळे ज्या समाजाची पुनर्रचना हे पंथ करू पाहात होते त्यापासून ते अलग पडले व त्यांच्या नव्या जाती तयार झाल्या आणि मूळ प्रश्न अधिक बिकट झाला असा केतकरांचा अभिप्राय होता. परंपरासंमत मार्ग अनुसरणारे लोक प्राचीन

काळच्या ब्राह्मणांनी घालून दिलेल्या धर्मविधींची कदर करतात, तर परंपरापतित मार्गाने जाणारे लोक तत्त्व म्हणून या धर्मविधीकडे पद्धतशीर दुर्लक्ष करतात. परंपरापतितांप्रमाणे परंपरासंमत मार्गाने जाणारे लोक समाजसुधारणा व मूलभूत धर्मतत्त्वे यांची गल्लत करीत नाहीत असेही केतकरांचे म्हणणे होते.

केतकर समाजक्रांतीच्या तयारीची भाषा क्वचित कधी तरी बोलत. सर्वसाधारणपणे प्रचलित समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल त्यांना अभिप्रेत नव्हता. त्यांच्या लेखनात 'सामाजिक उत्क्रांती' या संकल्पनेला जास्त महत्त्व आहे हे विसरून चालणार नाही. 'जुने जाउं द्या मरणालागुनी, जाळुनि किंवा पुरुनी टाका' असा पवित्रा कोणी घेतला तर तो त्यांना हास्यास्पद व अडाणीपणाचा वाटला असता हे त्यांचे लेखन वाचणाऱ्यांच्या सहज ध्यानात येईल. चातुर्वर्ण्याधिष्ठित हिंदुसमाजाची रचना मोडून-तोडून त्याऐवजी समतेवर आधारलेला समाज निर्माण करणे, असले काही उद्दिष्ट त्यांनी कधीच डोळयांपुढे ठेवले नाही. कारण श्रेणीबद्ध समाजव्यवस्था ही एक सर्वत्र आढळणारी नैसर्गिक स्थिती आहे असे त्यांना वाटत होते. या श्रेणीबद्ध समाजव्यवस्थेच्या शिरोभागी ब्राह्मण असणार हे त्यांनी गृहीत धरले होते. प्रचलित समाजाची पुनर्रचना अशी भाषा केतकर बोलत असत तेव्हा त्यांना अभिप्रेत होते ते या मूळ चौकटीत राहून बदलत्या कालमानानुरूप आस्ते आस्ते करावयाचे छोटे बदल! तेही एकंदर समाजाच्या गळी उतरवताना प्रचलित परंपरांतील जो चांगला भाग आहे तो जतन करण्याची दक्षता घेऊन घडवून आणावेत असा आग्रह असे. केतकर हे समाजक्रांतीचे पुरस्कर्ते किंवा जहाल समाजसुधारकही नव्हते. ते परंपरा जतन करू पाहणारे, कोणताही बदल करण्यापूर्वी त्याचे परिणाम वाईट होण्याची शक्यता लक्षात घेऊन, योग्य ती दक्षता घेऊन व मूळ चौकट खिळखिळी होऊ न देता ती दृढ होईल अशा तऱ्हेने आस्ते आस्ते बदल करू पाहणारे 'कॉंझर्व्हेटिव्ह' होते असाच ग्रह होतो.

एकदा त्यांचा हा मूलभूत दृष्टिकोण लक्षात घेतला की, मग जातिसंस्थेविषयी त्यांनी मांडलेली प्रमेये समजावून घेणे सोपे जाते. जात या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक गटाचे सदस्यत्व जन्माधिष्ठित असते व या गटातील सदस्यांना गटाबाहेरच्या व्यक्तीशी विवाह करण्याची मनाई केलेली असते, अशी जातीची व्याख्या केतकरांनी केली. त्यांच्या आधी सेनार्त, नेसफील्ड व हर्बर्ट रिसले यांनी जातीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्यापेक्षा केतकरांची व्याख्या अधिक स्पष्ट आहे. डॉ. आंबेडकरांसारख्या, केतकरांपेक्षा वेगळी व विरोधी विचारसरणी असणाऱ्या समाजशास्त्राच्या अभ्यासकानेही हे मान्य केले आहे. मात्र जातीबाहेरच्या विवाहास प्रतिबंध व जन्माधिष्ठित सदस्यत्व या, केतकर मानीत होते त्याप्रमाणे, दोन भिन्न गोष्टी नसून एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत; कारण जातिजमातीतील बेटीव्यवहारास बंदी केली की, जातीचे सदस्यत्व आपोआपच त्या जातीत जन्माला

येणाऱ्यापुरतेच मर्यादित होते असा मार्मिक अभिप्राय डॉ. आंबेडकरांनी दिला होता.[१५]

अशा जातींची एक उतरंड रचलेली असते व केतकरांनी सुचवलेला शब्द वापरावयाचा असल्यास या 'सोपानरचने'त धर्मज्ञान असणाऱ्यांना मानाचे स्थान असते. मनुस्मृती किंवा मानवधर्मशास्त्राच्या अनुरोधाने कुल्लूक, मेधातिथी व गोविंदराज या भाष्यकारांना वाट पुसत केतकरांनी इसवी सनाच्या तिसऱ्या शतकातील भारतातील समाजस्थिती रेखाटली आहे. मानवधर्मशास्त्र हा धर्मासंबंधीचा ग्रंथ होता. धर्म म्हणजे सार्वभौम सत्तेचा आदेश किंवा कायदा नसून ते एक नैतिक कर्तव्य असे. हे धर्मनियम पाळले जावेत म्हणून नरकात जाण्याची भीती दाखवली जात असे, पुढील जन्मात परिणाम भोगावे लागतील असा धाक दाखवला जाई आणि वाळीत टाकले जाण्याच्या शक्यतेची तलवार शिरावर सतत टांगलेली असे. मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याने, वर्ण चारच असतात व जाती मात्र अनेक असतात असे म्हटले आहे. अनेक जाती मिळून एक वर्ण होत असला तरी सबंध वर्ण म्हणजे एक जातही बनू शकते. म्हणजेच मनुस्मृतीच्या काळी जात हा शब्द छोट्या, त्याचप्रमाणे मोठ्या सामाजिक गटांच्या संदर्भातही वापरला जात होता. मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याने आर्य वर्ण किंवा शूद्र वर्ण अशा संज्ञा वापरल्या असल्या तरी वर्ण म्हणजे वंश अशी त्याची कल्पना नव्हती. वर्ण म्हणजे वंश असा अर्थ पाश्चिमात्य पंडितांनी घेतला व गोंधळ घातला असे केतकरांचे म्हणणे होते. १. मूळचे चार वर्ण, २. विशुद्ध व मिश्र जातींच्या मिलाफातून उद्‌भवलेल्या जाती, ३. पवित्र. धर्मविधीकडे दुर्लक्ष केल्यामुळे ज्यांचा दर्जा कमी झाला आहे अशा जाती, ४. जातीबाहेर काढलेल्या लोकांच्या जाती, ५. गुलाम व त्यांचे वारस आणि ६. चातुर्वर्ण्याबाहेरचे लोकसमूह असे सहा प्रकारचे गट मनुस्मृतीच्या काळी होते. तिसऱ्या प्रकारात मोडणाऱ्या जातींना 'व्रात्य' म्हणत. ब्राह्मणांची अवज्ञा केल्यामुळे व धर्मविधीकडे दुर्लक्ष केल्यामुळे शूद्र ठरलेल्यांमध्ये यवन, शक, द्रविड, किरात वगैरेंचा समावेश होता. या जाती एकेकाळी क्षत्रिय समजल्या जात असत. क्षत्रिय, वैश्य हे वर्ण म्हणजे अनेक जातींचे समूह होते. ब्राह्मणवर्ण ही मात्र एक जात होती असा केतकरांचा निष्कर्ष होता.

शूद्रांसंबंधीच्या मानवधर्मशास्त्रातील वचनांचा अर्थ लावताना किंवा स्पष्टीकरण देताना केतकरांनी त्या ग्रंथाच्या कर्त्याला झुकते माप दिले आहे. "धनसंचय करण्याची त्याची धमक असली तरी शूद्राने धनसंचय करू नये. कारण धनवान शूद्र ब्राह्मणास पीडा देतो" या वचनावरचे केतकरांचे भाष्य मोठे मसालेवाईक आहे. शूद्राने धनसंपादन करू नये असा कायदा केलेला नसून त्याचेच हित लक्षात घेऊन त्याला सल्ला देण्यात आला आहे असा केतकरांचा अभिप्राय आहे. शूद्र धनवान बनला तर तो उद्धट होईल. इतरांचा अनादर करील आणि नम्रतेने सेवा करण्याचे कर्तव्य विसरेल व अशा तऱ्हेने त्याच्या आध्यात्मिक उन्नतीत अडथळा निर्माण

होईल. हे सांगण्यात ब्राह्मणांचा दुष्टपणा कोठे आहे ते कळत नाही अशी मल्लीनाथीही केतकरांनी केली आहे.[१६]

धर्म हा शब्द स्वभाव या अर्थानेही वापरला जात असे. दुसऱ्याचे दास बनणे हा ज्यांचा स्वभावच आहे त्यांची दास्यातून मुक्तता केली तर सेवा कोण करणार ? शूद्र राज्य करू लागतील आणि राज्य करण्यास ते लायक नसल्यामुळे समाजव्यवस्था नष्ट होईल. धर्मशास्त्रज्ञांना समाजात सुव्यवस्था राहावी असे वाटत असल्यामुळे त्यांनी शूद्रांना अनेक गोष्टी करण्यास मना केले होते असा केतकरांच्या लिहिण्याचा रोख आहे. कर्मसिद्धान्त, तीन गुणांची कल्पना व पुनर्जन्म या त्रयीच्या साहाय्याने शूद्रांना पुढील जन्मी चांगली अवस्था प्राप्त होईल अशी आशाही दाखवण्यात आली होती. या जन्मीची हीन अवस्था ही पूर्वजन्मातील पातकांचे प्रायश्चित्त म्हणून भोगावयाची व पुढील जन्म ब्राह्मणकुलात होण्याची आकांक्षा बाळगावयाची. न्याया-बद्दल अनादर असल्यामुळे तर नव्हेच, उलट न्यायाची कदर असल्यामुळेच हिंदूंनी ही सर्व व्यवस्था केली होती असेही केतकर म्हणतात आणि तळटीपेत एक नमुनेदार पुस्तीही जोडतात : " अमेरिकेतल्या गोऱ्या लोकांनी तेथील निग्रोंना ख्रिश्चन धर्मा-ऐवजी कर्मसिद्धान्ताच्या तत्त्वज्ञानाची दीक्षा दिली असती तर किती बरे चांगले झाले असते ! "[१७]

दिवाणी व फौजदारी कायद्याच्या दृष्टीने जातिजातींमध्ये भेदभाव केला जात असे की नाही, या प्रश्नाचे उत्तर देण्याचाही केतकरांनी प्रयत्न केला आहे. मानवधर्म-शास्त्रातील धर्मप्रवचन म्हणजे वस्तुस्थितिनिदर्शक पुरावे समजू नयेत असे केतकरांचे म्हणणे आहे. साक्षीदार म्हणून शूद्राच्या जबाबदाऱ्या काय आहेत हे तपशीलवार सांगणारा मानवधर्मशास्त्राचा कर्ता, तो खोटे बोलल्यास त्याच्या माथी कोणती पातके बसतील हेही सांगतो. केतकरांच्या मते यात शूद्रांचा जाणूनबुजून अपमान करण्याचा हेतू नाही, कारण शूद्र अडाणी असल्यामुळे त्याला जबाबदारीची जाणीव असणार नाही. याउलट न्यायाधीशाने ब्राह्मणास नुसते ' बोल ' म्हटले की त्याच्या तोंडून सत्यच सांगितले जाणार, याबद्दल मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याप्रमाणेच केतकरांची खात्री दिसते. व्यभिचारप्रकरणात गुंतलेल्या स्त्रीचा वर्ण जितका उच्च व पुरुषाचा वर्ण जितका कनिष्ठ तितकी त्याबद्दल जबाबदार असलेल्या पुरुषास शिक्षा कडक असावी असा दंडक होता. शूद्राविषयी तुच्छतेने लिहिले गेले असले तरी मानव-धर्मशास्त्राच्या कर्त्यास त्यांच्याविषयी सहानुभूतीही वाटत होती असे केतकरांचे म्हणणे आहे. ब्राह्मण मालकाने उरलेसुरले अन्न शूद्रांना द्यावे, जुने कपडे द्यावे, कोंडाकणी द्यावी हा आदेश सहानुभूतीचा पुरावा म्हणून केतकरांनी पेश केला आहे. केतकरांचे हे सारे विवेचन वाचले की, डॉ. आंबेडकर मनुस्मृती का जाळावयास निघाले होते हे समजू शकते, त्याचप्रमाणे केतकरांच्या प्रबंधाच्या पहिल्या खंडावरील प्रा. व्हिस डेव्हिड्स यांच्या मार्मिक अभिप्रायाचीही आठवण येते. " हा ग्रंथ म्हणजे

येणाऱ्यापुरतेच मर्यादित होते असा मार्मिक अभिप्राय डॉ. आंबेडकरांनी दिला होता.[१५]

अशा जातींची एक उतरंड रचलेली असते व केतकरांनी सुचवलेला शब्द वापरावयाचा असल्यास या ‘ सोपानरचने’त धर्मज्ञान असणाऱ्यांना मानाचे स्थान असते. मनुस्मृती किंवा मानवधर्मशास्त्राच्या अनुरोधाने कुल्लूक, मेधातिथी व गोविंदराज या भाष्यकारांना वाट पुसत केतकरांनी इसवी सनाच्या तिसऱ्या शतकातील भारतातील समाजस्थिती रेखाटली आहे. मानवधर्मशास्त्र हा धर्मासंबंधीचा ग्रंथ होता. धर्म म्हणजे सार्वभौम सत्तेचा आदेश किंवा कायदा नसून ते एक नैतिक कर्तव्य असे. हे धर्मनियम पाळले जावेत म्हणून नरकात जाण्याची भीती दाखवली जात असे, पुढील जन्मात परिणाम भोगावे लागतील असा धाक दाखवला जाई आणि वाळीत टाकले जाण्याच्या शक्यतेची तलवार शिरावर सतत टांगलेली असे. मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याने, वर्ण चारच असतात व जाती मात्र अनेक असतात असे म्हटले आहे. अनेक जाती मिळून एक वर्ण होत असला तरी सबंध वर्ण म्हणजे एक जातही बनू शकते. म्हणजेच मनुस्मृतीच्या काळी जात हा शब्द छोट्या, त्याचप्रमाणे मोठ्या सामाजिक गटांच्या संदर्भातही वापरला जात होता. मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याने आर्य वर्ण किंवा शूद्र वर्ण अशा संज्ञा वापरल्या असल्या तरी वर्ण म्हणजे वंश अशी त्याची कल्पना नव्हती. वर्ण म्हणजे वंश असा अर्थ पाश्चिमात्य पंडितांनी घेतला व गोंधळ घातला असे केतकरांचे म्हणणे होते. १. मूळचे चार वर्ण, २. विशुद्ध व मिश्र जातींच्या मिलाफातून उद्भवलेल्या जाती, ३. पवित्र. धर्मविधीकडे दुर्लक्ष केल्यामुळे ज्यांचा दर्जा कमी झाला आहे अशा जाती, ४. जातीबाहेर काढलेल्या लोकांच्या जाती, ५. गुलाम व त्यांचे वारस आणि ६. चातुर्वर्ण्याबाहेरचे लोकसमूह असे सहा प्रकारचे गट मनुस्मृतीच्या काळी होते. तिसऱ्या प्रकारात मोडणाऱ्या जातींना ‘ व्रात्य ’ म्हणत. ब्राह्मणांची अवज्ञा केल्यामुळे व धर्मविधीकडे दुर्लक्ष केल्यामुळे शूद्र ठरलेल्यांमध्ये यवन, शक, द्रविड, किरात वगैरेंचा समावेश होता. या जाती एकेकाळी क्षत्रिय समजल्या जात असत. क्षत्रिय, वैश्य हे वर्ण म्हणजे अनेक जातींचे समूह होते. ब्राह्मणवर्ण ही मात्र एक जात होती असा केतकरांचा निष्कर्ष होता.

शूद्रांसंबंधीच्या मानवधर्मशास्त्रातील वचनांचा अर्थ लावताना किंवा स्पष्टीकरण देताना केतकरांनी त्या ग्रंथाच्या कर्त्याला झुकते माप दिले आहे. “ धनसंचय करण्याची त्याची धमक असली तरी शूद्राने धनसंचय करू नये. कारण धनवान शूद्र ब्राह्मणास पीडा देतो ” या वचनावरचे केतकरांचे भाष्य मोठे मसालेवाईक आहे. शूद्राने धनसंपादन करू नये असा कायदा केलेला नसून त्याचेच हित लक्षात घेऊन त्याला सल्ला देण्यात आला आहे असा केतकरांचा अभिप्राय आहे. शूद्र धनवान बनला तर तो उद्धट होईल. इतरांचा अनादर करील आणि नम्रतेने सेवा करण्याचे कर्तव्य विसरेल व अशा तऱ्हेने त्याच्या आध्यात्मिक उन्नतीत अडथळा निर्माण

होईल. हे सांगण्यात ब्राह्मणांचा दुष्टपणा कोठे आहे ते कळत नाही अशी मल्लीनाथीही केतकरांनी केली आहे.[१६]

धर्म हा शब्द स्वभाव या अर्थानेही वापरला जात असे. दुसऱ्याचे दास बनणे हा ज्यांचा स्वभावच आहे त्यांची दास्यातून मुक्तता केली तर सेवा कोण करणार ? शूद्र राज्य करू लागतील आणि राज्य करण्यास ते लायक नसल्यामुळे समाजव्यवस्था नष्ट होईल. धर्मशास्त्रज्ञांना समाजात सुव्यवस्था राहावी असे वाटत असल्यामुळे त्यांनी शूद्रांना अनेक गोष्टी करण्यास मना केले होते असा केतकरांच्या लिहिण्याचा रोख आहे. कर्मसिद्धान्त, तीन गुणांची कल्पना व पुनर्जन्म या त्रयीच्या साहाय्याने शूद्रांना पुढील जन्मी चांगली अवस्था प्राप्त होईल अशी आशाही दाखवण्यात आली होती. या जन्मीची हीन अवस्था ही पूर्वजन्मातील पातकांचे प्रायश्चित्त म्हणून भोगावयाची व पुढील जन्म ब्राह्मणकुलात होण्याची आकांक्षा बाळगावयाची. न्याया-बद्दल अनादर असल्यामुळे तर नव्हेच, उलट न्यायाची कदर असल्यामुळेच हिंदूंनी ही सर्व व्यवस्था केली होती असेही केतकर म्हणतात आणि तळटीपेत एक नमुनेदार पुस्तीही जोडतात : " अमेरिकेतल्या गोऱ्या लोकांनी तेथील निग्रोंना ख्रिश्चन धर्मा-ऐवजी कर्मसिद्धान्ताच्या तत्त्वज्ञानाची दीक्षा दिली असती तर किती बरे चांगले झाले असते ! "[१७]

दिवाणी व फौजदारी कायद्याच्या दृष्टीने जातिजातींमध्ये भेदभाव केला जात असे की नाही, या प्रश्नाचे उत्तर देण्याचाही केतकरांनी प्रयत्न केला आहे. मानवधर्म-शास्त्रातील धर्मप्रवचन म्हणजे वस्तुस्थितिनिदर्शक पुरावे समजू नयेत असे केतकरांचे म्हणणे आहे. साक्षीदार म्हणून शूद्राच्या जबाबदाऱ्या काय आहेत हे तपशीलवार सांगणारा मानवधर्मशास्त्राचा कर्ता, तो खोटे बोलल्यास त्याच्या माथी कोणती पातके बसतील हेही सांगतो. केतकरांच्या मते यात शूद्रांचा जाणूनबुजून अपमान करण्याचा हेतू नाही, कारण शूद्र अडाणी असल्यामुळे त्याला जबाबदारीची जाणीव असणार नाही. याउलट न्यायाधीशाने ब्राह्मणास नुसते ' बोल ' म्हटले की त्याच्या तोंडून सत्यच सांगितले जाणार, याबद्दल मानवधर्मशास्त्राच्या कर्त्याप्रमाणेच केतकरांची खात्री दिसते. व्यभिचारप्रकरणात गुंतलेल्या स्त्रीचा वर्ण जितका उच्च व पुरुषाचा वर्ण जितका कनिष्ठ तितकी त्याबद्दल जबाबदार असलेल्या पुरुषास शिक्षा कडक असावी असा दंडक होता. शूद्राविषयी तुच्छतेने लिहिले गेले असले तरी मानव-धर्मशास्त्राच्या कर्त्यास त्यांच्याविषयी सहानुभूतीही वाटत होती असे केतकरांचे म्हणणे आहे. ब्राह्मण मालकाने उरलेसुरले अन्न शूद्रांना द्यावे, जुने कपडे द्यावे, कोंडाकणी द्यावी हा आदेश सहानुभूतीचा पुरावा म्हणून केतकरांनी पेश केला आहे. केतकरांचे हे सारे विवेचन वाचले की, डॉ. आंबेडकर मनुस्मृती का जाळावयास निघाले होते हे समजू शकते, त्याचप्रमाणे केतकरांच्या प्रबंधाच्या पहिल्या खंडावरील प्रा. ऱ्हिस डेव्हिड्स यांच्या मार्मिक अभिप्रायाचीही आठवण येते. " हा ग्रंथ म्हणजे

सनातनी हिंदूंच्या भूमिकेचे मुख्यतः समर्थन आहे हा एक तोटा आहे. मात्र या महत्त्वाच्या विषयावर इतक्या समर्थपणे ब्राह्मणांचा दृष्टिकोण स्पष्ट होणे हादेखील एक फायदाच समजला पाहिजे. ''[१८]

मुळात चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या समाजाची कालांतराने शकले पडून आजच्या तीन हजार जाती तयार झाल्या ही लोकप्रिय उपपत्ती केतकरांना मान्य नव्हती. गुणकर्मानुसार कोणत्याही समाजात चार वर्ग असतात, एवढाच चातुर्वर्ण्यसिद्धान्ताचा अर्थ होता असे ते मानीत असत. ज्या अर्थाने ख्रिश्चन किंवा मुसलमान यांच्या बाबतीत धर्म हा शब्द वापरता येईल त्या अर्थाने हिंदूंच्या बाबतीत ' धर्म ' हा शब्द वापरणे चुकीचे ठरेल. ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्मीयांचा एक धर्मग्रंथ असतो. देव म्हणजे काय? मरणानंतर माणसाचे काय होते ?—असल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना त्या पवित्र ग्रंथातून मिळतात. वागणुकीचे विधिनिषेध त्यात सांगितलेले असतात. काही समारंभ किंवा धर्मविधी करणे बंधनकारक असते. ख्रिश्चन व मुसलमान यांच्या संदर्भात या अर्थाने केतकरांनी ' थिओफ्रॅट्री ' ही संज्ञा वापरली आहे व आशयाच्या दृष्टीने आपल्याकडील पंथ किंवा संप्रदाय या संज्ञा ' थिओफ्रॅट्री ' शी मिळत्याजुळत्या आहेत असे त्यांचे प्रतिपादन होते. थोडक्यात, हिंदूंचा असा पंथ, संप्रदाय नव्हता किंवा ' थिओफ्रॅट्री ' नव्हती. आजचा हिंदुसमाज हा अनेक राष्ट्र-जातींनी ( ट्राइब्स ) मिळून बनलेला आहे. या अनेक राष्ट्रजातींचा परस्परांशी संपर्क वाढला. कालांतराने त्यांनी समान चालीरीती, परंपरा, कल्पना यांचा स्वीकार केला. विशेषतः ब्राह्मणांनी स्थलांतर व देशांतर केल्यामुळे त्यांचा प्रसार झाला पण ज्याप्रमाणे ख्रिश्चन किंवा मुसलमान यांनी इतरांना धर्मांतर करावयास लावले तसे मात्र ही प्रक्रिया घडून येत असताना झाले नाही. वेदांना प्रमाण मानण्याची हिंदूंची प्रवृत्ती असते. मात्र ख्रिश्चन माणूस बायबलला जितके महत्त्व देतो तसे येथे दिले जात नाही. वेदांच्या शिकवणी-विषयी आदर असला तरी ती सदैव आचरणात आणण्याचा प्रयत्न केला जात असतोच असे नाही.

ब्राह्मणांनी जनतेला वेदांचा अभ्यास करण्यापासून परावृत्त केले हे केतकर नाका-रीत नाहीत, पण त्याची कारणे मोठ्या चलाखीने केतकरांनी दिली आहेत. वेद लोकप्रिय ग्रंथ नसून तत्त्वज्ञानी व विद्वानांनी वापरावयाचे ते संदर्भग्रंथ आहेत. असे असल्यामुळे पुरेशा पूर्वतयारीशिवाय इतर अज्ञ माणसांनी ते वाचले तर त्यांची दिशाभूल होईल म्हणूनच ब्राह्मणांनी शूद्रांना वेदांचे अध्ययन करू दिले नाही असा केतकरांचा बचाव आहे. म्हणजेच शूद्रांना फसवण्यासाठी नव्हे, तर त्यांच्याविषयीच्या सद्भावनेनेच ब्राह्मणांनी हे केले असे केतकर सांगतात. खेरीज ब्राह्मणांनी वेदाध्ययन करण्यापासून शूद्रांना परावृत्त केले म्हणजे त्यातील मंत्रादी भागाचे शिक्षण घेऊ दिले नाही याचे कारण खुद्द ब्राह्मणांच्याच त्याबद्दलच्या कल्पनांमध्ये बदल झाले होते. शूद्रांना उपनिषदांचे श्रवण करण्यास बंदी नव्हती, वेदान्त समजावून घेण्यास मनाई

केलेली नव्हती, असाही केतकरांनी युक्तिवाद केला आहे.[१९] वेदांच्या ज्ञानाबाबतची मक्तेदारी ब्राह्मणांनी हाती राखण्याचा जो अट्टाहास केला त्याचे समर्थन करण्यासाठी केतकरांनी आणखी एक कारण दिले आहे तेही असेच मासलेवाईक आहे. मोक्ष मिळविण्यासाठी वेदाध्ययनाची गरज नव्हती; मग शूद्रांना वेदाध्ययन करू दिले नाही तर काय बिघडले मोठेसे, असा त्यांच्या लेखनाचा सूर आहे.

विविध राष्ट्र-जातींमधील संपर्कामुळे निर्माण झालेला हिंदुसमाज हा पुरेसा एकात्म झाला नाही हे केतकरांना मान्य होते. जातिसंकल्पनेपेक्षा उच्च अशी मानवजातीची संकल्पना हिंदूंना अपरिचित नव्हती, पण राष्ट्रवादी भावना त्यांना माहीत नव्हती. जातिव्यवस्थेच्या आधारे हिंदुसमाज पुरेसा एकात्म झाला नसल्यामुळे भारतीय राष्ट्रवादाच्या आधारे हिंदुसमाज एकात्म करण्याचा प्रयत्न करावा असा केतकरांनी तोडगा सुचवला होता. हिंदूंचे धर्मशास्त्र किंवा त्यांचा चातुर्वर्ण्यसिद्धान्त जातिव्यवस्थेला दुजोरा देत नाही असे केतकरांचे मत होते.[२०] याचाच अर्थ असा की, देशातील सर्व लोकांचे एक राष्ट्र करावयाचे असल्यास जातिभेदाचा अडथळा दूर करणे आवश्यक आहे, मात्र त्यासाठी हिंदूंचे धर्मशास्त्र किंवा त्यांचा चातुर्वर्ण्य-सिद्धान्त हा त्याज्य मानण्याचे कारण नाही असा केतकरांचा विश्वास होता. किंबहुना जातिभेद शक्य तितक्या लवकर नाहीसा करण्याची भाषा काही काळ बोलणारे तरुण केतकर कधीही चातुर्वर्ण्य-सिद्धान्त झिडकारण्यास तयार नव्हते. या बाबतीतला त्यांचा दृढ विश्वास आयुष्याच्या अखेरीस लिहिलेल्या ‘ भारतीय समाजशास्त्र ’ या पुस्तकात निःसंदिग्ध शब्दांत त्यांनी व्यक्त केला आहे : “ सामाजिक प्रयत्न करताना तो जुन्या पायावरच करावा लागतो. नाहीतर तो मुळीच टिकत नाही. जातिसंस्था आणि चातुर्वर्ण्य या गोष्टी अनिष्ट आहेत काय, याविषयी चांगला विचार केल्याशिवाय समाजात सुधारणेचा प्रयत्न अयोग्य होईल. चातुर्वर्ण्याविषयी हे सांगितले पाहिजे की, हे तत्त्व समाजास अत्यंत हितकर आहे. चातुर्वर्ण्य आणि जातिभेद ही एक नव्हत. एकजातिरूप बनलेल्या राष्ट्रात आणि समाजात चातुर्वर्ण्य असू शकते आणि आज जातिभेद नाहीसा झाला तर चातुर्वर्ण्य उत्कर्ष पावेल; अपकर्ष पावणार नाही. ”[२१]

जातिभेदाचे दुष्परिणाम किंवा चातुर्वर्ण्यसिद्धान्त यासंबंधीचे केतकरांचे लेखन वाचताना सारखे जाणवते की, हिंदुसमाजरचनेतील विषमतेवर त्यांनी कधीच प्रहार केले नाहीत. सर्व माणसे समान असली पाहिजेत, सर्वांना आपला विकास घडवून आणण्याची समान संधी उपलब्ध झाली पाहिजे, असा केतकरांनी आग्रह धरलेला आढळत नाही. जातिव्यवस्थेवर आधारलेल्या समाजात कनिष्ठ किंवा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचा कसा कोंडमारा होतो, त्यांचे कसे शोषण होते, अनेक गोष्टींना त्या कशा पारख्या होतात, याविषयी केतकरांनी जवळजवळ काहीच लिहिलेले नाही. जातभेद मोडावयाचा तो विषमता वाईट म्हणून नाही तर “ आपल्या देशातील सर्व लोकांचे एकीकरण करून आमचे एक बलवान राष्ट्र करावयाचे व

हिंदुस्थानचे महत्त्व आम्हांस जगात वाढवावयाचे " यासाठी, ही त्यांची भूमिका होती. "आपल्या राष्ट्रधर्माच्या आड जातिभेद येतो व त्याकरिताच हा मोडला पाहिजे "[२२] असे ते म्हणत. त्याकरता त्यांनी जो बारा-कलमी कार्यक्रम सुचवला होता तो अंमलात आणण्यासाठी ब्राह्मणांनीच पुढाकार घेतला पाहिजे असेही ते सांगत. या कार्यक्रमानुसार हिंदूंनी मुसलमान, खिस्ती वगैरे बाहेरचे व अस्पृश्य आहेत ही कल्पना सोडून दिली पाहिजे. हिंदूंमधील निरनिराळ्या जातींत सोवळेपणाच्या बाबतीत समानता प्रस्थापित होण्यासाठी सोवळ्याओवळ्याच्या फाजील कल्पना सोडून द्याव्या; अस्पृश्यांना स्वच्छता शिकवावी; सर्व लोकांनी परस्परांमधील संबंध वाढवावेत; विवाहपद्धतीत सुधारणा करावी; प्रीतिविवाह घडून येण्यास पोषक वातावरण तयार करावे व जातिभेद मोडण्याचा देशव्यापी कार्यक्रम हाती घ्यावा, ब्राह्मणांनी मांसाहारासंबंधीचा तिटकारा सोडावा. मात्र ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांना जरा कमी शिव्या द्याव्यात असे पथ्य केतकरांनी सांगितले आहे.

"अनेक जातींचे अस्तित्व, त्यांत ब्राह्मणजातीचे प्राधान्य व जातींची उच्चनीचता व तिचे स्पष्टीकरण करणारी पावित्र्यअपावित्र्यतेची कल्पना या गोष्टी जातिभेदाच्या मुख्य घटक म्हणून धरण्यास हरकत नाही "[२३] अशी व्याख्या त्यांनी केली होती. अनेक जातींच्या समूहातून एक राष्ट्र निर्माण करण्यासाठी जातिभेद मोडण्याची भाषा केतकर करीत असले तरी त्याच वेळी जातपंचायतींसारख्या प्राचीन संस्थांचा प्रभाव पूर्वीसारखा पडत नाही याची त्यांना खंतही वाटत होती. "पूर्वी जातपंचायतीचा जातीवरील ताबा अबाधित स्वरूपाचा असे. पण हल्ली तो ढिला होत चालला आहे. ब्रिटिश अमदानीत रेल्वे, मोटारी इत्यादी साधनांची सोय झाल्याने एखाद्याला जातीने वाळीत टाकले तर तो चटकन दुसरीकडे जाऊन राहतो. तो आपल्या जातीची पर्वाच करीत नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचे नसते स्तोम माजल्याचा हा परिणाम होय. "[२४] आयुष्याच्या अखेरीस तर केतकर जातिभेद मोडण्याविषयी बोलेनासेच झाले आणि सरळसरळ जातिभावनेची तरफदारी करू लागले.

"जातिविशिष्ट प्रयत्न नसला म्हणजे व्यापक भावना उत्पन्न होतात असा भाग मुळीच नाही. आणि जातिविशिष्ट खटपट असली म्हणजे ती व्यापक हितसंबंधास बाधक होते अशातलाही भाग नाही...समाजामध्ये काही व्यक्ती महत्त्वाकांक्षी असाव्या लागतात त्याप्रमाणे जातीही महत्त्वाकांक्षी असाव्या लागतात...जातीतल्या जातीत जी समतेची भावना असते तितकी समतेची भावना युरोपातल्या राष्ट्रांत क्वचितच सापडते. श्रीमानांनी गरिबांपासून फटकून राहून केवळ दुसऱ्या श्रीमानाचीच संगती धरावी हे जातिसंस्थेमुळे शक्य होत नाही...एवंच समाजसुधारणेची खरी पद्धती म्हटली म्हणजे जातिविशिष्ट भावनांचा उच्छेद करण्याचा प्रयत्न करणे ही नसून त्या भावनांस इष्ट आणि समाजहितसाधक वळण लावण्याचा प्रयत्न करणे हीच होय. "[२५]

आरंभीच्या काळात जातिभेद मोडण्यासाठी बारा कलमी कार्यक्रम मांडणारे केतकर हळूहळू त्यातील अडचणींविषयीच जास्त लिहू लागले. ज्ञानकोशाचे काम करीत असताना त्यांनी जे लेखन केले त्यात याचे प्रत्यंतर येते. ‘अस्पृश्यता’ या विषयावरचा विठ्ठल रामजी शिंदे यांचा लेख उद्धृत करून त्याला केतकरांनी स्वतः लिहिलेल्या मजकुराची पुस्ती जोडली आहे : “अस्पृश्यता म्हणजे ब्राह्मणांपासून अतिशय दूरपणा. ब्राह्मणापासून मराठ्यास थोडा तरी दूरपणा आहेच आणि अस्पृश्यता नाहीशी झाली म्हणजे मराठे व महार यांची स्थिती जवळजवळ सारखीच होईल आणि यामुळे पुष्कळ ठिकाणी व्यवहारामध्ये महारांच्या विरुद्ध जाणारा वर्ग ब्राह्मणापेक्षा ब्राह्मणेतरच होईल असे वाटते. आणि याचा अनुभव पुष्कळ ठिकाणी आपणास येत आहे...पुष्कळ ठिकाणी अस्पृश्यता चळवळीमध्ये पुढारी ब्राह्मण असल्यामुळे ही मराठ्यांना खाली पाडणारी चळवळ आहे अशा तऱ्हेचे आक्षेप येतात.”[२६] जातिभेद विषयक भावनांची दृश्ये रंगवताना ते म्हणतात : “ब्राह्मणांनी आपल्यापेक्षा निराळे असावे ही भावना आपल्याकडे लवकर जाईलसे वाटत नाही.”[२७] हिंदूंच्या आत्मोद्धारार्थ चाललेल्या शुद्धी व संघटना या दोन चळवळींपैकी संघटनाचळवळ अधिक महत्त्वाची आहे याबद्दल त्यांना शंका नव्हती. मात्र संघटना करणे म्हणजे जातिभेद मोडणे असा अर्थ नाही. “जातिभेद नाहीसा झाला म्हणजे समाज संघटित आणि कार्यक्षम झाला असे होत नाही...जातिभेदविनाश आणि संघटना ही निरनिराळी कार्ये आहेत व ती दोन्ही अवश्य आहेत. हिंदुसंघटना अधिकाधिक झाली म्हणजे तीबरोबर जातिभेदाची तीव्रतादेखील कमी होईल. एवढेच नव्हे तर जातिभेद मोडण्यासही संघटना कारण होईल...जातिभेद मोडण्यास शतके लागणार तोपर्यंत संघटना उपेक्षावयाची काय?”[२८] हिंदुसंघटनेची आवश्यकता प्रतिपादन करताना केतकरांनी वन्य जातींचे संस्करण करण्याच्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. भिल्ल, गोंड, कोरकू, निहाल, कातकरी, ठाकूर वगैरे वन्य जातींचा शास्त्रीय तऱ्हेने अभ्यास करावा व त्यांच्या संस्करणासाठी हिंदू मिशनरीभावना जागृत व्हावी असे त्यांना वाटे. “अस्पृश्यता घालवण्यासाठी आपणास जो प्रयत्न करावयास पाहिजे जवळजवळ तितकाच प्रयत्न आपणांस वन्यसंस्करणासाठी करावयास पाहिजे.”[२९]

केतकरांच्या जातिसंस्थाविषयक लेखनात स्थूलमानाने तीन अवस्था दिसतात. आरंभीच्या म्हणजे ज्ञानकोशाचे काम हाती घेण्यापूर्वीच्या काळात ते जातिभेद मोडून एक राष्ट्ररूपी जात तयार करण्याची उमेद बाळगताना दिसतात. ज्ञानकोशलेखनाच्या काळात जातिभेद मोडण्याच्या गोष्टी करत असले तरी हळूहळू त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांकडे व तसे करण्यातील अडचणींकडे ते जास्त लक्ष वेधीत आहेत असे दिसते आणि अखेरच्या काळात जर उघडउघड जातिसंस्थेचे गुणवर्णन करण्याकडेच त्यांचा कल दिसतो. मात्र आरंभापासून अखेरपर्यंत चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचनेच्या बाजूने त्यांनी युक्तिवाद केला आहे व त्यातही ब्राह्मणांनी बजावलेल्या

कामगिरीबद्दलचा त्यांचा अभिमान सतत व्यक्त होताना दिसतो. याचा अर्थ, ब्राह्मणांचे दोष किंवा त्यांच्या कामगिरीतील उणिवा त्यांनी दाखवल्या नाहीत असे नाही, पण ते करतानाही ब्राह्मणांचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे सांगण्यास ते विसरले नाहीत.

"सर्व हिंदुस्थानांतील ब्राह्मणांनी एकत्र होऊन आपल्या जातीला काहीतरी विशिष्ट शिस्त लागावी किंवा सर्वजनहिताकरिता आपली काहीतरी दृष्टी निश्चित ठेवावी अशा तऱ्हेची सामुच्चयिक भावना त्यांच्यात कुरुयुद्धापासून आजपर्यंत कधी दृष्टीस पडली नाही... बौद्धिक इतिहासात ब्राह्मणजातीचे स्थान जरी मोठे आहे तरी पारमार्थिक व नैतिक इतिहासामध्ये ब्राह्मणजातीचे कार्य फारसे अभिमान बाळगण्याजोगे नाही. आपली उच्चता राहण्याकरिता देव बदलणे, आचार बदलणे, धार्मिक संस्था बदलणे, ऐतिहासिक ग्रंथ पूर्वीच्यापेक्षा अगदी निराळे करून टाकणे, ब्राह्मणांच्या उच्चत्वाच्या कथा प्रसृत करणे याच्यापलीकडे निश्चयात्मक कामगिरी फारच थोडी झाली असावी. समाजातील प्रगतीची साधना ब्राह्मणांनी फारशी केली नसावी पण जेव्हा प्रगतीची दिशा निश्चित झाली तेव्हा आपल्या पांडित्यासह त्या प्रवाहात पडून त्यांनी आपले तात्पुरते लौकिक हित करून घेतले. तथापि हेही लक्षात ठेवले पाहिजे की, राष्ट्रास एकस्वरूप देण्याच्या बाबतीत त्यांची कामगिरी मोठी झाली. हिंदुस्थानात आर्यन, मंगोलियन, द्रविड वगैरे अनेक रक्ते आहेत. तथापि इतक्या सर्व प्रकारच्या भिन्न लोकांना एका परंपरेस चिकटविले ही कामगिरी लहानसहान नाही."[३०] ब्राह्मणांची समाजविस्तारक विद्या ही जागतिक संस्कृती निर्माण करण्यास उपयोगी पडेल अशी त्यांना खात्री वाटत होती : "विस्तीर्ण समाजाची एक जनता करणे, त्याचे जे प्राचीन असेल ते संग्रहण करून तात्त्विक स्पष्टीकरणाने उज्ज्वल करणे इत्यादी क्रिया करून ब्राह्मणांनी एक व्यापक संस्कृती स्थापन केली ... सर्व जगाची संस्कृती एक व्हावी हेच ध्येय ब्राह्मणांचे होते" असे सांगून, "आजही जगाची धर्मविषयक पक्षपाती वृत्ती घालविण्यासाठी जागतिक संस्कृती निर्माण करणे हे जगाचे, विशेषतः ब्राह्मणांचे काम आहे"[३१] असे त्यांचे मत होते.

अगदी आरंभीच्या लेखनातही ब्राह्मणांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना वाटणारा अभिमान त्यांनी कधी सूचित केला आहे तर कधी आडवळणाने व्यक्त केला आहे. उदाहरणार्थ, त्यांच्या प्रबंधाच्या दुसऱ्या खंडातल्या एका तळटीपेत शाहूमहाराजांना वेदोक्त संस्काराचा अधिकार नाकारण्याचे धाडस करणाऱ्या व त्यासाठी जहागीर गमावण्यास तयार असलेल्या 'चारित्र्यवान ब्राह्मणाचा' त्यांनी गौरवाने उल्लेख केला आहे. गेले ते पेशवाईतले दिवस; आता ते परत येणे शक्य नाही किंवा पेशव्यांच्या अस्ताबरोबर पुण्यातील शास्त्रीपंडितांची सत्ताही लयास गेली याबद्दल केतकर हळहळताना दिसतात.[३२] ऐन पंचविशीत ते महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांच्या स्वतःविषयीच्या अचाट कल्पनांबद्दल टीका तरी करीत असत. महाराष्ट्रातील ब्राह्मण हे आपल्याला

साऱ्या मानवजातीचे धुरीण समजतात, एवढेच नव्हे तर भारतातील अन्य भागांतल्या सर्व ब्राह्मणांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे मानतात याबद्दल केतकरांनी त्यांना धारेवर धरले आहे. आपल्यामध्ये मुत्सद्द्याची व विद्वानाची दूरदृष्टी व शहाणपण आणि क्षत्रियांचा पराक्रम एकवटला आहे असे महाराष्ट्रातील ब्राह्मण मानीत असल्यामुळे ते अप्रिय होतात असा केतकरांनी इशारा दिला आहे.[३३] महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या या वृत्तीमुळे भारतातील ब्राह्मणजातीत निष्कारण फूट पडते व ऐक्याला बाधा पोचते ही जाणीव या टीकेमागे असावी.

अखेरच्या वर्षांत तर केवळ ब्राह्मणांच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल त्यांना वाटणारा विश्वास प्रकर्षाने जाणवू लागला. "प्रत्येक जातीतील ब्राह्मणसदृश वर्ग मागे पडून ब्राह्मणच ती जागा पटकावतात असे दिसून येते. तीच क्रिया मोठ्या प्रमाणावर जगात होईल. हिंदू आहेत ते ब्राह्मणांचा सन्मान ठेवणारे राहिले आणि त्यांनी अहिंदूंशी लग्ने वगैरे केली आणि ती हिंदू संस्कारांनी केली तर ब्राह्मणगौरवाचा प्रसार अन्यधर्मीयांत देखील होईल. ब्राह्मण व युरोपियन लग्नेदेखील ब्राह्मणगौरवसाधकच होतील. या लग्नापासून होणारा वंश हिंदू राहील आणि ब्राह्मण राहिला नाही तरी ब्राह्मणांस मानणारा राहील. हिंदू आणि युरोपीय यांची लग्ने ब्राह्मणगौरवसाधक म्हणजे हिंदुत्व-वर्धकच होतील"[३४] असा निर्वाळा देत होते. ब्राह्मण आणि तत्सम वर्गापुरते पाहणाऱ्या मध्यमवर्गीय पुणेकर लेखकांची केतकर 'सदाशिवपेठी' म्हणून थट्टा करीत; पण खरे म्हणजे त्यांचा चातुर्वर्ण्याचा अभिमान, विशेषतः ब्राह्मण जातीच्या कर्तृत्वाबद्दलची व भवितव्याबद्दलची त्यांची श्रद्धा, दलित समाजाच्या दुःखाविषयी व त्यावर होणाऱ्या अन्यायाविषयीची त्यांची उदासीन वृत्ती ही 'सदाशिवपेठी' या विशेषणाने सूचित होणाऱ्या मनोवृत्तीपेक्षा काही वेगळी नव्हती.

हिंदू समाजातील ब्राह्मण जातीचे उच्च स्थान व तिची नियंत्रक शक्ती यांना आव्हान देणारे बौद्ध, जैन, लिंगायत वगैरे संप्रदाय अगर पंथ किंवा इंग्रजी राजवटी-तील समाजसुधारक यांच्यावर केतकरांनी कडाडून हल्ला चढवला आहे त्याचेही मर्म हेच आहे. गौतम बुद्धावर व त्याच्या शिकवणीवर त्यांनी केलेल्या जळजळीत टीकेची केवळ चुणूक त्यांच्या प्रबंधाच्या पहिल्या खंडातील दोन तळटीपांत पाहावयास मिळते. गौतम बुद्धाने जातिभेद मुळीच मोडला नाही आणि त्याचा संप्रदाय म्हणजे जाति-व्यवस्थेविरुद्धचे बंड होते असे मानणे म्हणजे शुद्ध अडाणीपणा आहे असे केतकर ठासून सांगत. पावित्र्यापावित्र्याच्या काही बाबतींत तमाम ब्राह्मणांनी जेवढा मूर्खपणा केला नसेल तेवढा त्याने केला असेही ते म्हणत.[३५] बुद्धासंबंधीची आपली मते ही फारच थोड्या विद्वानांना मान्य होण्यासारखी आहेत याची त्यांना कल्पना होती. म्हणूनच, आपण जे म्हणतो ते आपल्या वाचकांनी केवळ आपल्यावर विश्वासून स्वीकारू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे.[३६] जातिव्यवस्था हे बुद्धाचे लक्ष्य नसून ब्राह्मणांचे वर्चस्व हे त्याच्या हल्ल्याचे कारण होते असे केतकर सांगतात.

धर्मशास्त्रवेत्ते ब्राह्मण व कायदे करणारे क्षत्रिय राजसत्ताधीश यांच्यामधील संघर्षाचे एक रूप म्हणजे गौतमाने संप्रदाय स्थापन करण्याचा केलेला प्रयत्न होय. नवा ' धम्म ' म्हणजे नीतिनियमांची संहिता ब्राह्मणांच्या धर्मशास्त्राऐवजी प्रचलित करण्याचा गौतमाचा प्रयास व्यर्थ ठरला, कारण भारतातील परंपरा व कायदा यांचे ज्ञान त्याला नव्हते. ब्राह्मणांचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी वेदांचे महत्त्व कमी करणे जरूर होते, पण वेदांसंबंधीचा त्याचा दृष्टिकोण भेदरट विरोधकाचा होता. गौतम बुद्धाला वेदांचे ज्ञान नव्हते व त्याला संस्कृत तरी येत होते की नाही याविषयी केतकरांना शंका होती.

१९१३ साली केसरीत लिहिलेल्या लेखमालेत केतकर गौतम बुद्धावर घसरले : " प्रथमतः गौतमास जातिभेद हवा होता; त्यास वर्णभेददेखील हवा होता. त्याचे भांडण जातिभेदाविरुद्ध अगर वर्णभेदाविरुद्ध नव्हते. ब्राह्मणाची जाती उच्च दर्जाची नसून ब्राह्मणापेक्षा क्षत्रिय श्रेष्ठ आहेत हेच त्याचे म्हणणे होते... गौतम हा अशिक्षित व अप्रामाणिक मनुष्य होता; तथापि मिशनरी काव्यात फार निष्णात व वितंडवादात फार कुशल असा मनुष्य होता. तत्कालीन ब्राह्मणांवर त्याने जे तोंडसुख घेतले ते सामाजिक सुधारणेच्या इच्छेने न घेता मत्सरामुळे घेतले....तो स्वतः मांसाहारी होता; व पुढे तो मृत्यू पावला त्याचे कारण त्याने एके दिवशी डुकराचे मांस सपाटून खाल्ल्यामुळे त्यास अपचन होऊन अतिसार झाला.[३७] धर्मानंद कोसंबींनी, ही सर्व विधाने केतकरांनी बौद्ध धर्मग्रंथांच्या आधाराने सिद्ध करून दाखवावीत असे आव्हान दिल्यावर " मजजवळ पुष्कळ पुरावा आहे, पण मी हा पुरावा मुद्दाम आत्ताच पुढे आणीत नाही " असे केतकरांनी उत्तर दिले. " मूळ ग्रंथांतील उतारे देऊन आपले मुद्दे सिद्ध करा " असे पुन्हा एकदा कोसंबींनी आव्हान दिले तेव्हा कोसंबींसारख्या " वाद-शिखंडीस प्रतिस्पर्धी म्हणून मान्य करण्यास माझी तयारी नाही " असले उत्तर देऊन केतकर निसटले व " माझ्या पुढे प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांच्या स्वीकारासाठी लोकांची मने तयार करून ठेवावी " असा आपल्या लेखमालेचा उद्देश असल्याचे सांगून त्यांनी वाचकांची समजूत घातली [३८]

ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडात केतकरांनी बुद्धचरित्र ज्या तऱ्हेने रंगवले आहे ते पाहिले म्हणजे गौतम बुद्ध काय काय नव्हता हे सांगण्यातच ते रंगलेले दिसतात. " आचरणाने केवळ सामान्य मनुष्य व धंद्याने मुत्सद्दी या तऱ्हेचीच दृष्टी गौतमाच्या आयुष्याचे परीक्षण करताना ठेवली म्हणजे गौतम वाईट मनुष्य मुळीच दिसत नाही "[३९] असा त्यांचा निष्कर्ष आहे. ज्ञानकोशामध्ये महंमद पैगंबरांविषयी चुकीचा मजकूर प्रसिद्ध झाला म्हणून मुसलमानांनी निषेध करण्यास सुरुवात करताच केतकरांनी आक्षेपार्ह पाने कापण्याचा निर्णय जाहीर करून प्रकरण मिटविले, पण बुद्धाविषयीची विधाने परत घ्यावीत अशी मागणी झाली असतानाही त्यांनी ती धुडकावून लावली. या मागणीमागे संख्येचे बल नसल्याने केतकर तेव्हा हे सहज करू शकले आणि त्यांच्या कसोटीची वेळच आली नाही. आपल्या या वागणुकीचे

समर्थन केतकरांनी केले आहे : "गौतमाविरुद्ध अत्यंत वाईट मत झालेल्या मंडळींत मी आहे, आणि त्यामुळे मी ज्या मताचा मुख्य अध्वर्यू त्या मताचा मी त्याग कसा करीन ?...महंमदाची गोष्ट निराळ्या प्रकारची होती. महंमदाविषयी मी कोणत्याही एका मताचा प्रवर्तक नाही. कारण त्याविषयी माझी माहिती सर्व दुय्यम प्रकारची राहणार. आपण दुसऱ्या कोणाच्या मतावर अवलंबून राहून त्याकरिता विनाकारण भांडणे उपस्थित करावी हे मला योग्य वाटले नाही."[४०] "जो ग्रंथ ज्ञानाचा ग्रंथ म्हणून कायम बाळगण्याजोगा आहे असा बाणा बाळगतो तो ग्रंथ मुसलमानांविषयी पूर्वग्रहाने दूषित झाला आहे अशी जर त्याविषयी हिंदूंची समजूत झाली तर हिंदू मंडळीदेखील तो ग्रंथ कमी योग्यतेचा व त्यामुळे विकत घेण्यास कमी लायक आहे असेच समजतील"[४१] असेही एक मजेदार स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. मात्र गौतमाविषयी काहीही वेडावाकडा मजकूर लिहिला तरी हिंदू मंडळींचा असा ग्रह होणार नाही अशी केतकरांना खात्री वाटत असावी! त्यांच्या ग्राहकांपैकी दोन-तृतीयांश ग्राहक ब्राह्मण असल्याने व ज्ञानकोश विकत घेण्याची इच्छा व शक्ती असलेले बौद्ध संख्येने नगण्य असल्याने 'ग्राहकांचा संतोष हेच आमचे समाधान' हा बाणा येथे सहज टिकवता येत होता. खरे म्हणजे ब्राह्मणांच्या वर्चस्वावर प्रहार करण्याच्या गौतम बुद्धाच्या अपराधाला केतकरांनी कधीच क्षमा केली नाही!

जन्माने माणूस ब्राह्मण ठरत नाही तर कर्माने तो ब्राह्मण ठरतो असे गौतम बुद्ध मानीत असल्याचे सुत्तनिपातावरून दिसते. बुद्धाने माणसाचे जीवन सुधारण्याचा प्रयत्न केला पण त्यासाठी संपूर्ण समाजव्यवस्था बदलण्याची त्याने धडपड केली असे म्हणता येत नाही, हा दृष्टिकोण ब्राइस रीअन या अभ्यासकाच्या 'कास्ट इन मॉडर्न सिलोन' या ग्रंथात स्पष्ट झालेला आहे. बुद्धाचे बंड हे भ्रष्ट ब्राह्मण्याविरुद्ध होते; ते जातीविरुद्ध नव्हते, असे रीअन यांचेही म्हणणे आहे. बुद्धाने क्षत्रियांना दिलेला अग्रक्रम हाही लक्षात घेण्यासारखा आहे. रीअन यांची ही मते वरवर पाहता केतकरांच्या मतांना दुजोरा देणारी वाटतात, पण केतकरांनी बुद्धाच्या शिकवणीने परिणामतः जातिव्यवस्था शिथिल झाली याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आहे. रीअन सांगतात की, निर्वाण मिळवण्यासाठी माणूस अमुक एका जातीचा असला पाहिजे असे बौद्ध मानीत नाहीत. भिक्षू हे कोणत्याही जातीचे असत. ज्या अर्थाने हिंदू समाजात अस्पृश्य असत त्या अर्थाने श्रीलंकेमध्ये अस्पृश्य आढळत नाहीत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जातपातविषयक बंधने ही नैतिक बंधने म्हणून हिंदू पाळतात तसे बौद्धांचे नसते.[४२] बुद्धाने जातिव्यवस्थेविरुद्ध बंड न करता ब्राह्मण्याविरुद्ध फक्त हल्ला केला असे केतकरांचे म्हणणे जरी गृहीत धरले तरी परिणामतः ब्राह्मणवर्चस्वाखालच्या जातिव्यवस्थेचा पाया काही काळ तरी काहीसा भुसभुशीत होण्यास बौद्ध धर्माने हातभार लावला, हे त्यांनी मान्य करावयास हवे होते.

हिंदू समाजातील ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या अर्वाचीन

काळातील धर्मसुधारकांवर व समाजसुधारकांवरही केतकरांनी आरंभापासूनच हल्ला चढविलेला दिसतो. हिंदू समाजातील ब्राह्मणांचे सर्वोच्च स्थान हा जातिव्यवस्थेचा सर्वांत कमी हानिकारक भाग होता असा त्यांचा दावा होता. त्यामुळे ब्राह्मणांना शिव्या देणाऱ्या समाजसुधारकांना व धार्मिक सुधारणेची चळवळ करणाऱ्यांना केतकरांनीही काही कमी शिव्या दिल्या नाहीत. एकोणिसाव्या शतकात हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न करणाऱ्या धर्मसुधारणेच्या प्रवर्तकांबद्दल केतकरांनी आपल्या प्रबंधाच्या दुसऱ्या खंडात व्यक्त केलेला अजब अभिप्राय या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे. धार्मिक सुधारणा करू इच्छिणाऱ्यांपैकी बहुतेकांना समाजसुधारणा करण्याच्या हेतूने कार्य करण्याची मुळीच प्रेरणा मिळाली नव्हती याबद्दल केतकरांना खात्री होती. ब्राह्मणांचा मूर्खपणा उघडकीस आणण्यास उत्सुक असलेल्या पाश्चिमात्य विद्वानांनी त्यांच्यापैकी काहींना धर्मसुधारक म्हटले असले तरी स्वतःसमोर धूप जाळून घेण्याखेरीज अन्य कोणत्याही हेतूने हे लोक कार्यप्रवृत्त झाले नव्हते एवढेच म्हणून केतकर थांबले नाहीत; त्यांच्यापैकी काहीजण चक्क लोकांना बनवणारे बदमाष होते, तर काहीजण सामान्य माणसांच्या पूर्वग्रहांचा फायदा घेऊन आपले स्तोम माजवू पाहात होते अशी पुस्तीही त्यांनी जोडलेली आहे.[४३]

समाजसुधारणा करू पाहणाऱ्यांचीही त्यांनी अशीच हेटाळणी केली आहे : " महाराष्ट्रातील व त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील इतर भागांत प्रमुख असलेल्या सुधारकांच्या लेखांचे अवलोकन केले तर मर्कटवृत्ती आणि पोपटपंचीशिवाय दुसरे काही दिसत नाही."[४४] सुधारकांच्या विषयीचे त्यांचे हे आरंभीचे मत अखेरपर्यंत कायम राहिले. देवळाच्या द्रव्यावर सार्वजनिक ताबा उत्पन्न करण्यासाठी मद्रास येथे झालेला प्रयत्न सोडला तर सामाजिक सुधारणेसाठी कायदे करण्याच्या झालेल्या इतर सर्व खटपटी आंग्लशूद्रत्वमूलक आणि त्यामुळे अत्यंत आक्षेपार्ह होत्या असे त्यांना वाटत होते : " संमतिवयाचा कायदा, उपवरतेनंतरचे लग्न कायदेशीर करू पाहण्याचा कायदा आणि सारडा यांनी केलेला कायदा हे सर्व समाजात उत्पन्न झालेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नसून विवाहाची मर्यादा मुद्दाम वाढविण्यासाठी इंग्रजांच्या पढिक शिष्यांच्या प्रयत्नाने झालेले किंवा फसलेले कायदे आहेत"[४५] हे त्यांचे मत या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.

एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांबद्दलचा त्यांचा हा ग्रह ज्ञानकोशातील समाजसुधारकांबद्दलच्या विविध नोंदीतही कळत-नकळत प्रतिबिंबित झाला आहे. गोपाळराव आगरकरांविषयीच्या टिपणाच्या अखेरीस ज्ञानकोशात खालील मजकूर आढळतो : " महाराष्ट्रीय मध्यम वर्गाचा आयुष्यक्रम आर्थिक कारणांनी बदलत चालला तेव्हा परिस्थित्यनुरूप अशा आयुष्यक्रमाचे समर्थन यांनी केले. यामुळे ' सुधारक ' नावाचा वर्ग यांस आपला तत्त्ववेत्ता समजत असे."[४६] आगरकरांविषयीच्या टिपणात त्यांच्या समाजसुधारणाविषयक तात्त्विक भूमिकेबद्दल अवाक्षर

लिहिलेले नाही किंवा त्याबाबतच्या त्यांच्या कार्याबद्दल गौरवोद्‌गार काढलेले दिसत नाहीत हेदेखील लक्षात घेण्यासारखे आहे. बाळशास्त्री जांभेकरांबद्दलच्या नोंदीतही त्यांनी केलेल्या समाजसुधारणाविषयक कार्याबद्दल चकार शब्द काढलेला दिसत नाही.[४७] बिचारे जोतीराव फुले! ब्राह्मणांवर सतत टीका करण्याच्या त्यांच्या अपराधामुळे केतकरांनी त्यांना इंग्रजांचे पढिक शिष्य समजून, महाराष्ट्रीय ज्ञानकोशात समाविष्ट करण्याची फुल्यांची योग्यता नाही असा निर्णय घेतला असावा! जोतीरावांच्या विषयी स्वतंत्र टिपण ज्ञानकोशाच्या शरीरखंडात आढळत नाही. सत्यशोधक समाजाविषयीही केतकरांना महाराष्ट्रीय ज्ञानकोशात लिहावेसे वाटलेले नाही.

याउलट लोकमान्य टिळकांविषयीच्या विस्तृत नोंदीत ‘टिळक व समाजसुधारणा’ या उपशीर्षकाखाली दिलेला मजकूर नमुनेदार आहे: “समाजसुधारणाविषयक टिळकांची मते कोणती होती हे सांगणे कठीण आहे. कारण समाजसुधारणेची नक्की दिशा त्यांनी आपल्या डोळ्यांपुढे ठेविलीच नव्हती. त्यांचे प्रमुख कार्य राजकीय स्वरूपाचे असल्यामुळे त्यांनी समाजसुधारणेच्या प्रश्नावर पूर्ण विचार केला नव्हता. त्यांनी वेळोवेळी जी सामाजिक बाबतीत आपली मते प्रतिपादन केली ती मुख्यतः सामाजिक सुधारणावादी सुधारकांच्या अचकटविचकट मतांचे खंडन करण्यासाठी व पुराणमतवाद्यांच्या संरक्षणासाठी होती. टिळकांच्या वेळचे समाजसुधारक पाश्चात्त्य कल्पनांनी भारून गेलेले, जुने तेवढे त्याज्य या मताचा पुरस्कार करणारे, अविचारी व अव्यवहारी होते. त्यामुळे टिळकांना त्यांच्या अतिरेकावर हत्यार उपसावे लागले. ते स्वतः समाजसुधारणेला विरोधी नव्हते. कोणतीही समंजस सुधारणा करण्याच्या बाबतीत ते कधीच विरोध करीत नसत. स्वतः त्यांनी आपल्या मुलींना चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले होते. त्यांनी आपल्या मुलींची लग्ने प्रौढपणीच केली होती. तात्पर्य, टिळक हे समाजसुधारणेला विरोधी होते हे म्हणणे चुकीचे आहे.”[४८] खरे म्हणजे स्वतःखेरीज केतकरांचे महाराष्ट्रातील ज्या हाताच्या बोटांवर मोजता येण्याजोग्या विद्वानांविषयी चांगले मत होते त्यांत लोकमान्य टिळक व इतिहासाचार्य राजवाडे या दोघाचा समावेश होता. वरील मजकुरातली टिळकांची तरफदारी वस्तुस्थितीपेक्षा लोकमान्यांविषयीच्या त्यांच्या आदरभावनेवर व समाजसुधारकांबद्दल ज्ञानकोशकारांना असलेल्या अनादरावर आधारलेली होती.

“हिंदुस्थान हे राष्ट्र होणे इष्ट आहे एवढेच केवळ नाही तर ते अपरिहार्य आहे”[४९] असे केतकर मानीत असल्यामुळे राष्ट्रबलसंवर्धनासाठी व राष्ट्रोत्कर्षासाठी जे जे आवश्यक ठरते ते केले पाहिजे असा ते आग्रह धरीत, त्यामुळे कित्येकांना काही वेळा त्यांची मते क्रांतिकारक वाटत असत: “आपली गाईसंबंधीची पूज्यबुद्धी घ्या. गोहनन करावे असे मी म्हणत नाही. तथापि आपली अंतःकरणे अशी बनू देऊ नयेत की जेणेकरून राष्ट्ररक्षणासाठी देखील गोहनन अशक्य होईल.”[५०] पंजाबात वीरनवालीवर एका युरोपियन खिस्त्याने बलात्कार केल्यामुळे लोकांनी तिला बहिष्कृत केले.

परिणामतः तिने आत्महत्या केली. या घटनेचा निर्देश करून केतकरांनी, विटाळाच्या असल्या कल्पनांमुळे समाजाला किती दौर्बल्य येते याविषयी खेद व्यक्त केला आहे. राष्ट्रबलसंवर्धन म्हणजे हिंदुसमाज-बलसंवर्धन असे त्यांचे समीकरण होते. त्यामुळे परधर्मीयांना शुद्ध करून हिंदू करून घेण्याच्या चळवळीला त्यांचा पाठिंबा होता. बिगर हिंदू स्त्रीशी विवाह करण्यास त्यांची तयारी होती, कारण त्यामुळे हिंदू समाजाचे बळ वाढणार होते, पण हिंदू स्त्रीने परधर्मीयाशी विवाह करण्याचे ठरवल्यास त्यांना ते बघणे "फार क्लेशदायक" वाटे हे खान-पाणंदीकर विवाहाच्या वेळच्या वर्तनावरून स्पष्ट दिसते.[५१]

शुद्धिचळवळीचा पुरस्कार करणाऱ्या केतकरांना मुसलमान किंवा खिस्ती लोकांचा हिंदूंना बाटवण्याचा उद्योग मुळीच मंजूर नसणे साहजिक होते. "हिंदू समाज म्हणजे विशिष्ट मते अगर परमार्थसाधने यांच्या पायावर निर्माण केलेला समाज" नसल्याने व "सर्व प्रकारच्या मतांची आणि दैवतांची ग्राहकता" हिंदूंमध्ये असल्याने, मुसलमान आणि खिस्ती यांना राष्ट्रबलसंवर्धनाच्या, म्हणजेच हिंदुसमाजबलवर्धनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे अवघड नाही असे केतकरांना वाटत असल्याचे दिसते. "मुसलमान आणि खिस्ती लोकांनी आपली जात वाढविण्याचा प्रयत्न न करिता आपला ईश्वरसाधनाचा मार्ग वाढविण्याचा प्रयत्न करणे हे त्यांचे कर्तव्य आहे ही गोष्ट त्यांस भासविली पाहिजे. हिंदुस्थानीय लोकांपैकी प्रत्येकाची जात हिंदूच आहे. मग त्याचे ईश्वरविषयक मत कोणतेही का असेना."[५२] मुसलमानांविषयी ज्ञानकोशात जी नोंद आहे तेथेही बागवान, धोबी, दक्षिणी बक्कर किंवा लाड सुलतानी, हजाम, नैकवारी मुसलमान वगैरे मुसलमानांतील जातींची प्रवृत्ती हिंदुधर्माकडे विशेष दिसते याकडे वाचकांचे खास लक्ष वेधलेले दिसते.[५३]

राष्ट्रबलसंवर्धनासाठी निरनिराळ्या जातींच्या व धर्मांच्या लोकांना एकच कायदा असणे आवश्यक आहे अशी केतकरांची धारणा असल्याने, आज आपणांपैकी काही जण 'समान नागरी कायद्याची' जी मागणी करतात ती त्यांनी जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वी केली असल्याचे आढळते: "हिंदुस्थानामध्ये एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विकास करण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्यांत सर्वांना म्हणजे निरनिराळ्या जातींच्या व धर्मांच्या लोकांना एकच कायदा असणे ही एक महत्त्वाची गोष्ट होय. काही बाबतींत सर्वांना एक कायदा आज आहेच. उदाहरणार्थ, फौजदारी किंवा शासनविषयक कायदा घ्या. हा सर्वांना एकच आहे. तथापि वारसाहक्काचा कायदा, विवाहाचा कायदा हे कायदे निरनिराळ्या समाजांस निरनिराळे आहेत. त्यांतील द्वैत दूर करणे हे कार्य कमी महत्त्वाचे नाही." अशी प्रस्तावना करून केतकरांनी सुचवले: "निरनिराळ्या धर्मांच्या लोकांना निरनिराळे कायदे आहेत या वस्तुस्थितीविरुद्ध प्रयत्न तर पाहिजेच पण सर्व हिंदूंस तरी एक कायदा असावा या गोष्टीकडे अधिक लक्ष पाहिजे."[५४]

राष्ट्रबलसंवर्धनासाठी भारताची आर्थिक प्रगती होणे आवश्यक आहे हे ओळखून केतकरांनी जातिव्यवस्थेच्या काही दुष्परिणामांमुळे आर्थिक विकास कसा खुंटतो हे दाखवण्याचा प्रयत्न भारतीय अर्थशास्त्रावरील निबंधात केला आहे. जातिव्यवस्थेमुळे समाजात फूट पडते. सोवळयाओवळयाच्या कल्पनांचाही आर्थिक परिस्थितीवर प्रभाव पडतो असे त्यांचे म्हणणे होते. जातिव्यवस्थेवर आधारलेल्या समाजातील दुफळीमुळे समान आर्थिक जीवन विकसित होण्यात अडथळा निर्माण होतो. सामाजिक दृष्ट्या कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या थरातील लोकांचे राहणीचे मान वाढत नाहीं आणि उत्पादनाच्या प्रक्रियेत समाजातील विविध वर्गांमध्ये जे सहकार्य असावयास हवे तेही होऊ शकत नाही. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी शरीरश्रम करणारे, भांडवल असणारे व बुद्धिमंत यांच्यामध्ये सहकार्य लागते. हिंदु-समाजात त्यासाठी निरनिराळ्या जाती आहेत व त्यांचा सामाजिक दृष्ट्या परस्परांशी संपर्क नसतो. काही जातींतील पडदा किंवा गोषा-पद्धतीमुळे एरवी जी कमी कष्टाची कामे स्त्रियांनी केली असती ती पुरुषांना करावी लागतात. हिंदूंची कलियुगाची कल्पना, इहलोकापेक्षा परलोकातील सुखे मिळवण्याचा त्यांचा ध्यास वगैरे गोष्टींमुळेही आपल्या देशाच्या आर्थिक विकासात विघ्ने उत्पन्न होतात.

केतकरांच्या या विवेचनातील उणिवा दाखवण्याचा प्रयत्न धनंजयराव गाडगिळांनी केला. केतकरांनी "सामाजिक रचनेला, आपल्या कलियुगाच्या कल्पना इत्यादी गोष्टींना, आर्थिक प्रगतीला वळण लावण्यात फाजील महत्त्व दिले आहे व पर्यायाने का होईना, हिंदी आर्थिक घटना म्हणजे काही विशेष असे सुचवण्याचा प्रयत्न केला."[५५] धनंजयरावांनी त्याला जोरदार हरकत घेतली. "ज्ञानकोशकार सामाजिक रचनेला आर्थिक बाबतीत भलतेच महत्त्व देतात" असे म्हणून हिंदी अर्थशास्त्र असे स्वतंत्र शास्त्र निर्माण करण्याची गरज नाही असे गाडगिळांनी केतकरांना बजावले. "समाजशास्त्र, मानसशास्त्र व अर्थशास्त्र यांची खिचडी अर्थशास्त्राच्या मर्यादेत नको" असा धनंजयरावांनी त्यांना इशारा दिला. केतकरांनी या टीकेला उत्तर दिलेले दिसत नाही.

राष्ट्रबलसंवर्धनासाठी हिंदुस्थानचे राजकीय विभाग भाषावार असावेत यावर केतकरांनी आरंभापासून भर दिलेला दिसतो. ब्रिटिश सरकार आपण होऊन भाषावार प्रांतांची निर्मिती करील असे त्यांना वाटत नव्हते, म्हणून चळवळ करून तसे करण्यास सरकारला भाग पाडावे असे त्यांचे म्हणणे होते. भाषावर प्रांतांमुळे राष्ट्रीय भावनेच्या निर्मितीस व पोषणास हातभार लागेल असे त्यांचे म्हणणे होते.[५६] "प्रांतिक राज्यकारभार देशी भाषेत व्हावा. तोदेखील इतका की, गव्हर्नरने इंग्रजीत सही केली तर ती बेकायदेशीर ठरावी. देशभाषेत हायकोर्टाचे निवाडे व्हावे म्हणजे देशी सामान्य भाषांना कायदेशीर भाषेचा संस्कार होईल आणि इंग्रज कायदेपंडितांचे देशात प्रामुख्य राहणार नाही आणि त्याबरोबर त्यांचे नैतिक प्रामुख्यही राहणार

नाही"[५७] अशा शब्दांत त्यांनी भाषावार प्रांतरचनेचा गर्भितार्थ स्पष्ट केला आहे. ओरिसा, आंध्र राज्यनिर्मितीसाठी चाललेल्या चळवळींची दखल घेतानाच मध्यप्रांत, वऱ्हाड व मुंबई इलाखा या मराठी भाषिक प्रदेशातील लोकांनाही स्वतंत्र प्रांत असावा असे वाटू लागल्याचे केतकरांनी नमूद केले आहे व कालांतराने ही इच्छा पुरेशी तीव्र झाल्यावर या चळवळीच्या पुरस्कर्त्यांचे उद्दिष्ट पुरे झाल्याशिवाय राहणार नाही असे भाकितही त्यांनी अचूक वर्तवलेले दिसते.[५८]

राजकीय प्रश्नांच्या बाबतीत केतकरांनी वर्तविलेली अनेक भाकिते खरी ठरलेली दिसतात. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या चौथ्या विभागाच्या अखेरीस सिंहावलोकन हे प्रकरण आहे ते या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे : " मागील इतिहासाचे सिंहावलोकन करून चालू असलेल्या विसाव्या शतकात राजकीय क्षेत्रात कोणत्या घडामोडी होतील याचा साधारणपणे अंदाज सांगणे सोपे नाही; पण प्रवृत्ती सांगता येतील" असे सावध विधान करून केतकरांनी १९२३ सालीच जगातील प्रमुख राष्ट्रांबद्दल अंदाज केले आहेत. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीमध्ये स्थापन झालेल्या लोकसत्ताक राज्याचे " आयुष्य किती काळ टिकेल याबद्दल संशय वाटू लागला आहे" असे म्हणून केतकर सांगतात : " आज जर्मनी जरी पूर्णपणे चिरडल्यासारखा दिसत आहे तरी या मानहानीचे शल्य जर्मनीच्या अंतःकरणात खोल जाऊन बसेल व या अडचणीतून कोणत्याही मार्गाने एकदा जर्मनीची सुटका झाल्यावर तो या अपमानाचा सूड येनकेन प्रकारेण घेण्याच्या तयारीस लागेल...हा धुमसत राहिलेला द्वेषाग्नी जगाची निराळी न्याय्य घटना न झाल्यास पुढेमागे अभूतपूर्व अशा जागतिक युद्धाच्या रूपाने पेट घेतल्याशिवाय राहणार नाही. त्या वेळी राष्ट्रसंघ आपल्या शांतिमंत्राने ही आग थांबविण्यास असमर्थ ठरेल व पुन्हा युरोपखंड व सर्व जग युद्धाच्या वणव्यात सापडेल." जपानविषयी लिहितानाही केतकरांनी जागतिक राजकारणाबद्दलचे त्यांचे आडाखे किती बरोबर होते याचा पुरावा दिला आहे. " जपान देश लहान असल्यामुळे त्याला आपल्या.वाढत्या लोकसंख्येस व भरभराटीस वाव मिळण्याकरिता आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याची जरुरी वाटू लागेलच व ' भौगोलिक परिस्थिती' पुढेमागे जपानला दुसऱ्या एखाद्या राष्ट्राशी झगडावयास लावील" अशी त्यांना खात्री वाटत होती. " ब्रिटनशीच जपानचा विरोध येणे अधिक संभवनीय दिसते" असे त्यांनी सांगितलेच. शिवाय " व्यापारी बाबतीत जपानचा पुढेमागे अमेरिका, ब्रिटन या राष्ट्रांशी खटका उडण्याचा संभव आहे" अशीही शक्यता बोलून दाखवली.

चीनबद्दल केतकर लिहितात : " हे अवाढव्य राष्ट्र जर नवविचारांनी प्रेरित होऊन जागृत होईल तर त्यामध्ये फार मोठ्या महत्त्वाकांक्षेचा उदय होऊन आपल्या असंख्य लोकसंख्येने सर्व जग व्यापून जागतिक साम्राज्य स्थापण्याच्याही गोष्टी कदाचित चिनी लोक बोलू लागतील, पण या सर्व गोष्टी भवितव्यतेच्या उदरात लपून

बसलेल्या आहेत. त्याविषयी आज निश्चित तर्क काही करता येत नाही." या पीत बागुलबोवाची श्वेतवर्णीयांना वाटणारी भीती खरी ठरण्याचा संभव नाही असे केतकरांना व्यक्तिशः वाटत होते हे खरे! पण त्याबरोबरच यापुढे "एशियामध्ये युरोपियांस दादागिरी करता येणार नाही" हेही त्यांनी म्हटले आहे हे विसरून चालणार नाही.

रशियातील बोल्शेव्हिकांनी लेनिनच्या नेतृत्वाखाली केलेल्या क्रांतीचीही केतकरांनी दखल घेतली आहे. १० जुलै १९१८ रोजी मंजूर झालेल्या रशियाच्या नव्या राज्यघटनेची तपशीलवार माहिती प्रस्तावना खंडाच्या पहिल्याच भागात देऊन त्यांनी त्याबद्दल खुलासा केला. "बोल्शेव्हिझम ऊर्फ कामगारी व शेतकरी यांची सत्ता हिच्या घटनेचा इतिहास विशेष देण्याचे कारण हेच की, हिंदुस्थानच्या सरहद्दीवर हे संकट येऊ पाहात आहे, आणि यासाठी याविषयी लोकांत विशेष माहिती असणे अवश्य आहे. हिंदुस्थानातील काँग्रेसने ब्रिटिश मजूर पक्षाशी गट्टी जोडण्याचा प्रयत्न चालविला आहे आणि ब्रिटिश कामगारवर्गात बोल्शेव्हिझमच्या तत्त्वांचा प्रसार होत आहे. बोल्शेव्हिझमची अनेक ध्येये जवळ जवळ अशक्य आहेत...सामान्य सुशिक्षित मनुष्याचे हेच कर्तव्य आहे की, बोल्शेव्हिकांविषयी आणि त्यांच्या मतांविषयी पूर्ण विचार केल्याशिवाय आणि संपूर्ण माहिती मिळविल्याशिवाय स्तुतिपाठक, अनुयायी, निंदक अगर द्वेष्टे बनू नये आणि यासाठी त्यांच्या समाजघटनेच्या तत्त्वांची सविस्तर माहिती देणे आम्हास अवश्य वाटले...हिंदुस्थानमध्ये शेकडा ९५ लोक जेथे निरक्षर आहेत तेथे ते सत्तारूढ होतील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे."[५९] राष्ट्रसंघाच्या संस्थापकांनी रशियाला प्रवेश न देण्याचे धोरण ठेवलेले असतानाही "पुढेमागे रशियास राष्ट्रसंघात मिळण्यास सवड दिली जाईल असे दिसते" याबद्दल केतकरांची खात्री होती.

१९२३ साली प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावनाखंडाच्या चवथ्या विभागात सिंहावलोकन करताना रशियातील घडामोडीबद्दल त्यांनी पुन्हा एकदा लिहिले: "बोल्शेव्हिकांनी प्रथम जुनी व्यवस्था मोडून टाकण्याच्या बऱ्याच अव्यवस्थित व अतिरेकाच्या गोष्टी केल्या व खासगी मालमत्ता नाहीशी करून परराष्ट्रीय कर्जही नाकबूल केले. बोल्शेव्हिकांनी स्त्रिया सार्वजनिक मालकीच्या केल्या अशीही एक अफवा उठली होती. हळूहळू अतिरेकाच्या गोष्टी एक एक कमी होत गेल्या...लष्करी सत्तेच्या जोरावर सत्ता वाढविणे हे रशियन सरकारचे ध्येयच नाही...रशियाशी तंटा होण्याचे जर काही कारण आज असेल तर बोल्शेव्हिक मतप्रसार एवढेच संभवते."[६०] मार्क्सविषयी ज्ञानकोशात जी नोंद आढळते तीत "श्रम हा किंमत ठरविणारा एकच घटक आहे" हे मार्क्सचे "मूलभूत प्रमेय चुकीचे असले तरी मार्क्सचे व इतर समाजसत्तावाद्यांचे अखेरचे सिद्धान्त एकच आहेत"[६१] असे भाष्य केलेले आढळते.

आयुष्याच्या अखेरच्या वर्षांत, रशियातील राज्यक्रांतीच्या दूरगामी वैचारिक

नाही"[५७] अशा शब्दांत त्यांनी भाषावार प्रांतरचनेचा गर्भितार्थ स्पष्ट केला आहे. ओरिसा, आंध्र राज्यनिर्मितीसाठी चाललेल्या चळवळींची दखल घेतानाच मध्यप्रांत, वऱ्हाड व मुंबई इलाखा या मराठी भाषिक प्रदेशातील लोकांनाही स्वतंत्र प्रांत असावा असे वाटू लागल्याचे केतकरांनी नमूद केले आहे व कालांतराने ही इच्छा पुरेशी तीव्र झाल्यावर या चळवळीच्या पुरस्कर्त्यांचे उद्दिष्ट पुरे झाल्याशिवाय राहणार नाही असे भाकितही त्यांनी अचूक वर्तवलेले दिसते.[५८]

राजकीय प्रश्नांच्या बाबतीत केतकरांनी वर्तविलेली अनेक भाकिते खरी ठरलेली दिसतात. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या चौथ्या विभागाच्या अखेरीस सिंहावलोकन हे प्रकरण आहे ते या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे : "मागील इतिहासाचे सिंहावलोकन करून चालू असलेल्या विसाव्या शतकात राजकीय क्षेत्रात कोणत्या घडामोडी होतील याचा साधारणपणे अंदाज सांगणे सोपे नाही; पण प्रवृत्ती सांगता येतील" असे सावध विधान करून केतकरांनी १९२३ सालीच जगातील प्रमुख राष्ट्रांबद्दल अंदाज केले आहेत. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीमध्ये स्थापन झालेल्या लोकसत्ताक राज्याचे "आयुष्य किती काळ टिकेल याबद्दल संशय वाटू लागला आहे" असे म्हणून केतकर सांगतात : "आज जर्मनी जरी पूर्णपणे चिरडल्यासारखा दिसत आहे तरी या मानहानीचे शल्य जर्मनीच्या अंतःकरणात खोल जाऊन बसेल व या अडचणीतून कोणत्याही मार्गाने एकदा जर्मनीची सुटका झाल्यावर तो या अपमानाचा सूड येनकेन प्रकारेण घेण्याच्या तयारीस लागेल...हा धुमसत राहिलेला द्वेषाग्नी जगाची निराळी न्याय्य घटना न झाल्यास पुढेमागे अभूतपूर्व अशा जागतिक युद्धाच्या रूपाने पेट घेतल्याशिवाय राहणार नाही. त्या वेळी राष्ट्रसंघ आपल्या शांतिमंत्राने ही आग थांबविण्यास असमर्थ ठरेल व पुन्हा युरोपखंड व सर्व जग युद्धाच्या वणव्यात सापडेल." जपानविषयी लिहितानाही केतकरांनी जागतिक राजकारणाबद्दलचे त्यांचे आडाखे किती बरोबर होते याचा पुरावा दिला आहे. "जपान देश लहान असल्यामुळे त्याला आपल्या वाढत्या लोकसंख्येस व भरभराटीस वाव मिळण्याकरिता आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याची जरुरी वाटू लागेलच व 'भौगोलिक परिस्थिती' पुढेमागे जपानला दुसऱ्या एखाद्या राष्ट्राशी झगडावयास लावील" अशी त्यांना खात्री वाटत होती. "ब्रिटनशीच जपानचा विरोध येणे अधिक संभवनीय दिसते" असे त्यांनी सांगितलेच. शिवाय "व्यापारी बाबतीत जपानचा पुढेमागे अमेरिका, ब्रिटन या राष्ट्रांशी खटका उडण्याचा संभव आहे" अशीही शक्यता बोलून दाखवली.

चीनबद्दल केतकर लिहितात : "हे अवाढव्य राष्ट्र जर नवविचारांनी प्रेरित होऊन जागृत होईल तर त्यामध्ये फार मोठ्या महत्त्वाकांक्षेचा उदय होऊन आपल्या असंख्य लोकसंख्येने सर्व जग व्यापून जागतिक साम्राज्य स्थापण्याच्याही गोष्टी कदाचित चिनी लोक बोलू लागतील, पण या सर्व गोष्टी भवितव्यतेच्या उदरात लपून

बसलेल्या आहेत. त्याविषयी आज निश्चित तर्क काही करता येत नाही." या पीत बागुलबोवाची श्वेतवर्णीयांना वाटणारी भीती खरी ठरण्याचा संभव नाही असे केतकरांना व्यक्तिशः वाटत होते हे खरे! पण त्याबरोबरच यापुढे "एशियामध्ये युरोपियांस दादागिरी करता येणार नाही" हेही त्यांनी म्हटले आहे हे विसरून चालणार नाही.

रशियातील बोल्शेव्हिकांनी लेनिनच्या नेतृत्वाखाली केलेल्या क्रांतीचीही केतकरांनी दखल घेतली आहे. १० जुलै १९१८ रोजी मंजूर झालेल्या रशियाच्या नव्या राज्यघटनेची तपशीलवार माहिती प्रस्तावना खंडाच्या पहिल्याच भागात देऊन त्यांनी त्याबद्दल खुलासा केला. "बोल्शेव्हिझम ऊर्फ कामगारी व शेतकरी यांची सत्ता हिच्या घटनेचा इतिहास विशेष देण्याचे कारण हेच की, हिंदुस्थानच्या सरहद्दीवर हे संकट येऊ पाहात आहे, आणि यासाठी याविषयी लोकांत विशेष माहिती असणे अवश्य आहे. हिंदुस्थानातील कॉंग्रेसने ब्रिटिश मजूर पक्षाशी गट्टी जोडण्याचा प्रयत्न चालविला आहे आणि ब्रिटिश कामगारवर्गात बोल्शेव्हिझमच्या तत्त्वांचा प्रसार होत आहे. बोल्शेव्हिझमची अनेक ध्येये जवळ जवळ अशक्य आहेत...सामान्य सुशिक्षित मनुष्याचे हेच कर्तव्य आहे की, बोल्शेव्हिकांविषयी आणि त्यांच्या मतांविषयी पूर्ण विचार केल्याशिवाय आणि संपूर्ण माहिती मिळविल्याशिवाय स्तुतिपाठक, अनुयायी, निंदक अगर द्वेष्टे बनू नये आणि यासाठी त्यांच्या समाजघटनेच्या तत्त्वांची सविस्तर माहिती देणे आम्हास अवश्य वाटले...हिंदुस्थानमध्ये शेकडा ९५ लोक जेथे निरक्षर आहेत तेथे ते सत्तारूढ होतील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे."[५९] राष्ट्रसंघाच्या संस्थापकांनी रशियाला प्रवेश न देण्याचे धोरण ठेवलेले असतानाही "पुढेमागे रशियास राष्ट्रसंघात मिळण्यास सवड दिली जाईल असे दिसते" याबद्दल केतकरांची खात्री होती.

१९२३ साली प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावनाखंडाच्या चवथ्या विभागात सिंहावलोकन करताना रशियातील घडामोडीबद्दल त्यांनी पुन्हा एकदा लिहिले: "बोल्शेव्हिकांनी प्रथम जुनी व्यवस्था मोडून टाकण्याच्या बऱ्याच अव्यवस्थित व अतिरेकाच्या गोष्टी केल्या व खासगी मालमत्ता नाहीशी करून परराष्ट्रीय कर्जेही नाकबूल केले. बोल्शेव्हिकांनी स्त्रिया सार्वजनिक मालकीच्या केल्या अशीही एक अफवा उठली होती. हळूहळू अतिरेकाच्या गोष्टी एक एक कमी होत गेल्या...लष्करी सत्तेच्या जोरावर सत्ता वाढविणे हे रशियन सरकारचे ध्येयच नाही...रशियाशी तंटा होण्याचे जर काही कारण आज असेल तर बोल्शेव्हिक मतप्रसार एवढेच संभवते."[६०]. मार्क्सविषयी ज्ञानकोशात जी नोंद आढळते तीत "श्रम हा किंमत ठरविणारा एकच घटक आहे" हे मार्क्सचे "मूलभूत प्रमेय चुकीचे असले तरी मार्क्सचे व इतर समाजसत्तावाद्यांचे अखेरचे सिद्धान्त एकच आहेत"[६१] असे भाष्य केलेले आढळते.

आयुष्याच्या अखेरच्या वर्षांत, रशियातील राज्यक्रांतीच्या दूरगामी वैचारिक

परिणामांनी त्यांचे लक्ष वेधलेले दिसते. “ जुन्या वैवाहिक आणि स्त्रीपुरुषसंबंधविषयक कल्पना नवीन समाजसत्तावादाच्या शिळेवर आपटून ठार झाल्या आहेत. रशियाचा परिणाम सर्व जगभर प्रत्यक्ष संसर्गाने होईल अशी अपेक्षा नाही. तथापि त्यांच्या देशात जे विचार निर्माण झाले ते विचार जगभर स्थित्यंतर घडवितील यात शंका नाही. रशियातील विचारांना उचलून धरणारा एक वर्ग हिंदुस्थानातही निर्माण झाला आहे. हा वर्ग ब्रह्मचर्यधर्म आणि पातिव्रत्यधर्म या धर्मांच्या उपयुक्ततेबद्दल एक मोठे प्रश्नचिन्ह लोकांच्या मनोफलकांवर कोरू पाहात आहे.”[६२] मार्क्स-लेनिन, रशियातील राज्यक्रांती व समाजसत्तावादाचे तत्त्वज्ञान यांसंबंधी केतकरांनी वेळोवेळी व्यक्त केलेली मते लक्षात घेता, त्यांना रशियातील या नव्या प्रयोगाविषयी अखेरपर्यंत कुतूहल वाटत असले तरी त्यांची त्याविषयीची प्रतिक्रिया सर्वसामान्यतः प्रतिकूल होती, हे जाणवल्याशिवाय राहत नाही. मात्र महाराष्ट्रातील त्यांच्या पिढीच्या विचारवंतांच्या व नेत्यांच्या तुलनेने पाहता, केतकरांनी किमान या नव्या प्रवाहाकडे दुर्लक्ष केले नाही किंवा त्याचे महत्त्वही कमी लेखले नाही याचे अवधान ठेवावयास हवे.

रशियातील राज्यक्रांतीनंतर केतकरांसारख्यांनी त्यावर लिहिले नसते तरच नवल वाटले असते. पण १९४४ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या भारतीय अर्थशास्त्रावरील निबंधात त्यांनी समाजवादाची चर्चा केलेली आढळते हे विशेष उल्लेखनीय आहे. समाजवादी अर्थशास्त्रात वाटपाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केलेले असते आणि व्यक्तीला समाजवादी समाजात जास्तीत जास्त फायदे मिळतील असे त्यांनी म्हटले आहे. समाजवाद व व्यक्तिवाद या दोहोंमध्ये विरोधच निर्माण होईल असे त्यांना वाटत नव्हते. व्यक्तिवादी सामाजिक परिवर्तनाची मागणी करीत नाहीत, याउलट समाजवाद्यांना मात्र फार गंभीर स्वरूपाचे बदल अभिप्रेत असतात. संपत्तीच्या समाईक मालकीवर व उपभोगावर समाजवादी भर देत असल्याने समाजात मूलगामी स्वरूपाचे बदल घडवून आणावे लागतील याचे केतकरांना भान होते. समाजवादी समाजात स्त्रियांना पुरुषांवर आर्थिक दृष्ट्या अवलंबून राहणे भाग पडणार नाही. विवाहबाह्य संबंधापासून निर्माण झालेल्या संततीलाही समाजातील इतरांप्रमाणेच संपत्तीचा उपभोग घेता येईल, त्यामुळे वैवाहिक बंधने शिथिल होतील असे त्यांनी म्हटले आहे. भारतातील परिस्थितीच्या संदर्भात समाजवादाला कोणते स्थान असावे या प्रश्नाला उत्तर देताना केतकरांनी प्रथम पोथीनिष्ठ समाजवाद व भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन केलेला काही समाजवादी कार्यक्रमाचा व तत्त्वांचा स्वीकार या दोहोंमध्ये फरक करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. एखादे धोरण केवळ समाजवादी आहे व समाजवाद ही चांगली गोष्ट आहे म्हणून त्या धोरणाचा स्वीकार करणाऱ्या पोथीनिष्ठ समाजवाद्यांचा मार्ग त्यांना मान्य नव्हता. रेल्वे किंवा तारखात्यासारख्या सार्वजनिक सेवांवरील शासनाचे नियंत्रण वगैरे गोष्टी करण्यास ते अनुकूल होते, पण त्यासाठी भारतीयांच्या हाती राजकीय सत्ता येणे त्यांना आवश्यक वाटत होते.

युरोपात किंवा अमेरिकेतही पोथीनिष्ठ समाजवाद स्वीकारला जाण्याची शक्यता फार कमी आहे असे त्यांचे मत होते. भारतात समाजवाद येण्याची शक्यता तर त्याहून कमी, कारण कामगारांच्या अडाणीपणामुळे त्यांच्यात वर्गभावना जागृत होणे फार कठीण आहे असे त्यांना वाटे. भाषा, धर्म वगैरे भेदांमुळे कामगारवर्गात सहकार्याची भावना निर्माण होणे जवळजवळ अशक्य आहे असे ते म्हणत. खेरीज प्राप्त परिस्थितीत उत्पादनाच्या समाजीकरणापेक्षा किंवा संपत्तीच्या वितरणातील सुधारणेपेक्षा भारतापुढची खरी महत्त्वाची समस्या सबंध देशाचा आर्थिक विकास साधणे ही आहे, असे त्यांनी निःसंदिग्धपणे म्हटलेले आहे.[६३] जवळजवळ साठ वर्षांपूर्वी समाजवादाच्या स्थापनेतील ज्या अडचणींचा व त्या चळवळीवरील ज्या आक्षेपांचा केतकरांनी उल्लेख केला त्याच अडचणी आणि तेच आक्षेप कमीअधिक फरकाने आजही घेतले जातात हे अर्थपूर्ण आहे.

राजकीय चळवळीबद्दल केतकरांना वाटणारे कुतूहल व आस्था कधी कमी झाली नाही. ज्ञानकोशाची समाप्ती नजरेच्या टप्प्यात येताच केतकरांनी आपला पुढील कार्यक्रम जाहीर केला : " हिंदुस्थानाला स्वराज्य प्राप्त करून देणे हेच पुढच्या आयुष्यातील अनेक वर्षांचे कार्य ठेवावे असा माझा हेतू आहे. या कार्याकडे एकनिष्ठेने मला ज्ञानकोशाच्या समाप्तीनंतर लागता येईल. या कार्याकडे एकनिष्ठपणाने लागले आणि ते करताना निःशस्त्रांचे राजकारण आणि समाजसंघटना यांची तत्त्वे काळजीपूर्वक प्रचारात आणली म्हणजे स्वराज्य प्राप्त करून घेणे ही गोष्ट मेहनत करावयास लावणारी पण साध्य वस्तू आहे असा माझा दृढविश्वास आहे."[६४] त्यासाठी त्यांनी ' स्वयंनिर्णयी संघ ' स्थापन केला. १९२९ साली डोमिनियन स्टेटस म्हणजे साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळवणे हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. " परचक्रापासून मुक्तता मिळवून अंतर्गत वाढ प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या हिंदुस्थानास इंग्लंडच्या सहकार्याची जरुरी आहे व इंग्लंडला हिंदुस्थानाच्या सहकार्याची जरुरी आहे." म्हणून साम्राज्याच्या बाहेर पडण्यात हिंदुस्थानचेच हित नाही असा केतकरांचा युक्तिवाद होता. काँग्रेस पक्षाने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मजूर केल्यानंतरही केतकर मात्र डोमिनियन स्टेटसचीच मागणी करीत राहिले.

स्वराज्य म्हणजे प्रातिनिधिक संस्था असलेले लोकांचे राज्य ! प्रातिनिधिक लोकशाही राज्यपद्धतीत सुधारणा मंदगतीने होत असली तरी तिचा प्रवाह अधिक पद्धतशीर व अखंड वाहतो असा केतकरांचा विश्वास होता. स्वराज्यप्राप्तीच्या दृष्टीने देशात विविध राजकीय पक्षांनी चालवलेल्या चळवळींचा त्यांनी आढावा घेतला. त्या संदर्भात त्यांनी गांधीजींच्या नेतृत्वाचे व कार्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला. " महात्मा गांधींचे अवतारकृत्य १९२४ च्या काँग्रेस आठवड्यात संपले" हे त्यांचे मत चुकीचे असल्याचे पुढे इतिहासानेच सिद्ध केले. मात्र गांधीजींच्या असहकाराच्या आंदोलनाचे दोष सांगताना त्यांनी त्या चळवळीच्या गुणांकडे दुर्लक्ष केले नाही. असहकाराचे

तत्त्व सर्वजनव्यापी म्हणजे दुबळ्या माणसांनाही अमलात आणण्यासारखे तत्त्व होते. गांधीजींची चळवळ ब्रिटिश जातीविरुद्ध नसून अनियंत्रित राज्यपद्धतीविरुद्ध होती. या अर्थाने "मवाळांच्या व लोकमान्य टिळकांच्या जुन्या तत्त्वाचा महात्माजींनी निर्मल चित्ताने व जोराने पुरस्कार केला."[६५] सर्वसुधारणा अनत्याचारीपणाने आणि असहकारितेचे शासन वापरून घडवून आणण्याच्या गांधीजींच्या तत्त्वाने "जगाच्या भावी राजनीतीमध्ये मोठी क्रांती घडून येणार आहे"[६६] असाही केतकरांनी निर्वाळा दिला आहे. "राजकारणासाठी म्हणून अवश्य असलेल्या सामुच्चयिक नैतिक विकासाकडे तर महात्मा गांधींखेरीज कोणीच लक्ष दिले नाही" याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

या गुणग्रहणाबरोबर केतकरांनी गांधींच्या चळवळीतील दोषही दाखवले. गांधीजींनी राजकीय प्रश्नात दुसरे अनेक प्रश्न मिसळले. त्यांनी आपला कार्यक्रम अनेक आगंतुक गोष्टींनी बद्ध करून अवजड व अव्यवहार्य केला. चरख्याचा कार्यक्रम अनावश्यक होता. मात्र चरख्याच्या चळवळीमागचे तत्त्व महत्त्वाचे आहे हे केतकरांनी हेरले होते. खेड्यापाड्यांत लोकांस वर्षभर पुरेल इतके काम नसते. खादीच्या प्रचारामागे मनुष्याचे निरुद्योगाचे दिवस कमी करण्याचा हेतू होता तो त्यांना प्रशंसनीय वाटला. आपल्या व गांधीजींच्या दृष्टिकोणातील फरक सांगताना केतकर म्हणतात : "महात्मा गांधींना पाश्चात्त्य पद्धतीचा औद्योगिक विकास नको आहे. मला तो हवा आहे. माझे असे मत आहे की, ज्याअर्थी भौतिक शक्तीचा उपयोग उत्पादन सवंग करण्याकडे होत आहे आणि तो वाढत जाईल त्याअर्थी त्यांचा उपयोग न करणे हा वेडेपणा आहे. गांधींनी तो वेडेपणा व्यवहारात कधीच दाखविला नाही." असे म्हटल्यानंतर गांधीजींच्या सैद्धान्तिक भूमिकेमागची त्यांची मनोवृत्ती जाणण्याचाही केतकरांनी प्रयत्न केला: "जुन्या प्रकारच्या आणि नष्ट होऊ पाहणाऱ्या साध्या आयुष्यक्रमाकडे त्यातील माधुर्याची आठवण ठेवून स्नेहबुद्धीने पाहणारा परंतु अर्वाचीन हत्यारांचा उपयोग होता होईतो पण क्रमप्राप्त म्हणून करणारा असे महात्मा गांधींच्या मनोवृत्तीचे स्पष्टीकरण होते."[६७]

गांधीजींचे गुणग्रहण करून दोषदिग्दर्शन करणारे केतकर अखेरच्या वर्षांत मात्र गांधीजींविषयी वाटेल ते लिहू लागले. गांधीजींची भारतीय राजकारणातील भूमिका प्राचीन संस्कृत नाटकातल्या क्षपणकासारखी होती असे ते म्हणू लागले. गांधीजी वर्तमानपत्रवाल्यांना पैसे चारतात व त्यामुळे व्यक्तिशः त्यांचा द्वेष करणारे अनेक संपादक त्यांची स्तुतिस्तोत्रे गातात, असाही आरोप केतकरांनी बिनदिक्कतपणे केला. गांधीजींनी जमवलेल्या एक कोटी रुपयांहूनही जास्त निधीच्या—टिळक स्वराज्य फंडाच्या — हिशोबाविषयीही त्यांनी संशय व्यक्त केला. गांधीजी हे अप्रामाणिक नेते आहेत, दक्षिण आफ्रिकेतील कार्यात त्यांना पूर्णपणे अपयश आले व त्यांच्यामुळे तेथील भारतीयांची स्थिती पूर्वीपेक्षा वाईट झाली, असे तेथील लोकांचे

मत असल्याचे शोधही केतकरांनी लावले.[६८] 'व्हिक्टोरियिस इंडिया' या पुस्तकात केतकरांचा तोल पार गेलेला दिसतो. ज्ञानकोशाची गुजराती आवृत्तीं काढण्यास गांधीजींनी केलेल्या विरोधामुळे त्यांना गांधीजींबद्दल आलेला संताप या पुस्तकात व्यक्त झाला आहे.

अखेरच्या वर्षांतील केतकरांची राजकीय घडामोडींबद्दलची मते अफाट व अजब होती. आरंभीच्या काळातील व ज्ञानकोश-समाप्तीपूर्वीची त्यांची राजकीय घडामोडी जाणून घेण्याची शक्ती पूर्णपणे गमावून ते केवळ कल्पनासृष्टीत रममाण झाले होते आणि आपल्या विरोधकांवर प्रहार करून त्यांना लोळवल्याचे समाधान ते मिळवीत होते की काय, असे वाटू लागते. १९३५ च्या कायद्यान्वये भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे अशी त्यांनी समजूत करून घेतली होती. या कायद्यानुसार भारतातील शासनावरचा ब्रिटनच्या संसदेचा अधिकार संपूर्णपणे नष्ट झाला आहे आणि ही वस्तुस्थिती भारतातील कोणत्याही राजकीय नेत्याच्या लक्षात आलेली नाही असे त्यांचे म्हणणे होते. भारत हा ब्रिटनने जिंकलेला देश नसल्यामुळे त्यास ब्रिटनची वसाहत म्हणता येणार नाही. तेथील सार्वभौम सत्तेने ईस्ट इंडिया कंपनीत दिवाण नेमून आपण होऊन ब्रिटनशी साहचर्य वाढवले; पुढे ब्रिटनमधल्या संसदेने ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटनच्या राजाकडे आलेल्या दिवाणगिरीचे अधिकार बळकावून त्यांचा वापर करण्यास सुरुवात केली. ब्रिटनच्या संसदेच्या या कृत्यातील बेकायदेशीरपणाविरुद्ध आपण प्रथम आवाज उठवला, न्यायालयात खटले भरून हा बेकायदेशीरपणा चव्हाट्यावर आणला व हिंदुस्थानवरची बेकायदेशीर सत्ता सोडण्यास ब्रिटनला आपण भाग पाडले, असा केतकरांचा दावा होता. १९३५ च्या कायद्यानुसार भारत स्वतंत्र झाला आहे तो आपल्या एकाकी लढतीमुळे—असे असताना त्याचे श्रेय कोणीही आपल्याला देत नाही अशी त्यांनी तक्रार केली.[६९]

अखेरच्या वर्षांतले केतकरांचे लेखन हे असे आहे! ते वाचून कोणाही अभ्यासकाचे मन सुन्न व्हावे असाच हा प्रकार होता. संशोधनाच्या क्षेत्रात आरंभीच्या काळात व ज्ञानकोशाची रचना करीत असताही अधूनमधून त्यांनी इतरांच्या विचारांना चालना देण्याचे व नव्या दिशा धुंडाळण्याचे कसब दाखवले होते. तीस-चाळीस वर्षांनंतरच्या काळात औद्योगिक समाजाचे जे विकसनशील रंगरूप दिसणारे होते ते आधीच ओळखून, त्या समाजातल्या संभाव्य समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्योगात केतकर कितीतरी वर्षे आधीच मग्न झालेले होते. "प्राथमिक शिक्षण व शहराची साफसफाई, पाण्याचा पुरवठा व रस्त्यात दिवे लावणे यापलीकडे" नागरिकांच्या कर्तव्याविषयीच्या कल्पना ज्या काळात जात नव्हत्या त्या काळात नगरसंवर्धनाचा व नगरसौंदर्याचा केतकर विचार करीत होते: "गिरण्यांतील यंत्रे जशी द्रव्योत्पादनाची साधने आहेत त्याप्रमाणेच शहरातील रस्ते, शहराची मांडणी, शहरातील शिक्षण, तेथील लोकांच्या सवयी, राहणी वगैरे सर्व गोष्टी द्रव्योत्पादनास

उत्कर्षक आणि अपकर्षक असतात. या सर्व गोष्टींचा शहराने विचार करावा व त्याप्रमाणे वृद्धी कोणत्या गोष्टींची करावयाची, फेरबदल कोणत्या गोष्टींत करावयाचा, व तो फेरबदल करण्यासाठी नाश कशाचा करावयाचा यासंबंधाने आपला कार्यक्रम ठरवावा." [७०] .नगरनियोजनाची भाषा ज्या काळात रूढ झाली नव्हती तेव्हा त्याचे महत्त्व केतकर प्रतिपादन करीत होते. आर्थिक दृष्ट्या प्रगत समाजात विक्रीची पद्धतीदेखील पुढे गेलेली असते हे जाणून माल कसा खपवावा यासंबंधीचे अनुभवाचे बोल त्यांनी ऐकवले. व्यापारविषयक वाङ्मय आपल्या भाषेत फारसे नसताना त्यांनी ते वाढण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. टपालविक्रीच्या पद्धतीने आपल्याकडेही माल विकण्यास कसा वाव आहे याचे जसे त्यांनी विवरण केले, त्याचप्रमाणे जाहिरातीचे युग अवतरण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी जाहिरात करण्याच्या तंत्राविषयी त्यांनी तपशिलाने लिहिले.

ज्या काळात स्त्रियांसाठी नियतकालिके निघत नव्हती व स्त्रियांकरिता केल्या जाणाऱ्या चळवळी बऱ्याच अंशी पुरुष करीत होते त्या काळात केतकर स्त्रियांना इशारा देत होते : "स्त्रियांस स्त्रियांच्या कैवारी पुरुषांवर पूर्णपणे विसंबता येणार नाही. स्त्रियांची व पुरुषांची दृष्टी नेहमी एकच असेल असे नाही व पुरुष स्त्रियांचे कैवारी असते तरी त्यांच्या स्त्रियांनी काय करावे यासंबंधाच्या त्यांच्या कल्पनांस पुष्कळच मर्यादा असणार हे सुशिक्षित स्त्रियांनी पक्के लक्षात ठेवले पाहिजे....स्त्रियांनी केवळ स्त्रियांसंबंधाच्याच प्रश्नात लक्ष घालावे असे नाही...समाजापुढे येणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर विचार करणाऱ्या स्त्रिया आमच्यात असल्या पाहिजेत व तशा असल्या तरच त्यांस जे राजकीय हक्क मिळाले आहेत त्याचे समर्थन होईल." [७१] "राहणी काटकसरीची कशी करावी, स्त्रियांचे घरगुती श्रम कसे कमी करावेत, शिशुसंगोपनाच्या नवीन कोणत्या गोष्टी प्रचारात आणाव्यात, पाश्चात्त्य समाजात ज्या गृहसुधारणेच्या अर्वाचीन पद्धती वापरल्या जातात त्यांपैकी आपल्याकडे सार्वत्रिक कोणत्या करता येण्याजोग्या आहेत, स्त्रियांना मोकळी हवा अधिक उपलब्ध होण्यास काय करावे, महाराष्ट्रीय जनतेचे जेवण कसे सुधारीत न्यावे, शरीरपोषक अन्न या दृष्टीने रोजच्या दैनिक जेवणाची किंमत काय आहे" [७२] यांसारख्या अनेक गोष्टींविषयी विचार झाला पाहिजे असे ते सांगत होते. "महाराष्ट्रीय जनतेत जीवनकलह अधिकाधिक वाढू लागल्यामुळे मध्यमवर्गाचे आयुष्य अधिकाधिक कठीण होत चालले आहे आणि हीच प्रवृत्ती दिवसानुदिवस वाढत जाणार आहे" असे निःशंक भाकित वर्तवून केतकरांनी त्या संदर्भात मध्यमवर्गातील स्त्रियांनी उद्योगधंद्यात प्रवेश केल्यावर निर्माण होणाऱ्या समस्यांचे स्वरूप अजमावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. [७३]

भावी काळात निर्माण होणाऱ्या समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न जसा त्यांनी केला, त्याचप्रमाणे ज्या विषयांच्या वाटेला कोणी सहसा गेले नाही ते विषय हाताळण्याचा किंवा ज्ञानाच्या क्षेत्रातील रूढ मतांविरुद्ध विचार मांडण्याचाही त्यांनी

प्रयत्न केला. महाराष्ट्रीयांच्या काव्याभिरुचीचे परीक्षण करण्याचा त्यांनी केलेला उपक्रम अभूतपूर्व होता. वाङ्मयाभिरुचीचे समाजशास्त्र जाणण्याच्या फंदात पडलेले फारसे समाजशास्त्रज्ञ आजही आढळत नाहीत. लेव्हिन शूकिंग या अभ्यासकाने १९३१ साली जर्मन भाषेत प्रसिद्ध केलेला 'वाङ्मयाभिरुचीचे समाजशास्त्र' हा ग्रंथ या विषयावरचा एक अपवादभूत असा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. केतकरांचे पुस्तक हे त्याही आधी तीन वर्षे प्रकाशित झाले होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.[७४] सामाजिक व वैज्ञानिक परिस्थितीचा वाङ्मयोत्पादनावर झालेला परिणाम दाखवून त्याच परिस्थितीचा महाराष्ट्रीयांच्या काव्यपरीक्षणावरही कसा प्रभाव पडला आहे त्याचे विश्लेषण केतकरांनी या पुस्तकात केलेले आहे. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या तिसऱ्या विभागात ब्राह्मण्याचा इतिहास देताना त्यांनी गोत्र व प्रवर यासंबंधी जे विवेचन केले ते तोपर्यंत रूढ असलेल्या मताविरुद्ध होते हे ध्यानात ठेवावयास हवे. गोत्र ही संस्था फार प्राचीन नाही. गोत्रांचा वैदिक धर्मसंस्थेत महत्त्वाचा संबंध नाही. हे सर्व भेद सूत्रकालीन आहेत. प्रवरांशी गोत्रांचा संबंध सूत्रकालीन होय हे केतकरांचे प्रतिपादन नवीन होते. पुढे हाच धागा पकडून एस. व्ही. करंदीकरांनी भरभक्कम पुराव्यानिशी छाननी करून या मताला पुष्टी दिली[७५]

नवनवीन कल्पनांनी केतकर झपाटले जात. एखाद्या नव्या कल्पनेने भारले की मग ते तिचा पिच्छा पुरवीत. तशात रूढ मताला धक्का देणारा एखादा विचार सुचला की खळबळजनक पद्धतीने तो मांडल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. काही वेळा आपल्याला सुचलेल्या नव्या विचारावर किंवा कल्पनेवर ते स्वतःच इतके खूष होत असत की, त्यातले तथ्य पारखून पाहण्याइतका धीर त्यांना राहत नसावा. केतकरांच्या संशोधनतंत्राचे डॉ. प. ल. वैद्य यांनी मार्मिक वर्णन केले आहे : "डॉ. केतकर म्हणजे मूर्तिमंत साहस! अगदी सूक्ष्म दिसणाऱ्या गोष्टींच्या आधारावर एक टोलेजंग हवेली उभी करावयाची व तिची सजावट करावयाची हा त्यांचा नेहमीचा उद्योग. हा उद्योग सफल झाल्यास ब्राह्मण्याचे म्हणजे ज्ञानोपासनेचे सार्थक झाले असे ते म्हणणार, आणि आपले मत विरुद्ध पक्षाने खोडून काढावे असे त्यास आव्हानही ते देणार! हे आव्हान स्वीकारण्याची पात्रता असणारा विद्वान महाराष्ट्रात पुनः केव्हा निर्माण होईल तो होवो!"[७६]

डॉ. केतकरांनी संपादित केलेल्या ज्ञानकोशाच्या रचनेतही त्यांच्या या विशिष्ट तंत्रामुळे त्यांच्या काही आवडत्या विषयांना व कल्पनांना वाजवीपेक्षा जादा महत्त्व मिळालेले दिसते.. त्यामुळे जागा पुष्कळ अडविली जाते आहे हे त्यांच्या लक्षात येत नव्हते असे नाही, पण ते त्यांनी मनावर न घेता उलट त्याचे समर्थनच केलेले दिसते. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या तिसऱ्या विभागात 'वेदकालातील शब्दसृष्टी' या प्रकरणाने तीनशेहून अधिक पाने अडवलेली आहेत. "या शब्दांनी जागा पुष्कळ अडविली आहे ही गोष्ट खरी, पण हे शब्द सर्व भावी भारतीय ऐतिहासिक संशोधनाचा

पाया असल्यामुळे त्यास लागणारी जागा आम्ही निर्भयपणाने देत आहो " ७७ असे त्यांनी प्रकरणाच्या सुरुवातीलाच सांगितले आहे. वेदकाळाविषयी संशोधन करण्याची जबरदस्त इच्छा असल्यामुळे ज्ञानकोश रचताना ती हौस त्यांनी पुरवून घेतली. परिणामतः ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या पाच विभागांत वेदकालाविषयीच्या विवेचनाने प्रमाणाबाहेर जागा अडवलेली आहे. दुसऱ्या विभागात तर चक्क ' विषयांतर ' असे शीर्षक देऊन वेदोक्त इतिहास व आख्यायिका सांगण्याची संधी केतकरांनी घेतलेली दिसते. भारतीय संस्कृतीचा इतरत्र जो प्रसार झाला त्याचे वर्णन करण्यात केतकरांनी दोनशेहून अधिक पाने खर्ची घातली आहेत, तर बाह्यांचा हिंदुस्थानावर झालेला परिणाम या विषयासाठी जेमतेम चाळीस पाने बहाल करण्यात आली आहेत. त्यातही रामायण हा ग्रंथ होमरचे कथानक भारतात आल्यामुळे झाला, या वेबरच्या मताची व त्यासंबंधी लासेन व तेलंग यांनी केलेल्या युक्तिवादाची माहिती देण्यातच वीस पाने—म्हणजे या प्रकरणाचा अर्धाधिक भाग—व्यापलेली आहेत. केतकरांचा निष्कर्षही अपेक्षित आहे : " या सर्व गोष्टींवरून होमरचा ग्रंथ केवळ ग्रीक असून बाकीचे त्याच्यासारखे ग्रंथ सर्व त्याच्या नकला आहेत असे म्हणण्याचे कारण नाही हे उघड आहे. विशेषतः वाल्मिकीच्या विरुद्ध आहे असे विधान करता येणार नाही. "७८ याचाच अर्थ असा की, ' बाह्यांचा हिंदुस्थानवर परिणाम ' काय झाला हे दाखवण्यासाठी केतकरांनी जेमतेम चाळीस पाने लिहिली असली तरी त्यांतली वीस पाने, होमरचा वाल्मिकीवर परिणाम झाला नसणार हे सिद्ध करण्यातच खर्च झाली आहेत.

केतकरांनी हे सारे अनवधानाने केले असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे स्वरूप सांगताना त्यांनी स्वतःच याबाबत खुलासा केला आहे : " भारतीय ज्ञानकोशाची शेकडा ३५ पृष्ठे भारतीय संस्कृतीच्या स्पष्टीकरणासाठी दिली आहेत, आणि केवळ शेकडा १५ पृष्ठे बाह्य संस्कृतीच्या उद्बोधनासाठी दिली आहेत. आमची योजना ज्या वेळेस प्रसिद्ध झाली त्या वेळेस काही पत्रकारांनी याबद्दल ज्ञानकोशकारांस पक्षपाताचा दोषही दिला होता. त्यांनी जे स्पष्टीकरण केले होते तेच पुनः एकदा करतो. परक्या देशांची आपणास केवळ स्थूल माहिती हवी असते, तथापि आपल्या देशाची आपणास सूक्ष्म माहिती पाहिजे असते. आपल्या देशाची माहिती देताना, आपल्या देशातील पंडितवर्गास उपयोगी पडेल असा ग्रंथ केला पाहिजे. सामान्य जनता व आपल्या देशासंबंधाने संशोधन करणारा वर्ग यांच्या ज्ञानात जे आज जमीनअस्मानाचे अंतर आहे, ते काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रीय जनतेची ही मोठी बौद्धिक गरज आहे आणि ज्ञानकोशकारांनी ती लक्षात घेतली पाहिजे. महाराष्ट्रीयन ज्ञानकोश हा महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्याचा झालेला प्रयत्न होय. "७९

केतकरांची ज्ञानकोशरचनेमागची ही भूमिका लक्षात घेतली तरीही फ्रेंच

राज्यक्रांतीसारख्या जगाच्या इतिहासास वळण लावणाऱ्या घटनेबद्दल ज्ञानकोशात दिली आहे त्यापेक्षा अधिक विस्ताराने माहिती द्यावयास हवी होती असे वाटल्यावाचून राहात नाही. ‘लोकसत्ता व लोकमत यांजकडून अपेक्षा’ या विषयासंबंधी कशीबशी पाच पाने विवेचन केले आहे त्यापेक्षा अधिक सखोल व विस्तृत विवेचन केले जाणे जरूर होते. “व्यापारविषयक व आर्थिक संबंधांचे यात फारच अल्पत्वाने विवेचन आले आहे” हे स्वत: केतकरांनीच कबूल केले आहे. “आर्थिक संबंधांचे विस्तृत विवेचन करावयास अवश्य साहित्य वेळेवर मिळाले नाही”[८०] असे या उणिवेचे कारणही त्यांनी सांगितले आहे. युरोपमधल्या प्रबोधनाबद्दल किंवा धर्मसुधारणेच्या चळवळीबद्दलही फार जुजबी माहिती देऊन तो विषय आटोपता घेण्यात आला आहे. ज्ञानकोशासारख्या ग्रंथात जागतिक इतिहासातील या महत्त्वाच्या घटनांची त्यापेक्षा अधिक दखल घेणे जरूर होते.

खरे म्हणजे ज्ञानकोशाच्या तेवीस खंडांवर केतकरांची सावली पडलेली दिसते. त्यांचे ग्रह, आग्रह व पूर्वग्रह, आवडीनिवडी, रागलोभ कळत-नकळत त्यात उमटले आहेत. केतकरांच्या जागी त्यांच्यापेक्षा कमी प्रतिभाशाली, कमी आग्रही माणूस मुख्य संपादक असता तर हे मूलत: संकलनात्मक काम अधिक प्रमाणबद्ध झाले असते. त्यात पूर्वगौरववादी राष्ट्रवाद जितक्या प्रकर्षाने जाणवतो तितका कदाचित जाणवला नसता. ब्राह्मण्याचा विकास, इतिहास याला जे प्राधान्य मिळालेले दिसते ते मिळाले नसते. मात्र ज्या परिस्थितीत केतकरांनी हा उद्योग आरंभला व तडीला नेला, त्या परिस्थितीत अन्य कोणी असले साहस करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता कमीच होती व ही हिंमत कोणी दाखवली असतीच तरी ती शेवटपर्यंत कितपत राहिली असती हे सांगणे कठीणच आहे.

ज्ञानकोशाचे ग्राहक कोण होते याबद्दल खुद्द केतकरांनीच माहिती दिली आहे : “ज्ञानकोश हा ग्रंथ महाराष्ट्रीय जनतेसाठी केला आणि महाराष्ट्रातील निरनिराळ्या वर्गांतून खास गिऱ्हाइकी मिळाली. गिऱ्हाइकीचे पृथक्करण केले तर जवळजवळ दोन-तृतीयांश गिऱ्हाइकी ब्राह्मणांतील निघेल. सुमारे ५ शे गिऱ्हाइकी संस्थानांतील आहे. सुमारे २५० गिऱ्हाइकी मराठे व तत्सम जाती यांची आहे व इतर जातींची गिऱ्हाइकी कमी आहे. कायस्थ प्रभूंमध्ये व पाठारे प्रभूंमध्ये मिळून गिऱ्हाइकी ६० च्या आतच आहे. पारशी व मुसलमान या दोहोंतील गिऱ्हाइकी १०च्या आतच आहे.”[८१] ज्ञानकोशाचे स्वरूप लक्षात घेतले तर त्याच्या गिऱ्हाइकांमध्ये दोनतृतीयांश ब्राह्मण गिऱ्हाईक आढळले नसते तरच नवल वाटण्याजोगे होते.

अनंत अडचणींवर मात करून केतकरांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोशासारखा ग्रंथ रचला आणि तो विकलादेखील! खरे म्हणजे ज्ञानकोशासारख्या ग्रंथात उपलब्ध ज्ञानाची संगतवार व प्रमाणबद्ध मांडणी करावयाची असते. त्यातील मजकुरात, त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, नवे असे काहीच नसते. अत्यंत विविध माहितीचे एकीकरण

हे अशा प्रकारच्या ग्रंथाचे वैशिष्ट्य असते. अभ्यासकांच्या सोयीसाठी असे संकलनात्मक ग्रंथ कोणत्याही समाजात निर्माण होणे आवश्यक असते. पण काही झाले तरी असे संदर्भग्रंथ नवे विचार मांडणाऱ्या, भावी संशोधनास किंवा विवक्षित ज्ञानक्षेत्रातील प्रगतीस चालना देणाऱ्या ग्रंथांची जागा घेऊ शकत नाहीत. जेव्हा नवे काही सांगण्यासारखे उरलेले नसते किंवा ज्याला नवे काही सांगायची कुवत नसते त्याने अशा ग्रंथांच्या निर्मितीत लक्ष घालावयाचे असते. त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे सहकार्य मिळवून, त्यांना वेळच्या वेळी लिहावयास लावून संघटनकौशल्याच्या जोरावर असली कामे पुरी करावयाची असतात. केतकरांसारख्या कल्पक प्रतिभावंताचे हे काम नव्हते. तशात त्यांनी हा उद्योग तरुण वयात आरंभला. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत तो पुरा केला. ज्ञानकोशाची निर्मिती करून व नंतरच्या अडचणी निस्तरता निस्तरता केतकर बौद्धिक दृष्ट्या फार थकले असावेत. कदाचित तीव्र स्वरूपाच्या मधुमेहामुळेदेखील त्यांच्या बौद्धिक शक्ती क्षीण झाल्या असतील. कारणे काहीही असोत, अखेरच्या वर्षांतील केतकरांच्या लेखनातील कस झपाट्याने कमी होत चालला होता, हे कोणाही अभ्यासकास जाणवल्यावाचून राहात नाही. म्हणूनच वाटते, केतकरांनी ज्ञानकोशरचनेचे हे काम हाती घ्यावयास नको होते!

## संदर्भटिपा

१. 'मी व माझे टीकाकार'; 'ज्योत्स्ना', वर्ष १, अंक २; जून १९३६; पृष्ठ ८

२. 'संकीर्ण लेख'; श्रुतिबोध मुद्रामंदिर, मुंबई; पृष्ठ ६२

३. कित्ता; पृष्ठे ६८–७०

४. 'विद्यासेवक'; वर्ष ५, अंक ४; जुलै १९२९; पृष्ठ ६

५. 'माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास'; १९२७; पृष्ठ १५४

६. 'विद्यासेवक'; वर्ष ५, अंक १; एप्रिल १९२८; पृष्ठ ७५

७. 'माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास'; पृष्ठे १५४–१५५

८. 'विद्यासेवक'; वर्ष ५, अंक २; मे १९२८; पृष्ठ ६

९. कित्ता; वर्ष ५, अंक ४; जुलै १९२९; पृष्ठ ८

१०. दा. ना. आपटे; 'डॉ. केतकर आणि प्राचीन महाराष्ट्र', 'लोकशिक्षण'; वर्ष ८, अंक १; जलै १९३७; पृष्ठ २८

११. चिं. वि. जोशी; 'अभिरुची'; मे १९४५; पृष्ठ ७४

१२. श्री. के. क्षीरसागर; 'डॉ. केतकर : व्यक्ती आणि विचार'; कॉंटिनेन्टल प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९५५; पृष्ठ ३१

१३. 'भारतीय समाजशास्त्र'; नवभारत ग्रंथमाला; १९३६; पृष्ठे ६८–६९

१४. 'ॲन एसे ऑन हिंदुइझम'; लूझॅक ॲंड कंपनी, लंडन; १९११; पृष्ठ १०७

१५. बी. आर. आंबेडकर, 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट ॲंड कास्ट्स इन इंडिया'; भीम पत्रिका पब्लिकेशन्स, जलंदर; १९६८; पृष्ठ १३३
१६. 'दि हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया', खंड १; टेलर ॲंड कार्पेंटर, न्यूयॉर्क; १९०९; पृष्ठ ९७–९८
१७. कित्ता; पृष्ठ ११५
१८. 'हिंदू लॉ'; एस. के. लाहिरी ॲंड कंपनी, कलकत्ता; १९१४; मलपृष्ठावरील जाहिरातीत उद्धृत केलेला अभिप्राय.
१९. 'ॲन एसे ऑन हिंदुइझम'; पृष्ठे ३७–३९
२०. कित्ता; प्रस्तावना; पृष्ठ २५
२१. 'भारतीय समाजशास्त्र'; सुविचार प्रकाशन, नागपूर; १९३६; पृष्ठे २०४–२०५
२२. 'संकीर्ण लेख'; पृष्ठ ४५
२३. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश', शरीरखंड, विभाग चवदावा; १९२५; पृष्ठ २१५
२४. कित्ता; पृष्ठ २१६
२५. 'भारतीय समाजशास्त्र'; सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर; १९३६; पृष्ठे २०६–२०८
२६. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' शरीरखंड, विभाग सातवा; पृष्ठ ६५१
२७. 'विद्यासेवक'; वर्ष ३, अंक २; एप्रिल १९२६; पृष्ठ २६
२८. कित्ता; वर्ष ४, अंक ६; ऑगस्ट १९२७; पृष्ठ ४
२९. कित्ता; वर्ष ५, अंक १; एप्रिल १९२८; पृष्ठ १७
३०. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश', प्रस्तावनाखंड, विभाग तिसरा; पृष्ठ ५११
३१. 'भारतीय समाजशास्त्र'; पृष्ठे २४०–२४१
३२. 'ॲन एसे ऑन हिंदुइझम'; पृष्ठ ८३
३३. कित्ता; पृष्ठ ६०
३४. 'भारतीय समाजशास्त्र'; पृष्ठ २४२
३५. 'दि हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया', खंड पहिला; पृष्ठ १२२
३६. 'हिंदू लॉ'; पृष्ठ ७१
३७. 'संकीर्ण लेख'; पृष्ठे ३४–३५
३८. कित्ता; पृष्ठे ६३–६४
३९. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश', प्रस्तावनाखंड, विभाग चवथा; १९२३; पृष्ठ १५४
४०. 'माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास'; पृष्ठे १७१–१७२
४१. कित्ता; पृष्ठे १८२–१८३
४२. ब्राइस रीअन; 'कास्ट इन मॉडर्न सिलोन'; रटजर्स युनिव्हर्सिटी प्रेस, न्यू जर्सी; १९५३; पृष्ठे ३२–३६

४३. ‘ ॲन एसे ऑन हिंदुइझम ’; पृष्ठ १२८
४४. ‘ संकीर्ण लेख ’; पृष्ठे ८०–८१
४५. ‘ भारतीय समाजशास्त्र ’; पृष्ठ ५९
४६. ‘ महाराष्ट्रीय ज्ञानकोश ’, विभाग सातवा; पृष्ठ ( आ ) ४९
४७. ‘ महाराष्ट्रीय ज्ञानकोश ’, विभाग चवदावा; पृष्ठ ( जा ) २३१
४८. कित्ता; पृष्ठ ( ट ) ३५
४९. कित्ता; प्रस्तावनाखंड, विभाग पहिला; पृष्ठ ४२३
५०. ‘ संकीर्ण लेख ’; पृष्ठ ४८
५१. द. न. गोखले; ‘ डॉ. केतकर ’; मौज प्रकाशन; १९५९; पृष्ठ २१७
५२. ‘ महाराष्ट्रीय ज्ञानकोश ’, प्रस्तावनाखंड, विभाग पहिला; पृष्ठ ४२६
५३. कित्ता; विभाग अठरावा; पृष्ठे ( म ) १८०–१८१
५४. ‘ विद्यासेवक ’; वर्ष २, अंक ३; नोव्हेंबर १९२५; पृष्ठे १–३
५५. कित्ता; वर्ष १, अंक ३ व ४; नोव्हेंबर-डिसेंबर १९२४; पृष्ठ १२
५६. ‘ ॲन एसे ऑन हिंदुइझम ’; पृष्ठे १४६–१४७
५७. ‘ माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास ’; पृष्ठ १९
५८. ‘ ॲन एसे ऑन इंडियन इकॉनॉमिक्स ’; १९१४; पृष्ठे १०८–१०९
५९. ‘ महाराष्ट्रीय ज्ञानकोश ’, प्रस्तावनाखंड, विभाग पहिला; १९२०; पृष्ठ ७६
६०. कित्ता, विभाग चवथा; १९२३; पृष्ठ ५१३
६१. कित्ता, विभाग अठरावा; पृष्ठ ( म ) १४०
६२. वात्स्यायन यांच्या ‘ रतिशास्त्रमीमांसा ’ या पुस्तकाला केतकरांनी लिहिलेली प्रस्तावना; १९३४; पृष्ठे १–१०
६३. ‘ ॲन एसे ऑन इंडियन इकॉनॉमिक्स ’; पृष्ठ १०४
६४. ‘ निःशस्त्रांचे राजकारण ’; १९२६; पृष्ठ १
६५. कित्ता; पृष्ठ ५४
६६. कित्ता; पृष्ठ ५५
६७. कित्ता; पृष्ठ १५६–१५७
६८. ‘ व्हिक्टोरियस इंडिया ’; १९३७; पृष्ठे १३७–१४२
६९. कित्ता; पृष्ठे २–३
७०. ‘ संकीर्ण लेख ’; पृष्ठ १४३
७१. ‘ विद्यासेवक ’; वर्ष १, अंक ८; एप्रिल १९२५; पृष्ठ ११
७२. कित्ता; वर्ष १, अंक ११; जुलै १९२५; पृष्ठ १५
७३. कित्ता; वर्ष २, अंक ३; नोव्हेंबर १९२५; पृष्ठ १३
७४. कित्ता; वर्ष ४, अंक ११–१२; जानेवारी-फेब्रुवारी, १९२८

७५. जी. एस. घुर्ये; ' द्र ब्रॅह्मनिकल इन्स्टिटयूशन्स–गोत्र अँड चरण '; पॉप्युलर प्रकाशन; १९७२; पृष्ठ ८–९
७६. ' लोकशिक्षण '; वर्ष ८, अंक १; जुलै १९३७; पृष्ठ २०
७७. ' महाराष्ट्रीय ज्ञानकोश ', प्रस्तावनाखंड, विभाग तिसरा; पृष्ठ १५४
७८. कित्ता; विभाग पहिला; पृष्ठ ३२५
७९. ' माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास '; पृष्ठ १११–११२
८०. ' महाराष्ट्रीय ज्ञानकोश ', प्रस्तावनाखंड, विभाग पहिला; पृष्ठ ४८३
८१. ' माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास '; पृष्ठ १६९–१७०

— मौज : दिवाळी १९७३

○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○

# ८

## ' समाजस्वास्थ्य 'कारांची विचारसृष्टी

○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○○

कोणत्याही समाजात प्रस्थापित विचारसरणीपेक्षा वेगळी व विरोधी विचारसरणी मांडण्याचे धैर्य दाखवणाऱ्यांची एक तर उपेक्षा होते, नाही तर त्यांना हेटाळणीला व सामाजिक रोषाला तोंड द्यावे लागते. कालांतराने बदलत्या परिस्थितीच्या दडपणामुळे त्यांचा एखादा विचार समाजाला स्वीकारावा लागला किंवा समाजाच्या गळी उतरला की तेवढ्यापुरते त्याचे त्यांना श्रेय दिले जाते, नाही असे नाही; पण त्याबरोबरच अशा विचारवंतांची एक प्रतिमा जनमानसात पक्की होत जाते. जोतीराव फुले यांचे नाव घेताच त्यांचा सत्यशोधक समाज आठवतो, त्याचप्रमाणे ब्राह्मणप्रधान हिंदू समाजरचनेवर त्यांनी आवेशाने चढवलेला हल्लादेखील लक्षात येतो; मात्र जोतीरावांच्या आंदोलनाच्या तळाशी असलेला मूलभूत मानवी हक्कांचा विधायक विचार, फुल्यांचा वारसा सांगणारेही नजरेआड करतात. आगरकर म्हटले की ' स्त्रियांचे उद्धारकर्ते ' किंवा ' सुधारकाग्रणी ' इतकेच अनेकांना आठवते; सामाजिक प्रश्नांप्रमाणेच आर्थिक व राजकीय प्रश्नांसंबंधीही आगरकरांनी महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत व त्यांच्या सर्वच लेखनाच्या मुळाशी त्यांचा बुद्धिप्रामाण्यवाद आहे, हे अनेकांच्या गावीही नसते. ' समाजस्वास्थ्य 'कार रघुनाथ धोंडो कर्वे यांच्या बाबतीतही असेच घडले आहे.

' संततिनियमनाचे किंवा आजच्या रूढ भाषेत कुटुंबनियोजनाचे भारतातील आद्यप्रवर्तक ' एवढीच त्यांची आठवण आता शिल्लक उरली आहे. त्यांच्या हयातीतही, ' समाजस्वास्थ्या 'चे अंक ( बहुधा चोरून ) वाचणाऱ्या, त्यांच्या बहुसंख्य वाचकांना त्या अंकांच्या मुखपृष्ठावरची अर्धनग्न किंवा पूर्णनग्न स्त्रियांची चित्रे व त्यांतील

लैंगिक विषयांवरील लेख व पत्रव्यवहार यांचेच अधिक आकर्षण वाटत असावे असे दिसते. रघुनाथरावांच्या समकालीनांपैकी कितीजणांनी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांविषयीच्या त्यांच्या प्रतिक्रियांची गंभीरपणे दखल घेतली होती कोण जाणे! जवळजवळ सत्तावीस वर्षे या मासिकाद्वारा कर्वे बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेतून प्रगट समाजचिंतन करीत असत, याचा आता तर बहुतेकांना पत्ताही नसतो. अशा परिस्थितीत, त्यांच्या विचारांची चिकित्सा केली गेली नाही, यात आश्चर्य नाही.

रघुनाथरावांच्या निधनानंतरच्या गेल्या जवळजवळ वीस वर्षांच्या काळात त्यांच्या– विचारांचे व कार्याचे मूल्यमापन करण्याच्या -- निदान त्याचे स्वरूप समजावून घेण्याच्या – फंदात कोणताही अभ्यासक पडलेला दिसत नाही. खरे म्हणजे त्यांच्या संबंधी फारसे काही लिहिलेच गेले नाही. आपल्या थोर सासऱ्यांचे अविस्मरणीय व्यक्तिचित्र रेखाटणाऱ्या इरावतीबाईंनीही, का कोण जाणे, अण्णासाहेबांच्याच तोलाच्या किंबहुना काही बाबतींत त्यांच्याहूनही सवाई ठरणाऱ्या आपल्या थोरल्या दिराविषयी काहीच लिहिलेले नाही. रघुनाथरावांच्या निकटच्या सहकारी श्रीमती शकुंतलाबाई परांजपे अधून-मधून त्यांच्या आठवणीला उजाळा देतात, पण त्यांच्या त्रोटक लेखांचे स्वरूपही बहुंशी व्यक्तिचित्रणात्मकच असते. अलीकडे रघुनाथरावांचे एक छोटेसे चरित्र प्रसिद्ध झाले आहे. चरित्रकाराने त्यासाठी किमान 'समाजस्वास्थ्या'चे सर्व अंक वाचणे आवश्यक होते, पण त्याने ही तसदी घेतल्याचा पुरावा त्या पुस्तकात सापडत नाही. एवढेच नव्हे, तर "आपले ईश्वरदत्त कार्य पुरे करून 'समाजस्वास्थ्य' ही वैयक्तिक संस्था तिच्या जनकाबरोबरच अखेर लयास गेली" असले अभिप्राय देऊन, ईश्वराचे अस्तित्वच न मानणाऱ्या रघुनाथरावांवर त्यांच्या चरित्रकाराने चक्क सूड उगवला आहे. ('उपेक्षित द्रष्टा : प्रा. र. धों. कर्वे'; दिवाकर बापट; प्रथमावृत्ती, १४ जानेवारी १९७१; पृष्ठ २८). तसे पाहिले तर खुद्द रघुनाथरावांनी आत्मचरित्र लिहिले नसले तरी स्वतःविषयी प्रसंगपरत्वे काही कमी लिहिलेले नाही. 'समाजस्वास्थ्या'च्या अंकांतून विखुरलेले चरित्रपर उल्लेख एकत्र केल्यास, त्यांच्या कार्याला व विचाराला प्रेरणा देणाऱ्या व्यक्ती व घटना यांचा मागोवा घेणे फारसे अवघड नाही.

समाजस्वास्थ्याच्या पहिल्याच अंकात रघुनाथरावांनी आपला उद्देश स्पष्ट सांगितला आहे :

"व्यक्तींच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधी उपायांची चर्चा करणे हा या मासिकाचा उद्देश आहे. विशेषतः ज्या विषयासंबंधी लेख छापण्यास इतर पत्रकार लाजतात किंवा भितात असे विषय कितीही महत्त्वाचे असले तरी त्यासंबंधी माहिती मिळविण्यास सामान्य वाचकास अतिशय अडचण पडते व ही अडचण दूर करण्याचा आमचा विचार आहे. यात केवळ तत्त्वज्ञानाचा खलच न करता व्यवहारोपयोगी माहितीही दिली जाईल. 'कामशास्त्र' या शब्दाचा

दुरुपयोग झालेला आहे. तरीही, ‘ कामवासनेचा शास्त्रीय दृष्टीने विचार ’ अशा अर्थाने हा शब्द वापरणे आम्हास भाग पडत आहे. याबद्दल कोणासही क्षुब्ध होण्याचे कारण नाही. ” ( १ : १ : १ )[१]

बुद्धिवादी लेखकांकडे रघुनाथरावांचा विशेष ओढा होता. त्यांना अनेक विषयांची आवड होती. फ्रेंच भाषेत लेखन करणाऱ्यांत “ प्रत्येक विषयाला बुद्धिवाद लावणारे ” पुष्कळ लेखक त्यांना आढळले. “ मराठीत असे लेखक फारच कमी आणि इंग्रजीतही फारसे नाहीत, ” ही उणीव त्यांना जाणवली. अमेरिकेतील डॉ. रॉबिन्सन हे अशा हाताच्या बोटावर मोजणाऱ्या लेखकांपैकी एक होते व तेही एकट्यानेच मासिक चालवीत असत. “ ते पाहूनच मला स्फूर्ती मिळाली, ” असे रघुनाथरावांनी मोकळेपणाने मान्य केले आहे. ( २१ : १० : २३२. )

स्वतःचे मासिक काढण्याच्या त्यांच्या विचारास मूर्त स्वरूप येण्यास एक तात्कालिक निमित्तही घडले होते. खुद्द रघुनाथरावांनी आपल्या मासिकाची जन्मकहाणी सांगितली आहे. ती अशी :

“ मी लिहिलेले लेख छापायला त्या वेळची कोणतीही कालिके तयार नव्हती. ‘ किर्लोस्कर ’ने एक लेख मागवला होता तेवढा छापला, पण त्याबद्दल बराच बभ्रा झाल्यामुळे नंतर मी आपणहून पाठवलेला लेख त्यांनी छापला नाही. तेव्हा प्रचाराचे साधन काहीच उरले नाही; आणि प्रचार केवळ संततिनियमनाचा आणि गुप्तरोगप्रतिबंधाचा करण्याऐवजी बुद्धिवादी विचारसरणी लोकांपुढे मांडणे अवश्य वाटू लागले. कारण, सनातनी कल्पना ज्यांच्या मनात ठाण मांडून बसल्या, त्यांना माझा इतर प्रचार रुचणे शक्य नव्हते. म्हणून नवीन मासिक काढले.”(२१ : ११ : २५४.)

---

१. जवळ जवळ सत्तावीस वर्षे र. धों. कर्वे यांनी ‘ समाजस्वास्थ्य ’ मासिक चालवले अंकातला बराचसा निनावी मजकूर त्यांच्या हातचा असे. ‘ शारदेची पत्रे ’ यासारखे सदर किंवा विविध विषयांवरच्या लेखमाला, त्यावर लेखकाचे नाव नसले तरी, रघुनाथरावांनी लिहिल्या होत्या हे त्यातील आशयावरून व त्यांच्या शैलीवरून सहज लक्षात येते. या लेखात अशा सर्व मजकुराचा विचार केला आहे. ‘ समाजस्वास्थ्या ’चे सर्व अंक सर्वत्र सहजासहजी उपलब्ध होण्यासारखे नाहीत, म्हणून रघुनाथरावांच्या विचारांचा सारांश देण्यापेक्षा, त्यांच्या लेखातील मूळ उतारे आवश्यक तेथे विस्तारानेही देणे जरूर वाटले. हे संकलन करीत असता त्यांच्या विचारसरणीची मर्मस्थाने व मर्यादा दाखवण्याचाही थोडासा प्रयत्न केला आहे. त्यातून किमान या उपेक्षित विचारवंताच्या विचारसृष्टीचे, ओझरते का होईना, दर्शन घडावे. स्वतंत्र उल्लेख केला नसेल त्या ठिकाणी कंसातील पहिला आकडा ‘ समाजस्वास्थ्या ’च्या वर्षाचा, दुसरा आकडा अंकाचा आणि तिसरा पृष्ठाचा समजावा.

नवमतवादी म्हणून पुढे ओळखले गेलेले विचार मराठीत मांडण्यास रघुनाथरावांनी प्रथम सुरुवात केली. "त्या वेळी त्यांना 'किर्लोस्कर' मासिकात स्थान देण्याइतके धैर्य किर्लोस्करांस असते तर आम्ही वेगळे मासिक काढलेच नसते." (१० : १० : ३१२); किंवा "किर्लोस्करच्या सोवळेपणामुळे आम्हास स्वतंत्र मासिक काढणे भाग पडले," (७ : १२ : ३११); असे कर्वे अनेकदा म्हणत असले तरी किर्लोस्करांचा नकार हे रघुनाथरावांच्या बाबतीत केवळ निमित्त ठरले. कधी ना कधी रघुनाथरावांनी स्वतःचे मासिक काढणे अटळच होते. कारण, बहुतेकांच्या बाबतीत मासिक चालवणे हा हौसेचा प्रकार होता. वाचकांचे मनोरंजन करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. जमल्यास वाचकांचे उद्बोधन करता आले तर त्यांतल्या काहींना नको होते असे नाही. पण हौसेपायी किंवा लोकशिक्षणासाठी वर्षानुवर्षे नुकसान सोसून मासिक चालवण्याची त्यांची तयारी नव्हती. काहींच्या दृष्टीने मासिक काढणे हा जाहिरातीचा एक प्रकार होता. इतर उद्योगधंद्यांप्रमाणेच हादेखील एक व्यवसाय होता व तो किफायतशीर चालावा ही त्यांची दृष्टी असणे साहजिक होते. रघुनाथरावांच्या बाबतीत मात्र मासिक चालविणे हा त्यांनी विचारपूर्वक स्वीकारलेल्या निष्ठेचा अपरिहार्य परिणाम होता.

आपल्या मासिकाचा खप वाढून निदान खर्चाची तोंडमिळवणी करता आली असती तरी रघुनाथरावांना बरे वाटले असते; पण खप वाढविण्यासाठी कोणाच्याही दडपणापुढे मान झुकवण्याची किंवा आपल्या मूलभूत निष्ठांशी तडजोड करून मतांना मुरड घालण्याची त्यांची तयारी नव्हती. 'दुनिया न माने' (कुंकू) या चित्रपटाचे परखड परीक्षण करताच त्या चित्रपटाची त्यांना मिळणारी जाहिरात बंद झाली. त्यावर रघुनाथरावांनी फटकळपणाने बजावले :

"आमच्या जाहिराती पाहिजे असतील तर आमची स्तुतीच केली पाहिजे असा फर्मान सिनेमावाल्यांनी अगोदरच सोडलेला होता. तेव्हा असे काही होणार याची आम्हास कल्पना होतीच, परंतु पैशाने सर्वच संपादकांची तोंडे बंद करता येत नाहीत, हेही त्यांस सांगणे जरूर होते; आणि ते सांगणार कोण? आम्ही आज दहा वर्षे प्रभातच्याच काय, पण जवळजवळ कोणत्याही जाहिरातीशिवायच जगलो आहोत आणि पुढेही जगू. ...जाहिरातीच्या पानात काहीही असले तरी त्याची जबाबदारी संपादकावर येत नाही असे म्हणता येईल, परंतु इतर पानांची मात्र निःसंशय येते आणि ती पाने व आपली लेखणी जाहिरातदारांना विकणे योग्य नव्हे." (११ : ९: २८९-२९१) रघुनाथरावांना आधीच जाहिराती फारच कमी मिळत. "आम्हा स्वतःला जाहिरातींची खटपट साधत नाही आणि अडत्याकडून समजले की आमच्या मतामुळे जाहिराती मिळत नाहीत." (१४ : १ : १) अशा स्थितीतही जाहिरातदाराच्या दडपणाला त्यांनी कधीच दाद दिली नाही. परिणामतः मासिक आरंभापासून (जुलै १९२७) ते अखेरपर्यंत (नोव्हेंबर १९५३) बहुशः नुकसान सोसूनच चाल-

वावे लागले.

मासिकाचे वर्ष संपताना किंवा नव्या वर्षाच्या आरंभी वाचकांना मासिकाच्या आर्थिक स्थितीबद्दल कर्वे माहिती सांगत. जुलै १९३६ पर्यंत मासिक आर्थिक दृष्ट्या यशस्वी झालेले नव्हते. त्यानंतर एकदोन वर्षे खर्चाची कशीबशी तोंडमिळवणी होत असावी, पण १९३९ पासून ते रघुनाथरावांच्या मृत्यूमुळे मासिक बंद होईपर्यंत तोटा वाढतच गेला. युद्धामुळे भडकलेल्या किमती, कागदटंचाई, सरकारी निर्बंध, फुकट्या वाचकांची वाढती संख्या, जाहिरातींचा अभाव वगैरे अनेक कारणांमुळे 'समाज-स्वास्थ्या'चा व्यवहार सतत नुकसानीचा ठरत होता. आरंभीच्या काळात मासिकात येणारे नुकसान भरून काढून शिवाय चरितार्थ चालवण्याकरता एका ऑफिसात त्यांनी कारकुनीही केली ( ३ : १ : २१ ), पण " स्वतःची किंमत राखण्याकरता " ती १ मे १९३३ पासून सोडून दिली : " नोकरीचा राजीनामा देण्याचा हा आमच्या आयुष्यातील तिसरा प्रसंग. एकंदरीत नोकरी करण्यास लागणारे गुण किंवा दोष आपल्या अंगी नाहीत असा याचा निष्कर्ष काढून यापुढे नोकरीसाठी खटपट न करण्याचाच निश्चय सध्या तरी केला आहे. तो कितपत तडीस जाईल हे पाहणे आहे. परंतु शक्य असल्यास लेखनावर व संततिनियमनाच्या व इतर आरोग्योपयोगी साध-नांचे विक्रीवर चरितार्थ चालवण्याचा प्रयत्न करावा " असे त्यांनी ठरवले. ( ६ : १२ : ३०९ ) युद्धकाळातील अडचणींमुळे व स्वातंत्र्योत्तर काळातील सरकारी निर्बंधांमुळे हीही वाट बंद झाली. पण रघुनाथरावांनी मासिक नेटाने तसेच चालवले.

जिवाचा आटापिटा करून ते 'समाजस्वास्थ्या'चा अंक दर महिन्याच्या पंधरा तारखेस वाचकांच्या हाती पडेल अशी व्यवस्था करीत. ही व्यवस्था इतकी चोख होती की, ऑक्टोबर १९५३ चा अंक त्यांची अंत्ययात्रा स्मशानात पोचली त्या वेळी, म्हणजे चौदा तारखेस टपालात पडून पंधरा ऑक्टोबरला वर्तमानपत्रातील मृत्युलेखाबरोबरच वाचकांना वाचावयास मिळाला. ( २७ : ५ : ८२ ) एवढेच नव्हे, तर पुढल्या महिन्याचे साहित्य आगाऊ तयार ठेवण्याची त्यांची पद्धत असल्यामुळे, त्यांच्या मृत्यूनंतरही एक अंक निघाला. तोच 'समाजस्वाथ्या'चा शेवटचा अंक !

मासिकाचा प्रपंच ओढगस्तीचा असला व त्यामुळे कोणी स्वयंस्फूर्त आर्थिक साहाय्य केले तर त्यांना ते स्वीकारावे लागत असले, तरी मुद्रकाची किंवा इतरांची बिले वेळच्या वेळी चुकती केली जात. साहजिकच 'समाजस्वास्थ्य' नुकसानीत चालते हे कित्येकांना खरे वाटत नसे. खोटे सांगून कर्वे लोकांकडून मदत घेतात, असा त्यांच्या हितशत्रूंनी बोभाटा करून पाहिला. तेव्हा अखेर रघुनाथरावांनीच उलगडा केला : " आम्ही काही पुस्तके व इतर काही वस्तू विकीत असतो त्यात काही फायदा असल्यामुळेच मासिकातील नुकसान सोसता येते. पण तेही उत्पन्न कमी होत आहे....प्रथमपासून संपादक, कारकून, शिपाई वगैरे सर्व कामे एकट्याने करूनही आणि त्याबद्दल कोण-ताही मोबदला हिशोबात न धरताही नुकसान होत आहे." ( २४ : ११ : २३८ )

तरीही मासिक चालू ठेवले होते याचे कारण रघुनाथरावांच्या म्हणण्याप्रमाणे ते त्यांचे एकच व्यसन होते : "मला दुसरे व्यसन नाही आणि या व्यसनापासून पैशाशिवाय दुसरे नुकसान नाही" ( २१ : ११ : २५५ ) त्यामुळेच सत्तराव्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या चाहत्यांनी जमवून दिलेले पाच हजार सहाशे रुपयेही त्यांनी या मुलखावेगळ्या व्यसनापायीच खर्च केले.

सनातन्यांच्या चिथावणीने इंग्रज सरकारने तीन वेळा खटले भरूनही रघुनाथरावांचे हे 'व्यसन' सुटले नाही. कायद्याचा बडगा दाखवून त्यांना वठणीवर आणण्याच्या प्रतिपक्षाच्या प्रयत्नाला त्यांनी मुळीच भीक घातली नाही. शक्य तितकी काळजी घेऊनही आपण कायद्याच्या कचाट्यात सापडू शकतो, याची जाणीव त्यांना प्रथमपासूनच होती : "येऊन-जाऊन कायद्याचे मोठे शस्त्र म्हणजे आमचेवर अश्लीलतेचा खोटा आरोप करून आम्हांस शिक्षा करवणे. अश्लीलतेची व्याख्या कायद्यात नसल्यामुळे हे कदाचित करता येईल. इतका मूर्ख एखादा मॅजिस्ट्रेट भेटतो की काय एवढाच प्रश्न आहे. अश्लीलता हा केवळ भाषेचाच प्रश्न आहे. कारण अर्थ अश्लील झालेला चालतोच, व आम्ही भाषेबद्दल शक्य तितकी खबरदारी बाळगली आहे. तथापि कोर्टात नेहमीच न्याय मिळत असता तर काय पाहिजे होते!" ( ५ : ४ : ९५ ) रघुनाथरावांना अनुभवही तसाच आला. सप्टेंबर १९३२ च्या अंकातील 'व्यभिचाराचा प्रश्न' हा लेख आक्षेपार्ह ठरवून त्याबद्दल त्यांना शंभर रुपये दंड करण्यात आला. गुजराती 'समाजस्वास्थ्या' च्या डिसेंबर १९३३ च्या अंकातील वाचकांच्या काही पत्रांना रघुनाथरावांनी दिलेली उत्तरे अश्लील असल्याच्या आरोपावरून त्यांना दुसऱ्या खटल्यात दोनशे रुपये दंडाची शिक्षा दिली गेली. उच्च न्यायालयात या निकालाविरुद्ध दाद मागूनही उपयोग झाला नाही. सप्टेंबर १९३८ च्या अंकातील 'कामकला' या पुस्तकाची जाहिरात अश्लील आहे, अशा आरोपावरून रघुनाथरावांना पुन्हा न्यायासनासमोर खेचले गेले.

या तिसऱ्या खटल्याच्या वेळी मागील अनुभव लक्षात घेऊन व पैसेही नसल्यामुळे त्यांनी बचावासाठी वकील दिला नव्हता, पण न्यायाधीशाने संशयाचा फायदा देऊन दोषमुक्त केल्याने त्यांच्यावरील गंडांतर टळले. "वैद्यकीय पुस्तकास व माझ्या मासिकातील लेखास एकच मानदंड लावला पाहिजे," असे त्यांचे म्हणणे होते. "माझ्या लेखांची एकंदर तऱ्हा भावनारहित, शास्त्रीय आणि जितक्यास तितकी असून त्यात विषयलोलुपतेला मुळीच जागा नसते" ( ७ : ११ : २८३ ) हा त्यांचा दावाही खरा होता. पण न्यायालयांनी तो कधीच मान्य केला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातही सरकारने त्यांच्या मासिकाच्या शेवटच्या अंकातील एका लेखाला ('समसंभोग—अनैसर्गिक नव्हे निसर्गपूरक—' हा तो आक्षेपार्ह लेख असावा.) हरकत घेऊन खटला भरला. पण रघुनाथरावांचे निधन झाले असल्याच्या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले जाताच खटला काढून घेण्यात आला. (पाहा : 'अप्पा कर्वे' : शकुंतला

परांजपे; मौज दिवाळी अंक १९६८; पृष्ठ १६८.) अशा तऱ्हेने स्वतंत्र भारतात रघुनाथरावांना त्यांच्या कार्याचे पारितोषिक सरकारकडून मिळण्याची संधी आली होती, पण मृत्यूने ती चुकवली!

शक्यतो कायदा मोडावयाचा नाही व प्रचलित कायद्याच्या चौकटीत जेवढे म्हणून स्वातंत्र्य घेता येईल तेवढे घ्यावयाचे, असे त्यांचे धोरण होते. मात्र आपल्याला पटलेले विचार मांडत असताना जर कायदा मोडल्याचा आरोप आला व तो सिद्ध झाला तर त्याबद्दल भोगाव्या लागणाऱ्या परिणामांना निधडेपणाने तोंड देण्याची त्यांची तयारी होती. एक तर ऊठसूट कायदा मोडणे त्यांना मान्य नव्हते. खेरीज कायद्याच्या कक्षेत येईल असे लेखन करून तुरुंगाच्या वाऱ्या करून आल्यामुळे, ते देत असलेल्या एकाकी लढतीत खंड पडला असता व त्यांच्या कार्याचे नुकसान होण्याचीच शक्यता जास्त होती. या बाबतीत भित्रेपणाचा दोष पत्करूनही त्यांनी शक्यतो प्रचलित कायद्याचे बंधन पाळूनच मतप्रचार करण्याचे तंत्र अवलंबिले. मासिकाच्या दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकापासून म्हणजे जुलै १९२८ पासून, कर्वे 'समाजस्वास्थ्या'च्या अंकावर अर्धनग्न स्त्रीचे चित्र छापू लागले. मात्र वाचकाकडे तोंड करून उभ्या राहिलेल्या अर्धनग्न किंवा नग्न स्त्रीचे चित्र छापण्यात कायद्याची अडचण होती म्हणून रघुनाथरावांनी तसे चित्र छापले नाही.

"आपणांस जर तेवढे धैर्य नाही तर नग्नतेचा प्रचार करण्याचा आव का आणता?" असा सवाल त्यांच्या एका वाचकाने विचारला तेव्हा रघुनाथरावांनी आपली भूमिका स्पष्ट केली: "आपले म्हणणे तात्त्विकदृष्ट्या बरोबर आहे. परंतु त्यात कायद्याचा प्रश्न येत असल्यामुळे तसे करता आले नाही. नग्न स्त्रीचे वाचकाकडे तोंड केलेले चित्र नैसर्गिक स्थितीत दाखवण्यास कायदा आड येतो व हा कायदा जरी मूर्खपणाचा असला तरी तो मोडण्याची आमची तयारी नाही. आमच्याप्रमाणे ज्यांची उपजीविका नोकरीवर अवलंबून आहे अशा लोकांना दंड किंवा तुरुंगवास पत्करून कायदा मोडणे शक्य नसते. शिवाय इतकेही धैर्य आम्ही केले तरी त्यामुळे लोकमत बदलेल असे वाटत नाही. आम्ही नग्नतेचा प्रचार करण्याचा आव घालीत नाही, आमचेकडून होईल तितका प्रचार आम्ही करीत आहो. याबरोबरच आपण नग्न का राहात नाही असा प्रश्न विचारावयाचा आपल्या नजरचुकीने राहिलेला आहे, त्याचेही उत्तर वरीलप्रमाणेच आहे. याबद्दल आपण आम्हास दोष द्या; आमची हरकत नाही." (३:९:२१३)

'समाजस्वास्थ्या'च्या अंकावरील चित्रात त्यांनी वेळोवेळी जे बदल केले त्यामागची भूमिकाही लक्षात घ्यावयास हवी: "सत्य सांगण्याच्या संकल्पास अनुसरून व सत्य हे नग्नच असले पाहिजे अशा विचाराने प्रथमवर्षारंभी पूर्णनग्नचित्र मलपृष्ठावर घालण्याचे आम्ही ठरविले होते व कायद्याची हरकत न येईल अशा प्रकारचे एक नग्न चित्र तयारही करविले होते." पण 'मुंबई वैभव' छापखान्याने त्यामुळे पहिला

अंक छापण्यास ऐन वेळी नकार दिला. " चित्र पाहिजे तर बदलतो ' असे आम्ही म्हटल्यावरही त्यांनी मासिक छापण्याचे नाकारले. " नंतर दुसरे एक मुद्रक चित्र छापण्यास तयार असताही चित्रच कलेच्या दृष्टीने समाधानकारक न वाटल्यामुळे आम्ही त्याऐवजी दीपगृहाचे चित्र घातले. " हे मासिक मार्गदर्शक आहे या दृष्टीने ते पुष्कळांस पसंतही पडले. " ( २ : ५ : १०६ ) पुढे त्यामुळे दृष्टी आकर्षित होत नाही असे त्यांना वाटल्यावरून, दुसऱ्या वर्षाच्या आरंभापासून अर्धनग्न स्त्रीचे चित्र छापले. तिसऱ्या वर्षांच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत पूर्ण नग्न स्त्रीचे चित्र झळकत होते. पण चौथ्या वर्षाच्या प्रारंभी अंकावरील चित्रातल्या स्त्रीचा अर्धाअधिक देह वस्त्राने झाकलेला आढळल्याबरोबर सात्त्विक संतापाने एका वाचकाने निषेध नोंदविला. चित्रासंबंधीच्या वाचकाच्या तक्रारीत बरेच तथ्य आहे हे कबूल करून रघुनाथरावांनी लिहिले : " पूर्ण नग्न चित्रात पुढील भाग नैसर्गिक रीतीचा दाखवण्यास कायद्याची अडचण असते, व नेहमीच नग्न राहावे असे नग्नतेचे पुरस्कर्तेही सांगत नाहीत तेव्हा चित्रदेखील नेहमी नग्न असण्याचे कारण नाही. " ( ४ : ६ : १४१ )

कायद्याची अडचण टाळून नग्नतेचा प्रचार करावयाचा, हा त्यांचा पवित्रा त्यांनी कधी बदलला नाही. " मासिकावर नेहमी स्त्रीचेच चित्र का असते ? कधी कधी पुरुषाचे का देत नाही ? " असा प्रश्न काही स्त्रियांनी विचारला तेव्हा रघुनाथरावांनी पुन्हा एकदा कायद्याची अडचण सांगितली ! " पुरुषाचे नग्न चित्र दिल्यास ते पाठीकडून द्यावे लागेल, एरवी कायद्याची अडचण येईल असे वाटते. अर्थात हा कायद्याचा मूर्खपणा आहे... " ( ६ : २ : ४६ ) नग्नचित्रे न घालणे व मासिकाचे नाव बदलणे या दोन सुधारणा केल्यास मासिकाचा खप वाढू शकेल असे सुचवणाऱ्या एका हितचिंतकाला रघुनाथरावांनी सांगितले : " उदाहरणार्थ ४ थ्या वर्षाचे अंकावरील चित्र नग्न नव्हते तरी त्या वर्षी खप जास्त झाला नाही. नग्न चित्र घालण्यात इतकाच मुद्दा आहे की नग्नता अश्लील नाही, इतकेच नव्हे तर ती फायदेशीर आहे हा आमचा एक प्रतिपाद्य विषय आहे. तथापि चित्र बदलता येईल, परंतु मासिकाचे नाव बदलण्यास मात्र आम्ही तयार नाही. " ( ९ : ९ : २७७ ) चित्र कामोत्तेजक असते म्हणून ते बदलावे, या सूचनेला मात्र त्यांनी कधीच किंमत दिली नाही. कारण चित्र कामोत्तेजक असू नये असे त्यांचे कधीच मत नव्हते. मात्र त्याबरोबर चित्राला मजकुराच्या तुलनेने गौण लेखण्याचे भानही त्यांनी राखलेले होते. म्हणूनच युद्धकाळात कागदाच्या टंचाईमुळे काही काळ सोळा पानी अंक काढण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी चित्राशिवाय अंक काढण्यासही मागेपुढे पाहिले नाही. " कारण सचित्र दर्शनी पृष्ठ ठेवल्याने मजकुराची जागा कमी होते आणि आमचे मते मजकूर अधिक महत्त्वाचा आहे. " ( १८ : २–३–४ : ११ )

आपण जे कार्य करीत आहोत ते करण्यास धजावणारी माणसे जवळजवळ नाहीतच अशी त्यांची धारणा असल्याने कार्यहानी होऊ नये म्हणून ज्याप्रमाणे

परांजपे; मौज दिवाळी अंक १९६८; पृष्ठ १६८.) अशा तऱ्हेने स्वतंत्र भारतात रघुनाथरावांना त्यांच्या कार्याचे पारितोषिक सरकारकडून मिळण्याची संधी आली होती, पण मृत्यूने ती चुकवली!

शक्यतो कायदा मोडावयाचा नाही व प्रचलित कायद्याच्या चौकटीत जेवढे म्हणून स्वातंत्र्य घेता येईल तेवढे घ्यावयाचे, असे त्यांचे धोरण होते. मात्र आपल्याला पटलेले विचार मांडत असताना जर कायदा मोडल्याचा आरोप आला व तो सिद्ध झाला तर त्याबद्दल भोगाव्या लागणाऱ्या परिणामांना निधडेपणाने तोंड देण्याची त्यांची तयारी होती. एक तर ऊठसूट कायदा मोडणे त्यांना मान्य नव्हते. खेरीज कायद्याच्या कक्षेत येईल असे लेखन करून तुरुंगाच्या वाऱ्या करून आल्यामुळे, ते देत असलेल्या एकाकी लढतीत खंड पडला असता व त्यांच्या कार्याचे नुकसान होण्याचीच शक्यता जास्त होती. या बाबतीत भित्रेपणाचा दोष पत्करूनही त्यांनी शक्यतो प्रचलित कायद्याचे बंधन पाळूनच मतप्रचार करण्याचे तंत्र अवलंबिले. मासिकाच्या दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकापासून म्हणजे जुलै १९२८ पासून, कर्वे 'समाजस्वास्थ्या'च्या अंकावर अर्धनग्न स्त्रीचे चित्र छापू लागले. मात्र वाचकाकडे तोंड करून उभ्या राहिलेल्या अर्धनग्न किंवा नग्न स्त्रीचे चित्र छापण्यात कायद्याची अडचण होती म्हणून रघुनाथरावांनी तसे चित्र छापले नाही.

"आपणांस जर तेवढे धैर्य नाही तर नग्नतेचा प्रचार करण्याचा आव का आणता?" असा सवाल त्यांच्या एका वाचकाने विचारला तेव्हा रघुनाथरावांनी आपली भूमिका स्पष्ट केली: "आपले म्हणणे तात्त्विकदृष्ट्या बरोबर आहे. परंतु त्यात कायद्याचा प्रश्न येत असल्यामुळे तसे करता आले नाही. नग्न स्त्रीचे वाचकाकडे तोंड केलेले चित्र नैसर्गिक स्थितीत दाखवण्यास कायदा आड येतो व हा कायदा जरी मूर्खपणाचा असला तरी तो मोडण्याची आमची तयारी नाही. आमच्याप्रमाणे ज्यांची उपजीविका नोकरीवर अवलंबून आहे अशा लोकांना दंड किंवा तुरुंगवास पत्करून कायदा मोडणे शक्य नसते. शिवाय इतकेही धैर्य आम्ही केले तरी त्यामुळे लोकमत बदलेल असे वाटत नाही. आम्ही नग्नतेचा प्रचार करण्याचा आव घालीत नाही, आमचेकडून होईल तितका प्रचार आम्ही करीत आहो. याबरोबरच आपण नग्न का राहात नाही असा प्रश्न विचारावयाचा आपल्या नजरचुकीने राहिलेला आहे, त्याचेही उत्तर वरीलप्रमाणेच आहे. याबद्दल आपण आम्हास दोष द्या; आमची हरकत नाही." (३ : ९ : २१३)

'समाजस्वास्थ्या'च्या अंकावरील चित्रात त्यांनी वेळोवेळी जे बदल केले त्यामागची भूमिकाही लक्षात घ्यावयास हवी: "सत्य सांगण्याच्या संकल्पास अनुसरून व सत्य हे नग्नच असले पाहिजे अशा विचाराने प्रथमवर्षारंभी पूर्णनग्नचित्र मलपृष्ठावर घालण्याचे आम्ही ठरविले होते व कायद्याची हरकत न येईल अशा प्रकारचे एक नग्न चित्र तयारही करविले होते." पण 'मुंबई वैभव' छापखान्याने त्यामुळे पहिला

अंक छापण्यास ऐन वेळी नकार दिला. “ चित्र पाहिजे तर बदलतो ’ असे आम्ही म्हटल्यावरही त्यांनी मासिक छापण्याचे नाकारले. ” नंतर दुसरे एक मुद्रक चित्र छापण्यास तयार असताही चित्रच कलेच्या दृष्टीने समाधानकारक न वाटल्यामुळे आम्ही त्याऐवजी दीपगृहाचे चित्र घातले. “ हे मासिक मार्गदर्शक आहे या दृष्टीने ते पुष्कळांस पसंतही पडले. ” ( २ : ५ : १०६ ) पुढे त्यामुळे दृष्टी आकर्षित होत नाही असे त्यांना वाटल्यावरून, दुसऱ्या वर्षाच्या आरंभापासून अर्धनग्न स्त्रीचे चित्र छापले. तिसऱ्या वर्षाच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत पूर्ण नग्न स्त्रीचे चित्र झळकत होते. पण चौथ्या वर्षाच्या प्रारंभी अंकावरील चित्रातल्या स्त्रीचा अर्धाअधिक देह वस्त्राने झाकलेला आढळल्याबरोबर सात्त्विक संतापाने एका वाचकाने निषेध नोंदविला. चित्रासंबंधीच्या वाचकाच्या तक्रारीत बरेच तथ्य आहे हे कबूल करून रघुनाथरावांनी लिहिले : “ पूर्ण नग्न चित्रात पुढील भाग नैसर्गिक रीतीचा दाखवण्यास कायद्याची अडचण असते, व नेहमीच नग्न राहावे असे नग्नतेचे पुरस्कर्तेही सांगत नाहीत तेव्हा चित्रदेखील नेहमी नग्न असण्याचे कारण नाही. ” ( ४ : ६ : १४१ )

कायद्याची अडचण टाळून नग्नतेचा प्रचार करावयाचा, हा त्यांचा पवित्रा त्यांनी कधी बदलला नाही. “ मासिकावर नेहमी स्त्रीचेच चित्र का असते ? कधी कधी पुरुषाचे का देत नाही ? ” असा प्रश्न काही स्त्रियांनी विचारला तेव्हा रघुनाथरावांनी पुन्हा एकदा कायद्याची अडचण सांगितली ! “ पुरुषाचे नग्न चित्र दिल्यास ते पाठीकडून द्यावे लागेल, एरवी कायद्याची अडचण येईल असे वाटते. अर्थात हा कायद्याचा मूर्खपणा आहे... ” ( ६ : २ : ४६ ) नग्नचित्रे न घालणे व मासिकाचे नाव बदलणे या दोन सुधारणा केल्यास मासिकाचा खप वाढू शकेल असे सुचवणाऱ्या एका हितचिंतकाला रघुनाथरावांनी सांगितले : “ उदाहरणार्थ ४ थ्या वर्षाचे अंकावरील चित्र नग्न नव्हते तरी त्या वर्षी खप जास्त झाला नाही. नग्न चित्र घालण्यात इतकाच मुद्दा आहे की नग्नता अश्लील नाही, इतकेच नव्हे तर ती फायदेशीर आहे हा आमचा एक प्रतिपाद्य विषय आहे. तथापि चित्र बदलता येईल, परंतु मासिकाचे नाव बदलण्यास मात्र आम्ही तयार नाही. ” ( ९ : ९ : २७७ ) चित्र कामोत्तेजक असते म्हणून ते बदलावे, या सूचनेला मात्र त्यांनी कधीच किंमत दिली नाही. कारण चित्र कामोत्तेजक असू नये असे त्यांचे कधीच मत नव्हते. मात्र त्याबरोबर चित्राला मजकुराच्या तुलनेने गौण लेखण्याचे भानही त्यांनी राखलेले होते. म्हणूनच युद्धकाळात कागदाच्या टंचाईमुळे काही काळ सोळा पानी अंक काढण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी चित्राशिवाय अंक काढण्यासही मागेपुढे पाहिले नाही. “ कारण सचित्र दर्शनी पृष्ठ ठेवल्याने मजकुराची जागा कमी होते आणि आमचे मते मजकूर अधिक महत्त्वाचा आहे. ” ( १८ : २–३–४ : ११ )

आपण जे कार्य करीत आहोत ते करण्यास धजावणारी माणसे जवळजवळ नाहीतच अशी त्यांची धारणा असल्याने कार्यहानी होऊ नये म्हणून ज्याप्रमाणे

कायद्याची बंधने पाळून मतप्रचार करणे त्यांना आवश्यक वाटले, त्याचप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व काळात प्रचलित राजकीय प्रश्नावर प्रक्षोभक लिहून सरकारचा रोष ओढवून घेण्यापेक्षा शक्यतो मौन राखणेच त्यांना श्रेयस्कर वाटले. म्हणूनच १९४७ पर्यंत राजकीय प्रश्नासंबंधी त्यांनी फार थोडे लिहिले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र ही दक्षता घेण्याची गरज न उरल्याने कर्वे अवतीभोवतीच्या घडामोडींवर टीकाटिप्पणी करू लागले. "राजसत्ता हाती असली तर सामाजिक सुधारणा चुटकीसरशी करता येतात" असा भ्रम असणाऱ्या एका वाचकाला उत्तर देताना त्यांनी दिलेले स्पष्टीकरण या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे : "राजसत्ता हाती असल्यास सामाजिक सुधारणा चुटकीसरशा करता येतात हे आपले म्हणणे सपशेल खोटे आहे. कारण स्वतंत्र देशात देखील त्या चुटकीसरशा होत नाहीत. आयर्लंड स्वतंत्र झाल्यावर ते या दृष्टीने अधिकच मागासले हे सर्वांस माहीत आहे, आणि हिंदुस्थानातही तसेच होण्याचा चांगलाच संभव आहे. तथापि स्वातंत्र्य नसावे असे आमचे म्हणणे नाही. आणि राजकारण जोराने करणारास आम्ही मुळीच दोष देत नाही. परंतु राजकारणी लोकांत मात्र इतकी उदार बुद्धी नाही आणि समाजसुधारणेचा प्रयत्न करणारांना ते नावे ठेवतात. शिवाय लोकांत बडेजाव होण्याचा मार्ग राजकारण हाच असल्यामुळे ते करणारांना कधीच तुटवडा पडणार नाही. त्यांना तुरुंगात जावे लागले तरी समाजाचा पाठिंबा असल्यामुळे पुष्कळांना त्याचे काही वाटत नाही. समाजसुधारकांना मात्र सरकारचा किंवा समाजाचा पाठिंबाही नसल्यामुळे कोणाचीही सहानुभूती नसते, तेव्हा हे काम करण्यास सहसा कोणीही पुढे येत नाही...स्वातंत्र्य मिळेपर्यंत समाजसुधारणा करू नये म्हणणे हा मनाचा कोतेपणा आहे." (९ : १ : १७–१८) रघुनाथरावांची ही भूमिका आगरकरांच्या भूमिकेशी किती मिळतीजुळती होती, हे आगरकरांच्या विचारांचा परिचय असलेल्यांना वेगळे सांगावयास नको.

स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय घडामोडींविषयी रघुनाथरावांनी जे थोडेसे लिहिले आहे तेही लक्षणीय आहे. मुसोलिनी व विशेषतः हिटलर यांच्या उदयापासून ते दुसऱ्या महायुद्धात त्यांचा पराभव होईपर्यंत या हुकूमशहाविषयी आदराने, कौतुकाने बोलणाऱ्या मंडळींची संख्या महाराष्ट्रात काही थोडीथोडकी नव्हती. आजही त्यांना विभूती मानून पूजा करणारे लोक आहेतच. रघुनाथरावांनी मात्र आरंभापासूनच हिटलर-मुसोलिनीवर टीका केली. मुसोलिनी व हिटलर यांचा संततिनियमनाला असलेला विरोध, एवढेच त्याचे कारण नव्हते. हिटलरच्या कृत्यात समाजशास्त्राच्या दृष्टीने अनैतिक काहीच नाही असे म्हणणाऱ्या एका वर्गणीदाराला रघुनाथरावांनी त्यांच्या फटकळ शैलीत बजावले : "हिटलरच्या अनन्वित कृत्यांविषयी आपणांस बिलकूल माहिती दिसत नाही. हिटलर व मुसोलिनी यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. मुसोलिनी सुशिक्षित मनुष्य आहे आणि त्याला विचार करण्याची शक्ती आहे याबद्दल कोणी शंका घेणार नाही. तो अप्रामाणिक आहे इतकेच आमचे म्हणणे

आहे. हिटलर हा शुद्ध दांडगट नंदीबैल आहे आणि लोकांचे हाल करण्यात मौज मानणारा आहे. हा कामशास्त्रातीलच एक प्रकार आहे, तेव्हा आम्हाला कामशास्त्राशिवाय काही कळत नाही अशी आपली कल्पना असली तरीदेखील हे आमचे विषयात येते. आमचे लिखाणात समाजशास्त्राचा विचार नसतो हे आपले म्हणणे सर्वथैव खोटे आहे हे आमचे मासिकातील अनेक लेख दाखवून सिद्ध करता येईल... हिटलरने मजूरपक्षाची सहानुभूती मिळवण्याकरता स्वतःला सोशिॲलिस्ट म्हटले, परंतु हिटलरला सोशिॲलिस्ट म्हणायचे म्हणजे ब्रिटिश सरकारलाच स्वराज्य म्हणण्यासारखे आहे...हिटलर मरेल तो सुदिन असेच आमचे मत आहे आणि ते बदलण्याचा संभव नाही." (८ : १० : ३०९-३११) डॉ. रॉबिन्सन व एच. जी. वेल्स यांच्या हिटलरसंबंधीच्या लेखनाचा हवाला देऊन रघुनाथरावांनी हिटलरवर हल्ला चढवला तेव्हा हिटलरच्या राजवटीची नवी नवलाई अजून पुरती ओसरली नव्हती.

व्यक्तिस्वातंत्र्याचे कट्टे पुरस्कर्ते असलेले उदारमतवादी कर्वे हिटलर मुसोलिनींच्या हुकूमशाहीवर जसे कधी भाळले नाहीत, त्याचप्रमाणे रशियातील कम्युनिस्ट राजवटीची भुरळही त्यांना कधी पडली नाही. मात्र रशियातील प्रयोगाविषयी त्यांच्या प्रतिक्रिया आरंभी तरी सर्वस्वी प्रतिकूल नव्हत्या. 'बेकारी व तीवर उपाय' या माधवराव बागलांच्या पुस्तकाचे परीक्षण करताना त्यांनी लिहिले : "भांडवलशाही नाहीशी झाल्याशिवाय बेकारी नाहीशी होणे शक्य नाही असा या पुस्तकाचा सारांश; आणि तो आमचे मते ठोकळ मानाने बरोबर आहे....संततिनियमनाने जगात एकदम सर्वत्र आबादीआबाद होईल असे आम्ही म्हणत नाही तसेच भांडवलशाही मोडली की सर्वांना विपुल अन्नवस्त्र आपोआप मिळेल, इतर कशाचीही जरुरी नाही असे म्हणणेही समंजस नाही. आज रशियात बेकारी नाही. परंतु अन्नवस्त्र मात्र पुरेसे मिळत नाही, मग बेकारी नाहीशी होऊन काय उपयोग ?....आज रशियात संततिनियमनाची माहिती सर्वांस दिली जाते आणि गर्भपातास परवानगी असताही प्रत्येक स्त्रीला विशेषतः हा उपदेश करण्यात येतो." (७ : ८ : २०३,२०४)

क्रांतीनंतरच्या सुरुवातीच्या काळात रशियात दिले गेलेले कामस्वातंत्र्य नंतर अधिकाधिक निर्बंधित होऊ लागले, हे अर्थातच रघुनाथरावांना मुळीच रुचले नाही. मार्च १९४२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'मार्क्सवाद्यांची अफू' या शीर्षकाच्या लेखात त्यांनी मार्क्सवाद्यांवर झोड उठवलेली आढळते : "हे अनुयायी जरी मार्क्सप्रमाणेच धर्माला अफू म्हणतात, तरी त्यांची मार्क्सवरची श्रद्धा धार्मिकच आहे...मनुष्यस्वभाव म्हणून काही असते, आणि क्रांती झाल्याबरोबर त्यात हुकमी बदल होणे शक्य नसते. ज्यांच्या हातात सत्ता येईल ते ती टिकवण्याचा प्रयत्न हटकून करणार हे मार्क्सला दिसले नाही...कामगारवर्गाची नैसर्गिक प्रवृत्ती क्रांतीकडे नसते, संप वगैरेच्या साहाय्याने भांडवलवाल्यांशी तडजोड करून आपली स्थिती सुधारण्याचाच त्यांचा नेहमी प्रयत्न असतो. आणि त्यांचे म्हणणे थोड्याबहुत प्रमाणात

कबूल करण्यातच आपले हित आहे हे भांडवलवाल्यांनाही कळत असल्यामुळे हा प्रयत्न यशस्वी होतो. याच प्रवृत्तीमुळे औद्योगिक प्रगतीच्या शिखरावर असलेल्या इंग्लंडसारख्या देशात मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे क्रांती न होता ती औद्योगिक प्रगती बिलकूल न झालेल्या रशियासारख्या देशात लेनिनच्या खटपटीने झाली आणि ती कामगारांनी केली नाही." ( १५ : ९ : २९५-२९८ ) रशियातील राजवट आपल्याला का आदर्श वाटत नाही, याचे मुख्य कारणही त्यांनी सांगितले : "केवळ चरितार्थ चालावा एवढेच आमचे ध्येय नाही. त्याबरोबर व्यक्तिस्वातंत्र्यही राहिले पाहिजे आणि ते रशियात अजिबात नाही." ( २० : २ : ३२ )

आयुष्याच्या अखेरच्या काही वर्षांत कर्वे लोकशाही समाजवादाकडे झुकले होते व त्यामुळे त्यांना समाजवादी पक्षाबद्दल सहानुभूती वाटत होती, असा प्रथमदर्शनी ग्रह होतो : "समाजवादी पक्षाला बराच जोर चढत आहे आणि त्यांची तत्त्वे आम्हांस मान्य आहेत, पण तो अधिकारावर आल्यास तोही बिघडणार नाही असे म्हणवत नाही. कारण सत्तेने बहुतेक लोक बिघडतात," असे त्यांना वाटे. (२३ : ६ : १३८) क्रांती व्हावी, मात्र क्रांतीसाठी रक्तपाताची आवश्यकता नाही, अशी त्यांची कल्पना होती : "क्रांतीच्या बाबतीत सुज्ञांत मतभेद आहे तो इतकाच की, ती क्रांती रशियाप्रमाणे भयंकर रक्तपात करूनच केली पाहिजे की तीहून सौम्य मार्गांनी करता येईल ? आमचे मते ती सौम्य मार्गांनी शक्य आहे, त्याला रक्तपाताची जरुरी नाही." ( १६ : २ : ७२ ) आपल्याला हव्या असलेल्या समाजवादाला त्यांनी समंजस समाजवाद म्हटले आहे : "व्यक्तिस्वातंत्र्याची आणि जागतिक शांततेची दृष्टी ज्यात कायम राहील, असा एखादा समाजवादाचा प्रकार असू शकेल, अशी अंधुक शंकादेखील मार्क्सवाद्यांच्या डोक्यात येत नाही, पण ज्याला जुलमाची चीड आणि व्यक्तिस्वातंत्र्याची चाड आहे, अशा कोणालाही रशियन पद्धतीचा समाजवाद स्पृहणीय वाटणार नाही." ( २० : २ : ५४–५५ ) आपल्याला अभिप्रेत असलेल्या समंजस समाजवादाचा बराचसा यशस्वी प्रयोग स्पेनमधील अरॅगॉ नावाच्या प्रांतातील सर्व खेड्यांत १९३६ साली झाला होता, अशी त्यांची समजूत होती.

भारतातील समाजवादी नेत्यांवर असलेल्या गांधीजींच्या अहिंसात्मक सत्याग्रही जनआंदोलनांचा प्रभाव, विशेषतः उपोषणासारख्या तंत्राचा समाजवादी करीत असलेला अवलंब रघुनाथरावांना कधीच रुचला नाही. गांधीजींच्या ब्रह्मचर्याच्या कल्पना, संततिनियमनाच्या आधुनिक दृष्टिकोणास असलेला त्यांचा विरोध, त्यांची 'आतल्या आवाजाची' भाषा, त्यांची उपोषणे, दारूबंदीबाबतचा आग्रह, मुसलमानांची मनधरणी करण्याचे त्यांचे धोरण, या सर्व गोष्टींवर रघुनाथरावांनी कडाडून टीका केली आहे. गांधीजींच्या निर्घृण खुनानंतरही रघुनाथरावांची त्यांच्या बाबतची मते बदलली नाहीत. गांधीजींच्या खुनानंतर लोकक्षोभाचा जो वणवा पेटला त्यामुळे श्री. म. माटे यांच्यासारख्या गांधीजींच्या टीकाकाराने एक पत्रक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून

आपल्या टीकेचा खुलासा केला, हे रघुनाथरावांना बिलकूल आवडले नाही : "कोणावरही प्रामाणिक टीका करण्याचा अधिकार कोणत्याही माणसाला आहे. विचार करून केलेल्या टीकेबद्दल मागून लोटांगणे घालण्याचे काहीच कारण नसते. मेलेल्या माणसावर टीका करू नये असा शिष्टाचार आहे, पण जर टीका अगोदरच येऊन गेलेली असेल तर तो काही गुन्हा होत नाही, किंवा शिष्टाचाराचाही भंग होत नाही. मग माफी मागण्याचे कारण काय ?" (२१ : १० : २३६); "गांधींच्या वधानंतर गांधींसंबंधी मत का बदलावे हे समजत नाही. तो वध हा गांधींवर झालेला अत्याचार होता, ती गांधींची कृती नव्हती. तेव्हा यात मत बदलण्यासारखे कोणतेही कारण मला दिसत नाही. अशा तऱ्हेने मत बदलणे ही बुद्धिवादाची खूण नव्हे." (२२ : ११ : २५७)

गांधीजींच्या प्रभावामुळे सानेगुरुजी, एस. एम. जोशी यांच्यासारखे समाजवादी उपोषणे करतात हे त्यांना आक्षेपार्ह वाटत असे, कारण समाजवादी धार्मिक नसतात अशी त्यांची समजूत होती. गांधीजींप्रमाणे समाजवादीही साधनशुचितेचा आग्रह धरत, हेही त्यांना मान्य नव्हते. साधनशुचितेबाबत "सामान्य नियम देता येणार नाही. प्रसंग कोणता असेल, त्यावरून साधने काय योजावी हे ठरवावे लागेल, आणि शिवाय 'शुचिता' म्हणजे काय हेही ठरवावे लागेल. त्याबाबत एकवाक्यता होणे कठीण. उदाहरणार्थ, कित्येकांना मांसाहार हे पाप वाटते. परंतु तेही प्रकृतीकरिता डॉक्टरने सांगितल्यास तो करायला ते तयार होतात आणि मी त्यांना दोष देत नाही. आपद्धर्म याचा अर्थच हा आहे. परंतु एखाद्याने मांसाहार नाकारला आणि तो मरायला तयार झाला तर मी त्याला मूर्ख म्हटले तरी मला त्याबद्दल आदर वाटेल." (२२ : ११ : २५८–२५९)

याचा अर्थ खुनासारख्या गोष्टींना त्यांचा पाठिंबा किंवा मूक संमती होती असे मात्र समजण्याचे कारण नाही. तसे करणे म्हणजे रघुनाथरावांच्या विचारसरणीचा विपर्यास करण्यासारखे होईल. दुसऱ्याला ज्यामुळे त्रास होईल अशी कोणतीही कृती करण्याचा व्यक्तीला अधिकार नाही असे मानणारे रघुनाथराव, दुसऱ्या व्यक्तीची जाणूनबुजून केलेली हत्या समर्थनीय समजणे शक्य नव्हते : "खून हा केव्हाही अत्याचारच आहे आणि गांधींच्या मृत्यूपासून हिंदूंचा किंवा हिंदुस्थानचा काही फायदा झाला आहे असे जरी धरून चालले तरी त्यामुळे गांधींच्या खुनाचे समर्थन होत नाही. अधिकारी पक्षाला खूष करायचे असते तर गांधींच्या वधाबद्दल शोक करणारा एखादा लेख लिहिता आला नसता असे नाही. तो आम्ही लिहिला नाही तरीदेखील जाणूनबुजून बेत करून केलेला खून केव्हाही समर्थनीय नाही. स्वसंरक्षणाकरता खून करावा लागला तर तो समर्थनीय होईल, किंवा संतापाच्या भरात एखाद्याने खून केला तर कायद्यात देखील त्याला थोडेबहुत क्षम्य समजतात. एरवी खून करणे म्हणजे कायदा आपल्या हातात घेणे. ही रानटीपणाची खूण आहे

आणि कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रात तशी परवानगी नसते. अर्थात मरायला तयार झालेला मनुष्य पाहिजे ते करायला तयार होतो याला इलाज नाही. पण समाजाच्या दृष्टीने ही गोष्ट भयंकर आहे." ( २३ : १ : १६–१७ )

"गांधींमुळे हिंदुस्थानचे नुकसानच जास्त झाले" असे रघुनाथरावांचे मत असले तरी गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बजावलेल्या कामगिरीच्या महत्त्वाची त्यांना मुळीच जाणीव नव्हती असे नाही. या दृष्टीने गांधीजी व टिळक यांची त्यांनी केलेली तुलना लक्षात घेण्यासारखी आहे : "गांधींबद्दल आमचे मत असे आहे की, त्यांनी आपल्या हट्टाने राजकीय हक्कांसंबंधी पुष्कळच जागृती उत्पन्न केली आणि टिळक समाजाच्या ज्या थरापर्यंत पोचू शकले नव्हते, त्या थरापर्यंत गांधी पोचले. म्हणजे जनतेला त्यात खरोखरच काही कळू लागले असे नव्हे, तर मूर्ख जनता गांधींकडे जास्त प्रमाणात आकृष्ट झाली. लोकजागृती हे महत्त्वाचे काम जरी त्यांच्याकडून झाले तरी लोकांच्या धार्मिक समजुतींच्या बाबतीत त्यांना काही करता आले नाही, कारण ते स्वतः आपल्याला हिंदू, वैष्णव, वर्णाश्रमधर्माचे पुरस्कर्ते म्हणवीत असत. केवळ अस्पृश्यांना हरिजन म्हटल्याने काय होणार ? तो शब्द लोक वापरू लागले, पण त्याचा अर्थ कायमच राहिला...गांधींसारखाच टिळकांनीही राजद्रोह केला होता, पण टिळकांवर खटला झाला तेव्हा त्यांनी स्वतःचा बचाव केला. मी राजद्रोह केला आणि असाच करणार असे सांगण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. पण ते गांधींनी सांगितले. ही शिकण्यासारखी गोष्ट आहे. जे आपल्याला योग्य वाटते ते आपण केले असे सांगायला बिलकूल लाज किंवा भीती वाटता कामा नये." ( २२ : ११ : २५७–२५९ )

गांधीजींनी राजकारणात जी धार्मिक परिभाषा वापरली ती रघुनाथरावांना मुळीच पसंत नव्हती. गांधीजी धार्मिक असल्यामुळे व धर्म म्हणजे आचरटपणा व मूर्खपणा असे रघुनाथरावांचे मत असल्यामुळे, अजाण जनतेत गांधीजींच्यामुळे मूर्खपणाचा प्रसार झाला, असे त्यांनी अनेकदा लिहिले आहे : "गांधींच्यामुळे लोक अधिक निर्भयपणे वागू लागले, तुरुंगवासाला भीत नाहीसे झाले हे खरे, परंतु एकंदरीत त्यांच्या धार्मिक ढंगामुळे कित्येक लोकांची विचारशक्तीच नाहीशी झाली. ते वास्तविक कोणत्याही विषयात तज्ज्ञ नसताना त्यांना सर्वच विषयांत तज्ज्ञ समजण्याची कित्येकांना सवय लागली. उपोषणाचे आततायी तंत्र राजकारणात शिरून पुष्कळ लोक त्याचा सर्रास दुरुपयोग करू लागले. उदाहरणार्थ, बुद्धिवादी म्हणवणारे समाजवादीसुद्धा उपोषणाचे तंत्र वापरू लागले. ही आमच्या मते अधोगती आहे. स्वातंत्र्य गांधींमुळे मिळाले नाही, जागतिक परिस्थितीमुळे इंग्रजांना येथे राहणे अशक्य झाल्यामुळे मिळाले." ( २६ : ३ : ५८ ) रघुनाथरावांनी त्यांच्या हयातीच्या अखेरीस विनोबांच्या भूदान-चळवळीचेही वाभाडे काढले होते. कारण, या चळवळीच्या प्रणेत्यानेही धार्मिक परिभाषेचा वापर केला होता : "या देशाचे हे दुर्दैव आहे की,

विवेकाच्या आधारावर उभी केलेली कोणतीही चळवळ येथे यशस्वी होत नाही. एखादी चळवळ यशस्वी व्हायला दांभिक प्रदर्शन, पायी चालणे, लंगोटी नेसणे, केस वाढवणे, खाण्यापिण्याचे काही विलक्षण नियम पाळणे अशा युक्त्यांनी येथे व्यक्तित्व निर्माण होते. लेनिन, स्टालीन किंवा माओ-त्से तुंग यांना अशा युक्त्या कराव्या लागल्या नाहीत, परंतु त्यांनी जे काम केले, तसे हजारो ढोंग्यांच्या हातून होणार नाही. असे लोक लोकांची दिशाभूलच करतील; त्यांना विवेकभ्रष्टच करतील." ( २७ : १ : ११–१२ ) गांधीजी किंवा विनोबाजी यांच्या भजनी लागलेल्या भारतातील समाजवाद्यांनाही रघुनाथरावांनी असेच धारेवर धरले आहे.

स्वतंत्र भारतातील शासन प्रत्यक्षतःही खऱ्याखुऱ्या अर्थाने इहवादी असावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच एकीकडे धर्मातीत राज्याचा उद्‌घोष करीत असताना विशिष्ट धर्मविधी करणारे शासन रघुनाथरावांच्या टीकेचे नेहमीच लक्ष्य बनले. धर्मातीत सरकार असलेल्या देशात, "कोणत्याही धर्माच्या लोकांना जास्त सवलती मिळता कामा नये व कोणत्याही धार्मिक संस्थांना किंवा कृत्याला सरकारकडून मदत होता कामा नये," असा त्यांनी सतत आग्रह धरला होता. "गांधीजींच्या निधनानंतर सरकार हिंदूच असल्याचा" नेहरूंनी भरपूर पुरावा दिला, असे म्हणण्यास कर्वे कचरले नाहीत. ( २१ : ९ : २०९ ) मुंबई सरकारने मंजूर केलेला गोहत्याप्रतिबंधक कायदा हा अहिंदूंच्या विरुद्ध आणि हिंदूंच्या धार्मिक समजुतींना धरून केलेला असल्याने धर्मातीत राज्याच्या घोषणेशी तो विसंगत आहे, असा त्यांचा आक्षेप होता. वैतरणेच्या धरणाच्या उद्‌घाटन समारंभाच्या वेळी मोडक इंजिनियरनी पत्नीसह जाऊन पूजा करणे गैर होते. म्हणूनच, "नगरसमिती हिंदू आहे काय? हे धरण हिंदूंकरता बांधायचे आहे काय? हे मोडकांच्या घरचे खाजगी कार्य नव्हते. अशी हिंदू पूजा करायचा त्यांना काय अधिकार होता? आणि त्यांच्या पत्नीचा त्यात संबंध कसा येतो?" असे अनेक प्रश्न त्यांनी विचारले. "गोहत्या बंद करून हिंदूंच्या वेडगळ समजुती इतरांवर लादायच्या आणि त्याला आर्थिक कारणे चिकटवायची. हिंदूंपुरती एकपत्नीत्वाची सक्ती करायची, शिखांना तरवारीची सवलत द्यायची, आणि म्हणे आम्ही धर्मातीत! हे कॉंग्रेसवाल्यांनाच शोभते." ( २२ : ९ : २१५ – २१६ )

समान नागरी कायद्याचा रघुनाथरावांनी नेहमीच पुरस्कार केला. केवळ हिंदूंनाच लागू होणारा कायदा त्यांना मान्य नव्हता : "बहुपत्नीकत्व जर वाईट असले, तर ते मुसलमानांपुरतेच चांगले असू शकत नाही. आणि हिंदू धर्मात एकपत्नीत्वाचा नियम नसताना ते जर हिंदूंवर जबरदस्तीने लादता येते तर ते मुसलमानांवरही का लादता येऊ नये? मुसलमानांच्या भीतीने सरकार त्यांच्यावर असले कायदे लादीत नाही, असे रघुनाथरावांनी स्पष्ट लिहिले आहे ( २३ : २ : ४७ ). आजही आपण धर्मातीत राज्याचे पुरस्कर्ते आहोत असा टेंभा मिरवणारी मंडळी बहुधा

मुसलमान समाजावरच लक्ष केंद्रित करीत असतात. कॅथॉलिक मिशनऱ्यांच्या कर्मठपणाविरुद्ध तितक्याच आवेशाने मोहीम काढणे जरूर असताना त्यांच्या चाळ्यांबाबत अनेक 'सेक्युलर' विचारवंत मूग गिळून बसतात. रघुनाथरावांनी मात्र असे कधी केले नाही : "हे मिशनरी जितक्या लवकर जातील तितके बरे" असे त्यांना वाटत होते. (२३ : २ : ४८) रघुनाथरावांनी कोणाबाबतच बोटचेपी भूमिका स्वीकारली नाही. पोस्टाच्या तिकिटावर 'रघुपती राघव राजाराम' छापणे जसे त्यांना गैर वाटले, तसेच गोमांस खाणाऱ्यांच्या मार्गात अडथळे आणणेही त्यांना अयोग्य वाटले. मद्रास राज्यामधल्या कॉंग्रेससरकारने नास्तिक मताच्या शिक्षकांना नोकरी न देण्यासंबंधी काढलेला हुकूमही त्यांच्या मते धर्मातीत राज्याच्या तत्त्वाशी विसंगत होता, कारण धर्मातीततेच्या वास्तविक अर्थानुसार कोणाच्याही धर्मासंबंधीच्या मतांची सरकारने दखल घेता उपयोगी नाही.

राष्ट्रवादासारख्या मूलतः भावनेवर आधारलेल्या विचारसरणीनेही रघुनाथराव कधीच भारले गेले नाहीत. १९४१ च्या सोलापूरच्या साहित्य संमेलनात श्री. ह. रा. महाजनी यांनी फॅसिझमविरोधी ठराव मांडला तेव्हा बहुतेकांना हा ठराव मंजूर होऊ नये असे वाटत होते. राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रभाव अनेकांवर असल्यामुळे तेव्हाच्या परिस्थितीच्या संदर्भात असा ठराव मंजूर करणे म्हणजे ब्रिटिश सरकारला नैतिक पाठिंबा देण्यासारखे होईल, अशी बहुतेकांची समजूत होती. रघुनाथरावांनी मात्र ठरावाला अनुमोदन देणारे भाषण केले. फॅसिझमसारख्या अत्याचारी पंथाला विरोध करण्याचे कर्तव्य पार पाडताना त्यामुळे ब्रिटिश सरकारला मदत होत असली तरी स्वातंत्र्यप्रिय लोकांनी त्याचा बागुलबोवा करून ठरावाला विरोध करणे अयोग्य होईल अशी त्यांची भूमिका होती (१४ : १० : ३५९). स्वातंत्र्योत्तर काळातही राष्ट्रगीत किंवा राष्ट्रध्वज यासंबंधी लिहिताना ते भावनांच्या आहारी गेलेले दिसत नाहीत. राष्ट्रगीत वाजवून होईपर्यंत चित्रपटगृहाचे दरवाजे बंद ठेवावे म्हणजे राष्ट्रगीताचा अपमान करून लोकांना बाहेर जाता येणार नाही, हा नियम म्हणजे मूर्खपणा व जुलूम आहे असे त्यांना वाटे. राष्ट्रगीताचा काही मान राखायचा असेल, तर ते वेळीअवेळी लोकांवर लादल्याने तो राहणार नाही : "नाहीतर इंग्लंडच्या राष्ट्रगीताचा जसा येथे मान राहात नसे; तशीच स्थिती आपल्या राष्ट्रगीताची होईल, इंग्रजी राष्ट्रगीत चालू असताना लोक खुशाल बाहेर जात असत, पण तरीही दरवाजा बंद करण्याचा मूर्खपणा सरकारने कधी केला नाही." (२१ : १२ : २८७)

'वंदे मातरम्' किंवा 'जनगणमन' या दोन्ही राष्ट्रगीतांविषयी त्यांचे चांगले मत नव्हते. "राष्ट्रगीतात थापा असल्याच पाहिजेत असे मला वाटत नाही. कारण अशा थापांनी ते हास्यास्पद होते. 'सुजलां सुफलां मलयजशीतलां' हे वर्णन सुंदर असले तरी ते खोटे आहे...ज्या दोन गीतांत चढाओढ होती त्यांतले एक हे असे खोटे आहे आणि दुसरेही फारसे खरे नाही....ते टागोरांनी लिहिले असले तरी ते राष्ट्र-

गीत होण्याच्या योग्यतेचे नाही." ( २२ : २ : ४५ ) रघुनाथरावांच्या मते सुब्रह्मण्य भारती यांनी तामिळ भाषेत लिहिलेले 'वंदे मातरम्' राष्ट्रगीत होण्याच्या योग्यतेचे होते. राष्ट्रध्वजावर चक्र असणे हेही त्यांना मान्य नव्हते, कारण चक्र हे प्रगतीचे निदर्शक होऊ शकत नाही. साधू लोकांचे बंड माजावयाला नको म्हणून भगव्या निशाणाला जसा त्यांचा विरोध होता, त्याचप्रमाणे काँग्रेसचा चरखायुक्त झेंडा त्यांना बावळटपणाचा वाटत होता. भूतकाळाचे गोडवे गाण्याची, पूर्वेतिहासाविषयी निष्कारण गौरवाने बोलण्याची राष्ट्रवाद्यांची खोड असते. कर्वे या सार्वत्रिक प्रवृत्तीपासून अलिप्त राहिलेले दिसतात. राष्ट्राचे प्रतीक असलेल्या झेंड्यासारख्या वस्तूंचे स्तोम माजवणेही त्यांना पसंत नव्हते.

समाजवादी पक्षाची मते आपल्याला मान्य असल्याचे कर्वे अखेरच्या दिवसांत म्हणत होते हे खरे असले, तरी मूलतः आणि मुख्यतः त्यांची विचारसरणी उदारमतवादी, स्वातंत्र्यवादी, बुद्धिप्रामाण्यवाद्याचीच होती. एकोणिसाव्या शतकातल्या जॉन स्टुअर्ट मिलसारख्या उदारमतवाद्यांप्रमाणे त्यांना बहुजनसमाजाच्या हुकूमशाहीची धास्ती वाटत असे : " स्वराज्य मिळाले तर हे खेडवळ लोक काय करतील हे सांगता येत नाही, कारण अशिक्षित बहुजनसमाज असाच असणार की नाही ? हा सुशिक्षित लोकांना मोठा धोका आहे. कितीही धोका असला तरी स्वराज्य मिळू नये असे मी म्हणत नाही. पण हे लक्षात ठेवून अशा लोकांना शिक्षणमात्र शक्य तितक्या लवकर दिले पाहिजे. नाहीतर आयर्लंडात जसे हेकेखोर, धार्मिक लोकांचे राज्य सुरू झाले आहे तसेच येथेही व्हावयाचे ", अशी त्यांनी भीती व्यक्त केली आहे ( ५ : २ : ४५ ). बहुजनसमाजाला पुष्कळ गोष्टी कळत नाहीत, त्यामुळे बहुमताने कायदे मंजूर केले तरी बहुमताने समाजाचे हितच होईल असे नाही, असा ते इशारा देत ( २१ : ५ : १०६ ). मात्र उदारमतवाद्यांप्रमाणेच, जबरदस्तीपेक्षा लोकशिक्षणाचाच मार्ग अखेर श्रेयस्कर ठरेल, असा त्यांचा विश्वास होता.

" वेश्या बंद करा, दारू बंद करा, जुगार बंद करा, अशी ओरड लोक एकसारखे करीत आहेत, पण यांपैकी एकही गोष्ट जबरदस्तीने बंद होत नाही. वेश्या बंद केल्या तर त्या भूमिगत होतात. दारू बंद केली तर दारूच्या चोरट्या भट्ट्या होतात. जुगाराविरुद्ध कायदा असूनही भर रस्त्यावर लोक जुगार खेळताना आढळतात. आता विडी बंद करा, शब्दकोडी बंद करा, रहस्यमाला बंद करा, अशा नवीन ओरडी सुरू झाल्या आहेत. आपल्याला जे अनिष्ट वाटेल ते जबरदस्तीने बंद करावे ही मनोवृत्ती मोठीशी श्रेयस्कर नाही, स्वातंत्र्याला शोभणारी नाही. या गोष्टी बंद व्हायला पाहिजे असतील, तर त्याला लोकशिक्षण हाच श्रेयस्कर मार्ग ठरेल. आणि ज्या गोष्टी आपल्याला अनिष्ट वाटतात त्या समाजदृष्ट्या अनिष्ट असतीलच असे नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे." ( २४ : ६ १४०–१४१ )

म्हणूनच सर्वच बाबतींत कायदे करू पाहणे हे उदारमतवाद्यांप्रमाणेच रघुनाथ-

रावांना पसंत नव्हते. मिलसारख्या विचारवंताने, फक्त एखाद्या व्यक्तीपुरत्याच संबंधित अशा कृती व व्यक्तीच्या इतरांशी संबंधित अशा कृती असा भेद करून, स्वातंत्र्य व कायदा यांचे परस्परसंबंध निश्चित करण्याचा प्रयत्न केला होता. रघुनाथरावांनी मिलचा निकष स्वीकारलेला दिसतो. व्यक्तीच्या ज्या कृतीमुळे दुसऱ्यास नुकसान पोहोचण्याचा संभव असतो अशा कृतीवर निर्बंध लादणे योग्य अशी मिल-प्रमाणेच त्यांची भूमिका होती : " समाजात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य मिळणे शक्य नाही, परंतु जोपर्यंत दुसऱ्या कोणाचे नुकसान होत नाही तोपर्यंत प्रत्येकास पाहिजे तसे वागण्याची मुभा असली पाहिजे, " हे सूत्र त्यांनी 'समाजस्वास्थ्या'च्या दुसऱ्या अंकातच सांगितले आहे ( १ : २ : ३ ). ज्यापासून दुसऱ्याच्या स्वातंत्र्यास बाध येत नाही असे स्वातंत्र्य सर्वथैव योग्य आहे, ही त्यांची भूमिका अखेरपर्यंत कायम राहिली : " स्वातंत्र्य याचा अर्थ चुका करण्याचे स्वातंत्र्य किंवा रूढीविरुद्ध वागण्याचे स्वातंत्र्य असाच केला पाहिजे. रूढीप्रमाणे वागण्याचे 'स्वातंत्र्य' काय असायचे ? कोणाचे नुकसान किंवा कोणाला जुलूम करण्याचा हक्क कोणालाही नाही, परंतु इतर कोणताही निर्बंध असता नये." ( ९ : ५ : १५९ )

रघुनाथरावांच्या या भूमिकेला त्यांच्या काही वाचकांनी आक्षेप घेतला : " आपण म्हणता की जेथे समाजहिताचा प्रश्न उद्‌भवत नाही तेथे प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे व समाजाने व्यक्तीला दडपून टाकू नये. आज अशी एकतरी महत्त्वाची गोष्ट आहे का की जेथे समाजाचा प्रश्न येत नाही ? समागमाचा प्रश्नदेखील सामाजिक आहे. " ( ९ : ४ : ११० ) रघुनाथरावांनी हा पेच सोडवला तो असा : " समागम ही एके काळी सामाजिक बाब होती. परंतु संततिनियमनाची आणि गुप्तरोगप्रतिबंधाची माहिती आहे अशा सुशिक्षितांच्या बाबतीत तरी ती हल्ली सामाजिक बाब नाही आणि यामुळेच पुढारलेले लेखक याबाबतीत व्यक्तिस्वातंत्र्य मागतात. यात 'ॲनार्किक' असे काहीच नाही. समाजाने नसत्या उठाठेवी करू नयेत इतकेच माझे म्हणणे आहे. सर्वांस तसे स्वातंत्र्य केव्हा मिळेल तेव्हा मिळो, ज्यांना ते आज घेता येईल त्यांनी ते आज, आत्ता, घ्यावे. क्रांतीची वाट पाहणे मूर्खपणा आहे. " ( ९ : ४ : १२५ ) एकमेकांच्या संमतीने कोणीही स्त्री-पुरुष समागम करतील तर ते गैर नसून हा प्रत्येकाचा हक्क आहे, असे कर्वे म्हणत. स्त्री-पुरुषसंबंधापासून जोपर्यंत संतती किंवा रोगप्रसार होत नाही, तोपर्यंत ती खासगी बाब समजण्यातच समाजाचे हित आहे, असे ते मानीत होते.

समागमस्वातंत्र्याचा ते पुरस्कार करीत असल्यामुळे साहजिकच प्रस्थापित सामाजिक संकेतामुळे किंवा सर्वमान्य नीतिमूल्यांमुळे समागमस्वातंत्र्याच्या मार्गात येणारे अडथळे व्यक्तीने बाजूला सारावेत, असा त्यांचा आग्रह होता. या दृष्टीने पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या मार्गात अडचणी जास्त येत असल्याने रघुनाथरावांनी त्यांचाच प्राधान्याने विचार करणेही अपरिहार्य होते. पुरुषप्रधान समाजात ज्या मूल्यांची जोपासना

केली जाते त्यांवर कवें तुटून पडलेले दिसतात. पातिव्रत्य हे नैसर्गिक नसून ती पुरुषांची अरेरावी आहे असे त्यांना वाटे, कारण स्त्रियांना स्वातंत्र्य दिल्यास त्याही पुरुषांप्रमाणेच वैचित्र्यप्रिय असल्याचे सिद्ध होईल, अशी त्यांना खात्री होती. एखाद्या विवाहित स्त्रीने नवऱ्याखेरीज अन्य पुरुषाशी केलेला समागम हा दोघांच्याही संमतीने होत असेल तर त्यात काही गैर नाही व रूढ अर्थाने त्याला व्यभिचार म्हटले जात असले तरी त्याला पाप किंवा गुन्हा मानण्याचे कारण नाही, असे ते मानीत असत. "स्त्रीचे चारित्र्य तिच्या जननेंद्रियात साठवलेले असते ही कल्पना खोट्या आध्यात्मिक कल्पनांवर आधारलेली" असल्याने ती त्यांना त्याज्य वाटली (२१ : ३ : ५०). म्हणूनच एखादी स्त्री केवळ शारीरिक सुखाकरता एखाद्या पुरुषाशी समागमास सिद्ध झाली तरीही तिला 'रांड' म्हणणे म्हणजे 'शिवी देणे आहे' असे ते समजत. रांड अगर वेश्या म्हणजे "पैशाकरता समागम सोसणारी स्त्री" असल्याने "प्रेम नसता पतिव्रता राहणारी स्त्री म्हणजे कर्तव्य म्हणून समागम सोसणारी स्त्री" ही वेश्येच्याच जातीची असेही ते म्हणत. स्वतःच्या स्त्रीवर प्रेम करावे व परस्त्रीवर करू नये हे म्हणणे फोल वाटत असल्याने तसा उपदेश पुरुषांना करावयास त्यांची तयारी नव्हती. मात्र त्याबरोबरच पत्नीचे इतर कोणावर प्रेम बसल्यास त्याबद्दल तिला दोष न देण्याची नवऱ्याची तयारी पाहिजे, असेही ते बजावीत (४ : ४ : ८८-८९). स्त्रीवर मालकीहक्क सांगण्याच्या पुरुषांच्या प्रवृत्तीमधून पातिव्रत्याच्या कल्पना निर्माण झाल्या आहेत,.असे त्यांचे मत होते.

या कामस्वातंत्र्याच्या पुरस्काराच्या मुळाशी जशी रघुनाथरावांची व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारसरणी होती, तशीच त्यांची सुखवादी विचारसरणीही होती : "दुसऱ्याचे नुकसान केल्याशिवाय जे जे सुख भोगता येईल ते ते भोगण्याची प्रत्येकाला मुभा असली पाहिजे आणि यातच कामसुखाचा समावेश होतो." (२४ : १ : ५) कामस्वातंत्र्य हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे, त्यामुळे कोणालाही कामवासना दडपून टाकण्याचा प्रसंग येऊ नये, मात्र, "सुखवाद म्हणजे केवळ स्वतःला सुख मिळावे, बाकीच्यांचे काय होईल ते होवो असे नव्हे. सर्वांच्या सुखाची जो काळजी वाहतो तोच सुखवाद," अशी त्यांची कल्पना होती (२० : २ : ३१). ऐहिक सुखवादी मरणानंतर काय होणार याची पर्वा करीत नाहीत. या जगातच सर्वांना सुख मिळावे अशी ते खटपट करीत असतात. या जगात माणसाला मिळणाऱ्या सुखात कामसुखाला महत्त्वाचे स्थान असल्याने ते व्यक्तीला नाकारणे म्हणजे अन्याय करण्यासारखे आहे, अशी रघुनाथरावांची धारणा होती. दुसऱ्याच्या सुखाकरता झटणे हे कामशास्त्राचे मुख्य नीतितत्त्व आहे याकडे लक्ष वेधून, स्त्रीच्या सुखावर समागमाचे नियम बसवणाऱ्या वात्स्यायनासारख्या प्राचीन विचारवंतांचा त्यांनी गौरव केला; कारण लॅटिन व ग्रीक भाषेत लेखन करणाऱ्या पाश्चिमात्य तज्ज्ञांनी केवळ पुरुषाच्या सुखासच महत्त्व दिले आहे हे त्यांना पसंत नव्हते. मात्र "हे सुख केवळ शारीरिक दृष्टीनेच न

पाहता सर्व बाजूंनी याचा विचार करणे जरूर आहे, " असा इशाराही ते देत असत (४:४:८९).

समागमस्वातंत्र्याच्या मार्गात विवाहसंस्थेचा अडसर येत असेल तर तोही व्यक्तीने बाजूला सारावा, असा कर्वे सल्ला देत असत. विवाहसंस्थेला ते नेहमी 'उंदराचा पिंजरा' म्हणत. मनुष्य विवाहाने सामान्यतः सुखी होत नाही असा त्यांचा दावा होता. "त्यामुळे विवाहाचे पावित्र्याचे ढोंग सोडून इतर कराराप्रमाणे हाही करार दोघांच्या सोयीप्रमाणे मोडता येईल अशी व्यवस्था" त्यांना हवी होती (२६:५:८९); "याचा अर्थ प्रत्येकाने आठवड्यातून तीनदा विवाह मोडलाच पाहिजे असा होत नाही. ज्यास विवाहात सुख मिळत नसेल त्याकरता मोडण्याची परवानगी पाहिजे व तो मोडल्यास त्यास कोणत्याही रीतीने कमी लेखता कामा नये" (५:८:१८६.); "विवाहाला भटांचीही परवानगी लागता कामा नये आणि रजिस्ट्रारचीही लागता कामा नये, किंवा निदान घटस्फोटाला तरी या दोन्हींपैकी कोणीही अडथळा करता कामा नये" ही त्यांची किमान मागणी होती (७:६:१४२). कर्वे विवाहसंस्थेवर हल्ला करीत असले तरी "मुले स्वावलंबी होईपर्यंत त्यांच्या संगोपनाची व्यवस्था करणारी संस्था" म्हणून कुटुंबसंस्थेचे अस्तित्व त्यांना आवश्यक वाटत होते; मात्र कुटुंब-संस्थेला विवाहसंस्थेचा टेकू असलाच पाहिजे असे नाही, अशी त्यांची भूमिका होती.

समागमस्वातंत्र्याची रघुनाथरावांनी केलेली तरफदारी व त्या संदर्भात त्यांनी स्त्रियांच्या हक्काचे केलेले समर्थन यामुळे ते एका बाजूने पुढारलेली मते प्रतिपादीत आहेत असे दिसले, तरी या मतांचा आधार केवळ स्वातंत्र्याचे तत्त्व असल्यामुळे व त्यांच्या विचारांना समतेचे अधिष्ठान नसल्यामुळे त्यांची मते दुसऱ्या बाजूने अनेकदा परंपराप्रिय माणसांच्या मताशी मिळतीजुळती वाटतात. समान हक्कांसाठी स्त्रियांनी चालविलेली चळवळ असमंजसपणाची आहे. या बाबतीय भारतीय स्त्रियांनी इंग्लंड-मधल्या स्त्रियांचे अनुकरण न करता फ्रान्समधल्या स्त्रियांचे उदाहरण डोळयांसमोर ठेवावे, असे त्यांना वाटे. समान हक्कांबरोबर येणारी समान जबाबदारी पत्करण्यात आपले नुकसान जास्त आहे हे फ्रान्समधल्या स्त्रियांना चांगले कळते व म्हणून त्या मतदानाचा हक्कदेखील जोराने मागत नाहीत, असे चांगल्या वर्तणुकीचे शिफारस-पत्रही रघुनाथरावांनी तेथील स्त्रियांना दिलेले आहे. विजारी घातल्याने, चिरूट ओढ-ल्याने किंवा केस कापल्याने स्त्रिया पुरुषांची बरोबरी करू शकत नाहीत, असे कर्वे म्हणत. पोशाखाच्या बाबतीत स्त्रियांना स्वातंत्र्य देण्यास त्यांची हरकत नव्हती. पण या स्वातंत्र्याचा उपयोग स्त्रीने पुरुषाला आकृष्ट करून घेण्यासाठी करावा, अशी त्यांची अपेक्षा होती. "पुरुषात न सापडणारे शरीराचे फुगीर भाग लपवण्याचा" प्रयत्न स्त्रियांनी पोशाखाच्या साहाय्याने करणे त्यांना पसंत नव्हते. सांकेतिक दृष्ट्या बंडखोरपणाचे प्रतीक म्हणून केस कापण्यात चूक नाही असे ते म्हणत असले, तरी पुरुषाशी शक्य तितके साम्य दाखवण्याचा स्त्रियांचा प्रयत्न त्यांना आचरटपणाचा

वाटत होता हे विसरून चालणार नाही.

पुरुषप्रधान समाजाने उराशी कवटाळलेली पातिव्रत्यासारखी मूल्ये झुगारून देणारे कर्वे त्याच पुरुषप्रधान समाजाने स्त्रियांविषयी प्रसृत केलेल्या अन्य कल्पनांच्या मगरमिठीतून मुक्त झालेले नव्हते : "सत्याची आणि न्यायाची चाड स्त्रियांना पुरुषांपेक्षा बरीच कमी असते" हे मत व्यक्त करताना, एरवी डॉक्टरांच्या अशास्त्रीय विचारसरणीवर सडकून टीका करणारे कर्वे एका डॉक्टराच्या सोयिस्कर मताचा बेलाशक हवाला देतात. "अन्यायी पुरुषालादेखील न्याय आणि अन्याय यांतला भेद कळतो. तो अन्यायाने वागला तर तो केवळ दुष्टपणाने आणि नाइलाज म्हणून, पण स्त्रीने अन्याय केला तर तिला त्याची जाणीवच नसते" किंवा "स्त्रीचा शब्द पुरुषाइतका विश्वसनीय नसतो असा अनुभव आहे." ( २५ : ३ : ४३ ) असली विधाने ते बेधडक करीत आणि त्यासाठी शोपेनावरसारख्या तत्त्वज्ञाच्या मतांचा आधार घेत असत किंवा एखाद्या अमेरिकन लेखिकेची साक्ष आपल्या वतीने काढीत असत. हे प्रचलित समज तपासून पाहण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केलेला दिसत नाही. पातिव्रत्याच्या, स्त्रियांच्या विनयशीलतेबाबतच्या अगर एकपत्नीव्रताबाबतच्या कल्पनांमुळे लैंगिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यात अडथळे येत होते म्हणून रघुनाथरावांनी या कल्पना झिडकारल्या. लैंगिक स्वातंत्र्य पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही ते द्यावयास तयार असले, तरी हे स्वातंत्र्य वापरताना स्त्रीने आपल्या वाट्याला निसर्गाने दिलेली भूमिका वठवण्यातच तिचे हित आहे, अशी त्यांची ठाम समजूत होती. निसर्गानेच स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेने गौण स्थान दिले आहे हे ओळखून त्यानुसार वागले तरच स्त्रियांचे भले होईल, असा स्त्रियांच्या हक्कांसंबंधीचा त्यांच्या विवेचनाचा रोख दिसतो.

"आपापले काम उत्तम तऱ्हेने करणाऱ्या मनुष्याला आपोआप मान मिळतो. तसाच स्त्रियांनी आपले काम चांगले केल्यास त्यांनाही मिळेल" असे आमिष दाखवून रघुनाथराव म्हणतात : "पण त्यांनी आपले स्त्रीत्व सोडता कामा नये आणि स्त्रियांच्या नैसर्गिक जबाबदाऱ्या टाळता कामा नये."; "सुखाच्या दृष्टीने काय किंवा प्रजोत्पत्तीच्या दृष्टीने काय, समागम हे स्त्रीचे मुख्य जीवनकार्य आहे हे कबूल केले पाहिजे." ( २५ : ४ : ६४–६६ ) शरीररचनेने स्त्रियांना येणारा कमीपणा आणि मासिक स्राव, प्रसूती वगैरेसारख्या अडचणी लक्षात घेऊन पुरुषासारखी कष्टाची कामे करण्याचा आपला हक्क बजावण्याचा स्त्रियांनी हट्ट धरणे योग्य होणार नाही, असे रघुनाथरावांनी स्त्रियांना सुचवले आहे. स्त्रिया पुरुषांपेक्षा लवकर म्हाताऱ्या होत असल्याने व विशेषतः उष्ण प्रदेशात त्यांची कामवासना आणि आकर्षण ही पुरुषापेक्षा बऱ्याच अल्प वयात कमी होत असल्याने स्त्रियांनी समान हक्कांच्या हव्यासाने पुरुषावर एकपत्नीव्रत लादू नये, असाही त्यांनी उपदेश केलेला आहे.

निसर्गतःच असलेली आपली दुबळी अवस्था लक्षात घेऊन स्त्रियांनी सर्व क्षेत्रांत पुरुषांची बरोबरी करण्याच्या भरीला पडण्यात मतलब नाही असा त्यांच्या

लिखाणाचा एकूण झोक दिसतो : " स्त्रियांनी स्वातंत्र्याकरता झगडण्यात कोणतीही चूक नाही, पण स्वातंत्र्याचा अर्थ समानता होऊ शकत नाही. स्वातंत्र्य याचा अर्थ त्यांच्यावर पुरुषांचा ताबा असू नये इतकाच होतो, पण पुरुषांच्या व त्यांच्या कार्यक्षमतेत स्वाभाविक फरक असल्यामुळे पुरुषांच्या सर्व धंद्यांत त्यांनी शिरावे असा त्याचा अर्थ होत नाही. अर्थात त्या स्वतंत्र झाल्यास त्यांना कोणी अशी बंदी घालू शकत नाही हे खरे. तथापि त्यात त्यांचा फायदा नाही आणि समाजाचाही नाही." (२५ : ३ : ४५) पुष्कळ स्त्रिया वकील, डॉक्टर किंवा शास्त्रज्ञ आहेत हे खरे असले तरी पुरुषांचे कोणतेही काम पुरुषासारखेच स्त्रीही करू शकेल असे त्यांना वाटत नव्हते. खेरीज, " पुरुषांना स्त्रियांविषयी जे प्रेम वाटते ते त्यांच्या स्त्रीत्वामुळे, त्या डाक्टरीचे किंवा वकिलीचे काम उत्तम प्रकारे करू शकतात म्हणून नव्हे " अशी त्यांची खात्री असल्याने, पुरुषांना आपल्याबद्दल वाटणारे आकर्षण टिकवून व वाढवून त्यांच्यावर सत्ता गाजवण्याचा मार्गच अखेर स्त्रियांना श्रेयस्कर, असा कर्वे पोक्त सल्ला देत असत (२५ : ५ : ८३).

आधुनिक भांडवलशाही समाजात स्त्रियांना व्यवसायस्वातंत्र्य देऊ करणाऱ्या मंडळींनीही स्त्रियांच्या सौंदर्याचा व आकर्षणाचा जेथे वापर करता येईल अशा क्षेत्रातच स्त्रियांना वाव दिलेला दिसतो. चित्रपट व रंगभूमी गाजवणाऱ्या नटी, उपाहारगृहातील नर्तिका, हवाई सुंदरी, जाहिरात किंवा वेषभूषा यांसारख्या व्यवसायांत काम करणाऱ्या स्त्रिया, उद्योगपतींच्या किंवा व्यवस्थापकांच्या 'निजी सचिव' म्हणून काम पाहणाऱ्या स्त्रिया बऱ्यापैकी पैसा कमावतात तो त्यांच्या स्त्रीत्वाच्या व आकर्षणाच्या भांडवलावर! विक्रेत्यांचे काम करणाऱ्या, स्वागत-कक्षांत काम करणाऱ्या स्त्रिया यांच्याही बाबतीत हेच गुण पाहून काम दिले जात असते. भांडवलशाही समाजात पुरुषांचे मनोरंजन करणे, त्यांना आकृष्ट करून घेणे किंवा त्यांची शुश्रूषा किंवा सेवा करणे याखेरीज अन्य कामे स्त्रियांच्या वाट्यास सहसा येत नाहीत. स्त्रीच्या कर्तृत्वाला वाव मिळणे व तिच्या अंगभूत गुणांचा विकास होणे हे अखेर तिच्या सौंदर्यावर व आकर्षणावर अवलंबून असते, कारण त्याचाच फायदा उठवून नफा मिळवण्याकडे भांडवलवाल्यांची प्रवृत्ती असते. भांडवलशाही समाजात स्त्री ही भोग्य वस्तू मानली जातेच, शिवाय अन्य वस्तूंचा खप वाढवण्यासाठी गिऱ्हाइकांना खेचून घेणारे एक प्रभावी साधन म्हणूनही स्त्रीला वापरले जाते. साहजिकच स्त्रीने आपले स्त्रीत्व कसे जपले पाहिजे, आपला बांधा व सौंदर्य टिकवण्यासाठी शरीराची निगा राखून पुरुषांना आकर्षित करणे कसे जरूर आहे, हे सांगण्यावर नेहमीच भर दिला जातो. त्यासाठी आवश्यक ते स्वातंत्र्य स्त्रियांना देण्यास दूरदर्शी माणसे खळखळ करीत नाहीत, पण तिने समानतेची भाषा केली की मग मात्र नैसर्गिक विषमता आठवते. रघुनाथरावांची भूमिकाही भांडवलशाही समाजातल्या या प्रवृत्तीला पोषक अशीच आहे.

समानतेची भाषा म्हणजे केवळ वायफळ बडबड आहे, असे रघुनाथरावांचे मत

होते: "पण आता राजे जरी नाहीसे झाले तरी आणि समाजवादी लोकांनी कितीही बडबड केली तरी, समाजात सर्वांचा दर्जा सारखा होणे अशक्य आहे. तत्त्वतः समता प्रस्थापित झाली तरी स्त्रियांच्या आकर्षणाची किंमत कमी होणार नाही आणि यामुळे व इतर कारणांनीही समता तत्त्वातच राहणार. सामान्यतः श्रीमंत लोक जसे खरे समाजवादी नसतात, तशाच स्त्रियाही नसतात. समाजवादी मजूर पक्ष सर्वांनाच मजूर बनवायला पाहतो, पण यात स्त्रियांचा फायदा नसतो. स्त्रियांना रंगमहाल पाहिजे असतो तो मजुरांच्या राज्यात कसा मिळणार ?" ( २५ : २ : २३-२४ ) प्रजोत्पादन हा समाजाचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे हे ओळखून मातांना शक्य तितक्या सवलती दिल्या पाहिजेत आणि फाजील प्रजोत्पादनाने त्यांचे आरोग्य व सौंदर्य यांना हानी पोचणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे, यावर रघुनाथरावांनी भर दिला. चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र स्त्रीने खुषीने निवडल्यास त्यात तिचे व समाजाचे हित आहे असाच त्यांच्या स्त्रियांच्या हक्कासंबंधीच्या प्रतिपादनाचा सूर आहे: "स्त्रियांना स्वातंत्र्य असू नये, त्यांनी पुरुषांच्या गुलामगिरीतच नेहमी राहिले पाहिजे, असे हल्ली कोणीही म्हणत नाही, परंतु स्वातंत्र्य असूनदेखील चूल आणि मूल ही दोन्ही सांभाळावी असे म्हणणारे पुष्कळच आहेत आणि ही कामे करण्याबद्दल त्यांना पगार द्यावा असेही म्हणणारे पुष्कळ आहेत आणि ते रास्त आहे" असे म्हणून रघुनाथराव स्त्रियांची समजूत घालतात: "गुलामगिरी नसली आणि स्त्रियांना स्वातंत्र्य असले, म्हणून पुरुषांत व स्त्रियांत श्रमविभाग असू नये असे नाही. यंत्रांनी घरकामाचे कष्ट कमी करता येतील आणि मग घरकामातही कमीपणा वाटण्याचे कारण राहणार नाही." ( २५ : ५ : ८२ )

आगरकरांच्या काळात महाराष्ट्रातील विचारवंत व ललित लेखक विधवांच्या दुःस्थितीविषयी पोटतिडिकेने लिहीत; रघुनाथरावांच्या काळात विधवांच्या ऐवजी वेश्या मराठी विचारवंतांच्या व ललित लेखकांच्या सहानुभूतीचा विषय बनल्या. वेश्याव्यवसायाला नीच समजण्याचे कारण नाही असे सांगितले जाऊ लागले. वेश्यावृत्तीची समाजाला गरज आहे असे कर्वे मानीत: "वेश्यावृत्ती ही अत्यंत उच्च दर्जाची संस्था आहे व ती कधीही नाहीशी होता कामा नये असे आमचे म्हणणे नाही. तेव्हा आम्ही वेश्यावृत्ती आदर्श समजत नाही, पण आम्ही त्यांना हीनमात्र मानीत नाही. जेव्हा आम्ही पुरस्कारीत असलेल्या कामस्वातंत्र्याला समाज मान्यता देईल तेव्हा वेश्यांची गरज राहणार नाही, किंवा फार तर प्रवाशांकरता किंवा ज्यांना दुसरी कोणतीही स्त्री थारा देणार नाही अशा कुरूप माणसांकरता राहील...ही व्यवस्था हल्ली वेश्यांकडून होत आहे, तिला कोणीही अडथळा करू नये, असे मात्र आम्ही म्हणतो." ( २५ : ८ : १४८-१४९ )

रघुनाथरावांनी येथे चांगलीच गफलत केलेली आहे. वेश्यावृत्ती कधीही नाहीशी होऊ नये असे आपण म्हणत नसल्याचा निर्वाळा ते देत असले, तरी ती नष्ट कर-

ण्याचा कोणी चंग बांधला तर अशा प्रयत्नांना त्यांनी साथ दिली नसती, असे वाटण्याजोगेच त्यांचे लेखन आहे.

वेश्यावृत्ती कायद्याने बंद करू पाहणाऱ्या गर्ती स्त्रियांना कर्वे सवाल करतात : " ज्यांना वाटेल त्यांना वेश्यावृत्ती करण्याचा हक्क का असू नये ? " ' पैशासाठी समागम सोसणारी स्त्री म्हणजे वेश्या ' ही रघुनाथरावांची व्याख्या मान्य केली तर पैशासाठी समागम सोसणे हा हक्क कसा होऊ शकतो ? उदरनिर्वाहासाठी नाइलाजाने पत्करलेला तो मार्ग ठरेल किंवा गरिबीमुळे, विशेषतः दलित स्त्रियांच्या वाट्यास येणारा तो जुलूम म्हणता येईल; पण व्यक्तित्वाच्या विकासास उपकारक ठरणारा तो हक्क म्हणता येणार नाही. " वेश्या स्वखुषीने धंदा करीत असते. ( अर्थात आर्थिक परिस्थितीमुळे त्या धंद्यात पडलेल्या काही असतात पण त्यांची संख्या शेकडा दहापेक्षा जास्त नसते ) " असेही कर्वे सांगतात. हे जर खरे मानले तर ' पैशासाठी समागम सोसणारी स्त्री ' या व्याख्येला अर्थ राहात नाही. वेश्येला हीन समजण्याचे कारण नाही हे त्यांचे म्हणणे कोणीही मान्य करील, पण नव्वद टक्के वेश्या आर्थिक दुःस्थितीमुळे या धंद्यात येत नाहीत तर स्वखुषीने येतात, हे रघुनाथरावांचे म्हणणे मान्य करणे कठीण आहे. काही कारणांमुळे विवाह करणे ज्यांना शक्य नसते अगर नको असते त्या पुरुषाची अडचण ओळखून मदतीला धावणाऱ्या समाजसेविकांची भूमिका या वेश्या बजावीत असतात, असे रघुनाथराव समजत असावेत व त्यामुळे या समाजसेविकांच्या कार्याला वाव देणे किंवा निदान त्यांना प्रतिबंध न करणे आवश्यक आहे यावर ते भर देत होते, असा ग्रह झाल्याशिवाय राहात नाही. वेश्याव्यवसायास आळा घालण्यासाठी केलेल्या कायद्यातील काही हास्यास्पद तरतुदींवर रघुनाथरावांनी केलेली टीका वाजवी होती तरी त्यामुळे ' पैशासाठी समागम सोसणाऱ्या स्त्रियांचे ' अस्तित्व समाजवादी समाजाने मान्य करावे काय, हा मूळ प्रश्न शिल्लक उरतोच. खरे म्हणजे ज्या लैंगिक स्वातंत्र्याचा कर्वे पुरस्कार करीत होते त्याचा उपभोग घेण्यास वेश्यांचे अस्तित्वही आवश्यक होते. त्यामुळे वेश्यांना धंद्याचे स्वातंत्र्य मिळावे वगैरे युक्तिवाद कर्वे करीत होते.

या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात माग्नूस हिर्शफेल्ड, हॅवेलॉक एलिस, सिगमंड फ्रॉइड यांनी लैंगिक प्रश्नांविषयी केलेल्या लेखनाचा जगभरच्या लैंगिक स्वातंत्र्यवाद्यांप्रमाणेच रघुनाथरावांनीही आधार घेतलेला आहे. लैंगिक प्रश्न, वैवाहिक जीवन वगैरेसंबंधी इंग्रजीत लेखन करणाऱ्या डॉ. रॉबिन्सन, डॉ. नॉर्मन हेअर, जज्ज लिंडसे, बर्ट्रांड रसेल वगैरेंप्रमाणेच फ्रेंच भाषेतील ग्रंथकारांचे ऋणही त्यांनी वेळोवेळी मान्य केले आहे. लैंगिक प्रश्नांसंबंधी लेखन करणाऱ्या ' लोकप्रिय ' पाश्चिमात्य लेखकांची लायकी व मर्यादा त्यांनी बरोबर ओळखली आहे. मेरी स्टोप्सच्या ' एन्ड्यूरिंग पॅशन ' या गाजलेल्या ग्रंथावर अभिप्राय देताना कर्वे म्हणतात : "....यातील पुष्कळ गोष्टी फ्रेंच व जर्मन वाङ्मयात पुष्कळ जुन्या झालेल्या आहेत व ज्या काही गोष्टी

नवीन आहेत त्या लेखिकेचे तर्क आहेत, त्यांस शास्त्रीय पुरावा नाही... स्टोप्स यांची भाषा शास्त्रीय विषयास साजेशी नसून कादंबऱ्यांचे धर्तीवर जाते त्यामुळे त्यांची पुस्तके लोकप्रिय होतात हे खरे, परंतु शास्त्रीय दृष्टीने त्यांची किंमत कमी होते." (२ : १२ : २७०) व्हॅन ड व्हेल्ड हे असेच आणखी एक लोकप्रिय ग्रंथकार! त्यांच्याविषयीही असाच परखड अभिप्राय दिलेला आहे. ते "कामशास्त्रज्ञ आहेत, समाजशास्त्रज्ञ नाहीत आणि त्यांचे अंगी लोकमताविरुद्ध जाण्याचे साहस आहे असे त्यांचे ग्रंथावरून दिसत नाही." (८ : ११ : ३३७)

रघुनाथरावांनी काय वाचले हे जसे अभ्यासकाने लक्षात घेतले पाहिजे, त्याचप्रमाणे काय वाचले नाही, हे लक्षात घेणेही, त्यांच्या विचारसृष्टीचे स्वरूप व मर्यादा समजावून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ठरते. फ्रॉइडच्या 'सहज प्रवृत्ती'च्या सिद्धान्तातील कच्चे दुवे दाखवून तो झिडकारण्याचे प्रथम धाडस करणाऱ्या तज्ज्ञांत इयान सटी यांना आज अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले जाते. प्रेम आणि द्वेष या भावनांच्या उगमांची उपपत्ती लावणारा व त्या संदर्भात फ्रॉइडच्या सिद्धान्ताची चिरफाड करणारा त्यांचा ग्रंथ १९३५ सालीच प्रकाशित झाला होता. त्याआधी दोन वर्षे जे. डी. अनविन यांनी 'लैंगिक नियमन व मानवी वर्तन' यांचे अन्योन्य संबंध तपासून, खऱ्याखुऱ्या अर्थाने समतेच्या आधारे स्त्रीपुरुषांमधील संबंध निश्चित केले जावेत, असे प्रतिपादन करणारा ग्रंथ प्रकाशित केला होता. अनिर्बंध लैंगिक स्वातंत्र्याची परिणती समाजाच्या ऱ्हासाने होते असा अनविन यांचा दावा होता व आपले मत सिद्ध करण्यासाठी त्यांनी भरपूर ऐतिहासिक पुरावे सादर केले होते. अनविनच्या या विचारसरणीचे खंडन करण्यासाठी का होईना, त्यांच्या ग्रंथाची रघुनाथरावांनी दखल घ्यावयास पाहिजे होती. पण कसा कोण जाणे, हाही महत्त्वाचा ग्रंथ त्यांच्या नजरेतून निसटलेला दिसतो. "मी मुलांच्या मानसशास्त्राचा विशेष अभ्यास केलेला नाही," अशी त्यांनी स्वतःच कबुली दिलेली आहे (२३ : ८ : १८७). त्यामुळे मेलानी क्लीनसारख्या लेखिकेने फ्रॉइडच्या 'सहज प्रवृत्ती' बाबतच्या सिद्धान्तातील तथ्य पारखण्याचा जो प्रयत्न केला, त्याचीही रघुनाथरावांनी दखल घेतलेली दिसत नाही.

गणित हा रघुनाथरावांचा मूळचा अभ्यासविषय असल्याने असेल कदाचित, कोणतेही शास्त्र हे 'निश्चित' असावे असे त्यांना वाटत असे. सामाजिक शास्त्रे त्यांच्या या कसोटीस उतरत नसल्याने त्यांना 'शास्त्रे' म्हणण्यासच ते राजी नसत. समाजशास्त्राचा अपवाद वगळता इतर विषयांविषयी त्यांचे फारसे चांगले मत नव्हते. इतिहासाचार्य राजवाडे यांच्याबद्दल त्यांनी लिहिले आहे: "त्याग करून राजवाड्यांनी केले काय, तर इतिहाससंशोधन. हा विषय फावल्या वेळी हाती घेण्यासारखा आहे, त्यावाचून कोणाचेही काही अडत नाही. तेव्हा सर्वस्व पणाला लावण्यासारखे त्यात काही नाही.... शास्त्रीय संशोधनात जन्म घातला तर त्याने जगाचे कल्याण होण्याचा संभव असतो, तसा इतिहाससंशोधनात नसतो. इतिहाससंशोधनाचा राजवाड्यांना नाद

होता म्हणून त्यांनी त्यात जन्म घातला. पण त्या नादाचा कोणालाही उपयोग नसल्यामुळे त्याला फारशी किंमत देता येत नाही." (१५ : ३ : ९२) इतिहास-संशोधनाचा कोणालाही उपयोग नाही हे रघुनाथरावांचे म्हणणे खरे आहे असे गृहीत धरले तरी त्यांनीच मान्य केलेल्या दुसऱ्या एका निकषाच्या साहाय्याने इतिहास-संशोधनही महत्त्वाचे मानावे लागेल. महादेवशास्त्री दिवेकरांनी भास्करराव जाधवांच्या रामायणासंबंधीच्या संशोधनावर असलाच आक्षेप घेतला असताना रघुनाथरावांनी लिहिले : "आम्ही शास्त्रीय वृत्तीचे लोक ज्याला सत्य म्हणतो त्याची कल्पनाच दिवेकरांना किंवा गांधींना नाही. सत्याला स्वतःची काही किंमत असते, त्याचा उपयोग किती होईल यावर ती अवलंबत नाही हे ज्यांना कळतच नाही त्यांना संशोधकाची भूमिकाच कशी समजणार?" (११ : ३ : ९३). भास्करराव जाधवांची तरफदारी करताना जो युक्तिवाद रघुनाथरावांनी केला त्याचे त्यांना राजवाड्यांविषयी लिहिताना विस्मरण झाले, याचे कारण राजवाड्यांबद्दलच्या पूर्वग्रहांनी त्यांच्या विचारशक्तीवर मात केलेली दिसते.

कठोर तार्किकता हे रघुनाथरावांच्या लिखाणाचे सर्वसामान्य वैशिष्ट्य असले तरी काही बाबतींत तर्कापेक्षा त्यांचे पूर्वग्रहच प्रबळ ठरत असावेत, असे वाटल्याखेरीज राहात नाही. प्रयोगशील वृत्तीचे एरवी कौतुक करणाऱ्या रघुनाथरावांचा भारतीय संगीताच्या बाबतीतला दृष्टिकोण कमालीचा कर्मठ होता. अभिजात भारतीय संगीत ऐकण्याचा त्यांना विलक्षण षोक होता, पण खानदानी भारतीय संगीतात कोणी सरमिसळ करण्याचा प्रयत्न करणे, नवी वाट शोधण्याची उमेद बाळगून प्रयोग करणे त्यांना बिलकूल खपत नसे : "बंगाली निर्मात्यांनी हिंदुस्थानी संगीतात युरोपीय संगीताची भेसळ करून संगीताचा नाश केला आहे आणि त्यांचेच अनुकरण पुष्कळांनी केले आहे. आमचे मते युरोपीय संगीत हे संगीत नसून गोंगाट आहे. निदान ते इतके भिन्न आहे की, त्याचा हिंदुस्थानी संगीताशी मिलाफ होणे अशक्य आहे. रवींद्रसंगीत हा प्रकार आम्ही ऐकला नाही, परंतु नावावरून तो बंगालीच असावा, म्हणजे गोंधळच असावासे वाटते." (२६ : ३ : ५९-६०). रघुनाथरावांचा हा हल्ला अनुदार वाटल्यामुळे त्यांच्या एका वाचकाने तक्रार केली, तेव्हा आपण हे सर्व विचारपूर्वक लिहिले आहे असे त्याला उत्तर मिळाले. हार्मोनियमचा वापर कोणी गवयाने केला की त्यांचे पित्त खवळत असे. हार्मोनियमला आकाशवाणीने बंदी केली हे योग्यच केले असे त्यांना वाटे, एवढेच नव्हे तर हार्मोनियमचा वापर करावा म्हणणाऱ्याला भारतीय संगीतातले काही समजत नाही, असे ते ठासून सांगत. सौंदर्यशास्त्र, आधुनिक चित्रकला, नवकाव्य वगैरेंची ते टवाळी करीत. मर्ढेकरांसारख्यांचे नवकाव्य किंवा पिकासोसारख्यांची चित्रकला दुर्बोधतेमुळे त्यांना नकोशी वाटे. सौंदर्याची निश्चित व्याख्या करणे शक्य नसल्यामुळे त्याचे शास्त्र कधीच होणे शक्य नाही, अशी ते ग्वाही देत असत.

सौंदर्यशास्त्राप्रमाणे मानसशास्त्र किंवा मनोविश्लेषण म्हणजे 'तोतयाशास्त्र' आहे, असे कर्वे म्हणत. फ्रँक केनियन यांच्या 'मिथ ऑफ द माइंड' या पुस्तकाच्या आधारे १९४४ साली त्यांनी एक लेखमाला लिहून मानसशास्त्र म्हणजे थोतांड आहे व मनोविश्लेषणशास्त्र खोटे आहे, असा आपला अभिप्राय जाहीर केला होता. या लेखमालेत रघुनाथरावांच्या विचारसरणीतील काही महत्त्वाची गृहीतकृत्ये स्पष्ट दिसतात : "धर्म हा ईश्वर व आत्मा या काल्पनिक गोष्टींवर उभारलेला असतो, आणि मानसशास्त्राचा पाया म्हणजे मन, हेही तितकेच काल्पनिक आहे"; "सर्वच शास्त्रे प्रथम कल्पनाशक्तीतून निघतात, पण केवळ कल्पना म्हणजे शास्त्र नव्हे. त्यातला काल्पनिक भाग काढून टाकल्यावर जे शिल्लक राहील त्यालाच शास्त्र म्हणता येईल. पण मानसशास्त्रात सर्वच काल्पनिक असल्यामुळे शिल्लक काहीच राहात नाही"; "ज्या शास्त्रातच काही निश्चित नाही, त्यातून निश्चित पद्धत कशी निघणार?" (१८ : २,३,४ : १२-१६). शोपेनावरला मानसशास्त्राचा अभ्यास फोल वाटे, तर ज्या विषयाला गणित लावता येत नाही त्याचे शास्त्र होऊ शकत नसल्यामुळे मानसशास्त्र हे कधीही शास्त्राच्या पदवीला पोचणे शक्य नाही, असे कांटचे मत होते. रघुनाथरावांनी या मतांना दुजोरा दिला आहे.

मन हे शरीराहून वेगळे नाही. मेंदू म्हणजेच मन. ज्याला आपण जाणीव म्हणतो ती आपल्याला मज्जातंतूंद्वारेच होते, मात्र जाणीव जरी मज्जातंतूंशिवाय होत नसली तरी मज्जातंतूंचे कार्य जाणिवेशिवाय होऊ शकते. म्हणजेच मेंदू आपोआप काम करीत असतो. आपल्याला कधी कधी त्याची जाणीव होते किंवा कधी होतही नाही. ज्या गोष्टींची आपल्याला जाणीव होते त्यांना आपण मानसिक मानतो, परंतु हा भाग फार थोडा असतो आणि विशेष महत्त्वाचाही नसतो. आपले शरीर हे यंत्र आहे. फक्त अन्न मिळवण्याची बाब सोडली तर प्राणी म्हणजे यंत्रेच आहेत आणि शास्त्रीय नियमाप्रमाणेच त्यांच्या सर्व हालचाली होतात, असे सांगून रघुनाथरावांनी निष्कर्ष काढला आहे : "मनाचा शरीरावर अंमल चालतो असे काहींना वाटते, पण ते हास्यास्पद आहे. कार्याचा परिणाम कारणावर होणे शक्य नाही. मन स्वतंत्र नाही, ते सर्वस्वी शरीरावर अवलंबून आहे. सारांश, मन आणि शरीर अशा द्वंद्वाची कल्पना आता सोडून दिली पाहिजे आणि शरीर म्हणजेच सर्व काही हे ओळखले पाहिजे." (१८ : १० : १०८) मनच जर नाही तर त्याचे विश्लेषण कसे करणार, असा त्यांचा मनोविश्लेषणशास्त्र बनवू पाहणाऱ्यांना सवाल आहे.

लेस्ली फार्बरनी म्हटल्याप्रमाणे मानसशास्त्र हे 'निश्चित' शास्त्र आहे किंवा नसल्यास तसे व्हावयास हवे आणि निश्चित समजल्या जाणाऱ्या शास्त्रांना कल्पनाशक्तीची जरूर नसते असा मानसशास्त्राच्या अनेक अभ्यासकांचाही भ्रम असतो. ('ह्यूमन होप अँड दि डेथ इन्स्टिंक्ट' : डेव्हिड होलब्रुक; पृष्ठ ३७.)

मानसशास्त्राला थोतांड म्हणणाऱ्या रघुनाथरावानीही हीच भ्रामक समजूत

बाळगली होती. खरे म्हणजे पदार्थविज्ञान किंवा रसायनशास्त्र यांच्यासारखी प्राकृतिक शास्त्रे 'एकेकाळी जितकी निश्चित' मानली जात होती. तितकी 'निश्चित' मानावी की नाही असा संदेह या विषयात पारंगत असलेले शास्त्रज्ञही आज उघड बोलून दाखवत आहेत. 'निश्चित' समजली जाणारी शास्त्रे वस्तुनिष्ठ असतात, हाही असाच एक भ्रम असल्याचे मान्य करण्यात येत आहे. पदार्थविज्ञानातील सापेक्षतावादाच्या सिद्धान्तास मान्यता मिळाल्यानंतर 'सहभागी निरीक्षकाची' संकल्पना आता खगोल-शास्त्रातही स्वीकारली जात आहे. खेरीज प्राकृतिक शास्त्राचे अभ्यासक ज्या विशिष्ट पद्धतीचा अवलंब करतात तिचाच अवलंब मानसशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांनीही करावा, हा रघुनाथरावांचा आग्रहही बरोबर नव्हता. एखादा शास्त्रज्ञ कोणत्या पद्धतीचा वापर करतो हे बरेचसे तो जी समस्या हाताळीत असतो तीवर अवलंबून असते. त्याचा स्वतःचा पूर्वानुभव, मनोधर्म व कल्पनाशक्ती यांवरही ते अंशतः अवलंबून असते. म्हणूनच ब्रिजमनसारख्या विख्यात पदार्थवैज्ञानिकाला किंवा नॉर्थरॉपसारख्या भाष्यकाराला 'एका शास्त्रीय पद्धतीची' भाषा चुकीची वाटते. ('सायन्स अँड रिलिजन': हॅरोल्ड के. शिलिंग; पृष्ठ ३६-३७)

मनोव्यापारांचा अभ्यास करताना पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र किंवा गणित या शास्त्रांत वापरल्या जाणाऱ्या पद्धती उपयुक्त ठरतात हे आजही कोणी नाकारीत नाही. मात्र मनाचे खरे स्वरूप समजावून घेण्यास या पद्धती पुरेशा नाहीत, एवढेच नव्हे तर काही जीवशास्त्रीय बाबींचा अभ्यास करताना त्यांचा अवलंब करणे अयोग्य व दिशाभूल करणारे आहे असे आता शास्त्रज्ञ म्हणत आहेत. (पाहा: 'अॅन इथॉ-लॉजिकल अॅप्रोच टु दि प्रॉब्लेम ऑफ माइंड', पी. एम. ड्रायव्हर; 'दि माइंड: बायॉलॉजिकल अॅप्रोचेस टु इट्स फंक्शन्स': विल्यम कॉर्निंग व मार्टिन बॅलाबन (संपादक); पृष्ठ २६०–२६१.) आजपर्यंत जीवशास्त्रीय बाबींचा उलगडा करण्यासाठी बिगर-जीवशास्त्रीय पद्धतींचा उपयोग केला गेल्यामुळे पदार्थविज्ञान किंवा गणित यांच्या सावलीत जीवशास्त्र वाढले, पण त्याचमुळे त्याची वाढही खुरटली अशी तक्रार आज केली जात आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. प्राण्यांच्या वर्तनाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांना सध्याच्या गणिती तंत्रांचा अपुरेपणा आज जाणवतो आहे. जीव-शास्त्रातल्या या अलीकडच्या प्रवाहांची दखल घेतली तर गणित किंवा पदार्थविज्ञान या शास्त्रांतील पद्धतीच्या वापराचा रघुनाथरावांचा आग्रह तितकासा बरोबर नव्हता, असेच म्हणावे लागते.

रघुनाथरावांनी धर्माबद्दल व्यक्त केलेली मतेही फार उथळ व ठोकळ वाटतात. धर्म म्हणजे बावळटपणा, वेडगळपणा किंवा मूर्खपणा यापलीकडे धर्माचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आढळत नाही: "...वास्तविक धर्म म्हणजे सगळाच बावळट-पणा, त्यात निवड करायची म्हणजे 'उडदामाजी काळेगोरे काय निवडावे निवडणारे!' अशीच स्थिती. विचारशून्य लोकांकरताच धर्म असतो..." (७:१०:२७७);

" धर्म म्हणजे कल्पनासृष्टी व विज्ञान म्हणजे सत्यसृष्टी " असल्याने विज्ञानाची वाढ जसजशी होत जाईल तसतशी धर्माची पीछेहाट होणार अशी त्यांना खात्री वाटत होती. खरे म्हणजे धर्माबद्दलची त्यांची मते अठराव्या शतकातल्या व्होल्तेर, दिदेरो यांच्यासारख्या फ्रेंच विचारवंतांच्या मताशी जास्त जुळतात. पण रघुनाथराव ज्या काळात फ्रान्समध्ये शिक्षणासाठी गेले त्या पहिल्या महायुद्धानंतरच्या काळापूर्वी म्हणजे १९१२ साली डरखाइमसारख्या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाचे धर्माबद्दलचे अधिक मूलगामी व सखोल विचार प्रसिद्ध झालेले होते. केवळ चुकीच्या समजुतीवर व असत्यावर आधारलेली एखादी मानवी संस्था इतकी दीर्घ काळ अस्तित्वात राहणे व तीत चैतन्य नांदणे कसे शक्य आहे, असे वाटून डरखाइमसारखे समाजशास्त्रज्ञ 'धर्मभावनेची उगमस्थाने' शोधण्याचा प्रयत्न करीत होते. कोणत्याही विशिष्ट धर्माचे रघुनाथरावांना आकर्षण वाटत नसले तरी धर्मसंस्थेने मानवी समाजाच्या जडणघडणीस लावलेला हातभार, समाजव्यवस्थेतील धर्माचे कार्य वगैरे प्रश्नांचा त्यांनी वेध घेणे आवश्यक होते असे वाटते; पण त्यांनी तसे कधीच केले नाही.

विल हर्बर्ग या अभ्यासकाने फ्रॉइडविषयी म्हटले आहे : " विवेक हा फ्रॉइडचा देव होता आणि फक्त सत्याचा–म्हणजे त्याच्या दृष्टीने शास्त्रीय सत्याचा–साक्षात्कारच तो मानावयास तयार होता. " रघुनाथरावांबद्दलही असेच म्हणता येईल : " बुद्धिवाद हा सर्व शास्त्रीय ज्ञानाचा पाया आहे. नैसर्गिक परिस्थितीचे अवलोकन किंवा प्रयोग करून मिळवलेली माहिती आणि यावर आधारलेली तर्कशुद्ध अनुमाने एवढेच काय ते शास्त्रीय सत्य मानायचे याचे नाव बुद्धिवाद. " ( २४ : १० : २३१ ). शास्त्रीय सत्य शोधण्याचा बुद्धिवाद हा एकच मार्ग आहे अशी रघुनाथरावांची निष्ठा असल्यामुळे, एखाद्या मिशनऱ्याच्या चिकाटीने त्यांनी बुद्धिप्रामाण्यवादाचा आयुष्यभर पुरस्कार केला; शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जावा असा नेहमी आग्रह धरला. मात्र बुद्धिप्रामाण्यवादाची गृहीतकृत्ये पुन्हा पुन्हा तपासून पाहण्याचा किंवा त्यांचा फेरविचार करण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला असे वाटत नाही. " बुद्धीची मुख्य खूण आणि ज्ञानार्जनाचे साधन म्हणजे चिकित्सक वृत्ती, शंका घेण्याची प्रवृत्ती " ( २२ : ९ : २०८ ). जो शंकाच घेत नाही त्याला ज्ञान कसे मिळणार, असा प्रश्न विचारणाऱ्या रघुनाथरावांनी अठराव्या व एकोणिसाव्या शतकातल्या बुद्धिवाद्यांची गृहीतकृत्ये कितपत बरोबर आहेत, हे पडताळून पाहण्याचा सारखा प्रयत्न करायला हवा होता.

प्रत्यक्षतः घडले ते एवढेच की, रघुनाथरावांनी निःशंक पण बंदिस्त मनाने बुद्धिप्रामाण्यवादाचा सतत प्रचार केला. बुद्धिप्रामाण्यवादावरील हल्ले परतवताना त्यांनी त्याचा फेरविचार करून पुन्हा नव्याने आपल्या विचारांची मांडणी करण्याचा प्रयत्न केला नाही. " शास्त्रीय ज्ञानाने इतर सर्व प्रश्न सुटले तरी मृत्यूचा प्रश्न त्याने कसा सुटणार ? " या सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रश्नाला रघुनाथरावांनी दिलेले उत्तर

मासलेवाईक आहे : " मृत्यूचा प्रश्नच कोठे आहे, तर तो सोडवायचा आहे ? मृत्यू सर्वांना येतो हे माहीत आहे, तेव्हा आता प्रश्न काय राहिला ? मृत्यू म्हणजे काही भयंकर गोष्ट आहे असेही नाही. कारण पुष्कळ लोकांना मरताना बिलकूल त्रास होत नाही. ज्यांना नरकाची भीती वाटत असेल, त्यांना ते एक बुजगावणे आहे, पण हल्लीच्या शास्त्रज्ञांना त्याची मुळीच भीती वाटत नाही, कारण ईश्वर, स्वर्ग, नरक, आत्मा, मोक्ष वगैरे कल्पनांवर त्यांचा विश्वास नाही. तेव्हा मृत्यूचा प्रश्नच काही राहात नाही. तेव्हा तो सोडवायचा कसा ? ....मृत्यूच्या पलीकडे काही नाही अशी खात्री झाल्यावर मृत्यूला भिण्याचे काय कारण ? जिवंत राहणाराचेच पुष्कळ वेळा अत्यंत हाल होतात. मरणाराचे होत नाहीत. जो मेला तो सुटला, हे माहीत असताना मरणाला भ्यावे का ?" (१३ : ८ : २८७-२८८) मिशनऱ्यांचे एक बरे असते. त्यांना प्रश्न पडत नाहीत, शंका येत नाहीत. सर्व प्रश्नांवर त्यांच्याकडे उत्तरे तयार असतात. ती समजावून सांगून अज्ञ जनतेला सन्मार्ग दाखवायचा एवढेच आपले काम असे त्यांना वाटत असते. बुद्धिप्रामाण्यवादाचा मिशनऱ्यांच्या निष्ठेने व तळमळीने प्रचार करणाऱ्या रघुनाथरावांच्या लेखनात हाताच्या बोटावर मोजता येण्याजोगे अपवाद वगळता, कमालीची सुसंगती आहे. मात्र ही सुसंगती बंदिस्त मनाच्या विचारवंताची आहे.

विज्ञानाच्या क्षेत्रात गेल्या तीस-चाळीस वर्षांत झालेल्या विचारमंथनाच्या अनुरोधाने रघुनाथरावांच्या विचारसरणीतील उणिवा व अपुरेपणा दाखवणे आज कोणत्याही अभ्यासकाला शक्य होत असले तरी त्यामुळे रघुनाथरावांनी सतत सत्तावीस वर्षे दिलेल्या एकाकी लढतीचे महत्त्व कमी लेखण्याचे कारण नाही. भारतात अनेक उदारमतवादी विचारवंतांनी व सुधारकांनी स्त्रियांची कड घेऊन त्यांची दुःस्थिती नाहीशी करण्याकरता आपल्या परीने प्रयत्न केला, पण त्यांच्यापैकी कोणीही लैंगिक संबंधांच्या बाबतीत उदारमतवादी विचारसरणीचे प्रतिपादन करण्याचे धैर्य दाखवले नाही. शिवस्वामी अय्यर यांच्यासारख्या उदारमतवाद्याने कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाबाबत आस्था दाखवली असली तरी रघुनाथरावांप्रमाणे लैंगिक संबंधांचे मूलगामी विश्लेषण केले नाही. स्त्रियांची बाजू घेऊन भांडणाऱ्या समाजसुधारकांची भूमिका मुख्यतः त्यांच्याविषयी वाटणाऱ्या करुणेवर आधारलेली होती. रघुनाथरावांनी केलेला स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार मात्र स्त्रियांविषयी त्यांना वाटणाऱ्या दयेच्या भावनेतून उद्भवलेला नव्हता. " ' स्त्री ' हा कोणी पुरुषापेक्षा वेगळ्या जातीचा प्राणी नाही; समाज या नावाला पात्र होणारा कोणताही गट स्त्रियांचा व पुरुषांचा मिळून होत असतो, आणि स्त्रियांचे व पुरुषांचे हितसंबंध एकमेकांत गुंतले असल्यामुळे " पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही स्वातंत्र्य उपभोगता आले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोण होता.

लैंगिक प्रश्नांच्या बाबतीत मोकळेपणाने लिहावे असे रघुनाथराव सांगत असत.

साहजिकच ही गुरूची विद्या गुरूवरच उलटवण्याचा प्रयत्न त्यांच्या काही बेरकी वाचकांनी करून पाहिला :

"आपल्या पत्नीस विषमज्वराने किंवा अशाच भारी दुखण्यामुळे कमरेखाली पंगुत्व आले आणि आपण निपुत्रिक आहात....कामशास्त्राच्या देशी-विदेशी वाङ्मयाचा इतका अभ्यास व निरीक्षण असूनही आपण निपुत्रिक कसे? की पुत्रप्राप्तीचे संशोधनात हा अभ्यास झाला? की काही काल आशा आणि पुढे चौकशीतच वय संपले? ...आपण उभयतांस पुत्रप्राप्तीची इच्छा आणि आतुरता होती का...कामपूर्तीचे बाबतीत आपली परिस्थिती कशी राहिली?" साळसूदपणे विचारल्या गेलेल्या या सवालात कुत्सितपणाने रघुनाथरावांच्या वैयक्तिक जीवनातील दुःखद घटनांचा निर्देश केला गेला होता. रघुनाथरावांच्या जागी अन्य कोणी लेचापेचा संपादक असता तर तो या प्रश्नांच्या सरबत्तीमुळे पेचात पडला असता. पण असल्या प्रश्नांतील खवचटपणा मनावर न घेता रघुनाथरावांनी त्यांच्या रोखठोक पद्धतीने आडपडदा न ठेवता जबाब दिला :

"आमचे पत्नीस रक्तक्षयाने (पर्निशिअस ॲनीमिया) पंगूपणा आला होता आमचा कामशास्त्राचा अभ्यास विवाहापूर्वी निदान दहा वर्षापासून चालू होता. आम्हा दोघांसही पुत्रप्राप्तीची आतुरता कधीच नव्हती. कित्येकांना धार्मिक कारणाकरता पुत्र पाहिजे असतो. कित्येकांना वारस पाहिजे असतो. आम्हा दोघांपैकी कोणीच धार्मिक नव्हते व मिळकतच नसल्यामुळे वारसाला काय मिळणार?...मूल झाले नाही याचे कारण शोधण्याची जरूर आम्हास वाटली नाही, पण डाक्टरी चिकित्सेशिवाय स्वतःलाच समजेल असे काही कारण नव्हते इतकेच मी सांगू शकतो. तसे चुकून मूल झाले असते तर मला सरकारी नोकरी सोडण्याची छाती झाली नसती, कारण एकदा कुटुंबाची जबाबदारी पत्करली म्हणजे जरूर तर अपमान सोसूनही शक्य तर कुटुंबावर दारिद्र्यात राहण्याचा प्रसंग येऊ नये असे माझे मत आहे...एखादे वेळी पतिपत्नी दोघेही स्वार्थत्याग करतात आणि त्यांना मुले झाल्यास त्यांचे हाल होतात, तेही मला पसंत नाही...पत्नीच्या आजाराचा भयंकर खर्च डोक्यावर होता. दोनदा नोकरी सोडल्यावर पुन्हा नोकरी मिळण्याचा संभव फारच थोडा होता, म्हणून त्या अवधीत संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतली, कारण त्यानंतर मुले होण्यात मोठाच धोका होता...दुसऱ्या लग्नाचा विचारच माझ्या डोक्यात कधी आला नाही. पत्नीचे आजाराचे सुरुवातीला माझे वय ४७ असल्यामुळे कामपूर्तीचे बाबतीत मला विशेष जाणवण्यासारखी परिस्थिती नव्हती; परंतु इतरांनी धडा घेण्यासारखे मी काहीच केले नाही. म्हणजे माझा स्वभाव भित्रा असल्यामुळे इतर कोणतीही व्यवस्था केली नाही." (२२ : १२ : २७८–२८३)

रघुनाथरावांच्या विचारसृष्टीचा आणखी एक गुणविशेष कोणालाही स्तिमित करील. नाजूक समजल्या जाणाऱ्या विषयावरील विवेचनही त्यांनी त्याचा कस मुळीच

कमी न करता विलक्षण नेमक्या, स्पष्ट व साध्या भाषेत केले आहे. रघुनाथरावांचे शब्द जोरकस व ठाशीव असत, तसेच ते सरळ आशयाला भिडणारे असत. त्यांच्या समकालीनांना असलेला अलंकारांचा अतिरिक्त सोस लक्षात घेतला तर याही बाबतीत त्यांनी आपले वेगळे वळण राखले होते, हे जाणवते. प्रत्यक्ष जीवनात बुजरे व अबोल असलेले रघुनाथराव कोणाचाही मुलाहिजा न ठेवता प्रतिपक्षावर तुटून पडत. मात्र कठोर टीका करतानाही त्यांनी शिवीगाळ कधी केली नाही. एखाद्यावर फारच संतापले तर त्याच्यासंबंधी 'गेला झक मारीत' असे म्हणणे ही त्यांच्या बाबतीत अगदी हद्द होती. शास्त्रीय विषयासंबंधी लेखन करणारे कितीतरी लोक निष्कारण बोजड शब्दांचा वापर करून सोप्या गोष्टीही उगाचच अवघड करून सांगत असतात. क्लिष्टता हा जणू त्यांच्या पांडित्याचा पुरावा समजला जातो. स्पष्ट व सुबोध लेखन करण्याबाबत रघुनाथरावांचा कटाक्ष होता. म्हणूनच बोजड भाषेबद्दल त्यांनी ज्ञानकोशकार केतकरांनाही दोष दिला आहे. गुळमुळीत लिहिणे किंवा मोघम विधाने करणे हे रघुनाथरावांनी कधी केले नाही. चूष म्हणून त्यांनी अपरिचित किंवा नवे शब्द वापरले नाहीत. मात्र इतर कोणी असा उद्योग केला की, व्याकरणाच्या दृष्टीने किंवा अर्थाच्या दृष्टीने त्यांचे काही शब्द कसे चुकीचे आहेत, हे त्यांनी तत्परतेने दाखवून दिले.

विविध विषयांत रघुनाथरावांना गती असल्यामुळे त्यांच्या विचारसृष्टीचे रूपही बहुरंगी झाले आहे. तसे पाहिले तर ललित साहित्याला त्यांनी 'समाजस्वास्थ्या'त दुय्यम स्थान दिले होते; पण त्यासाठी मर्यादित जागा देऊनही त्यांनी त्या काळातल्या महत्त्वाच्या कलाकृतींची दखल घेतली आणि त्यांचे बहुंशी बरोबर मूल्यमापन केले. लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांचे त्यांनी जेमतेम सहा ओळींत परीक्षण केले असले तरी, "चरित्रे बहुधा कंटाळवाणी असतात परंतु हे तसे नाही. मराठीत अशा प्रकारचे चरित्र दुसरे सापडणार नाही", हा त्यांचा अभिप्राय होता, हे लक्षात घेण्यासारखे आहे (९ : १० : ३०२). श्री. ना. पेंडसे यांच्या 'हद्दपार' व 'गारंबीचा बापू' या दोन्ही कलाकृतींनाही रघुनाथरावांनी अशीच दाद दिली आहे : "हरिभाऊ आपटयांच्या नंतर इतक्या दर्जाच्या कादंबऱ्या फारच थोड्या झाल्या" असे 'हद्दपार'-च्या संदर्भात म्हटल्यानंतर त्यांनी, 'गारंबीचा बापू' आधीच्या "दोन कादंबऱ्यांपेक्षा अधिक सरस ठरेल," असे म्हटले हे विसरून चालणार नाही (२५ : १ : १२ व २५ : १० : १९४). ललितकृतींची पारख करतानाही त्यांनी जी जाण दाखवली तीही त्यांच्या चोखंदळ रसिकतेची साक्ष देणारी होती.

रघुनाथरावांच्या बाबतींत एक गोष्ट मात्र नेहमी घडली. त्यांनी केलेल्या कार्याचे व त्यांच्या विचारसृष्टीचे खरे स्वरूप क्वचितच लक्षात घेतले गेले. त्यामुळे अखेर अहंमन्यतेचा दोष पत्करूनही त्यांना स्वतःच आपल्या कार्याचे .व विचारविश्वाचे दर्शन करून द्यावे लागले :

" आमचा उद्देश प्रथमपासूनच असा होता की, आगरकरांनी ज्या बुद्धिवादाचा पुरस्कार केला त्या बुद्धिवादाचा प्रकाश शक्य तितक्या विषयांवर पाडून प्रसार करावा. अर्थात बुद्धिवाद आगरकरांनी आपल्या डोक्यातून काढलेला नाही. त्याचा त्यांनी पुरस्कार केला इतकेच. परंतु कित्येक बुद्धिवादी लोक असे समजतात की, आगरकर म्हणजे बुद्धिवादाची कमाल मर्यादा झाली; त्यांच्यापुढे जाणे शक्य नाही. आमचे मते ते शक्य आहे आणि आम्ही तसा प्रयत्न केला आहे. यामुळे 'ही मते आगरकरांना देखील पसंत पडली नसती' या आक्षेपाला आम्ही बिलकूल किंमत देत नाही. या मासिकात लैंगिक विषयांना प्राधान्य मिळाले आहे याचे कारण असे की स्वतःला बुद्धिवादी म्हणवणारे लोक देखील या विषयात मात्र बुद्धिवादाचा उपयोग करण्यास तयार नसतात." ( २६ : १ : १ ). रघुनाथरावांचा स्वतःविषयीचा हा दावा वाजवी होताच. पण आगरकरांनंतरच्या इतर काही विचारवंतांबाबतचे किंवा कर्त्या सुधारकांबाबतचे त्यांचे मतही वस्तुस्थितीला धरून होते. " गोपाळराव गोखले बुद्धिवादी नव्हतेच. डॉ. केतकरही नव्हते. महर्षी कर्वे यांनी अशा प्रकारचे लिखाण केलेले नाही. राजवाड्यांनीही केले असेल असे वाटत नाही. ते बुद्धिवादी होते की काय हे माहीत नाही. वामनराव ( वा. म. जोशी ) जरी अर्धवटच बुद्धिवादी होते, तरी या इतरांपेक्षा त्यांनी बुद्धिवादाला जास्त पाठिंबा दिला होता. मात्र त्यांनी आगरकरांची परंपरा चालू ठेवली हे म्हणणे हास्यास्पद आहे." ( २१ : २ : ४० )

आत्मश्लाघेचा आरोप केला जाण्याची शक्यता लक्षात घेऊनही रघुनाथरावांनी आगरकरांचे आपणच एकटे वारस आहोत, असा दावा केला. त्यांच्या समकालीनांनी खरे म्हणजे तो मान्य करावयास हवा होता, पण इतके श्रेयही त्यांना दिले गेले नाही. निर्लेप मनाने 'समाजस्वास्थ्य' पुन्हा एकदा वाचण्याची त्यांच्यापैकी कोणी तसदी घेतली तर रघुनाथराव कर्वे हे एकटेच आगरकरांचे वारस होते, अशी कबुली त्यांना, उशिरा का होईना द्यावी लागेल.

— मौज : दिवाळी अंक, १९७२

०००००००००००००००००००००००००

# १

# सावरकरांची विचारसृष्टी

०००००००००००००००००००००००००

माझिनीच्या आयुष्याचा आपल्याला जेवढा हेवा वाटतो तेवढा दुसऱ्या कोणत्याही महान व्यक्तीच्या जीवनाचा हेवा वाटत नाही, असे नीत्शे म्हणत असे. कारण एकाग्र मनाने माझिनीने एकाच कल्पनेचा ध्यास घेतल्यामुळे ही कल्पनाच एक ज्वाला बनली आणि या धगधगत्या ज्वालेने माझिनीच्या जीवनात जे जे म्हणून वैयक्तिक होते ते सर्व जाळून टाकले असे नीत्शेने म्हटले आहे. ( **माझिनी :** गेलॅनो सॅलव्हेमिनी-इंग्रजी अनुवाद, १९५६ ) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचेही असेच झाले होते. स्वातंत्र्योत्तर सत्तेच्या राजकारणात ज्यांची सरशी झाली त्यांची पाठराखण करू पाहणाऱ्या आणि त्यांच्या पायाशी लोळण घेणाऱ्या मंडळींना स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळच्या रणधुमाळीत घायाळ होऊन शरपंजरी पडलेल्या रोगजर्जर सावरकरांचा हेवा वाटत असेल की नाही कोण जाणे; पण स्वतंत्र व शस्त्रसज्ज भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आयुष्याचा क्षणन् क्षण सावरकरांनी वेचला हे त्यांच्या कडव्या विरोधकालाही कबूल करावे लागेल. "माझे जीवन जाणत्या आरंभापासून भारतीय राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाशी संबद्ध झालेले आहे. इतकेच नव्हे तर पुढे पुढे त्या राष्ट्रीय जीवनाचा ते माझे व्यक्तिजीवन एक प्रमुख आणि परिणामकारक घटक होत आले आहे." असे स्वतः सावरकरांनीच म्हटले आहे. ( **समग्र सावरकर वाङ्मय :** खंड १, पृष्ठ ४. ) "माझ्या समकालीन पिढीतील लक्षावधी तरुणांच्या आयुष्याची दिशा पलटून जावी इतका त्यांच्यावर माझ्या मतांचा, प्रयत्नांचा आणि सहवासाचा प्रत्यक्ष परिणाम झालेला आहे." ( **कित्ता,** पृष्ठ ४ ) याची स्वतः सावरकरांना जाणीव होती.

सावरकरांचे जीवन कोणालाही एखाद्या अभिजात ग्रीक शोकान्तिकेची आठवण करून

देईल. नियतीशी टक्कर देणाऱ्या एखाद्या धीरोदात्त नायकाप्रमाणे सावरकर अखेरच्या क्षणापर्यंत झगडले. असामान्य शौर्य, असाधारण धैर्य व साहस, अमोघ वक्तृत्व, ओजस्वी लेखन या गुणांच्यामुळे ऐन पंचविशीतच सावरकरांच्या भोवती एक वलय निर्माण झाले होते. सशस्त्र क्रांतीचा प्रयत्न फसल्यानंतरचा त्यांचा बंदिवास, त्रिखंडात गाजलेली त्यांची ती समुद्रातील उडी, नंतर झालेली पन्नास वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा, कारागृहातील अंगावर शहारे आणणारा त्यांचा भयानक छळ यांमुळे सावरकरांची जीवनगाथा ही त्यांच्या हयातीतच रम्य आणि अद्भुत कादंबरी वाटू लागली. स्वतः सावरकरांनाही याची कल्पना होती, म्हणूनच ते म्हणाले, "माझे चरित्र मूलतःच अशा काही उत्क्षोभक विद्युत-तंतूंनी विणलेले आहे आणि प्रकंपक सुखदुःखांच्या रंगाबेरंगांनी त्याची अशी सजावट झाली आहे की त्याच्या नुसत्या उद्दीपक मनोवेधकपणासाठी सुद्धा साहित्यात त्याची भर टाकण्यास प्रत्यवाय नाही." (किता, पृष्ठ ५.)

या झपाटलेल्या माणसाच्या मंतरलेल्या आयुष्याची अखेर झाल्यावर त्याच्या यशापयशाचे मर्म समजावून घेण्याचा प्रयत्न करणे हेच त्याच्या समकालीनांचे कर्तव्य ठरते. एखाद्या अस्सल शोकात्म नाटकाचा अखेरच्या अंकाचा पडदा पडल्यावर प्रेक्षागृहातून बाहेर पडताना आपल्याला वाटत राहते, या शोकनाटकाच्या नायकाचे जीवन असे घडणे आणि त्याचा शेवट असा होणे अपरिहार्य होते. सावरकरांच्या जीवनाचा त्यांच्या प्रकाशित साहित्याच्या आधारे विचार करताना अभ्यासकालाही असेच वाटेल.

सावरकरांचे आत्मवृत्तात्मक लेखन चाळताना सारखे जाणवते की आपण नेते होण्यासाठीच जन्माला आलो आहो आणि सभोवतालच्या सामान्य माणसांची क्षुद्र जीवने आपल्या स्पर्शाने उजळणार आहेत, त्यांना अर्थ येणार आहे, याबद्दल सावरकरांना मनोमन खात्री होती. सावरकरांनी लहानपणापासून स्वतःकडे नेता म्हणूनच पाहिले. आपल्या नेत्याच्या भूमिकेचा स्वतःला विसर पडू न देणारा सावरकरांइतका आत्मकेंद्रित वृत्तीचा पुढारी अर्वाचीन भारताच्या इतिहासात क्वचित आढळेल. आपले नेतृत्व हे कोणाच्या आश्रयाने वाढले नाही किंवा कोणाचा वारसा म्हणून मिळालेले नाही; ते स्वयंभू आहे असे सावरकरांना वाटत असल्याचे दिसते. आपली मते ही आपण स्वतःच बनवलेली आणि आपली कृती ही देखील स्वतःचीच; ती कोणाच्या प्रभावामुळे अगर प्रेरणेमुळे घडली नाही असे सावरकर बजावतात, याचा अर्थ असा नव्हे की, सावरकर कोणाचेच ऋण मानीत नाहीत. "माझ्या मतावर नसला तरी माझ्या ज्ञानावर, भाषेवर, संस्कृतीवर आणि उत्साहावर 'काळा'च्या अखंड परिशीलनाचा फारच मोठा परिणाम झाला. इतका की, जर मला माझ्या क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचे गुरुपद कोणास तरी देणे असेलच तर ते मी 'काळा'सच देऊ शकेन; पण तेही केवळ क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचे, कृतीचे

नव्हे. क्रांतिकारक संघटनेत आणि संगरात सदैव मलाच माझे पुढारी व्हावे लागले. मला माझ्याविणे दुसरा कोणताही गुरू वा नेता त्या रणकंदनात प्रत्यक्ष सक्रिय सहाय्य देणारा नव्हता. बहुतेकजण मला नाकारणारेच होते, एकदोघे आतून 'ठीक', वेळेवर 'धन्य' म्हणणारे होते. पण माझ्या ध्येयाच्या, धाडसाच्या आणि रणधुमाळीच्या पुढे पाऊल टाकणारा, त्यात माझे पुढारीपण घेणारा त्या पिढीतील पुढाऱ्यांत कोणीही नव्हता. ते झाडून सारेजण फारफार मागे उभे राहिलेले असत आणि आपण मागे रेंगाळत आहोत असे न समजता मीच भरमसाट भडकलो आहे असे समजत. 'काळ'कर्त्यांनी एवढी चूक मात्र कधीही केली नाही. दुसऱ्यास मागे तरी ओढले नाही." (किता; पृष्ठ १४८) आपल्याला कोणत्याही नेत्याचा आधार अगर मार्गदर्शन मिळाले नाही, एवढेच नव्हे तर आपल्या नेतृत्वाची खच्ची करणाऱ्या प्रयत्नांना आपण कसे जुमानले नाही हे सावरकरांनी स्पष्ट सांगितले आहे. "माझ्या लहानपणी काय किंवा प्रौढपणी काय, मला माझ्या या साध्या धाडसापासून तो अगदी स्वातंत्र्य-घोषणेच्या आणि राज्यक्रांतीच्या व समाजक्रांतीच्या अभिनव भारतीय धाडसापर्यंत उत्तेजन देणारे गुरुजन मिळण्याचे सुदैव क्वचितच लाभले! उलट तेजोभंगाच्या आणि मनोभंगाच्या वेड्यांनी माझे पाय बहुधा गुरुजनांकडूनच जखडून ठेवण्यात येत. पुढे जाण्यात जी अन्यथा उपयोगी पडते अशी माझी कितीतरी शक्ती गुरुजनांनी पाय मागे खेचण्यासाठी टेविलेल्या या बेड्या पुढे जाण्यासाठी तोडण्यातच खर्ची पडली." (किता; पृष्ठ ११८) रौलट रिपोर्टात अगम्य गुरू नावाचे स्वामी सावरकरांचे राजकीय गुरू आहेत असे म्हटले आहे, (**शत्रूच्या शिबिरात** : पृष्ठ १५१–१५५) ती भाकडकथा कशी आहे किंवा दिवंगत क्रांतिकारक चारुचंद्र दत्त यांच्या लेखात सावरकर बाबासाहेब खर यांचे अनुयायी असल्याचे विपर्यस्त विधान कसे आले आहे (किता; पृष्ठ १२४–१२७)–हे सविस्तर सांगितल्याशिवाय सावरकरांना राहवत नाही ते याच संदर्भात अर्थपूर्ण ठरते.

आपण नेते आहोत याची सदैव जाणीव ठेवल्याने नेत्यासारखे आपण नेहमी वागले पाहिजे अशी दक्षता सावरकरांनी घेतलेली दिसते. अर्थात त्यामुळे असे वागणे सोपे झाले असेल असे समजण्याचे कारण नाही. स्वतःस पुढारी समजणाऱ्या अनेकांचे पितळ निर्वाणीच्या प्रसंगी उघडे पडते. सावरकरांची कसोटी पाहणारे अनेक प्रसंग त्यांच्या आयुष्यात आले. त्यात तावून सुलाखून सावरकरांचे नेतृत्व बावनकशी ठरले; पण अग्निदिव्य करावे लागत असताना आपले नेतृत्व कसाला लावले जात आहे याची स्पष्ट कल्पना सावरकरांना होती असे वाटते. म्हणूनच नेता या नात्याने आपले वागणे हिणकस ठरू नये याची काळजी त्यांनी सतत घेतली. विलायतेला जाताना प्रियजनांच्या ताटातुटीने हळवे सावरकर कासावीस झाले. गृहविरहाचे दुःख आपण कसे सोसले हे सांगताना सावरकर म्हणतात, "तथापि जे धकाधकीचे कठोर कर्तव्य माझ्या वाट्याला आले होते त्यात उणेपणा येऊ नये म्हणून माझ्या अंतःकरणातले अश्रू मी

अंतःकरणातच गोठवून टाकी. चारचौघांत त्यांना डोळयांत उतरू देत नसे. नाहीतर मी त्यांच्यापुढे जे ध्येय ठेवणार होतो ते अनुसरण्याच्या कठोर कार्यात त्यांचा तेजोभंग व्हावयाचा." ( कित्ता; पृष्ठ १५ ) धिंग्राने कर्झन वायलीचा वध केल्यानंतर आणि नाशिकला जॅक्सनसाहेबाचा बळी पडल्यानंतर धरपकड सुरू झाली. सहोदर, आप्त यांना पकडण्यात येऊ लागले. त्यांचा छळ होऊ लागला तेव्हा पॅरिसला असलेले सावरकर बेचैन झाले. लाला हरदयाळ या आपल्या सहकाऱ्याला श्रद्धांजली वाहताना सावरकरांनीच या वेळच्या त्यांच्या मनःस्थितीचे वर्णन केले आहे. "हरदयाळ माझी समजूत घाली; पण माझे मन द्विधा झाले. माझे सहोदर, माझे मित्र तुरुंगात हालअपेष्टा सोशीत असता मी मात्र फ्रान्समधील बागांतून फिरावे, अरे, हे कसले जीवन! हरदयाळ म्हणत, 'तू गेलास म्हणजे शक्ती गेली. तू पुढारी-चळवळीचा आत्मा—' छे. मला ते पटेना. मी म्हणालो, "मी पुढारी आहे की नाही ते ठरावयाचे आहे. जे हाल माझे आप्तेष्ट सोशीत आहेत ते मी सोसल्याशिवाय कार्याची पूर्तता होणार नाही. मी जाणार..." ( **समग्र सावरकर वाङ्मय**; खंड ४, पृष्ठ ४०८.) अंदमानात जन्मठेपेची शिक्षा भोगीत असताना तर कसोटीचे प्रसंग फार आले. काही वेळा यातना असह्य होऊन आत्महत्या करावीशी वाटली, पण निग्रहाने सावरकरांनी मन स्थिर केले. एवढेच नव्हे, तर अनेक राजबंद्यांना अनेक वेळा आत्महत्येच्या काठावरून हात धरून सावरकरांनी परत फिरवले. आपण नेते आहोत, आपण चारचौघांसारखे वागलो तर त्यांच्यात आणि आपल्यात काय फरक राहिला, या जाणिवेमधे संकटे झेलण्याच्या व दुःख पचवण्याच्या सावरकरांच्या सामर्थ्याचा उगम झाला असेल का?

नेता म्हणूनच सतत स्वतःचा विचार केल्याने आणि गुप्त व क्रांतिकारक स्वरूपाच्या संघटनांचे नेतृत्व केल्याने सावरकरांच्या नेतृत्वाला नकळत एक मर्यादा पडली असावी. गुप्त व क्रांतिकारक संघटनांचा भर मुख्यतः कृतीवर असल्याने व अशा प्रकारच्या संघटनांना एकाच व्यक्तीचे नेतृत्व उपकारक ठरत असल्याने सावरकरांच्या नेतृत्वाची ही मर्यादा त्यांच्या सहकाऱ्यांना किंवा अनुयायांना तेवढी जाणवली नसावी. पण रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून मुक्त झाल्यावर हिंदुमहासभेसारख्या राजकीय पक्षाची सूत्रे सावरकरांनी हाती घेतली तेव्हा सावरकरांच्या नेतृत्वाची एक मर्यादा स्पष्ट झाली. सावरकर स्वतःखेरीज इतर कोणास आपल्या तोलाचे नेते समजत नव्हते, एवढेच नव्हे तर दुसरे कोणी दुय्यम तिय्यम दर्जाचे नेतेही असू शकतात आणि त्यांच्याशी विचारविनिमय करून, त्यांचा दृष्टिकोण समजावून घेऊन, प्रसंगी आपले मत बाजूस ठेवून पक्षाचे राजकारण लढवावे लागते, पक्षसंघटनेत नव्या नेतृत्वाची वाढ होऊ द्यावी लागते याचे भान सावरकरांना राहात नसावे. राजकीय पक्षाला एकच नेता असावा, इतरांनी त्यांचे म्हणणे निमूटपणे मान्य करावे, अशी त्यांची धारणा होती की काय कोण जाणे. या संदर्भात सावरकरांचे चरित्रकार

श्री. शि. ल. करंदीकर यांच्या मताकडे लक्ष वेधावेसे वाटते. श्री. करंदीकर म्हणतात, "सनदशीर राजकारणात मोकळ्या मनाने केलेल्या चर्चेला व विचारविनिमयाला प्राधान्य असते. क्रांतिकारकांची राजकारणपद्धती ही कार्यप्रधान असते. हा फरक व्हावा तितका स्पष्ट न झाल्याने हिंदुमहासभेत पुरेशी चर्चाही होत नाही; आणि ती क्रांतिकारक संस्था नसल्यामुळे ती म्हणण्यासारखी कार्यप्रधानही बनत नाही. सनदशीर संस्थेमार्फत राजकारण करू पाहणाऱ्या नेत्याने स्वतः कमी बोलून व सहकाऱ्यांना अधिक बोलावयाला लावून त्यांचा दृष्टिकोण समजून घेतला पाहिजे व त्यांच्या विचारातील चुका समजून दिल्या-घेतल्या पाहिजेत. दुसऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यापेक्षा स्वतःचे म्हणणे जोराने सांगण्याची व ते जोराने सांगितले गेल्यामुळे दुसऱ्याला पटले असले पाहिजे असे समजण्याची प्रवृत्ती सावरकरांच्या ठिकाणी असल्यामुळे हिंदुमहासभेतील कित्येक प्रमुख नेत्यांचे प्रमुख प्रश्नांबाबत अद्याप त्यांच्याशी एकमत झालेले नाही." (**सावरकरचरित्र :** शि. ल. करंदीकर, पृष्ठ ५९२-५९३.) सावरकरांच्या नेतृत्वाची जडणघडण ज्या तऱ्हेने झाली व ज्या परिस्थितीत झाली त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाला स्वाभाविक मर्यादा पडल्या आणि सनदशीर व खुल्या पद्धतीने चालणाऱ्या राजकारणात त्यांचे नेतृत्व हे त्यांच्या पक्षाच्या मुळावर आले असावे.

लहानपणापासून सावरकरांना इतिहासप्रेमाने पछाडले होते. बालपणी इतिहासाची आपल्याला भारी जिज्ञासा असल्याचे व शाळेत असताना आपण जे वाचन केले त्यात प्रमुख भर इतिहासावर दिला असल्याचे त्यांनी आत्मवृत्तात लिहिले आहे. इतिहासाचा हा ओढा कधीच कमी झाला नाही. म्हणूनच त्यांच्या साहित्याचा फार मोठा भाग इतिहासविषयक लेखनाने व्यापला आहे. मात्र हे सारे लेखन केले आहे प्रेरणा घेण्यासाठी व प्रेरणा देण्यासाठी! त्यामुळे भारतातील लोकजीवनाचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास करावयाचा, भूतकाळातील घटनांचा काटेकोरपणे क्रम निश्चित करून घटनांचा अर्थ लावावयाचा, उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक साधनांची शक्य तितक्या निःपक्षपाती व वस्तुनिष्ठ पद्धतीने छाननी करावयाची व मग कारणपरंपरा तर्कशुद्ध पद्धतीने मांडून दाखवावयाची असे सावरकरांनी केलेले नाही. बऱ्याच वेळा त्यांनी हे इतिहासविषयक लेखन प्रचारकाच्या थाटाने केले आहे. कधी कधी एखाद्या ऐतिहासिक घटनेचे स्वरूप त्यामुळे आधीच त्यांच्या मनात निश्चित होत असे व मग ते सिद्ध करण्यासाठी इतिहास-लेखन होई. 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' या सावरकरांच्या गाजलेल्या ग्रंथाची जन्मकथा त्यांनी स्वतःच सांगितली आहे ती या दृष्टीने लक्षात घेण्यासारखी आहे. माझिनी, गॅरिबाल्डी वगैरेंच्या पावलावर पाऊल टाकून भारतात सशस्त्र क्रांती करावी असे जेव्हा सावरकर लंडनमधल्या मित्रांना सांगत तेव्हा त्यातले बहुतेक जण सशस्त्र क्रांतीचा मार्ग पूर्णपणे अव्यवहार्य, अशक्य नि हास्यास्पद आहे असे म्हणत. सावरकर सांगतात, "माझी विचारसरणी जनतेत आणि सैनिकांत पसरविण्यासाठी आणि वर सांगितलेल्या आक्षेपकां-

पुढे प्रत्यक्ष घडलेले उदाहरण ठेवून त्यांची मने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध चेतवून ती क्रांतिप्रवण करण्यासाठी केवळ पन्नास वर्षांपूर्वीच भारतात अशा प्रकारचे घडलेले जे उदाहरण म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्यसमर, त्याचा एक साधार नि स्फूर्तिप्रद इतिहास लिहिण्याचा विचार योजला." (**शत्रूच्या शिबिरात : पृष्ठ १९२.**) अर्थात या उद्देशाने लिहिलेल्या इतिहासात या तथाकथित स्वातंत्र्य समरात लढलेल्या वीरांच्या बहादुरीची वर्णने आणि इंग्रजांची व फितूर स्वकीयांची चीड यावी अशी वर्णने यांची रेलचेल होणे साहजिकच होते. स्फूर्ती मिळण्यासारखे प्रसंग निवडून वाचकाच्या भावनेला आवाहन करण्यासाठी आपल्या उत्तुंग कल्पनाशक्तीच्या साहाय्याने ते काव्यमय भाषेत रंगवायचे हा सावरकरांचा शिरस्ता होता. आपण असे करतो हे त्यांना माहीत होते. म्हणूनच आपल्या या तंत्राचे कधी कधी त्यांनी समर्थन केले आहे. भारताच्या इतिहासातील सोनेरी पानांचा उल्लेख करताना सावरकर म्हणतात, "परंतु निर्भेळ इतिहासात आणि काव्यातही काही प्रदेश असा असतो की, तो इतिहास नि काव्य यांच्या संयुक्त मिश्रणानेच यथार्थपणे व्यक्तविला जाऊ शकतो. त्यावाचून त्या प्रसंगाच्या वर्णनाला जिवंतपणा येत नाही. अशा प्रसंगी इतिहास हा अकस्मात आपण होऊनच काव्यमय होतो. अशा प्रसंगी अगदी पुराणातील अद्भुत रूपकांचा, दैविक वर्णनशैलीचा अवलंब केल्यावाचून त्या घटनांचे अलौकिकत्व यथाप्रमाण अशा रसरशीतपणे रंगविले जात नाही." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड ४, पृष्ठ ९१४.**)

सावरकरांच्या इतिहासविषयक लेखनातील कल्पनाविलासामुळे व काव्यमय भाषेमुळे वाचकाची फसगत होण्याचा संभव असतो. कधी कधी, जे घडले नाही ते घडले असे सांगून सावरकर एखाद्या ग्रंथाचा हवाला देतात आणि जिज्ञासूंनी मूळ ग्रंथ पाहावा अशी शिफारसही करतात. त्यांच्या शिफारशीप्रमाणे मूळ ग्रंथ काढून पाहावा तर सावरकरांनी जी वस्तुस्थिती म्हणून वर्णिलेली असते ती वस्तुस्थिती नाही असे लक्षात येते. सुरेंद्रनाथ बानर्जींनी सन १८८४ मध्ये पंजाबमध्ये माझिनीसंबंधी भाषण केले व त्या भाषणास लजपतराय उपस्थित होते. "त्या वक्तृत्वपूर्ण व्याख्यानाचा लालाजींवर...परिणाम झाला." (**शत्रूच्या शिबिरात : पृष्ठ १६४.**) असे सावरकर सांगतात. लालाजींच्या आत्मचरित्रात मात्र त्यांनी सन १८८१-८२ मध्ये सुरेंद्रनाथांच्या भाषणांचे पुस्तक हाती आल्यावर ते वाचताना डोळ्यांत पाणी आल्याचा उल्लेख केला आहे (**लजपतराय : आत्मवृत्तात्मक लेखन** [ इंग्रजी ] : संपादक : **विद्याचंद्र जोशी**, पृष्ठ ८१.) श्यामजी कृष्णवर्मांच्या संस्थेशी लगट केल्याबद्दल कॉटन, वेडरबर्न साहेबांनी "दादाभाई, गोखले, लजपतराय यांना दटावले" (**शत्रूच्या शिबिरात**, पृष्ठ ९७.) असे सावरकर लिहितात. खुद्द लालाजींच्या आत्मचरित्रात मात्र वेडरबर्नने आपली बाजू घेतली एवढेच नव्हे तर इतर सभासदांनीही त्यांचेच अनुकरण केले व मग सर हेन्री कॉटननीही माघार घेतली असे लजपतरायांनी म्हटले आहे. (**लजपतराय : आत्मवृत्तात्मक लेखन** [ इंग्रजी ] : संपादक : **विद्याचंद्र जोशी**, पृष्ठ

१०५.) सावरकरांनी साधार लिहिल्यासारखे वाटले, तरी त्यातले काही निराधार असण्याचीही शक्यता असते हे अशा वेळी अभ्यासकाला जाणवते.

अमेरिकेतील सुप्रसिद्ध इतिहासकार आर्थर श्लेझिंजर (ज्युनियर) यांच्या मते, "इतिहासकाराचे मन हे विश्लेषण करू शकते किंवा ते 'रोमँटिक' असू शकते. उत्तम इतिहासकार मात्र जसे विश्लेषण करणारे असतात तसेच ते रोमँटिकही असतात." (अ थाउजंड डेज : आर्थर श्लेझिंजर ज्युनियर, पृष्ठ ९९.) सावरकरांच्या इतिहासविषयक लेखनात विश्लेषणाचा भाग फार थोडा आहे. त्यांच्या इतिहासविषयक लेखनाचे स्वरूपही मूलतः आणि मुख्यतः रोमँटिक आहे. भूतकालाचे उदात्तीकरण हे रोमँटिक प्रवृत्तीचे एक प्रमुख लक्षण! सावरकरांच्या इतिहासविषयक लेखनात ही प्रवृत्ती प्रकर्षाने जाणवते. शुक्राचार्यांच्या पोटात शिरून कचाने संजीवनी विद्या हस्तगत केली म्हणतात. इतिहासकारालाही असेच भूतकालाच्या पोटात शिरून सत्य शोधावे लागते. पण हे करताना भूतकालाच्या आहारी जाण्याचा, भूतकालाची बाधा होण्याचा धोका टाळावा लागतो. सावरकरांना हे साधले आहे असे दिसत नाही. आर्थर श्लेझिंजर म्हणतात त्याप्रमाणे इतिहासकाराचे मन हे क्वचितच एखाद्या विवक्षित विचारप्रणालीशी जखडलेले असते. जेव्हा एखादा इतिहासकार स्वतःला विशिष्ट विचारप्रणालीच्या दावणीला बांधून घेतो तेव्हा त्यासाठी त्याला इतिहासाची किंमत द्यावी लागते. म्हणजेच श्लेझिंजर यांच्या मते अशा व्यक्तीचे लेखन हे खऱ्याखुऱ्या अर्थाने इतिहास होऊ शकत नाही. सावरकरांच्या इतिहासविषयक लेखनाची गत अशीच झाली आहे असे म्हणावे का?

सावरकरांचे राजकारणही त्यांच्या इतिहासलेखनाप्रमाणे मूलतः आणि मुख्यतः 'रोमँटिक'च होते. जन्मभर सावरकरांनी राष्ट्रवादाचा पोटतिडिकेने पुरस्कार केला. राष्ट्रवादाचा स्वीकार 'रोमँटिक' प्रवृत्तीची माणसे विनासायास करू शकतात. कारण 'राष्ट्र' ही मूलतः एक भावनाच आहे. त्या भावनेचा उद्गम आणि विकास का आणि कसा होतो हे स्थूलमानाने सांगता येते. या भावनेची उत्कटता आणि तिचा प्रभाव हा सर्व समाजात किंवा काळात सारखा नसतो. अर्वाचीन काळात पाश्चिमात्य देशांत या भावनेने तेथील समाज प्रथम भारले व अगदी अलीकडे आशिया व आफ्रिका या खंडांतील देशांत या भावनेचा प्रभाव दिसू लागला आहे. भारतातही राज्य होते. राज्ये होती, कधी कधी साम्राज्य होते, पण भारत हे प्राचीन काळात किंवा मध्ययुगात राष्ट्र होते की नाही याची अनेकांना शंका आहे. इंग्रजी राजवटीत प्रथम आपण 'वंश, धर्म, जात, भाषा यांचा विचार गौण मानून साऱ्या राष्ट्राचा विचार केला पाहिजे' अशी भाषा बोलू लागलो. आजही शेजारच्या देशांनी आक्रमण करताच आपल्याला ही भाषा आठवते; पण आक्रमणाचा धोका तात्पुरता का होईना, टळला, की कोणत्याही अंतर्गत समस्येचा विचार करताना आपल्यामधल्या जाती, भाषा व प्रदेशाविषयीच्या निष्ठा वरचढ ठरतात. म्हणूनच काही मंडळी

भारताला ‘ राष्ट्र ’ म्हणण्यास अजूनही तयार नाहीत सावरकरांना अर्थातच हे मान्य नव्हते. सावरकरांच्या मते, “ हिंदुत्व हा शब्द मूलतः नि मुख्यतः दैशिक नि राष्ट्रीय आहे. हिंदुत्व म्हणजे एक धर्ममत नव्हे. ” (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ३, पृष्ठ ५ ) “ हिंदुजगतात राष्ट्रैक्याची नि देशैक्याची भावना सहस्रावधी वर्षांपासून रक्तात मुरत आलेली आहे. हे हिंदुजगत ह्या आसेतुहिमाचल भारतभूमीला आपली पितृभू नि आपली पुण्यभू म्हणून पूजीत आले आहे. ” (**समग्र सावरकर वाङ्मय:** खंड १; पृष्ठ ६६. ) असा सावरकरांचा दावा होता. म्हणूनच राष्ट्रीयत्वाची भावना ही इंग्रजी शिक्षणाचे फळ आहे असे काँग्रेसमधील इंग्रजीशिक्षित पुढाऱ्यांना वाटते ते चूक आहे असे सावरकर मानीत. इंग्रजी राजवटीत काही झाले असेल तर एवढेच की, “ आपण सर्वांनी एककेंद्र, एकात्म, अखिल भारतीय नि अखंड भारतीय असे राजैक्यही संपादिले पाहिजे, अशा हिंदुजगतात आधीच अंतर्हित असलेल्या भावनांची एक नवी लाट देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत प्रकटपणे हेलकावत चालली. ” (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड १, पृष्ठ ६४. ) सावरकरांची ही मते, त्यांच्या मनावर राष्ट्रवादाचा केवढा जबरदस्त पगडा होता त्याचा पुरावा देतात. आपण जगाच्या ज्या भागातील समाजात जन्मलो व वाढलो त्या समाजाची गौरवास्पद परंपरा आणि त्याने गाठलेल्या प्रगतीचा उच्चांक यासंबंधी बोलण्याचा राष्ट्रवाद्यांचा रिवाजच असतो. जगाच्या इतर भागांतील लोकसमूहाकडून आपण काही शिकलो हे कबूल करावयाला राष्ट्रवादी सहजासहजी तयार नसतात. वेदकालात सर्व काही होते; पाश्चिमात्यांनी सर्व विद्या, कला आपल्याकडूनच घेतल्या असे भाबडेपणाने म्हणणारे लोक आजही आपल्यासभोवार दिसतात. राष्ट्रवादाची ही फारच बाळबोध, लोकप्रिय व स्वस्त आवृत्ती ! सावरकरांनी असे केले नसले आणि प्राचीन आर्यसंस्कृतीचे वेळीअवेळी गोडवे गाणाऱ्या सनातन्यांच्यावर कडाडून हल्ला चढवला असला तरी त्यामुळे फसण्याचे कारण नाही. कारण सावरकर धर्मभोळे नसले तरी ‘ राष्ट्रभोळे ’ होते असे वाटते.

सावरकरांनी धर्मभोळेपणावर जी प्रखर टीका केली आहे त्यामुळे प्रभावित होऊन सावरकरांची राजकीय मते मान्य नसलेल्या लोकांनीही त्यांच्या विज्ञाननिष्ठ, बुद्धिनिष्ठ दृष्टिकोणाची तारीफ केली आहे. हिंदू समाजातील जातिभेद, गाईचे माहात्म्य, बाटण्याच्या कल्पना यांच्यासंबंधी सावरकरांनी जे लेखन केले त्यामुळे सनातनी मंडळी बिथरली व स्वतःला सुधारक किंवा पुरोगामी विचाराचे म्हणवून घेणारे लोक त्यांच्यावर बेहद्द खूष झाले. गाय हा उपयुक्त पशू, माता नव्हे—देवता तर नव्हेच नव्हे, असे परखड शब्दात सावरकर म्हणाले खरे; पण त्याचे कारण लिंगपूजा, पशुपूजा, वृक्षपूजा, प्रभृती धर्म ही धर्माची तामस नि अपकृष्ट स्वरूपे आहेत म्हणून ! हिंदू राष्ट्रवाद हा सावरकरांचा धर्म होता. या धर्माच्या प्रसाराला जे जे आवश्यक होते त्याचा त्याचा त्यांनी तडफेने प्रचार केला. त्यांनी स्वीकारलेल्या या धर्माच्या

रक्षणास व प्रसारास ज्यामुळे अडथळा येईल असे त्यांना वाटले त्या सर्व गोष्टींचा त्यांनी धिक्कार केला. गोहत्या टाळण्यासाठी राष्ट्रहत्या होऊ देणाऱ्या मंडळींवर त्यांचा रोख होता. म्हणूनच हिंदु-शिखांचा शूर सेनानी हरिसिंग नलवा याचे उदाहरण देऊन सावरकरांनी म्हटले, " दुर्ग वा राजधानी हिंदू शत्रूच्या हाती पडू देण्यापेक्षा आणि तशी राष्ट्रहत्या करण्यापेक्षा वेढ्यातील अवश्य तितक्या गाई मारून खाणे, ती गोहत्या करणे हाच खरा हिंदुधर्म होय." (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ३; पृष्ठ १८६) हिंदू समाजातील व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, रोटीबंदी आणि बेटीबंदी यांचा त्यांनी निःसंदिग्ध शब्दांत निषेध केला व सनातन्यांचा रोष ओढवून घेतला हे खरे! पण त्याचे कारण एवढेच की, या चार रूढी अत्यंत प्रबळ, व्यापक नि हिंदू राष्ट्राच्या संघटनेस मूलतःच घातक होणाऱ्या आहेत अशी त्यांची खात्री होती. राष्ट्रवादाच्या चौकटीत जेवढी विज्ञाननिष्ठा बसेल, जेवढी बुद्धिनिष्ठा परवडेल तेवढीच मानावयाची असे सावरकरांचे तंत्र दिसते. त्यांच्या हिंदुराष्ट्रवादाला विरोधी ठरणाऱ्या सुधारणांची त्यांनी तरफदारी केलेली दिसत नाही, हे लक्षात ठेवणे जरूर आहे. म्हणूनच हिंदू समाजातील जातिजातींत बेटीबंदी नसावी असे उघड म्हणणारे सावरकर त्याच वेळी इशारा देतात, " हिंदुत्वाच्या कक्षेबाहेर जाऊन कोणीही मुसलमानख्रिश्चनादिकांशी विवाह करता कामा नये. जोवर मुसलमान मुसलमान राहू इच्छितो, तोवर हिंदूला हिंदूच राहिले पाहिजे. तिला वा त्याला हिंदू करून घेतल्यावाचून अहिंदूशी विवाह करणे आपल्या हिंदू राष्ट्राच्या सामुदायिक हितास अत्यंत अनिष्ट आहे." (**कित्ता;** पृष्ठ ८६.) अस्पृश्यतानिवारणाचा आणि शुद्धीकरणाचा त्यांनी धडाडीने पुरस्कार केला, कारण स्पर्शास्पर्शाच्या कल्पनांमुळे हिंदू समाजातील एक मोठा गट हिंदू समाजापासून अलग होत होता आणि परधर्मीयांच्या प्रचाराला बळी पडत होता. हिंदू राष्ट्र सामर्थ्यसंपन्न होण्यासाठी जातिभेद नष्ट होणे आणि शुद्धीकरणाची मोहीम हाती घेणे जरूर आहे असे त्यांना वाटे. यंत्र हे शाप नसून वरदानच आहे असा त्यांचा विश्वास होता. म्हणून यंत्रयुगाचे त्यांनी स्वागत केले; पण त्याच्या मुळाशी, " युरोप आज जे अजिंक्य झाले आहे ते मुख्यतः यंत्रबळे " ही त्यांची समजूत होती.

धर्मभोळेपणाप्रमाणेच देवभोळेपणावरही सावरकरांनी निर्भयपणे टीका केली आहे. देवभोळेपणा घटतो त्या मानाने यंत्रशीलपणा वाढतो असे त्यांचे मत होते. जो दर्शनाने बाटतो तो देवच कसला, असा प्रश्न ते सरळ विचारतात. बुवाबाजीच्या तंत्राची त्यांनी निर्भयपणे चिरफाड केली. यज्ञाची कुळकथा सांगून एकेक अनाथालय हे एकेक अश्वमेध यज्ञाइतके पुण्यप्रद आहे असा ते निर्वाळा देतात. एवढेच नव्हे तर राजकारणाला भगवंताचे अधिष्ठान हवे असे म्हणणाऱ्यांना सावरकर बजावतात, " ऐहिक यश ज्या चळवळीस हवे तिने ऐहिक, भौतिक, प्रत्यक्ष सृष्टीत उपयोगी पडतील तेवढी साधने संपादून विपक्षावर सामर्थ्यात मात केली की ती चळवळ बहुधा यशस्वी होते.

मग तिला ज्याच्या त्याच्या धार्मिक पोथ्यांतील कल्पनांप्रमाणे न्यायाचा, पुण्याचा, स्नानसंध्याशील उपायांनी मिळविल्या जाणाऱ्या भगवंताच्या आध्यात्मिक अधिष्ठानाचा पाठिंबा असो वा नसो !... धार्मिक अर्थी भगवंताच्या अधिष्ठानाच्या नादी न लागता, ' सामर्थ्य आहे चळवळीचे जो जो करील तयाचे ' इतकेच काय ते खरे मानावे आणि वैज्ञानिक, सामर्थ्यशाली, प्रत्यक्षनिष्ठ अशा ऐहिक साधनांनी विपक्षाहून वरचढ होण्याचा यत्न करावा. " ( **सावरकरचरित्र : शि. ल. करंदीकर : पृष्ठ ५८९** ) देवभोळेपणामुळे राष्ट्र दुबळे बनते असे सावरकरांना वाटत असल्यामुळे सावरकरांना देवभोळेपणाची चीड होती. तथाकथित विज्ञाननिष्ठेवर व बुद्धिनिष्ठेवर आधारलेल्या त्यांच्या लेखनाचा खरा आधार राष्ट्रवादावरील निष्ठा हाच होता असे म्हणणे चुकीचे ठरेल का ?

राजकारणाला किंवा चळवळीला भगवंताचे अधिष्ठान आहे की नाही याची फारशी फिकीर करण्याचे कारण नाही; शस्त्रबळाचे अधिष्ठान असले म्हणजे झाले असा सावरकरांचा सूर होता. शस्त्रावर त्यांचा जेवढा विश्वास होता तेवढा राष्ट्र सोडून दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर नव्हता. राष्ट्राचा विचारही शस्त्र वगळून सावरकर करू शकले नाहीत. शास्त्राचा पुरस्कारही त्यांनी केला तो अखेर शास्त्राच्या साहाय्याने शस्त्रबळ वाढविता येते म्हणून ! कोणत्याही परतंत्र राष्ट्राला स्वातंत्र्य मिळते ते सशस्त्र क्रांतियुद्धानेच, याबद्दल त्यांना शंका नव्हती. अर्थात दोन-चार इंग्रज अधिकारी मारल्याने काही होणार नाही हे त्यांना माहीत होते. पण भारताच्या त्या काळच्या परिस्थितीत असल्या साहसी प्रयत्नांनाही अर्थ होता. सावरकरानी आत्मवृत्तात म्हटले आहे, " इंग्रजाचे दहापाच लोक मारले की ते पळतील अशी दुधखुळी समजूत आम्ही केंव्हाही करून घेतली नव्हती. पण आमची निष्ठा असे की तीस कोटी लोकांचे हे राष्ट्र; यातील सर्वजण जरी कधीच उठले नाहीत तरी दोन लक्ष वीर जरी अशा छाप्यांच्या पद्धतीने, गुप्त संघटनेने, अखंड, अदम्य, अविश्रांत वृकयुद्ध लढू निघतील तरी आपले राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादू शकतीलच शकतील. " ( **समग्र सावरकर वाङ्मय : खंड १; पृष्ठ २५५–२५६.** ) मात्र स्वराज्य संपादन केल्यानंतर राष्ट्रात विधायक आणि निर्बंधशील वृत्तींचे वर्चस्व स्थापले पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला होता. कारण सावरकरांच्या मते, " परराज्य उलथून पाडण्यासाठी गुप्त कट, सशस्त्र बंडाळी, भयंकरवाद, निर्बंधभंग, परराज्यद्रोह ही सर्व साधने पुण्यच असतात, अपरिहार्य असतात. " ( **समग्र सावरकर वाङ्मय : खंड ८, पृष्ठ ४८३.** ) मात्र स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी शस्त्रबळाचाच आधार घ्यावा लागतो. भारत स्वतंत्र झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाने, " प्रचंड नि अजेय शस्त्रबळाची सज्जता करण्याच्या दिशेने " प्रयत्न करावयास हवे होते, पण त्या दिशेने पहिले पाऊलसुद्धा अजून टाकले नाही, या अक्षम्य चुकीबद्दल १९५२ मध्ये सत्ताधारी पक्षास सावरकरांनी दोष दिला. अभिनव भारत सांगता समारंभाचा समारोप करताना सावरकरांनी सत्तीच्या सैनिक

शिक्षणाची मागणी केली. पाच वर्षांत एक कोटी हिंदू तरुणांचे सैन्य सीमांचे संरक्षण करण्यास सज्ज ठेवावे असे त्यांनी म्हटले होते. २४ डिसेंबर १९६१ या दिवशी त्यांचा मृत्युंजय दिन साजरा झाला तेव्हाही महाराष्ट्र हा हिंदुस्थानचा खड्गहस्त झाला पाहिजे असे ठासून सांगून तरुणांना सैन्यात शिरण्याचा त्यांनी उपदेश केला.

अखेरच्या क्षणापर्यंत सावरकरांचे हे शस्त्रवेड कायम होते. या शस्त्रवेडामागेही एक पद्धत होती. १९३८ मध्ये केलेल्या एका भाषणात सावरकर म्हणाले, " 'बळी तो कान पिळी' हा सिद्धान्त अजून तरी कायम आहे. आपल्याला कोणाचा कान पिळण्यासाठी नव्हे पण यापुढे आपल्याला कोणी दुसऱ्याने कानपिळी देऊ नये म्हणून तरी निदान आपण 'बळी' व्हायला पाहिजे" (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ४, पृष्ठ ४२९.) १९३९ मध्ये कलकत्त्याला परराष्ट्रीय धोरणाचे मर्म समजावून सांगताना त्यांनी खुलासा केला होता : "पाशवी म्हणा, पण निसर्गाचा कायदा आत्मरक्षणाचाच आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात नीतीचा अंमल असेल अशा भ्रमात राहू नका. ती नीती केवळ पुस्तकातच सापडते." (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ४, पृष्ठ ४२७) १९६१ मध्ये पुन्हा हाच विचार ! "अरे ! न्याय वगैरे काही नाही या जगात. जोपर्यंत सारं जग अन्यायी आहे तोपर्यंत आपल्याला अन्यायानेच उत्तर देणे भाग आहे. जोपर्यंत सारं जग आक्रमक आहे तोपर्यंत आक्रमणाला प्रत्याक्रमणानेच प्रत्युत्तर देणे आवश्यक होते." (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ८, पृष्ठ ५१३) आपल्या शस्त्रवेडाचे समर्थन करताना सावरकर १९५२ मध्ये म्हणाले होते, "आजही सारी मानवजात राष्ट्रवादाच्या नि शस्त्रवादाच्याच राजकीय पातळीवर उभी आहे ही खूणगाठ बांधून ठेवा ! जी राष्ट्रे स्वतःच्या शस्त्रबळाच्या आधारावर स्वतंत्र आहेत तीच काय ती खरीखुरी स्वतंत्र आहेत आणि इतर दुर्बल राष्ट्रांवर आपापले वर्चस्व स्थापण्यासाठी खटपटत आहेत." (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ८, पृष्ठ ४८९) वेळोवेळी व्यक्त झालेल्या सावरकरांच्या या मतामागे मानवी जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा निराशावादी दृष्टिकोण आहे. जीवनकलहात मोठा मासा लहान माशाला गिळतो आणि माणसामाणसांमधील व्यवहार आणि राष्ट्राराष्ट्रांमधील व्यवहार हे या मत्स्यन्यायाच्या सनातन नियमाप्रमाणेच चालतात अशी यामागची भूमिका होती. राष्ट्राराष्ट्रांमधील व्यवहार 'जंगलच्या कायद्या'ने चालतात या आपल्या भूमिकेमुळेच सावरकर परराष्ट्रीय धोरणासंबंधी बोलताना नेहमी प्राणिसृष्टीतील वर्तनाचे दाखले देत असावेत. "चिमण्यांनी आम्ही तटस्थ आहो अशी घोषणा केली तरी ससाणे त्यांच्यावर झेप घालण्यास थोडेच सोडणार आहेत !" (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ८, पृष्ठ ४९०) "वाघ जेव्हा शेळीला खातो तेव्हा संपूर्ण सहजीवन होतं." (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ८, पृष्ठ ५१३) "वाघाची नखे जोपर्यंत तीक्ष्ण असतात तोपर्यंत गायीला त्याच्यापुढे गय खाऊन मेलेच पाहिजे." (**समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ४, पृष्ठ ४३०) "हरिणबालकाचा वध करून रक्ताने

माखलेल्या जिव्हेने वाघीण आपल्या पिलाकडे येत आहे. ती पिले तिला बिलगून दुग्धप्राशन करीत आहेत आणि वाघीण रक्ताने भरलेले आपले तोंड जिभेने साफ करीत आहे. सृष्टी ही अशी आहे." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड ४, पृष्ठ ४९०**) हे सारे दाखले बोलके आहेत.

सावरकरांचे हे शस्त्रवेड कोणत्या थराला जात असे हेही पाहणे उद्बोधक ठरेल. १९६१ मध्ये सावरकरांनी त्यांच्या मृत्युंजय दिनानिमित्त केलेले भाषण हे या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. त्या वेळी ते म्हणाले, "तुमचं जर मत असेल तर मी अध्यक्ष होईन आणि दोन वर्षांच्या आत मी हा देश क्रुश्चोव्हच्या रशियापेक्षा बलाढ्य करून दाखवीन...दोन वर्षांच्या आत—हो हो दोन वर्षांच्या आत—त्यानं जसा जगाला जोडा दाखवला तसा मी 'माझा बूट उचलून सबंध जगाला दाखवीन...अरे, ह्या गोष्टी शक्तीच्या असतात, सैन्याच्या असतात." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड ८, पृष्ठ ५०४-५०५.**) "त्याप्रमाणे सत्ता हाती घेणारं जर कुणाचं राज्य असेल—मग ते हिटलरचे का असेना...ते मी आनंदाने पत्करीन. आक्रमकापुढे शरणागती पत्करणाऱ्या लोकशाहीपेक्षा शक्तिशाली नि सामर्थ्यवान हिटलरची एकशाही मी पत्करीन—मी सर्वश्रेष्ठ मानतो. कशानेही का होईना, देश समर्थ होईल आणि रणांगणात उभा राहील. मग त्या हिटलरला मारायला तोच देश त्याच शक्तीनं पुढं जातो हे इतिहासात प्रत्येक ठिकाणी शिकला असाल." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड ८, पृष्ठ ५०९.**) सावरकरांचे हे उद्गार वाचीत असताना त्यांचा 'समानधर्मा' माझिनी याची आठवण झाल्याखेरीज राहात नाही. आपली मातृभूमी इटली स्वतंत्र होऊन बलवान व्हावी आणि इटलीत लोकशाही गणराज्य स्थापन व्हावे असे माझिनीला वाटे; पण तशी वेळ आलीच तर एकवेळ इटलीत लोकशाही गणराज्याची स्थापना नाही झाली तरी चालेल, पण इटली सामर्थ्यशाली झाला पाहिजे आणि इटलीला सामर्थ्यशाली बनवणारी कोणतीही राजवट आपल्याला मान्य होईल, असे माझिनीनेही म्हटले होते. सामर्थ्याच्या या दृढ उपासनेमुळेच सावरकर सरळ म्हणत, "आज संरक्षक फौज म्हणतात. खोटी गोष्ट आहे. सैन्य हे नेहमी आक्रमकच असावं लागतं. संरक्षक सैन्य ही गोष्टच मुळी अस्तित्वात नाही. सैन्य जर आक्रमक असेल तरच राष्ट्राचे संरक्षण करू शकेल." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड ८, पृष्ठ ५१२**) नागांचा प्रश्न सोडविण्याच्या नेहरूंच्या रीतीवर सावरकरांनी जी झोड उडविली आहे तीही या संदर्भात अर्थपूर्ण आहे. "हे नागा....एक आठवड्याच्या आत यांचा प्रश्न मिटवून टाकायला हवा होता. दडपून टाकायला हवा होता. त्या कमांडरने नेहरूंना सुचवलं होतं की विमानं धाडावीत; कारण ते जंगलात लपतात आणि जंगलात गनिमी कावा चालत नाही. तिथं एकच हत्यार आणि ते म्हणजे वरचं विमान! कुठं लपतात ते विमानाच्या टेहळणीच्या बाहेर!" (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड ८, पृष्ठ ५१५.**) दक्षिण व्हिएतनामसारख्या देशातील भूमिगतांना दडपून टाकण्यासाठी

अमेरिकेसारखे शक्तिशाली राष्ट्र आपली ताकद पणाला लावीत आहे, त्याचे परिणाम आपण पाहातच आहोत. अमेरिकेसारख्या बड्या राष्ट्राला दक्षिण व्हिएतनामसारख्या परक्या देशातील, चिमुकल्या देशातील प्रश्न असा शस्त्रबळाने सोडविता आला नाही. मग भारत सरकारने सामोपचाराचे उपाय न योजता नागा लोकांसारख्या भारतवासीयांवरच बॉंबवर्षाव करून प्रश्न सोडवू पाहणे हे किती कठीण आहे याची कल्पना केलेली बरी. पण राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय कोणत्याही प्रश्नावर शस्त्रबळाचा वापर हाच तोडगा सावरकरांजवळ होता, कारण सारे प्रश्न अखेर शस्त्रे सोडवतात; राज्यांच्या सीमादेखील खड्ग निश्चित करते अशी सावरकरांची श्रद्धा होती. म्हणूनच सावरकर बेधडक सांगत, "हिंदुस्थान स्वतंत्र झाला तेव्हा मी जर अध्यक्ष झालो असतो— मला व्हायचं नाही पण—झालो असतो तर ! पहिल्या दिवशी दोन मानचित्रं माझ्या डोळ्यांसमोर ठेवली असती. एक म्हणजे हिंदुस्थानच्या सीमा कोणत्या आहेत त्या निश्चित करून—याही माझ्या—माझ्या व्याख्येप्रमाणे ! त्यात अरबी समुद्राला 'अरबी' समुद्र हे नाव नाही. तो काही अरबांच्या बापाचा नाही....त्याला सिंधुसागर केला असता. आणि नंतर हे मानससरोवर, हा चीन, आमची सगळी पुराणं काढून आमच्या सरसीमा कुठवर होत्या त्या पाहून ही जी No Man's Land होती ती Hindu Man's Land करून घेतली असती आणि आमची सेना तिथे नेऊन ठेवली असती." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड ८, पृष्ठ ५१२.**)

सावरकरांचे हे उद्‌गार त्यांच्या शस्त्रवेडाप्रमाणेच त्यांच्या राष्ट्रभोळेपणावरही प्रकाशझोत टाकतात. राष्ट्रवादी माणसाला आपली बाजू नेहमीच सत्याची, न्यायाची वाटते. आपण आक्रमणाचे बळी आहोत आणि म्हणून स्वसंरक्षणासाठी शस्त्र उचलण्याचा आपल्याला अधिकार आहे असा त्याचा युक्तिवाद असतो. आपण आक्रमण केले हे तो सहसा कबूल करीत नाही आणि कबुली द्यावी लागली तर आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांना धोका पोचण्याची जी शक्यता होती ती टाळण्यासाठी बचावात्मक पवित्रा घेणे जरूर होते अशी मखलाशी केली जाते. आपल्या राष्ट्राच्या सीमा आपण म्हणू तशा निश्चित व्हाव्यात असा आग्रह राष्ट्रवादी धरतात आणि शस्त्राच्या जोरावर शेजारच्या राष्ट्रांना त्या मान्य करण्यास भाग पाडतात. राष्ट्रवादाच्या या स्वरूपामुळेच विशेषतः या शतकात शांतता धोक्यात आली आहे आणि राष्ट्राराष्ट्रांमधली शस्त्रस्पर्धा वाढण्यास हातभार लागला आहे. धर्म ही जनतेची अफूची गोळी आहे असे मार्क्स म्हणत असे. राष्ट्रवादाची अफाट शक्ती अजमावण्यात मार्क्स अपयशी ठरला. खरे म्हणजे राष्ट्रवाद ही आजच्या घटकेस जनतेची अफूची गोळी बनली आहे. राष्ट्रवादाचा सोयिस्कर बुरखा पांघरून समाजातील मोक्याच्या जागा अडवून बसलेली, सर्व संपत्ती आपल्या हाती घेऊ पाहणारी मूठभर मंडळी लक्षावधी लोकांना नाडण्याचा धंदा करीत असताना दिसतात. राष्ट्रवादामध्ये सर्वसामान्य माणसाच्या भावनांना आवाहन करण्याचे सामर्थ्य असते. त्यामुळेच सर्वसाधारण माणसाच्या

त्यागावर चरणे समाजातील हितसंबंधी गटांना शक्य होते. राष्ट्रवादातील या धोक्यांची दखल सावरकरांनी कोठेही घेतलेली दिसत नाही. कारण शस्त्र व राष्ट्र या पलीकडे सावरकर काही पाहूच शकले नाहीत.

सर्वसाधारणपणे विचारवंत म्हणून समजल्या जाणाऱ्या राजकीय नेत्यांच्याबाबत एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे आयुष्याच्या वाटचालीत सभोवतालच्या माणसांचे व घटनांचे त्यांच्या मनावर कमीअधिक प्रमाणात परिणाम होतात. त्यांची सुरुवातीची मते बदलतात. त्यांचा दृष्टिकोणही वाचन, चिंतन व अनुभव यामुळे बदलतो. नवे विचार आत्मसात केले जातात, उराशी कवटाळलेल्या आदर्शांचा फोलपणा लक्षात येतो, चुका लक्षात येतात व प्रसंगानुरूप त्या मान्यही केल्या जातात. गांधीजी, जवाहरलाल नेहरू, आंबेडकर, मानवेंद्रनाथ रॉय यांचा वैचारिक प्रवास असा झालेला दिसतो. आठ खंडांत प्रसिद्ध झालेले सावरकरांचे साहित्य वाचल्यावर मात्र सारखे वाटत राहते की सावरकरांची अशी वैचारिक वाढ कधी झालीच नाही की काय? शस्त्रबळावरचा विश्वास, राष्ट्रवाद, मुसलमानांविषयीची मते, हिंदुत्वाच्या कल्पना, विज्ञाननिष्ठा, बुद्धिनिष्ठा, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार ही सारी वैशिष्ट्ये सावरकरांच्या आचारविचारांत अगदी शाळेत असल्यापासूनच्या दिवसांत दिसत होती असे त्यांच्या आत्मवृत्तावरून दिसते. वासुदेव चापेकर व रानडे यांच्या फाशीची बातमी ऐकून सावरकर बेचैन झाले आणि वयाच्या पंधराव्या वर्षी, "यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून 'मारिता मारिता मरेतो' झुंजेन" (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड १, पृष्ठ १४३.**) अशी सावरकरांनी देवीसमोर प्रतिज्ञा घेतली. शाळेत असतानाच्या दिवसाविषयी सावरकर लिहितात, "या काळात माझी राजकीय महत्त्वाकांक्षा सशस्त्र क्रांतीकडे झुकू लागली. तिचे पाय माझ्या पोरखेळाच्या पाळण्यात स्पष्ट दिसू लागले होते. मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारांचा आणि इंग्रजांच्या राजकीय अत्याचारांचा, ते काय आहेत हे स्फुटतः कळण्यापूर्वीच ते आहेत एवढ्याच अस्फुट निश्चिततेने तीव्र तिटकारा येई." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड १, पृष्ठ ११९**) १८९४-९५ च्या सुमारास मुंबई-पुण्यास झालेल्या हिंदु-मुसलमान दंग्यांचा सावरकरांच्या बालमनावर कसा परिणाम झाला त्याचे वर्णन त्यांनी स्वतःच केले आहे : "केसरी, पुणेवैभव वगैरे वृत्तपत्रांतून त्याचे वृत्त वाचण्यासाठी इतके उत्सुक व्हावे की, त्या पत्रांच्या डाकेची वाट पाहात टपालठाण्यापाशी तिष्ठत उभे राहावे. मुसलमानांनी दंगे आरंभून हिंदूंचा पाडाव केला की आम्ही अगदी संतप्त व्हावे. हिंदू चूप का राहतात! इतक्यात हिंदूंनी प्रतिकार करून मुसलमानास चेतवल्याचे वृत्त आले की आमच्या मंडळींचा हर्ष गगनात मावू नये." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड १, पृष्ठ १२०**) [अलीकडे झालेल्या भारत-पाक संघर्षाच्या वेळी भारतीय सेनेच्या लाहोर विभागातील विजयी घोडदौडीची वार्ता ऐकून मृत्युशय्येवर पडलेल्या वीर सावरकरांना अतिशय आनंद झाला होता.]

ज्या पोथीनिष्ठेची पुढे त्यांनी जाहीर टवाळी केली ती पोथीनिष्ठाही कशी घातक आहे हे सावरकरांना बालवयातच उमजले होते. " पण मी आता प्रथमतःच श्रद्धेचा आणि संशयाचा असे दोन्ही डोळे उघडून पोथी वाचली तो हे बुद्धीचे म्हणणे पटू लागले की ज्या संकटी देव पावला न पावलासा भासला तेवढीच प्रकरणे पोथ्यांत रंगवून लिहिलेली असून याच उत्कट भावास अनेक वेळा तोच देव पावलाही नाही. " ( **समग्र सावरकर वाङ्मय : खंड १, पृष्ठ १२५** ) " दिवसेंदिवस त्या विषयाच्या अनेक उपांगांवर, अद्‌भुत चमत्कार सत्य की असत्य यावर बडेजावी मिरवणारे भोंदू की साधू, सोवळेओवळे, पदोपदी धर्मधर्म म्हणून बोकाळलेल्या रूढी त्याज्य की अत्याज्य, केवळ आचार कोणते आणि खरे धर्म कोणते, फार काय, देवाचे अस्तित्व की नास्तित्व असल्या विषयावर माझे माझ्या बंधूशी, माझ्याहून वयाने वा ज्ञानाने वडील असणारांशी आणि समवयस्कांशी उघड उघड वादविवाद सारखे चालू झाले." ( **समग्र सावरकर वाङ्मय : खंड १, पृष्ठ १२७.** ) याची परिणती अर्थातच सामाजिक सुधारणांचा जोरदार प्रचार करण्यात झाली. सावरकरांची आई सावरकर नऊ वर्षांचे असतानाच वारली. सावरकर म्हणतात, " आई वारल्यानंतर माझ्या राजकीय आणि धार्मिक संस्कारांची आणि क्रियेची झपाट्याने वाढ होत गेली. विटाळवेडाचा, फाजील सोवळ्या-ओवळ्याचा, जातिभेदाचा मला तेव्हापासूनच तिटकारा येई." (**समग्र सावरकर वाङ्मय : खंड १, पृष्ठ ११२** ).

सावरकरांच्या आत्मवृत्तात विखुरलेले हे उल्लेख लक्षात घेतले की विलायतेला जाण्यापूर्वीच सावरकरांची श्रद्धास्थाने व मूल्ये निश्चित झाली होती हे स्पष्ट होते. विलायतेस गेल्यानंतर माझिनींच्या आत्मवृत्ताचा आणि लेखांचा सहा भागांत प्रसिद्ध झालेला इंग्रजी अनुवाद सावरकरांनी प्रथम वाचला. सावरकर लिहितात, " मी जसजसा तो ग्रंथ वाचीत गेलो तसतसे मला आढळून येत चालले की, मी हिंदुस्थान सोडण्याचे आधी गुप्त संस्थांतून जे जे क्रांतिकारक मार्गदर्शन माझ्या सहकाऱ्यांना करीत होतो त्यात आणि माझिनीने ' तरुण इटली ' साठी अगदी पहिल्यापासून जे जे मार्गदर्शनाचे लेख लिहिले होते त्यात आश्चर्यकारक साम्य आहे. " ( **शत्रूच्या शिबिरात : पृष्ठ १६६.** ) " मला आश्चर्य वाटत गेले की त्याच कार्यक्रमाचा आणि कोटिक्रमांचा प्रबळ पुरस्कार नि कोठे कोठे तर मी उच्चारी त्याच वाक्यात नि उपदेशी त्याच सूत्रांत माझिनीच्या त्या लेखातून केला होता. " ( **शत्रूच्या शिबिरात : पृष्ठ १६७.** ) असले विचार लहान वयात सांगण्याच्या धाडसाबद्दल जहाल पुढारी ' पोरकट ', ' वेडगळ ' अशी शेलकी विशेषणे आपल्याला बहाल करीत हे सावरकरांना बोचलेले होते. माझिनीच्या लेखांचा अनुवाद केला तर या जहाल पुढाऱ्यांना गप्प बसवता येईल व " अभिनव भारतातील माझ्या शतावधी सहकाऱ्यांचाही माझ्या मार्गदर्शनावरील विश्वास आणि त्यांची स्वतःची आत्मनिष्ठाही वाढल्यावाचून राहणार नाही." ( **शत्रूच्या शिबिरात : पृष्ठ १६७** ) असे सावरकरांना वाटले आणि म्हणून

त्यांनी माझिनीच्या लेखांचे भाषांतर केले. तात्यासाहेब केळकरांनी १९४३ मध्ये शि. ल. करंदीकरांनी लिहिलेल्या सावरकर-चरित्रास प्रस्तावना लिहिली होती. त्या प्रस्तावनेत तात्यासाहेब केळकरांनी मोठे मार्मिक मत व्यक्त केले आहे. केळकर लिहितात, " सावरकर-चरित्र जो वाचील त्याच्या एक गोष्ट लक्षात येईल की, सावरकरांची राजकीय मते आज चाळीस वर्षांच्या दीर्घ काळात स्थिर आहेत. दुसऱ्या बाजूचे म्हणजे अशा मतांच्या चंचलपणाचे उदाहरण द्यावयाचे तर ते लाला हरदयाळ यांचे देता येईल. दोघेही देशभक्त, स्वार्थत्यागी, साहसी, तथापि दोघांच्या मनोधारणेत किती फरक!" (**सावरकर-चरित्र :** प्रस्तावना, न. चिं. केळकर; पृष्ठ १४–१५.) विलायतेस गेल्यानंतरच्या काळापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत सावरकरांनी त्यांना बालपणात गवसलेल्या श्रद्धास्थानांचा आणि मूल्यांचाच बचाव केला. यांपैकी कोणत्याही श्रद्धास्थानाविषयीचा अगर मूल्यावरचा त्यांचा विश्वास उडाला नाही. म्हणूनच सावरकरांच्या लेखनात कमालीची सुसंगती दिसते.

सुसंगती हा मर्यादित अर्थाने गुण असला तरी जवळजवळ सत्तर वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात एखाद्या व्यक्तीची मते बालपणी जी होती तीच राहिली याचा अर्थ काय घ्यावयाचा? संपूर्णपणे बंदिस्त मन असलेल्या विचारवंतांबाबत अशी सुसंगती, अशी स्थिरता शक्य असते. सभोवारच्या घटना आणि माणसांच्या प्रतिक्रिया अशा विचारवंतांना दिसत असतात. क्वचित त्यांची नोंदही अशी मंडळी घेतात. पण मोकळ्या मनाने त्यांचा स्वीकार करून नवे विचार, कल्पना पारखून घेऊन त्यांच्या अनुरोधाने आपण मानलेले सिद्धान्त किंवा मूल्ये तपासून पाहावयाची, ही गतिशील विचारवंतांची रीत बंदिस्त मनांच्या विचारवंतांना मानवत नाही. खुल्या दिलाच्या गतिशील विचारवंतांच्या लेखनात बऱ्याच वेळा विसंगती आढळते ती बदलत्या परिस्थितीस साद देऊ शकणाऱ्या त्यांच्या मनाचे द्योतक असते. असली विसंगती जिवंत मनाचे लक्षण असते. पण एकदा आपण मानलेल्या श्रद्धास्थानांखेरीज व मूल्यांखेरीज दुसरे काहीही खरे किंवा विचारार्ह नाही असे कोणीही माणूस समजू लागला की त्याचा वैचारिक विकास थांबलाच म्हणून समजावे. मग अशी माणसे, आपल्याला गवसलेले सत्य आता फक्त इतर अज्ञ लोकांना सांगावयाचे काम उरले आहे आणि त्या अज्ञ लोकांना देखील त्यांचा स्वीकार केल्याखेरीज पर्याय नाही, असे मानू लागतात. सावरकरांचे असे झाले होते का?

" आपण मार्क्स वाचला का?" असा प्रश्न विचारणाऱ्याला " मार्क्सने सावरकर वाचला होता का?" असे उत्तर देऊन सावरकरांनी गप्प बसवले होते म्हणतात. सावरकरांनी मार्क्सवादाचा अभ्यास केला असेल किंवा नसेल. एक गोष्ट मात्र खरी की त्यांच्या प्रकाशित साहित्यात तरी जगाच्या इतिहासाला नवे वळण देऊ शकणाऱ्या या विचारवंताविषयी किंवा त्याच्या तत्त्वज्ञानाविषयी सावरकरांनी मौन धारण केलेले दिसते. मार्क्सवादाविरुद्ध सावरकरांनी लिहिले असते तरी ते समजण्यासारखे होते.

कारण त्यांच्या विशुद्ध राष्ट्रवादी भूमिकेच्या अगदी विरोधी असे मार्क्सचे तत्त्वज्ञान आहे. गांधीजी, नेहरू, आंबेडकर, मानवेंद्रनाथ रॉय यांच्यापासून ते विनोबा भावे, जयप्रकाश नारायण यांच्यापर्यंतच्या सावरकरांच्या समकालिनांनी मार्क्सच्या विचारसरणीविषयी, त्याचा वारसा सांगणाऱ्या सोव्हिएत रशिया आदी देशांतील कम्युनिस्ट चळवळीविषयी कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केलेले दिसतात. पण सावरकरांनी मात्र आधुनिक जगातील या प्रभावी विचारसरणीचा मागोवा घेऊन तिची बलस्थाने व मर्मस्थाने समजावून घेण्याचा किंवा देण्याचा प्रयत्न केला असे त्यांच्या प्रकाशित साहित्यावरून तरी दिसत नाही.

तसे पाहिले तर समाजवादी विचाराच्या व्यक्तींची किंवा समाजवादविरोधी मते प्रतिपादन करणाऱ्यांची सावरकरांना माहिती होती. ब्रिटनमधील त्या काळचे एक समाजवादी नेते हाइंडमन यांचा उल्लेख 'शत्रूच्या शिबिरात' या आत्मवृत्तात्मक पुस्तकात खूप वेळा येतो. हाइंडमन हे त्या काळचे मार्क्सवादावर निष्ठा असलेले नेते म्हणून ओळखले जात, हे ब्रिटनमधल्या मजूरपक्षाच्या इतिहासाची ज्यांना माहिती आहे त्यांना तरी सांगावयास नको. सावरकर ज्या वेळी लंडनमध्ये होते त्याच काळात फेबियन समाजवाद्यांच्या गटाने म्हणजे वेब पतिपत्नी, बर्नार्ड शॉ, वेल्स वगैरेंनी लक्ष वेधून घेतले होते. वर्गविग्रह, विषमतेवर आधारलेली समाजरचना, 'आहेरे आणि नाहीरे' यांच्यामधील अंतिम संघर्ष, इतिहासाचा आर्थिक दृष्टीने लावला जात असलेला अर्थ यासंबंधी विलायतेतील वैचारिक विश्वात हिरीरीने वाद खेळले जात होते, तरुण सावरकरांच्या मनावर याचा काहीच कसा ठसा उमटला नाही? रशियन क्रांतिकारकांपासून बॉंबविद्या हस्तगत करावी असे वाटले, पण रशियामध्ये राज्यक्रांती करू पाहणाऱ्या माणसांची तात्त्विक भूमिका आपल्यापेक्षा वेगळी आहे आणि म्हणून ती समजावून घ्यावी, असे त्यांना वाटलेले दिसत नाही. एवढेच नव्हे तर ज्या माझिनीच्या आत्मचरित्राचा व लेखांचा त्यांनी अनुवाद केला, त्या माझिनीने आयुष्याची अखेरची वर्षे समाजवादाला विरोध करण्यात का घालवली त्याचा विचार करावा, असेही सावरकरांना कधी वाटलेले दिसत नाही. सावरकरांनी ज्या वेळी माझिनीविषयी लिहिले त्याच सुमारास म्हणजे १९०५ मध्ये गेतॅनो सॅल्व्हेमीनी नावाच्या लेखकाने इटलीत माझिनीविषयी एक पुस्तक प्रसिद्ध केले. सॅल्व्हेमीनीचे पुस्तक हे टीकात्मक आहे आणि माझिनीच्या विचारसरणीतील धोके व उणिवा यांचे त्यात सुस्पष्ट रीतीने विवेचन केले आहे. सावरकरांचे पुस्तक अर्थातच प्रशंसापर आहे; कारण एका अर्थाने माझिनीवर टीका करणे म्हणजे सावरकरांनी स्वतःवरच टीका करण्यासारखे होते आणि आपल्या श्रद्धास्थानांची व मूल्यांची अलिप्तपणे, कठोरपणे चिकित्सा करणे सावरकरांना कधीच साधले नाही.

सोव्हिएत रशियाविषयी ते उल्लेख करतात; नाही असे नाही. रशियामधील घटस्फोट-स्वातंत्र्याच्या प्रयोगाविषयी त्यांचा एक सविस्तर लेख आहे. रशियन क्रांती ही जीवन

क्रांती आहे आणि हा प्रयोग कल्पनेबाहेर यशस्वी झाला असल्याचे व त्याप्रमाणेच अपेक्षेबाहेर फसला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ( **समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ३, पृष्ठ २०६ ) पण यापलीकडे फार चिकित्सा करण्याच्या भानगडीत सावरकर पडलेले नाहीत. यंत्रयुगाविषयी लिहिताना, " बेकारी यंत्राने वाढत नाही तर विषम वाटणीमुळे वाढते ! आणि विषम वाटणीचा दोष यंत्राचा नसून समाजरचनेचा आहे " ( **समग्र सावरकर वाङ्मय :** खंड ३, पृष्ठ ३९८. ) असे त्यांनी म्हटले आहे. पण या विचाराच्या अनुषंगाने विषमतेचा समग्र. विचार करावा असे त्यांना वाटल्याचे दिसत नाही. सोव्हिएत रशियात चाललेल्या राष्ट्रउभारणीच्या प्रयत्नाबाबत आणि शस्त्रसंपन्न बनण्याच्या रशियाच्या आकांक्षेबाबत मात्र सावरकरांनी वेळोवेळी कौतुकाचे उद्गार काढले आहेत. असेच प्रशंसेचे उद्गार त्यांनी हिटलर-मुसोलिनी यांच्याबाबत काढलेले आढळतात. फॅसिझम, नाझीझम, बोल्शेव्हिझम, लोकशाही तत्त्वज्ञान यांच्याबाबत सरसकट सावरकरांनी एकच निकष लावलेला दिसतो—तो म्हणजे, कोणाहीमुळे का होईना, राष्ट्र शस्त्रदृष्ट्या बलवान झाले म्हणजे पुरे !

हे सारे वाचू लागले की वाटते—सावरकरांची बारीबाबाच्या त्या भयंकर तुरुंगातून सुटका झाली; अनेक वर्षांच्या स्थानबद्धतेनंतर मुक्तता झाली; गांधीजींच्या खुनात गोवल्यामुळे स्वतंत्र भारतातही उतारवयात त्यांना कारावास सोसावा लागला, त्याही अग्निदिव्यातून ते बाहेर पडले; पण वैचारिकदृष्ट्या त्यांनी आपल्या मनाला फार लहान वयात ज्या बेड्या घातल्या त्या मात्र त्यांना कधीच तोडता आल्या नाहीत.

सत्यकथा : मे, १९६६

ooooooooooooooooooooooooo

# १०

# पां. वा. गाडगीळ यांची विचारसृष्टी

ooooooooooooooooooooooooo

समाजवाद हा चालू घडीचा परवलीचा शब्द झाला आहे. समाजवाद या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विचारसरणीचा सामान्य माणसाच्या मनावरील प्रभाव वाढत असल्याने, सध्या कोण, केव्हा, आपण समाजवादी असल्याचा पुकारा करील याचा नेम राहिलेला नाही. समाजवादी म्हणवून घेणाऱ्या माणसांच्या उक्तीवर व कृतीवर आजही टीकाटिप्पणी केली जाते; त्यांची कुचेष्टा होते; पण ती अनेकदा या लोकांच्या उक्तीत व कृतीत जमीन-अस्मानाचे अंतर पडलेले दिसत असल्यामुळे! आपणच अस्सल समाजवादी व बाकीचे सारे नकली समाजवादी हे सिद्ध करण्यासाठीही समाजवादी म्हणवून घेणाऱ्यांची टवाळी केली जाते. पण तीस-चाळीस वर्षांपूर्वी आपण समाजवादी आहोत असे सांगणाऱ्यांना जी हेटाळणी सहन करावी लागे, जी दूषणे दिली जात, ती मूलतः व मुख्यतः ते पुरस्कारीत असलेल्या समाजवादी विचारसरणीमुळे. त्या काळात समाजवादी विचारसरणीचा प्रसार करणे हे खरोखरच कठीण काम होते. एक तर प्रत्येक समाजवादी हा कम्युनिस्ट असलाच पाहिजे, असे त्या वेळी बेधडक गृहीत धरले जात असे. शिवाय तेव्हा परक्या सत्तेच्या उच्चाटनावर राष्ट्रवादी चळवळीचे लक्ष केंद्रित झालेले असल्याने व देशाचे स्वातंत्र्य नजरेच्या टप्प्यात आलेले नसल्याने समाजवादाच्या पायावर भारतीय समाजाची पुनर्रचना करण्याची भाषा बहुतेकांना अप्रस्तुत वाटत असे. तसल्या प्रतिकूल परिस्थितीत मराठी भाषेत समाजवादासंबंधी लेखन करण्याचा उपक्रम कोणी आरंभला तर आपणांस बरेच कळते असे मानणारे तत्कालीन पुढारीही म्हणत, "तुम्ही मराठीत ही पुस्तकं

काढता; पण आम्ही हा विषय मुळात इंग्रजीतून वाचतो आणि आम्हांला तो समजतो. उलट ज्यांना इंग्रजी येत नाही त्यांना हा मराठीतून तरी कसा समजणार? कारण मराठीत या विषयाची परिभाषाच मुळी नाही. लिहिणाऱ्यांचे लेखन अगदी भाषांतर-वजा वाटते!"[1] असल्या अवहेलनेची पर्वा न बाळगता जावडेकर, गोरे, महाजनी, सुंठणकर, भुस्कुटे, कोल्हटकर, लक्ष्मणशास्त्री जोशी या समकालीनांच्या बरोबरीने पां. वा. गाडगिळांनी समाजवादासंबंधी मराठीत लेखन केले व हे नवविचाराचे लोण महाराष्ट्रातल्या सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत पोचवण्याचा जिद्दीने प्रयत्न केला. जावडेकरांचा अपवाद वगळता, समाजवादाचा प्रसार करण्यासाठी गाडगिळांनी मराठीत जितके विपुल लेखन केले आहे, तितके सातत्याने व दीर्घकाळ दुसऱ्या कोणीही केलेले आढळत नाही. गाडगिळांनी लिहिलेली एकुलती एक कादंबरी व कोणत्याही पुस्तकात समाविष्ट न झालेले वृत्तपत्रातील त्यांचे असंख्य लेख आपण जमेस धरले नाहीत तरीही निव्वळ वैचारिक स्वरूपाची अशी सतरा पुस्तके त्यांच्या खात्यावर जमा झालेली दिसतात. त्यांपैकी सात पुस्तके तर सरळ सरळ समाजवाद, मार्क्सची विचारसरणी व रशियातील राज्यक्रांती या विषयांसंबंधी लिहिलेली आहेत. उरलेल्या पुस्तकांतही — मग ते फॅसिझमसंबंधी असो की आर्थिक नियोजनासंबंधी असो — आपण समाजवादी दृष्टिकोणच मांडीत आहोत, असा त्यांचा दावा आहे.

गाडगिळांची ही सारी पुस्तके ते पत्रव्यवसायासारखा धकाधकीचा व्यवसाय करीत असताना लिहिली गेली आहेत. जवळजवळ चाळीस वर्षांच्या मराठी वृत्तपत्र-सृष्टीतील आपल्या कारकीर्दीत गाडगिळांनी व्यवसायात जसे चढउतार अनुभवले, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रांच्या विश्वातली स्थित्यंतरे पाहिली. वर्तमानपत्रे चालवणे हे एके काळी व्रत होते. टिळक-परांजप्यांच्या काळात ते सतीचे वाण होते. पुढे ती वृत्ती बनली. वृत्तपत्रे ही मतपत्रे किंवा विचारपत्रे राहिली नसून, ती खऱ्या अर्थाने वर्तमानपत्रे बनली. परिणामतः "पत्राचा खप हा एकंदर वृत्तसंकलन, वृत्तप्रदर्शन, प्रसारसंघटना यावरच अवलंबून राहात आहे. यामुळे विद्वान, निःस्पृह व साक्षेपी मुख्य संपादकाची गरज कमी झाली आहे व हळूहळू त्यांची संख्याही घटत आहे."[2] "खूप वाचन, खूप चिंतन करून, अतिशय मेहनतीने व एकतानतेने" वृत्तपत्रातील लेखन करण्याबद्दल कटाक्ष बाळगणारी गाडगिळांच्यासारखी माणसे आता दुर्मिळ होत चालली आहेत. सध्या शिवराळ, चुरचुरीत व चटकदार शैलीत उथळ व गोलमाल युक्तिवादाने भरलेले लेखन करणाऱ्यांची मराठी पत्रसृष्टीवर जबरदस्त पकड आहे, तर साहित्यक्षेत्रात अभिव्यक्तीतला सरळपणा, साधेपणा, स्पष्टपणा व सोपेपण ही सामान्य लेखकाची लक्षणे मानण्याकडे अनेकांचा कल आहे. आपल्याला गवसलेला आशय शक्य तितक्या तेढ्या व तिरकस पद्धतीने व्यक्त करून वाचकांना दहशत घालणाऱ्यांची सध्या चलती आहे. बऱ्याच वेळा अशी मंडळी भाषा वापरीत असतात ती विचार व्यक्त करण्यासाठी नाही, तर केर्केगार्द म्हणत असे त्याप्रमाणे

आपल्याजवळ स्पष्ट विचार नाहीत ही वस्तुस्थिती लपविण्यासाठी! श्री. पां. वा. गाडगीळ हे सध्या चलती असलेल्या या मंडळींपैकी नाहीत. वर्तमानपत्र वाचणाऱ्या वाचकाला विश्वासात घेऊन, त्याला अवघड व गुंतागुंतीचे राजकारण व अर्थकारण शक्य तितक्या सुबोध भाषेत समजावून सांगावयाचे आणि तसे करताना विरोधकांवर व्यक्तिगत टीकेची चिखलफेक न करता किंवा वाचकाच्या भावना न भडकवता त्याच्या विचार करण्याच्या शक्तीला आवाहन करावयाचे, असा गाडगिळांचा शिरस्ता आहे. गुळगुळीत शब्दांची पखरण करून व तथाकथित लालित्याचा रंग मिसळून लेख सजवण्याच्या मोहाला गाडगीळ बळी पडलेले दिसत नाहीत. खरे म्हणजे लेख सजवावे कसे याची त्यांनी कधी फिकीर केलेली दिसत नाही. 'कसे सांगायचे' यापेक्षा 'काय सांगायचे' यावरच त्यांनी भर दिलेला आढळतो.

असे लेखन करणे वाटते तितके सोपे नाही. दैनंदिन घडामोडींवर भाष्ये करण्यासाठी व त्यांच्या अनुषंगाने राजकीय भाकिते वर्तवण्यासाठी चौफेर अभ्यासाची व सतत चिंतनाची जरूर असते. विशेषतः सामान्य वाचकासाठी निव्वळ वैचारिक स्वरूपाचे लिखाण दैनिक वृत्तपत्रासारख्या माध्यमाद्वारा करणाऱ्याला एका आपत्तीला नेहमीच तोंड द्यावे लागते. एक तर वेळेच्या व जागेच्या मर्यादेमुळे ते पुरेसे सखोल होत नाही व फार सूत्रबद्ध लिहिले तर वाचकाला बोध होत नाही. हे दोन्ही धोके टाळून लेखन करण्याची तारेवरची कसरत करताना तोल जाऊ न देण्यात तरबेज झालेल्यांच्या बाबतीत आणखी एक धोका असतो. अत्यंत गुंतागुंतीचा विषय सोपा करून उकलून दाखवण्याची हातोटी साधलेली माणसे इतके सोपे व सुबोध लिहितात की, वाचकाला वाटावे एवढ्या साध्या गोष्टी आपल्या कशा लक्षात आल्या नाहीत? मात्र सोपे व स्वच्छ लिहिण्याची हातोटीच अखेर त्यांच्या अंगलट येते. आपल्याला जे कळत नाही, समजत नाही असे लिहिणारा माणूस हा भलताच थोर विद्वान असला पाहिजे, असे जेथे मानले जाते तेथे विवेचनाचा सोपेपणा म्हणजे लेखकाच्या सामान्य दर्जाचा बिनतोड पुरावा समजला जातो. त्यात असले लिखाण दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले असले म्हणजे ते क्षणजीवी व जुजबी स्वरूपाचे मानले जाते. विद्वत्तेच्या क्षेत्रातला उफराटा न्याय असा आहे की, भरपूर तळटीपा व संदर्भग्रंथांची विस्तृत सूची यांची कवचकुंडले असल्याखेरीज व सोपी गोष्ट पुरेशी अवघड करून सांगण्याची कला अवगत असल्याखेरीज एखाद्या लेखकाला व्यासंगी पंडिताची प्रतिष्ठा लाभत नाही. खरे म्हणजे दैनिक वर्तमानपत्राच्या माध्यमाद्वारा निव्वळ वैचारिक स्वरूपाचे लिखाण यशस्वीरीत्या करणाऱ्यांच्या लेखनातला सोपेपणा हा मोठा फसवा असतो. मुळात जटिल असलेल्या समस्यांनी निर्माण केलेला गुंता उकलून दाखविण्यासाठी लेखकाने केवढी मेहनत घेतली आहे, याचा चटकन अंदाज येत नाही. गाडगिळांच्या लेखनातील सुबोधता अशीच फसवी आहे. वर्षानुवर्षांच्या तपस्येखेरीज व शिस्तीखेरीज ही सुबोधता सहजासहजी साधण्या-

सारखी नाही.

आपल्या एकुलत्या एक कादंबरीच्या "दुसऱ्या आवृत्तीसाठी दोन शब्द" लिहिताना गाडगिळांनी केलेले निवेदन लक्षात घेण्यासारखे आहे: "ललितलेखक होण्याची महत्त्वाकांक्षा मी कधीच बाळगली नाही. मी नेहमीं विशिष्ट हेतूने लिहितो. लेखनाची हौस अशी मला मुळीच नसून लिहिणे हा चरितार्थाचा व लौकिकाचा व्यवसाय असल्यामुळेच मी लिहितो. माझ्या विचाराहून वेगळी अथवा अधिक अशी भाषाशैली मजजवळ मुळीच नाही. या कादंबरीतील माझी भाषा ही संस्कृतप्रचुर आहे. या कादंबरीनंतर माझी भाषा बदलली व तिला पूर्ण मराठी वळण लागले."[३] गाडगिळांच्या भाषेला आढेवेढे न घेता किंवा उगाच घोळ न घालता आशयाला सरळ जाऊन भिडण्याची सवय आहे. गाडगीळ आपली ठाम मते वाजवी अभिनिवेशाने मांडताना दिसले, तरी त्यांच्या प्रतिपादनात आक्रमकपणा किंवा आकस्ताळेपणा आढळत नाही. विरोधकांनी हल्ला चढवला किंवा आव्हाने दिली तर डिवचले जाऊन शब्दांचा वाघनखासारखा वापर करून प्रतिहल्ला चढवण्याचा मोह अनेकांना होतो. प्रतिकूल टीकेने गाडगीळ चिडतात, संतापतात असे दिसले, तरी प्रतिपक्षावर हिरीरीने तुटून पडण्यापेक्षा ते कधी कधी त्राग्याने लिहिताना दिसतात. मात्र चर्चा करावी पण वादात पडू नये, ही मर्यादा ते सहसा ओलांडीत नाहीत. त्यामुळे वैचारिक क्षेत्रात वाद खेळण्याची खुमखुमी असलेल्यांच्या लेखनात जशा ठिणग्या उडतात, तशा गाडगिळांच्या लेखनात उडत नाहीत. गाडगिळांचे शब्द प्रतिपक्षाला डसत नाहीत की जिव्हारी लागत नाहीत.

गाडगिळांच्या समकालीनांच्या लेखनशैलीचा विचार केला तर त्यांच्या शैलीचे हे वेगळेपण जाणवते. गाडगिळांची भाषा जावडेकरांच्या भाषेसारखी जड नाही; त्याचप्रमाणे त्यांच्या विवेचनात जावडेकरांची तर्ककर्कशताही नाही. त्यांच्या भाषेत लक्ष्मणशास्त्री जोश्यांच्या भाषेतला पांडित्याचा दिमाख जसा दिसत नाही, तशीच ती निष्कारण जडजंबालही झालेली नाही. महाजनी किंवा माडखोलकर यांच्या लेखनात स्पष्ट दिसणारा चिपळूणकरांच्या किंवा. शिवराम महादेव परांजप्यांच्या संस्कृतप्रचुर शैलीचा बाज जसा गाडगिळांना कधी मानवला नाही, त्याचप्रमाणे वक्रोक्ती, व्याजोक्ती वगैरे वाकडी वळणेही त्यांच्या भाषेने सहसा घेतली नाहीत. कोणालाही हेवा वाटावा अशा नितळ, प्रसन्न व अकृत्रिम भाषाशैलीचे लेणे आचार्य अत्र्यांना मिळाले होते. पण त्यांच्या लेखनात विचारांना चालना देण्यापेक्षा विकार फुलवण्याचे सामर्थ्य होते. नानासाहेब गोरे व काकासाहेब गाडगीळ यांच्या समाजवादविषयक लेखनालाही त्यांच्या नटव्या बहुरंगी भाषाशैलीचा जाच सोसावा लागला आहे. प्रभाकर पाध्यांच्या वैचारिक स्वरूपाच्या लेखनालाही ललित लेखक म्हणून त्यांनी मिळवलेल्या यशाची अशीच बाधा झालेली दिसते. पण विविध ज्ञानशाखांतील नवनवीन.प्रमेयांबाबतच्या किंवा संकल्पनांबद्दलच्या अनिवार जिज्ञासेमुळे पाध्ये सौंदर्य-

शास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान यांसारख्या ज्ञानक्षेत्रांत जसे संचार करताना दिसतात तसे गाडगीळ मात्र आपण आखून घेतलेल्या सीमारेषा ओलांडताना दिसत नाहीत.

"लोकमान्य टिळकांबद्दल लहानपणापासून वाटणाऱ्या प्रेमामुळे देशसेवा, राजकारण व भगवद्गीता याची मला गोडी लागली"[४] असे गाडगिळांनी स्वतःच सांगितले आहे. ऐन तारुण्यात मायेचे खरे कोडे उलगडण्याचा छंद त्यांना लागला होता असे १९२८ साली लिहिलेल्या 'खग्रास प्रभाकर' या कादंबरीवरून वाटते. गाडगिळांच्या कादंबरीचा नायक प्रभाकर वसंत व्याख्यानमालेत उपवक्ता म्हणून जे बोलतो, त्यात गाडगिळांची मनःस्थिती व्यक्त झाली आहे, असा समज होतो. आरंभीच्या या काळात त्यांनी भगवद्गीतेचेही स्वतंत्र बुद्धीने परिशीलन केले. त्याची साक्ष 'गीतातत्त्वांजली' ही पुस्तिका देते. १९२५–२६ सालापर्यंत हिंदुमहासभेचे पुरस्कर्ते असलेल्या गाडगिळांना १९३० नंतर मार्क्सवादाने झपाटले. मार्क्सवादाचा पगडा जसा त्यांच्यावर बसू लागला; तसा भारतीय तत्त्वज्ञानाविषयीचा त्यांचा ओढा कमी होऊ लागला. वेदान्तचर्चा त्यांना निरर्थक वाटू लागली. एकेकाळी स्फूर्तिस्थान व आराध्यदैवत असलेल्या टिळकांचे त्यांनी पुढे कठोर मूल्यमापन केले. "संन्यास की कर्मयोग हा नऊशे पाने खर्चून लो. टिळकांनी माजविलेला वाद आज अगदीच निरर्थक वाटतो. आपण कर्मयोगशास्त्र लिहीत आहो अशी प्रतिज्ञा करून जो 'गीतारहस्य' ग्रंथ टिळकांनी लिहिला त्यात आत्मानात्म, पूर्वजन्मसंचित, ईश्वरकर्तृत्व यांचीच सारी भाकड चर्चा असून 'शठं प्रति शाठ्यम्' असे अगदी उथळ ठोकताळे मार्गदर्शनासाठी दिले आहेत...मोक्ष, निर्गुण, ईश्वर, ब्राह्मी स्थिती हे सर्व निरर्थक शब्दावडंबर आहे अशी आज. आम्हा अभ्यासकांची खात्री झाली आहे. गीतारहस्याची भाषा अप्रतिम आणि विवेचन विद्वत्तापूर्ण पण निरर्थक बाड आहे असे मला वाटते"[५] एकेकाळी अध्यात्मप्रवण असलेल्या गाडगिळांनी पुढे आध्यात्मिक 'मॉनर्की' विरुद्ध व त्यातून हळूहळू येणाऱ्या हुकुमशाहीविरुद्ध आवाज उठवला आणि ब्रह्मविद्येचे स्तोत्र गाणाऱ्या आचार्य जावडेकरांना बजावले, "सज्जनांना होणारा अंतर्नाद भ्रम असू शकतो आणि लबाड लोक ढोंग करून त्याचे थोतांड माजवू शकतात असे माझे म्हणणे आहे...ब्रह्मवेत्ता म्हटले की थोतांडाची कल्पना मनात येते याचे कारण ब्रह्मवेत्ता हा सर्वज्ञ असलाच पाहिजे असा समज आहे आणि आपण ज्याला ब्रह्मवेत्ता म्हणतो त्याला तर त्याच्या क्षेत्राहून अन्य क्षेत्रात इतर सामान्य माणसाहून अधिक काही कळत नाही असा अनुभव आहे."[६] गाडगिळांना अध्यात्माची झालेली 'ॲलर्जी' मार्क्सवादाच्या अभ्यासामुळे उत्तरोत्तर वाढत गेली. आपल्या दृष्टिकोणात झालेल्या परिवर्तनांची प्रांजळ कबुली देताना गाडगीळ म्हणतात, "मी जेव्हा समाजवादी विचार वाचू, ऐकू लागलो तेव्हापासून माझ्या डोक्यातील हिंदुत्वनिष्ठेचा कैफ साफ उतरला. हळूहळू माझी जातिनिष्ठा, जुनाट धर्मनिष्ठा, ईश्वरनिष्ठा, अध्यात्मनिष्ठा सर्व नष्ट झाली आणि मी पूर्ण भौतिक-

वादी झालो."[७]

१९३४ साली शंकरराव देवांनी गाडगिळांकडून 'सोशॅलिझम अथवा समाजवादाचा ओनामा' हे पुस्तक लिहून घेतले. "स्वातंत्र्याची चळवळ व समाजवाद ऊर्फ सोशॅलिझमची चळवळ या दोनही एकदमच चालविल्या पाहिजेत व त्यासाठी सर्व प्रकारच्या आर्थिक लढ्यास राजकीय व वर्गीय स्वरूप दिले पाहिजे"[८] असे गाडगिळांच्या विवेचनाचे सूत्र होते. हिंदी भांडवलवाले, जमीनदार, संस्थानिक व जातिनिष्ठ पुढारी हे चार वर्ग स्वातंत्र्याचे खरे शत्रू असल्याचा निर्वाळा देऊन त्यांनी जवाहरलाल नेहरूंनी ज्याप्रमाणे घटनासमिती बोलावण्याची मागणी केली तशी मागण्याच्या फंदात सोशॅलिस्टांनी पडू नये, असा सल्ला दिला आहे. कारण देशातील संपत्तिसाधने हाती असलेले वरील चार वर्ग हे बहुसंख्य समाजास हितकारक अशी राज्यघटना करणार नाहीत, अशी गाडगिळांना त्या वेळी खात्री वाटत होती. १९३४ साली घेतलेली ही भूमिका गाडगिळांनी १९४० साली सोडून दिली. "गांधींना स्वातंत्र्य हवे, पण वर्गलढा नको म्हणून त्यांचा घटनासमितीस विरोध होता." असे सांगून, "जातीय कलह माजण्यापेक्षा थोडाफार वर्गकलह झाला तरी चालेल" या वृत्तीतून गांधी घटनासमितीची मागणी करीत आहेत, असे गाडगिळांनी स्पष्टीकरण दिले, एवढेच नव्हे तर, "जनताजागृतीची, जनतेस राजकीय हक्कांचे शिक्षण देण्याची आणि जनहिताचे पुढारी जनतेमार्फत निवडून आणून एकजुटीने अखंड राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करण्याची घटनासमितीची चळवळ ही अमोल संधी आहे." असाही त्यांना साक्षात्कार झाला[९].

समाजवाद या संज्ञेचा गाडगिळांनी लावलेला अर्थही असा वेळोवेळी बदलत गेला आहे की, त्यांच्या कोलांटउड्या पाहून एखादा गोंधळून तरी जाईल किंवा त्याची करमणूक तरी होईल. 'समाजवादाचा ओनामा' या अगदी पहिल्या पुस्तकात "सोशॅलिझम अथवा समाजवाद याचा संपत्तिसाधने सार्वजनिक मालकीची असावी असे मानणारा मतपंथ असा अर्थ समजावा"[१०] असे गाडगीळ म्हणतात. 'सोशॅलिझम अर्थात सुलभ समाजवाद' या वादविवेचन मालेतील त्यांच्या पहिल्या पुस्तकात त्यांनी समाजवाद म्हणजे काय याची सुधारून वाढवलेली व्याख्या दिलेली आहे. "'संपत्तिसाधने सरकारी मालकीची करणे' हाही जो सोशॅलिझमसंबंधी वाक्प्रचार रूढ आहे त्याबद्दलही पुष्कळदा गैरसमज होतो. हिंदी संस्थानांत कितीतरी धंदे सरकारी मालकीचे आहेत; पण तो सोशॅलिझम नव्हे. सरकार हे पूर्ण समाजाचे प्रातिनिधिक असून त्याने जनतेच्या तर्फे सर्व धंदे आपल्या मालकीत घेणे याचे नाव सोशॅलिझम"[११]. १९४८ साली मार्क्सच्या कॅपिटल ग्रंथाचे विवरण करताना, "ऐतिहासिक कार्य संपलेली अशी ही भांडवलशाही नष्ट करून धनोत्पादन-साधने सार्वजनिक मालकीची केली पाहिजेत व मग जनतेच्या उपयोगाच्या दृष्टीने धनोत्पादन केले पाहिजे असे मार्क्सवाद्याचे म्हणणे" असल्याचा हवाला त्यांनी दिला आहे[१२].

१९४५ साली महाराष्ट्राने सोशॅलिझम का स्वीकारावा हे समजावून सांगताना ते म्हणतात, " सोशॅलिझम हा असलेली संपत्ती वाटून खाण्याचाच केवळ मार्ग नसून संपत्त्युत्पादनाच्या कामी न येणारे बेकार श्रम व बेकार भांडवल संपत्त्युत्पादनाच्या कामी लावणे, धनोत्पादन वाढविणे व उत्पन्न धनाचा विनियोग जनतेच्या उन्नतीसाठी करणे या त्रिविध ध्येयाचा मार्ग आहे. "[१३]

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी समाजवादाचा जो अर्थ स्पष्ट केला आहे तो लक्षात घेतला, तर गाडगीळ कोठून निघाले आणि कोठे येऊन पोचले, हे लक्षात येईल. १९६१ साली प्रसिद्ध झालेल्या 'समाजवादाची वाटचाल' या पुस्तिकेत गाडगीळ ठासून सांगतात, " याचा अर्थ सर्व धनोत्पादन-साधने सार्वजनिक मालकीत आणणे हाच समाजवाद होय असा नव्हे...न खपणारा माल अडवून ठेवून कारखानदार कारखाने जर बंद ठेवू लागला तर ते कारखाने वर म्हटल्याप्रमाणे समाजाच्या मालकीत ठेवणे, त्यांचा समाजासाठी वापर करणे हे समाजाच्या हिताचे म्हणून समाजाचे कर्तव्य ठरते. ही गोष्ट केवळ उत्पादक धनाबाबत म्हणजे भांडवली धनाबाबतच खरी आहे असे नसून केव्हा केव्हा उपभोग्य धनाबाबतही समाजाला म्हणजे सरकारला अशी भूमिका घ्यावी लागते. "[१४] १९६५ च्या अखेरीस 'स्वातंत्र्योत्तर भारता'बद्दल बोलताना, " या देशात समाजवाद आहे की नाही ? " असा सवाल विचारून त्यांनी उत्तर दिले आहे, " धनोत्पादनसाधनाचे राष्ट्रीयीकरण ही समाजवादाची व्याख्या आता मागे पडली आहे...लोककल्याणासाठी लोकशाही सरकार धनोत्पादन-साधनांच्या मालकीचे, नफ्याचे, मजुरीचे, व्याजाचे, खंडाचे नियंत्रण करू शकते हे गेल्या अठरा वर्षांत दिसून आले आहे. तेव्हा आता समाजवाद याहून वेगळा असू शकणार नाही. लोककल्याणासाठी धनोत्पादन-साधनांचे नियंत्रण करण्याचा हक्क सरकारला असला म्हणजे मालकी सरकारची असावी की खाजगी असावी हा व्यवहाराचा प्रश्न ठरतो. " एवढेच म्हणून गाडगीळ थांबले नाहीत तर, " बहुतेक पुढाऱ्यांनी या प्रकारच्या समाजवादाचा म्हणजे केन्सियन दृष्टिकोणाचा अभ्यास अथवा विचार कधी केलेला नाही " असा नेत्यांना बोल लावला आहे[१५]. भारताच्या आर्थिक नियोजनाविषयीच्या आपल्या ताज्या ग्रंथात तर गाडगिळांनी चक्क सांगितले आहे की, " सर्व धनोत्पादन-साधने सार्वजनिक मालकीत आणणे ही समाजवादाची ढोबळ व्याख्या एकोणिसाव्या शतकात होती. रशियात कम्युनिस्ट क्रांती झाल्यानंतर लेनिनने जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना साऱ्या जमिनी वाटल्या तेव्हा धनोत्पादनसाधन राष्ट्रीय मालकीचे करणे म्हणजे समाजवाद ही व्याख्या निरर्थक झाली...समाजातील सर्वांना किमान सुखसोयी व समान संधी देणे, आर्थिक व सांस्कृतिक उत्कर्षप्रयत्नाला सौकर्याची व उत्तेजक परिस्थिती निर्मिणे हे समाजवादाचे उद्दिष्ट आहे. धनोत्पादनसाधने सार्वजनिक मालकीची करणे यासारख्या घोषणा हे विविध उपाय आहेत, ते काही सिद्धान्त नव्हेत. अर्थसंघटनेत वरील उद्दिष्टा-

साठी सरकारी हस्तक्षेप करता येणे व सरकार प्रातिनिधिक असणे या दोन गोष्टी शेवटी लोकशाही समाजवादाला किमान आवश्यक ठरतात."[१६] गाडगिळांनी आजवर केलेल्या विपुल लेखनातून विखुरलेल्या या समाजवादाच्या विविध व्याख्या व स्पष्टीकरणे विस्तारभयाची पर्वा न करता उद्धृत केली आहेत. कारण, ती इतकी बोलकी आहेत की, त्यावर वेगळे भाष्य करण्याचीही गरज वाटत नाही. गाडगिळांनी समाजवाद या संकल्पनेच्या आशयाबाबत हा जो गोंधळ घातला आहे त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, मार्क्सच्या विचारसरणीपासून केन्सच्या विचारसरणीपर्यंत त्यांनी केलेला वैचारिक प्रवास, हे होय.

१९३०–३२ च्या चळवळीच्या सुमारास महाराष्ट्रातील काही तरुण कार्यकर्त्यांना व अभ्यासकांना मार्क्सवादाने मोहिनी घातली. जागतिक मंदीच्या तडाख्यामुळे भांडवलशाही राष्ट्रांतील अर्थव्यवस्था पार विस्कटून गेली असल्यामुळे भांडवलशाहीला पर्यायी समाजरचना म्हणून रशियातील नवसमाजनिर्मितीविषयी त्यांना कुतूहल व प्रेम वाटू लागले. रशियातील नेत्यांना प्रेरणा देणाऱ्या मार्क्सच्या विचारसरणीचा अभ्यास व प्रसार करण्याचे प्रयत्न सुरू झाले. तसे पाहिले तर डांगे, जोगळेकर, रुईकर, निमकर, मिरजकर, लालजी पेंडसे वगैरे कार्यकर्ते त्याआधीच कम्युनिस्ट म्हणून ओळखले जात होते. हे सर्वजण सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षनेत्यांच्या तंत्राने चालणाऱ्या भारतीय कम्युनिस्टांची संघटना बांधीत होते आणि राष्ट्रवादी चळवळीशी सतत सांधा जोडण्याचा प्रयत्न करीत होते. पण १९३०–३२ सालातल्या चळवळीनंतर मुख्यतः युवक चळवळीतून आलेला जो गट मार्क्सवादाने प्रभावित झाला, तो सोव्हिएत नेत्यांच्या मार्गदर्शनाबरहुकूम धोरणे आखणाऱ्या डांगे आदी कम्युनिस्टांपेक्षा वेगळा होता. कॉंग्रेसअंतर्गत समाजवादी पक्षाची स्थापना करून, राष्ट्रवादी चळवळीच्या मुख्य प्रवाहापासून अलग न होता या प्रवाहाला समाजवादी वळण लावण्याची या गटाची आकांक्षा होती. पां. वा. गाडगीळही या गटातलेच एक! १९४३ साली आपल्या 'लेखकजीवनाविषयी' त्यांनी जे निवेदन केले आहे ते या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. "कॉंग्रेस समाजवादी पक्षात असल्यामुळे समाजवादाचा अभ्यास करण्याची मला विशेष संधी मिळाली. पक्षाच्या अभ्यासमंडळात दरसाल काही आठवडे व्याख्यान देत असे....ते जे समाजकार्य करीत आहेत त्यास त्यांच्या रांगेत उभा राहून हातभार लावणे याहून कोणतीही अधिक मोठी महत्त्वाकांक्षा मला नाही"[१७].

य. गो. जोशी यांच्यासारख्या प्रकाशक-मित्राच्याबरोबर याच काळात वाद-विवेचन-मालेचा धाडसी उपक्रम गाडगिळांनी तडीस नेला. य. गो. जोशी यांच्या-बरोबर सहज चर्चा करताना निघालेल्या मालेच्या कल्पनेला त्यांनी संपादकत्व पत्करून मूर्त रूप दिले. वादविवेचन-मालेतील एकूण तेरा पुस्तकांपैकी 'सोशॅलिझम अर्थात सुलभ समाजवाद', 'फॅसिझम', 'अराज्यवाद', 'मार्क्सचा भौतिकवाद' ही चार

पुस्तके तर त्यांनी लिहिलीच, पण 'कॅपिटल सारग्रंथ', मालेच्या 'कळसाध्यायासारखा', शेवटी काढायचा ठरला असतानाही मालेतील अखेरची तीन पुस्तके प्रसिद्ध होण्यापूर्वीच तो तयार झाला. तीस वर्षांपूर्वीच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पैशाचे पाठबळ नसताना, वादविवेचन मालेतल्या पुस्तकांसारखी पुस्तके प्रसिद्ध होऊ शकली व त्यांतल्या काहींच्या आवृत्त्याही निघू शकल्या, याचे मोठे श्रेय गाडगिळांना द्यावे लागेल. 'मोले घातले रडाया' असा हा मामला नव्हता. फॅसिझमसंबंधी किंवा अराज्यवादासंबंधी गाडगिळांनी लिहिले त्याला आता तीस वर्षे लोटली असली, तरी त्याहून गुणवत्तेने जास्त किंवा वेगळ्या व अधिक सुबोध शैलीत मराठीत या विचारसरणीसंबंधी नंतर कोणी लिहिलेले नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

अर्थात गेल्या तीस वर्षांत पाश्चिमात्य राष्ट्रांत मार्क्सवादासंबंधी व रशियातील राज्यक्रांतीसंबंधी इतके विपुल लेखन व संशोधन झाले आहे, की त्याचा आधार घेऊन तीस वर्षांपूर्वी गाडगिळांनी या विषयासंबंधी केलेल्या लेखनातील उणिवा व दोष दाखवणे सहज शक्य आहे. 'पश्चात्‌बुद्धी' या सदरात जमा होईल अशा शहाणपणाचा नंतरच्या पिढ्यांना जो स्वाभाविक फायदा मिळतो त्यामुळे हा खेळ करणे त्यांना अवघड नसते. पण कोणत्याही लेखकाच्या कृतीचे मूल्यमापन करताना त्या कृतीला असलेला काळाचा संदर्भ विसरून चालणार नाही. गाडगिळांच्या बाबतीत एक गोष्ट विशेष जाणवते ती म्हणजे, गांधीवाद व समाजवाद यांच्यातील विरोध जाणवल्यानंतरही जावडेकरांच्याप्रमाणे त्यांनी गांधीवाद व समाजवाद यांचा समन्वय साधण्याचा किंवा संकर करण्याचा प्रयोग करून पाहिला नाही. त्यांच्या समकालीनांपैकी बरेचजण ज्या वेगाने मार्क्सवादाकडे खेचले गेले, त्याहीपेक्षा जास्त वेगाने १९४० नंतरच्या काळात मार्क्सवाद विरोधी विचारांच्या आहारी गेले व बाटलेले लोक अधिक कडवे असतात त्याप्रमाणे मार्क्सवादाचे व कम्युनिस्ट चळवळीचे कडवे टीकाकार बनले. त्यांतल्या काहींनी कम्युनिस्टांनाच नव्हे तर समाजवादी विचारसरणीलाच उखडून लावण्याचा ठेका पत्करला. गाडगिळांचे असे काही झाले नाही. समाजवादी विचारसरणीविरुद्ध जशी त्यांनी आत्यंतिक विरोधी भूमिका स्वीकारली नाही, त्याचप्रमाणे कम्युनिस्टांचा आंधळा द्वेषही त्यांनी केला नाही. कम्युनिस्ट पक्षाची व चळवळीची बलस्थाने व मर्मस्थाने शोधण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. या संदर्भात गाडगिळांनी वेळोवेळी कम्युनिस्टांसंबंधी — विशेषतः भारतीय कम्युनिस्टांसंबंधी — जे लिहिले आहे ते विचारात घेण्यासारखे आहे.

१९३६ साली प्रसिद्ध झालेल्या रशियातील राज्यक्रांतीवरच्या पुस्तकाच्या अखेरीस गाडगीळ म्हणतात, " आपापल्या राष्ट्रात समाजवाद निर्माण करण्याच्या धोरणाची सूत्रे यापुढे रशियाबाहेरच्या कम्युनिस्टांनी रशियातून चालवून घेऊ नयेत, ही गोष्ट येथे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. अमेरिकेच्या, इंग्लंडच्या अथवा फ्रान्सच्या साम्राज्यातील प्रजेचे आपल्यावरच्या साम्राज्यशाहीशी वैर असणे साहजिक आहे. यापैकी

एक अथवा सर्व राष्ट्रांच्या बाजूने रशियाला जपान, जर्मनी व इटाली या फॅसिस्ट राष्ट्रांशी लढावे लागणार असा संभव दिसू लागला तर अशा वेळी रशियन कम्युनिस्ट वरील साम्राज्यांच्या अंकित राष्ट्रांतील कम्युनिस्टांना ही साम्राज्ये संकटात आणावी असा सल्ला देतील हे असंभवनीय आहे. या बाबतीत रशियन सरकार व कम्युनिस्ट इंटरनॅशनल यांची धोरणे वेगळी असतील असे मानण्यास काहीच आधार नाही "[१८]. गाडगिळांचे हे भाकित पुढे खरे ठरले व जर्मनीने रशियावर हल्ला केल्यानंतर व रशिया दोस्त राष्ट्रांपैकी एक झाल्यानंतर, तोपर्यंत चाललेल्या युद्धाला 'साम्राज्यवाद्यांचे युद्ध' म्हणून नाक मुरडणाऱ्या भारतीय कम्युनिस्टांनी, ते 'फॅसिझमविरुद्ध चाललेले लोकयुद्ध' आहे असा जयघोष करण्यास सुरुवात केली.

खुद्द गाडगिळांनाही "बेचाळीसचा लढा व गांधींचे धोरण हे सर्व बरेच नापसंत" होते[१९] व "मध्य सरकारात संयुक्त जबाबदारीचे तत्त्व जर मान्य झाले तर ब्रिटिश सरकारशी युद्धकालात समेट करून राष्ट्रीय सरकार स्थापन करावे, याहून अधिक पूर्ण स्वातंत्र्याचा हक्क आज धरू नये" असे त्यांना वाटत होते.[२०] दुसऱ्या महायुद्धाच्या फॅसिस्टविरोधी स्वरूपाबाबतची जवाहरलाल नेहरूंची भूमिका गाडगिळांना मान्य होती. मात्र ती काँग्रेसच्या गळी उतरवण्याऐवजी, गांधीजी पुनः पुन्हा युद्धापासून अलग राहण्याची भूमिका मांडत असताना नेहरूंनी ती सर्वकाळ सहन केली, याबद्दल गाडगिळांनी नेहरूंवर टीका केली आहे. गाडगीळ म्हणतात, "यात त्यांचा (नेहरूंचा) अप्रामाणिकपणा नव्हता तरी दुबळेपणा दिसून आला हे निःसंशय."[२१] दुसऱ्या महायुद्धाबाबत गाडगिळांनी मांडलेले मत कम्युनिस्टांनी स्वीकारलेल्या पवित्र्याशी मिळतेजुळते वाटले तरी, "केवळ रशिया युद्धात पडल्यामुळे हे युद्ध 'लोकयुद्ध' झाले" असे ते मानीत नव्हते, हे विसरून चालणार नाही. बेचाळीसच्या लढ्यासंबंधी गाडगिळांनी एकांड्या शिलेदाराप्रमाणे विरोधी भूमिका घेऊन काँग्रेस समाजवादी पक्षातील मित्रांची इतराजी ओढवून घेतली, तरी ऑगस्ट आंदोलनाबाबतच्या कम्युनिस्टांच्या धोरणाचेही वाभाडे काढले आहेत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. "ऑगस्टनंतर दंगलीत जपानचा हात कोठेही दिसून आला नाही. दंगल करणारे लोक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने जपानशी लढण्याची संधी आपणास मिळावी म्हणून बंड करण्यास प्रवृत्त झाले होते ही गोष्ट कम्युनिस्टांना माहीत नव्हती असे नाही; पण त्यांनी या बंडवाल्यावर ते शत्रूस फितूर असल्याचा आरोप केला असून बंडवाल्यांपैकी काहींना पकडून देण्यास व्यक्तिशः काही कम्युनिस्टांनी हस्ते परहस्ते मदतही केली. ज्यांनी पूर्वी कम्युनिस्टांना त्यांच्या अज्ञातवासात आश्रय दिला अशा कित्येकांना या वेळी कम्युनिस्टांनी सरकारच्या हवाली करून पूर्वीचे ऋण सव्याज फेडले."[२२]

गाडगीळ हे छुपे कम्युनिस्ट किंवा कम्युनिस्टांचे सहप्रवासी असल्याचा अनेकांचा समज असल्याचे आढळून येते. गाडगिळांचे प्रकाशित लेखन वाचल्यावर हा समज

तितकासा खरा नसल्याचे कोणाच्याही ध्यानात येईल. कम्युनिस्ट कसे असतात या-संबंधीचे चित्र त्यांनी १९४२ साली रेखाटले आहे. "कम्युनिस्टांच्या कार्यपद्धतीत सभ्यता, सौजन्य, भलेपणा, दुसऱ्याची भूमिका समजून घेऊन आपली समजून देण्याची उत्सुकता यांपैकी काहीही नाही. ते कोणत्याही विषयाची निर्विकार चर्चा न करता वाग्युद्ध करतात. आपणाजवळ बिनतोड युक्तिवाद नसला तर वितंडवाद घालावा, दम द्यावा, दुसऱ्याला भेकड अथवा बेअक्कल ठरवावे याची त्यांना घाई असते. दुसऱ्या पक्षाची सभा होऊ नये असे वाटले की, ते त्यासाठी भाड्याने गुंड आणून सभा मोडतील. गिरणी कामगार युनियनच्या निवडणुकीत हातात पैसा अथवा पाठीत सुरी यांपैकी कशाचाही उपयोग करण्यास ते मागेपुढे पाहणार नाहीत. पक्षात असताना एक-मेकांशी पूर्ण एकजुटीने वागणारे हे कम्युनिस्ट पक्षाबाहेर गेलेल्या माणसाशी हाडवैर धरतात, त्याचा सर्व बाजूंनी सतत छळ चालू ठेवतात." "बहुतेक सर्व कम्युनिस्ट पुढारी अतिशय बुद्धिमान, व्यासंगी, हजरजबाबी, निरनिराळ्या प्रचलित विषयांचा खोल अभ्यास करणारे" असले तरी "रसिकता, कलावृत्ती, विनोद यांचे त्यांना अतिशय वावडे आहे" असाही अभिप्राय त्यांनी दिला आहे. "कोमलता ही दगड आणि कम्युनिस्ट यांच्या अंतःकरणात मुळीच नसायची. शृंगारिक वृत्तीलाही ते असेच काहीसे पारखे आहेत" असेही भाष्य त्यांनी केले आहे.[२३] १९६२ सालीच लिहिलेल्या 'भारतीय कम्युनिस्ट काय करणार?' या लेखात गाडगीळ म्हणतात, "कम्युनिस्ट हे एका परदेशाला निष्ठा अर्पण करणारे आहेत व त्या देशाचे हित व आमच्या देशाचे हित यांत विरोध आला असता ते स्वदेशाचा द्रोह करतील अशी त्यांच्या तत्त्वज्ञानावरून, इतिहासावरून आणि वर्तनावरून खात्री वाटते आणि म्हणून मग कम्युनिस्ट हे देशद्रोही आहेत असेच म्हणावे लागते. कम्युनिस्टासारखा संघ-टित, शिस्तबद्ध, ध्येयासाठी व्यक्तिशः व संघशः दीर्घकाळ सतत झिजत राहणारा आणि कोणत्याही वेळी मोठ्या त्यागास तयार असलेला पक्ष या देशात दुसरा कोण-ताही नाही असे मी मोठ्या आदराने सांगतो. पण या सर्वांची परिणती काय हा प्रश्न मनाला एकसारखा डाचल्यावाचून राहात नाही."[२४] कम्युनिस्टांची शिस्त, ध्येय-निष्ठा, स्वार्थत्यागी प्रवृत्ती, संघटनाकौशल्य या गुणांचे गाडगीळ कौतुक करताना दिसतात हे खरे असले तरी, "कठोर शिस्त, उत्तम शरीरप्रकृती, आज्ञाधारकत्व, स्वार्थत्याग वगैरे गुण राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनेतील कार्यकर्त्यांच्या अंगी ओतप्रोत भरलेले आहेत आणि बुद्धिमान व खानदानी घराण्यातील तरुण या संघटनेत आहेत" असेही म्हणण्यास ते मागेपुढे पाहात नाहीत.[२५] कम्युनिस्टांचे गाडगिळांनी रंगवलेले चित्र कोणास आवडो वा न आवडो, पण ते पाहून गाडगीळ छुपे कम्युनिस्ट किंवा सहप्रवासी आहेत असे छातीठोकपणे म्हणण्याची सोय राहात नाही, हे मान्य केलेले बरे!

गाडगीळ हे छुपे कम्युनिस्ट किंवा सहप्रवासी असल्याचा समज का पसरला असावा?

बेचाळीसच्या वेळी त्यांनी घेतलेल्या विरोधी भूमिकेमुळे नाराज झालेल्या त्यांच्या मित्रांना काही काळ असे वाटले असण्याची शक्यता आहे. खुद्द गाडगीळ कधी कधी ज्या तऱ्हेने कम्युनिझमविषयी व सोव्हिएत रशियाविषयी लिहितात, त्यामुळेही एखाद्याचे असे मत होणे स्वाभाविक वाटते. १९४५साली लोकशाहीच्या नव्या कल्पनेविषयी लिहिताना गाडगीळ सुरुवातीलाच अशी सलामी देतात की, "रशियातील सोव्हिएत कम्युनिझम ही जास्तीत जास्त परिपूर्ण अशी लोकशाही आहे असे माझे व आणखी अनेकांचे मत आहे. हे आमचे मत रशियात जाऊन आल्याने समक्ष वस्तुस्थिती पाहिल्याने बनले आहे असे मुळीच नव्हे. खुद्द रशियात जाऊन तेथील परिस्थिती पाहून आलेल्या लोकांत सोव्हिएत रशियाच्या ऐकान्तिक प्रशंसकापासून ऐकान्तिक निंदकापर्यंत सर्वांची गणना होते. तेव्हा 'मी समक्ष परिस्थिती पाहून आल्याने माझे मत अमूक प्रकारचे बनले आहे म्हणून ते खरे माना' असे कोणी म्हणेल तर त्यात काही हशील नाही. सोव्हिएत कम्युनिझम ही लोकशाही आहे असे माझे मत बनण्याचे मुख्य कारण म्हणजे माझा समाजवादाचा अभ्यास आणि सिडने व बिॲट्रिस वेब यांच्या 'सोव्हिएट कम्युनिझम—ए न्यू सिव्हिलिझेशन' या ग्रंथाचे वाचन होय. पण त्यामुळे माझे मत निर्णायक आहे असे सिद्ध होत नाही; कारण, लुई फिशर आणि मॅक्स इस्टमन यांच्या मते रशियात सैतानशाही आहे व त्यांचे ग्रंथ काही माझ्या वाचण्यात आलेले नाहीत. त्यामुळे माझे मत एकतर्फी आहे हे उघड होय."[२६]

गाडगिळांनी स्टालिनच्या बाजूने टाकलेले झुकते माप हेदेखील त्यांच्याविषयीच्या रूढ समजुतीला कारणीभूत झाले असेल.[२७] गाडगिळांचे स्टालिनप्रेम कधी कधी इतके उफाळून येते की, "ज्या गूढ प्रकाराने स्टालिन मेला त्यावरून त्याला क्रुश्चेव्हनेच मारले असावे असा माझा तेव्हापासूनचा तर्क आहे"[२८] असे बेलाशक लिहितात आणि बिचाऱ्या क्रुश्चेव्हविषयी चीनमधले नेतेही घेत नाहीत अशा भलभलत्या शंका घेतात. "'तुम्ही लुई फिशरचा अमूक एक ग्रंथ वाचल्यावाचून स्टालिनबद्दल अनुकूल मत बनविता कामा नये' अशी ताकीद जेव्हा माझे काही मित्र मला देतात तेव्हा ते मी साफ नाकारतो" असेही ते बिनदिक्कत सागतात.[२९] (हे सारे पाध्यांच्यासारख्या मित्रांच्या रोखाने लिहिले असावे असे वाटते!) याचा अर्थ गाडगीळ हे खुल्या मनाचे विचारवंत नाहीत असे नाही. कम्युनिस्ट विचारसरणीवर कडाडून हल्ला चढवणारे ग्रंथ ते वाचीत नाहीत असे नाही. एवढेच नव्हे तर, आपण ठामपणे मांडलेले मत चुकीचे आहे अशी खात्री पटल्यावर ते बदलण्यास व तसे प्रांजळपणे कबूल करण्यास ते कचरत नाहीत. तसे नसते तर, दुसऱ्या एखाद्याने सांगितले तर सुरस व चमत्कारिक आख्यायिका वाटावी अशी वस्तुस्थिती स्वतः गाडगिळांनीच सांगितली नसती. गाडगीळ म्हणतात, "१९४१ साली आंबेडकरांचे 'थॉटस् ऑन पाकिस्तान' हे पुस्तक वाचून त्यावर चार कॉलम अग्रलेख मी लिहिला. मी त्या पुस्तकाच्या विरुद्ध लिहिले व ते लेखन आंबेडकरानाही आवडले असे मला

समजले. पण माझा लेख मीच वाचल्यावर त्याच वेळी माझे मत बदलले व मी फाळणीवादी झालो. स्वातंत्र्य व फाळणी एकदम पाहिजेत असे माझे मत झाले."[३०] स्वतःचाच लेख वाचून मत बदलावे असे वाटण्याचा हा प्रकार अद्‌भुत वाटला तरी तो बंदिस्त मनाच्या विचारवंताचे लक्षण मानता येणार नाही.

त्यांच्या ह्या सहजप्रवृत्तीमुळेच त्यांच्यावर मार्क्सवादाचा ज्या काळात जास्तीत जास्त पगडा होता त्या काळातही पोथीनिष्ठ मार्क्सवादाप्रमाणे त्यांनी लिहिलेले आढळत नाही. १९४१ साली आचार्य जावडेकरांनी पुरस्कारिलेल्या ब्रह्मविद्येबाबतच्या प्रतिपादनाला आक्षेप घेताना गाडगिळांनी लिहिले होते, "सेश्वरवादी अथवा चैतन्यवादी विश्वाचे आदिकारण हे चैतन्यमय आहे असे मानतात तर कम्युनिस्ट हे विश्वाचे आदिकरण जड आहे असे मानीत असल्याचे मी ऐकतो. मला स्वतःला मार्क्सचे या आदिकारणासंबंधाचे मत काय आहे हे नक्की माहीत नाही, आणि ते जडच आहे अथवा चैतन्यमय आहे याबद्दल मार्क्सचे अमूक मत असल्याचे उद्या मला कळले तरी ते मी मान्य करावे असे मला वाटत नाही. माझ्या मते विश्वाचे आदिकारण काय असावे याचा शोध केवळ चिंतनानंद भोगण्यासाठी कोणीही चालू ठेवावा. पण व्यावहारिक दृष्टीने जगात वावरणाऱ्यांना त्याच्याशी काहीही कर्तव्य असणार नाही."[३१] "टिळकांनी आणि श्रीकृष्णाने प्रतिपादिलेला कर्मयोग हाच मार्क्सच्या भौतिकवादाचा भावार्थ आहे असे म्हटले तर ते फारसे चूक नाही"[३२] हे त्यांचे मत मार्क्सवादी पठडीतल्या मंडळींना ग्राह्य वाटले नसण्याचीच शक्यता जास्त आहे. अहिंसाबलाचा प्रयोग करून मार्क्सला अभिप्रेत असलेले समाजपरिवर्तन भारतात घडवून आणता येईल असा त्यांना स्वातंत्र्यपूर्व काळातही विश्वास वाटत असल्याचे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात गाडगिळांनी वर्गकलहाचा मार्क्सवादी सिद्धान्त झिडकारलेला आहे. "कम्युनिस्टांना वर्गकलह माजवून या देशात अंदाधुंदी निर्माण करता आली नाही त्याचे पुष्कळसे श्रेय" ते गांधीजींच्या वर्गसमन्वयाच्या दृष्टिकोणाला देतात.[३३] "कम्युनिस्ट तत्त्वज्ञान व कम्युनिस्ट अर्थशास्त्र ही दोन्ही अतिशय शास्त्रशुद्ध असून मानवी जीवन सर्वांगाने उन्नत करण्याचे सामर्थ्य त्यांत आहे. पण कम्युनिस्टाची राज्यपद्धती व व्यवहार निव्वळ राक्षसी आहे"[३४] असे त्यांचे आता वैयक्तिक मत झाले आहे मात्र गाडगीळ स्वतःच म्हणतात त्याप्रमाणे, "तत्त्वज्ञान आणि व्यवहार ही परस्परांपासून पूर्ण अलग असू शकतात हा विचारच मुळी मार्क्सला मान्य नाही."[३५] हे लक्षात घेतले तर कम्युनिस्ट तत्त्वज्ञान व कम्युनिस्टांचा व्यवहार यांत फरक असतो हे मानण्याची त्यांची आजची भूमिका मार्क्सच्या एका महत्त्वाच्या सिद्धान्ताच्या विरोधी आहे असे म्हणावे लागते. आज गाडगीळ लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करताना दिसतात. "शेतकरी वर्गात समाजवादाचे बीजारोपण झाल्याशिवाय समाजवाद येणार नाही. मला वर्गकलह अगदी अमान्य आहे. पण

समाजात आर्थिक वर्ग पडले असून बहुसंख्य जनता पिळल्या गेलेल्या वर्गातील आहे हे नाकबूल करता येणार नाही आणि वर्गीय दृष्टिकोणाने शेतकरी वर्गाची संघटना करून सहकारमार्गाने त्याला स्वावलंबी केल्यावाचून त्याची पिळवणूक थांबणार नाही, व समाजाची आर्थिक प्रगती होणार नाही "[३६] असे आता त्यांना वाटते व हे संघटनाकार्य करण्याची जबाबदारी ते सुशिक्षित मध्यमवर्गीयांवर टाकतात.

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांना केन्सच्या नव्या अर्थशास्त्राने भुरळ घातली. "ब्रिटिश मजूर पक्षाने आपले सोशॅलिझमचे उद्दिष्ट गाठण्यासाठी योजलेल्या पद्धती केन्सीअन सिद्धान्ताचा विस्तारच आहेत"[३७] हे गाडगिळांचे मत चुकीचे नाही, कारण दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात ह्यू डाल्टन, हर्बर्ट मॉरिसन, डग्लस जे या ब्रिटनमधील मजूर पक्षनेत्यांनी, केन्सने सुचवलेल्या उपायांचा अवलंब करून समाजवाद आणण्याची भाषा केली. केन्स व मार्क्स यांच्या भांडवलशाहीतील पेचप्रसंगाबाबतच्या विश्लेषणातील साम्यामुळे अनेकांची फसगत झाली. "केन्सच्या शिकवणीचे तार्किक व इतिहासक्रमप्राप्त पर्यवसान आर्थिक नियोजन व नियंत्रण हेच आहे "[३८] हे गाडगिळांचे म्हणणे मान्य केले तरी आर्थिक नियोजन व नियंत्रण म्हणजे समाजवाद अशी गल्लत करणे कितपत बरोबर ठरेल ? अनिर्बंध भांडवलशाहीत मंदी व बेकारी यांसारख्या संकटांना तोंड द्यावे लागते व त्यासाठी अर्थव्यवस्थेचे नियंत्रण व नियोजन सरकारमार्फत न झाल्यास सर्व भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वासच धोका पोचण्याची शक्यता असते, हे केन्सने हेरले होते. पण त्याने पुरस्कारलेल्या अर्थनीतीचा उद्देश व परिणाम भांडवलशाही अर्थव्यवस्थेऐवजी समाजवादी अर्थव्यवस्थेची निर्मिती असा नसून भांडवलशाही तारणे हा होता. केन्स उदारमतवादी विचारसरणीचा समर्थक होता. 'दि रोड टू सर्फडम' या प्राध्यापक हायेक यांच्या गाजलेल्या पुस्तकामागची नैतिक व तात्त्विक भूमिका केन्सला बहुतांशी मान्य होती. केन्सचे चरित्रकार आर. एफ. हॅरॉड यांनी, केन्सने हायेक यांना २२ जून १९४४ रोजी लिहिलेले पत्र उद्धृत केले आहे. हायेकनी त्यांच्या पुस्तकात अधिकारवाणीने व आग्रही वृत्तीने दिलेल्या आर्थिक घोषणा जशाच्या तशा स्वीकारण्याची केन्सची तयारी नसली, तरी हायेकच्या पुस्तकामागच्या नैतिक व तात्त्विक भूमिकेशी आपण बहुतांशी सहमत आहोत, असे सांगून केन्सनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. नियोजनच नको किंवा ते कमी हवे असे ते म्हणत नव्हते. कारण वस्तुतः त्यांना अधिक नियोजन हवे असे वाटत होते. पण हे नियोजन, हायेकनी मांडलेली नैतिक भूमिका ज्या समाजात जास्तीत जास्त लोकांनी स्वीकारली आहे, अशा समाजात अवलंबले जावे असे केन्सचे मत होते.

आपण ज्या धोरणांचा पुरस्कार करीत आहो तो सोशॅलिझम नव्हे हे केन्सने पुनः पुन्हा सांगितल्याचे गाडगीळ कबूल करतात, पण सोशॅलिझमचा अर्थ 'कल्याणकारी अर्थनियंत्रण' असा केला व ते लोकशाही मार्गाने करावयाचे असे म्हटले की

या अर्थाने केन्सिअन समाजघटना सोशॅलिस्टच होईल, असा त्यांचा दावा आहे. त्यांनी लावलेला हा अन्वयार्थ स्वीकारणे कठीण आहे. खाजगी भांडवलदारांना मिळणाऱ्या नफ्याच्या पायावर आधारलेली उत्पादनव्यवस्था केन्सने नाकारलेली नाही. मंदीसारख्या व बेकारीसारख्या आर्थिक अरिष्टामुळे ती उद्‌ध्वस्त होऊ नये म्हणून नियोजन व नियंत्रण यांच्या रूपाने होणारा सरकारी हस्तक्षेप केन्सला मान्य आहे. याचा अर्थ धनोत्पादनसाधने ही खाजगी मालकीची असण्याला केन्सचा विरोध होता असे नाही. साधनसामग्रीच्या व संपत्तीच्या समान वाटपावर समाजवाद्यांचा भर असतो तसा भर केन्सने दिलेला आढळत नाही. समाजात फार मोठी विषमता असू नये असे केन्स म्हणत होता, याचे कारण विषमता असणेच त्याला मंजूर नव्हते असे नसून, 'आहे रे' व 'नाही रे' वर्गातील अंतर अमर्याद वाढले तर भांडवलशाही अर्थव्यवस्थाच संपूर्णपणे नष्ट होण्याचा संपूर्ण धोका त्याला दिसत होता म्हणून! केन्सचा मागोवा घेत कल्याणकारी अर्थनियंत्रणाचा स्वीकार केला तर भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील विषमता बेफाम वाढणार नाही किंवा ती 'नाही रे' वर्गाला सुसह्य होण्याची शक्यता आहे एवढे जास्तीत जास्त म्हणता येईल; पण त्यामुळे समाजवाद कसा येणार आहे हे एक गाडगिळांनाच माहीत! जी० डी० एच० कोल म्हणत असत की, अर्थशास्त्रीय विचारात केन्सने घडवून आणलेल्या क्रांतीचे समाजवाद्यांनी एका मर्यादेपर्यंत स्वागत केले पाहिजे व ती स्वीकारली पाहिजे; कारण 'लेसा–फेर' तत्त्वावर आधारलेल्या पूर्वीच्या अर्थशास्त्रापेक्षा केन्सचे अर्थशास्त्र हे अधिक प्रगतिशील आहे, पण याचा अर्थ केन्सचे अर्थशास्त्र हा समाजवादाला किंवा समाजवादी आर्थिक सिद्धान्तांना पर्याय म्हणून स्वीकारायचे असे नाही; कारण समाजवादाची किंवा समाजवादी आर्थिक सिद्धान्तांची झेप केन्सच्या अर्थशास्त्राच्याही पलीकडे जाते. केन्सपूर्व अर्थशास्त्र व केन्सचे अर्थशास्त्र यांच्यामधील फरक हा प्रकाराचा नसून प्रमाणाचा आहे, हे विसरून चालणार नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात केन्सच्या नव्या अर्थशास्त्रामुळे गाडगीळ जसे भारले गेले त्याचप्रमाणे जवाहरलाल नेहरूंवरील त्यांची भक्तीही वाढत गेली. "पं. नेहरूंबद्दल वाचणे, विचार करणे, लिहिणे, बोलणे, आशा बाळगणे, अंदाज करणे, हुरूप मानणे, निराश होणे, हा एक असाच माझा गेल्या निदान वीस वर्षांचा छंद आहे" अशी त्यांनी स्वतःच कबुली दिलेली आहे[३९]. 'भारतभाग्यविधाता', 'आजच्या जगातले पहिल्या रांगेतले थोर सत्पुरुष', 'थोर संत' व 'यशस्वी मुत्सद्दी' अशा गौरवपर शब्दांची गाडगीळ नेहरूंवर खैरात करतात. नेहरूंची विद्वत्ता अफाट होती, इतिहासाचे ज्ञान अगाध होते असा हवाला देऊन गाडगीळ थांबत नाहीत, तर नेहरूंच्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेमुळे "अमेरिकेसारख्या बलाढ्य व धनाढ्य राष्ट्रास पुनः पुनः नमावे लागले याचा दुःख अमेरिकेतील बड्या पत्रकारांनी व मुत्सद्द्यांनी धरला आहे"[४०] अशी ग्वाही देतात. काही माणसांना विशिष्ट रंगच दिसू शकत नाहीत असे

म्हणतात, त्याप्रमाणे जवाहरलाल नेहरूंविषयी लिहिताना गाडगिळांचे होत असावे. नाहीतर नेहरूंबद्दलची वस्तुस्थितीला सोडून असलेली विधाने त्यांच्या लेखनात आढळली नसती. "भाषिक राज्याच्या मागणीपुढे मान तुकवू नका असे सांगणारी दडपणे नेहरूंच्यावर पुष्कळ आली पण नेहरूंनी भाषिक राज्याचा प्रश्न उकरून काढून असंतोष ओढवून घेतला आणि आता तो शमवीत आणला आहे"[४१] हे गाडगिळांचे विधान म्हणजे त्यांच्या कल्पनाशक्तीचा खेळ आहे. भाषिक राज्यांची मागणी डावलण्याचा व नंतर त्यासाठी झालेली आंदोलने निर्दयपणे दडपून टाकण्याचा नेहरूंनी आटोकाट प्रयत्न केला हा इतिहास आहे आणि गाडगिळांच्या मताविरुद्ध खुद्द नेहरूंच्या अस्सल पत्रव्यवहाराचा पुरावाच सादर करता येण्यासारखा आहे.

जवाहरलाल नेहरूंचे आपण अंधभक्त नाही असा ते वारंवार निर्वाळा देत असले, तरी ध्यानी मनी स्वप्नी नेहरूंच्या विचाराने पछाडलेल्या गाडगिळांना नेहरूंनी पुकारलेल्या परराष्ट्रीय धोरणाचे वाजवी अलिप्तपणाने विश्लेषण करता आलेले नाही. जागतिक शांतता हे भारताच्या बाबतीत निव्वळ ध्येय नसून ती भारताची अनिवार्य गरज आहे शतकानुशतके दरिद्री राहिलेल्या दैववादी, परंपरागत समाजाचा, वाढत्या लोकसंख्येच्या भेडसावणाऱ्या समस्येच्या सावटाखाली योजनापूर्वक विकास घडवून आणावयाचा तर मुळातच कमकुवत असलेल्या, मागासलेल्या अर्थव्यवस्थेला युद्धाचा बोजा झेपणार नाही हे ओळखून नेहरूंनी युद्धाचा धोका शक्य तितका कमी करण्याचा व टाळण्याचा प्रयत्न केला. दीर्घकाळपर्यंत चालणारे युद्ध खेळण्याचे सामर्थ्य असलेल्या बलिष्ट देशाने तत्त्व म्हणून शांततेचा पुरस्कार करणे व बलिष्ट देशाकडून भीक मागितल्यामुळे किंवा त्यांच्या मेहेरबानीमुळे मिळवलेल्या शस्त्रास्त्रांवर लढण्याची पाळी येत असलेल्या राष्ट्राने शांततेचा अनिवार्य गरज म्हणून पुरस्कार करणे, या दोहोंत जमीन-अस्मानाचा फरक आहे. भारतासारख्या अविकसित खंड-प्राय राष्ट्राला झपाट्याने आर्थिक विकास करून घ्यावयाचा असेल तर युद्ध परवडण्या-सारखे नाही म्हणून युद्धाचे वातावरण निर्माण होण्यास हातभार लागेल अशी कोणतीही कृती आपण करावयाची नाही ही दक्षता घेण्यात शांतिदूत नेहरूंनी आदर्श-वादाबरोबरच वस्तुस्थितीचेही अवधान ठेवले होते. संयुक्त राष्ट्रसंघटना बळकट करणे, अण्वस्त्रनिर्मितीस नकार देणे, कोणत्याही सत्ता गटाच्या प्रेरणेने झालेल्या लष्करी करारात सामील न होणे व शांततामय सहजीवनाची आकांक्षा बाळगणे ही नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची सूत्रे भारताच्या सध्याच्या अवस्थेच्या मूलभूत मर्यादांशी सुसंगत होती.

युद्ध टाळण्याची नेहरूंची इच्छा समजण्यासारखी असली तरी दुसऱ्या कोणी युद्ध लादल्यास संभाव्य शत्रूविरुद्ध कोणती रणनीती व डावपेच अवलंबावे लागतील, याबद्दल नेहरूंनी फारशी फिकीर बाळगलेली दिसत नाही. संभाव्य आक्रमणाविरुद्ध पूर्व-

तयारी म्हणून निश्चित योजना आखण्याच्या बाबतीत नेहरूंनी दाखवलेला निष्काळजी-पणा समर्थनीय ठरत नाही. कोणत्याही स्वतंत्र राष्ट्राला आपल्या संभाव्य शत्रूच्या हालचालीवर सक्त नजर ठेवावी लागते. त्याच्याशी मैत्री करण्याचे एका बाजूने चालू ठेवले तरी दुसऱ्या बाजूने त्याच वेळी त्याचा योग्य प्रतिसाद मिळणार नाही असे गृहीत धरून स्वसंरक्षणासाठी किमान तजवीज करावी लागते. पाकिस्तानविरुद्ध अशी काळजी, काही प्रमाणात का होईना, घेतली गेली असावी असे मानण्यास जागा आहे, पण चीनच्या आक्रमणापूर्वी रणनीतीच्या व डावपेचांच्या दृष्टीने अशी पूर्वतयारी झाली होती असे त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांच्या ग्रंथांवरून वाटत नाही. शांततामय सहजीवनाच्या आपल्या परराष्ट्रीय धोरणास शेजारी राष्ट्रांनी प्रतिसाद दिला नाही तर, आपद्धर्म म्हणून का होईना, काय करावयाचे याची स्पष्ट कल्पना भारत सरकारला होती असे म्हणता येत नाही. नेहरूंनी आर्थिक नियोजनाच्या आवश्यकतेबाबत जसे सामान्य माणसाला जागे केले तसे संरक्षणसमस्यांबाबत काही शिकवले नाही. कोणत्याही युद्धाची प्रत्यक्ष झळ न लागलेल्या व बव्हंशी निःशस्त्र मार्गाने परकी सत्तेचा प्रतिकार करून स्वतंत्र झालेल्या देशातील नागरिकांना तर संरक्षण-समस्यांची जाणीव करून देणे फार आवश्यक होते. अण्वस्त्रनिर्मितीला व प्रसाराला नेहरूंनी विरोध केला तोही मुख्यतः मानवतावादाच्या भूमिकेवरून! अद्य-यावत पूर्वरूढ शस्त्रास्त्रांच्या बाबतीत भारत सुसज्ज राहिला तर आर्थिकदृष्ट्या न पर-वडणाऱ्या व रणनीतीच्या दृष्टीने आवश्यक नसलेल्या अण्वस्त्रांच्या निर्मितीची भारताला संरक्षणाच्या दृष्टीने गरज नाही, असे नेहरूंनी सहसा सांगितले नाही. नेहरूंच्या अंतर्गत धोरणासंबंधी, विशेषतः आर्थिक नीतीविषयी व परराष्ट्रीय धोरणासंबंधी गाडगिळांनी लिहिले आहे. पण त्यांच्या संरक्षण-नीतीची चिकित्सा करणारे लेख त्यांच्या पुस्तकात अभावाने आढळतात ही उणीव अर्थपूर्ण आहे.

गेल्या जवळजवळ चाळीस वर्षांत गाडगिळांनी केलेली ग्रंथरचना पाहिल्यावर एक गोष्ट विशेष नजरेत भरते, ती म्हणजे प्रथम मार्क्स आणि नंतर जवाहरलाल नेहरू व केन्स यांच्या विचारसरणीमुळे प्रभावित होऊन गाडगिळांनी त्या तिघांच्या विचारांचे त्या त्या काळात चिकित्सक वृत्तीने परीक्षण करण्यापेक्षा त्यांची तरफदारीच फार केली. समाजवादाविषयी किंवा एकूण भारतीय राजकारणाविषयी आचार्य जावडे-करांनी जितक्या प्रमाणात मूलगामी विश्लेषण केले तितके गाडगीळ अद्याप करू शकलेले नाहीत असे वाटते. स्वतंत्र बुद्धीने नवा विचार सांगण्यापेक्षा किंवा पूर्वसूरींच्या अगर समकालीनांच्या विचारांचा नव्याने अन्वयार्थ लावण्यापेक्षा त्यांचे जे विचार ग्राह्य वाटले ते सामान्य माणसालाही समजावून सांगण्याचे व पटवून देण्याचे कार्यच गाडगिळांनी जास्त केले आहे. अर्थात हेदेखील काही कमी महत्त्वाचे अगर सहजा-सहजी साधण्यासारखे कार्य आहे असे नाही. या संदर्भात यशवंतराव चव्हाणांच्या उद्गारांचा निर्देश करावयास हवा : "१९३०–३२ च्या चळवळीनंतर महाराष्ट्रा-

मध्ये समाजवादाचे वाङ्मय समजावून घेण्याची जबरदस्त लाट निर्माण झाली; पण हे सर्व वाङ्मय इंग्रजी भाषेत होते. समाजवादाची, राजकारणाची, अर्थशास्त्राची आणि तत्त्वज्ञानाची परिभाषा मराठीत आणण्याचे काम मोठे किचकट होते, परंतु काही मंडळींनी हा प्रयत्न केला. त्यांनी मराठी भाषेत लिहावयास सुरुवात केली. पां. वा. गाडगीळ हे त्यांपैकीच एक होते. मार्क्सचा कॅपिटल हा ग्रंथ मोठा गुंतागुंतीचा आहे. इंग्रजीतून वाचतानासुद्धा तो लवकर समजत नाही, परंतु गाडगिळांनी तो मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. आज खेड्यातला कार्यकर्ता मार्क्सवादावर आणि समाजवादावर साध्या शेतकऱ्याला समजेल इतक्या सुरेख भाषेत व्याख्याने देत असतो. कुठून आले हे सर्व ?"[४२]

खरोखरच, महाराष्ट्रातल्या निदान एका पिढीवर समाजवादी विचाराचे जे संस्कार झाले ते करणाऱ्यांत आचार्य जावडेकरांच्या बरोबरीने गाडगिळांचा फार मोठा वाटा आहे.

(या लेखात उद्धृत केलेल्या उताऱ्यापैकी शेवटचा उतारा सोडून बाकीचे सर्व श्री. पां. वा. गाडगीळ यांच्या पुस्तकांतून घेतले आहेत.)

१. माझा दृष्टिकोण, पृ. ३
२. माझे काही वृत्तपत्रीय लेखन, पृ. २३४
३. खग्रास प्रभाकर, पृ. ३ (दुसरी आवृत्ती, १९४५)
४. गीतातत्त्वांजली, पृ. ६
५. समाजवादाकडे, पृ. १७–१८
६. माझा दृष्टिकोण, पृ. १३–१५
७. समाजवादाकडे, पृ. ७६
८. सोशॅलिझम अथवा समाजवादाचा ओनामा, पृ. ४ (दुसरी आवृत्ती)
९. माझा दृष्टिकोण, पृ. ८३–८५
१०. सोशॅलिझम अथवा समाजवादाचा ओनामा, पृ. १३७ (दुसरी आवृत्ती)
११. सुलभ समाजवाद, पृ. ८७
१२. मार्क्सचे कॅपिटल-सारग्रंथ विवरण, (दुसरी आवृत्ती, १९४९) पृ.१३१-१३२
१३. समाजवादाकडे, पृ. २६
१४. समाजवादाची वाटचाल, पृ. ६८
१५. स्वातंत्र्योत्तर भारत, पृ. ५६–५७
१६. भारताचे आर्थिक नियोजन, पृ. ४४८–४४९
१७. माझा दृष्टिकोण, पृ. ६–७
१८. रशियातील राज्यक्रांती, पृ. ३६३–३६४

२५५०
२२६६९
निबंध

१९. माझे काही वृत्तपत्रीय लेखन, पृ. २२६
२०. माझा दृष्टिकोण, पृ. १६७
२१. काँग्रेस आणि महायुद्ध, पृ. १०२
२२ किता, पृ. ९४
२३. माझा दृष्टिकोण, पृ. १९–२०
२४. माझे काही वृत्तपत्रीय लेखन, पृ. २७
२५. समाजवादाकडे, पृ. ७७
२६. किता, पृ. ६०
२७. रशियातील राज्यक्रांती, पृ. ३०२–३०३
२८. माझे काही वृत्तपत्रीय लेखन, पृ. २
२९. समाजवादाकडे, पृ. १२०
३०. माझे काही वृत्तपत्रीय लेखन, पृ. २
३१. माझा दृष्टिकोण, पृ. १–१०
३२. मार्क्सचा भौतिकवाद, पृ. १४
३३. समाजवादाची वाटचाल, पृ. ५९
३४. किता, १८
३५. मार्क्सचा भौतिकवाद, पृ. ३
३६. समाजवादाची वाटचाल, पृ. ७७
३७. भारताचे आर्थिक नियोजन, पृ. ४४९
३८. किता, पृ. ४५०
३९. शांतिदूत नेहरू, पृ. २२
४०. किता, पृ. ६५
४१. समाजवादाची वाटचाल, पृ. १०
४२. यशवंतराव चव्हाण, युगांतर, पृ. १७५–१७६

ooooooooooooooooooooooooo

# सूची

ooooooooooooooooooooooooo

**( व्यक्ती, नियतकालिके, ग्रंथ, विषय, संस्था इत्यादी )**


## अ–आ

‘ अंतकाळचे उद्‌गार ’ ४३, ५२, ६३, ६४
‘ ॲन इथॉलॉजिकल ॲप्रोच टु द प्रॉब्लेम ऑफ माइंड ’ १४४
अनविन जे. डी. १४१
अप्रबुद्ध ८२
अय्यावारू स्वामी ५७, ६३
‘ अश्लीलता ’ १२३, २५
अळतेकर माधवराव २८, ३२, ३९
‘ अज्ञानराव भोळे देशमुख ’ ४४
आगरकर गो. ग. १, ३–५, ७, ८, १०, ११-१३, १६-३३, ३६–३९, ५३, १००, १८, ४९
आगरकर यशोदाबाई ३, २२
‘ आनंदी गोपाळ ’ ९
आपटे दा. ना. ८६
आपटे रमाबाई २१, २२
आपटे लक्ष्मणराव ७३
आपटे वा. शि. १, ३, १३–२२, ८१
आंबेडकर डॉ. ४१, ७५, ७६, ७९, ८९-९१, १६६
आर्थर श्लोझिंजर १५६

## इ–ई

‘ इंदुप्रकाश ’ ३, ४, ९, १५, २१
इन्व्हेरॅरिटी बॅ. १९
‘ इशारा ’ ५५, ५६
‘ ईश्वरास प्रार्थना ’ ६३

## उ

‘ उत्तररामचरितम् ’ १५
‘ उपेक्षित द्रष्टा–कर्वे ’ ११९

## क–ख

कबीर ४२–४४
करंदीकर शि. ल. १५४
कर्वे इरावती ८६, ११९
कर्वे महर्षी १४९
कर्वे र. धों. ११८–४९
‘ कॅपिटल ’ १७३
‘ कॅपिटल सारग्रंथ ’ १७६

कांट १४३
काटदरे मा. के. ८२
'कास्ट इन मॉ. सिलोन' ९९
'काळ' १५१, ५२
कीर धनंजय ४१, ४४, ४५, ६३
'कुंकू' ( दुनिया न माने ) १२१
कुंटे म. मो. १४
केतकर श्री. व्यं. ८०-११४, ४८, ४९
केन्स १८१, ८२, ८४
'केसरी' २-४, ९, १८-२०, २४, २७-३०, ३२, ३६, ३९, ४० ( दि. ७८), ७७, ८२, ९८
केळकर द. के. ८२
केळकर न. चिं. २३, २५, २८, ७४, १६५
केळकर वासुदेवराव १३, १७, १९
केळूसकर कृ. अ. ५७, ६१-६३
'कैवारी' ७६, ७७
'कोल्हापूर प्रकरण' १८, १९, २१
कोसंबी धर्मानंद ८२, ९८
'क्रांतीचे रणशिंग' ७९
क्लीन मेलानी १४१
'खग्रास प्रभाकर' १७२

**ग–घ**

गाडगीळ गंगाधर १४
गाडगीळ धनंजय ८२, १०३
गाडगीळ न. वि. ६५, ७२, ७३, १७१
गाडगीळ पां. वा. १६८-८५
गांधी महात्मा ४५, ७८, १०७, ८, ९, २८, २९-३१, ६६, ६७, ७३, ७७
'गांधीवाद' १७६
गायकवाड सयाजीराव ६०
'गारंबीचा बापू' १४८
गुंजाळ नारायणराव ६६, ७३
गुप्ते के. एस. ७७, ७८
'गुलामगिरी' ४६, ४७, ७१
गोखले गोपाळराव १, ३, ८, १७, २१, ३१-३४, ३६-३९, १४९
गोखले द. न. ८६
गोडबोले रघुनाथशास्त्री ८१
'गोरक्षण चळवळ' ३१-३३, ३६
गोरे ( ना. ग. ) १६९, ७१
'गोहत्या प्रति. कायदा' १३१
गोळे म. शि. १९
गौतम बुद्ध ८२, ९७-९९
'ग्रामण्य प्रकरण' २४, २७, २८
घोले विश्राम रामजी ४५-४७, ५५

**च–छ**

चव्हाण यशवंतराव १८४
'चातुर्वर्ण्य' ९१-९३
चिपळूणकर कृष्णशास्त्री ४६, ४७
चिपळूणकर ल. कृ. ४७
चिपळूणकर विष्णुशास्त्री १३, १५-१८, ४६, ४७, ४९, ७१, ७२, १७१
'छत्रपती पद्यसंग्रह' ६९, ७४

**ज**

जवळकर दिनकरराव ६५-७९
'जगन्नाथ शं. शिष्यवृत्ति' १८
जंगलीमहाराज ४३
'जातिभेदविवेकसार' ४२
'जातिसंस्था' ८३, ८४, ८७-९०, ९३-९५, ९७, ९९
जाधव भास्करराव ७०, ७३, ७६-७८ १४२
जांभेकर बाळशास्त्री १३, १०१
जावडेकर शं. द. १६९, ७१, ७२, ७६, ८०

जिन्सीवाले श्रीधरपंत २४
जेधे केशवराव ६५-७९
जेधेबंधू ७६, ७७
'जेधे मॅन्शन' ६६, ६७, ७६, ७८
जोशी आनंदीबाई ९, १३
जोशी ग. वा. (सार्व. काका) १६, ४७
जोशी गोपाळराव ३, ४, ९–१२
जोशी चिं. वि. ८२, ८७
जोशी रामभाऊ ७, ८
जोशी लक्ष्मणशास्त्री १६९, ७१
जोशी वा. म. १४९
जोशी विद्याचंद्र १५५
जोशी श्री. ज. ९, १०

### ट-ठ

'टाईम्स ऑफ इंडिया' २०, ३१, ३२ ७०, ७३
'टिळकचरित्र' (केळकर) २३, २५, ३२
'टिळक जीवनरहस्य' २५
टिळक बा. गं. १, ४, १३, १५–२१, २३-२८, ३०-३९, ५३, ६५, ६६, ७१, ७२, १०१, ७२, ८०
ठकार बाळशास्त्री ८१

### ड-ढ

डरखाइम १४५
'डे. एज्यु. सोसायटी' १, १३ २०-२२
'डेक्कन कॉलेज' १५
डेव्हिड्स व्हिस ९१
ढेरे रा. चिं. ४३, ६३

### त–थ

'तरुण मराठा' ६६, ६७, ७०, ७१
'तरुण मराठा मंडळ' ६७, ६८
तर्खडकर भा. पां. १३
'तेज' ७९
'थॉटस् ऑन पाकिस्तान' १७९

### द–ध

दयानंदस्वामी ४९
'दक्षिण प्रा. कमिटी' ४६, ४७
'दि माइंड : वार्यो. ॲप्रोचेस् टू इट्स फॅक्शन्स' १४४
'दि रोड टू सर्फडम' १८१
दिवेकर महादेवशास्त्री १४२
'दीनबंधु' ४७–५३
'दीनबंधु' सार्व. सभा' ५८, ५९, ६१
'दीनमित्र' ५९, ६२, ६६, ६७
'दुसरे महायुद्ध' १७७
देव शंकरराव ६५, १७३
देवधर सीतारामपंत २५-२८
'देशाचे दुष्मन' ७१, ७३, ७४, ७७
'धर्म आणि विज्ञान' १४४-४६

### न

'नग्नचित्रे' १२४, २५
नलावडे गणपतराव ७२
नवलकर ह. ना. ४६, ५१, ५८, ६०, ६१
नातू बाळासाहेब २४
नामजोशी म. ब. १६-१९, ३१-३५
'निबंधमाला' १६, ४८, ४९, ५३, ६४
नीत्शे १५०
नूलकर (रा. ब.) ३
नेहरू पं. १६१, ६६, ७३, ७७, ८२–८४
'न्यू. इं. स्कूल' २, ३, ५, ६, १४, १६-१८

### प

'पटेल बिल' ( विवाहविषयक ) ६६
पडवळ तुकाराम तात्या ४२, ४३
पंतप्रतिनिधी ६७
परांजपे शकुंतला ११९, २३, २४
परांजपे शि. म. १७१
'पांगारकर आत्मचरित्र' १७, १८
पाटील गणपतराव ५८, ५९
पाटील मुकुंदराव ६६
पाध्ये प्रभाकर १७९
पालकरबंधू ६६-६८
पावगी नाना ८२
'पुणे नगरपालिका' ७०, ७१, ७३
'पुणे वैभव' १४
'प्रणयप्रभाव' ६६

### फ

फडके वासुदेव बळवंत ५२
'फर्ग्युसन कॉलेज' ६, १४, १७, २०
'फॅसिझम' १७६, ७७
फुले बाबूराव ७१, ७३
फुले महात्मा ४१–६०, ६२, ६३, ६५, ७२, १०१, १८
फुले सावित्रीबाई ४४
फ्रॉइड १४०, ४१, ४५

### ब

'बडोदावत्सल' ५५, ५७, ६३, ६४
बर्वे माधवराव १८, १९
बानर्जी सुरेंद्रनाथ १५५
'बीजग्रंथ' ४२
'बुद्धिप्रामाण्यवाद' ( बुद्धिवाद ) ११८-२०, २९, ३३, ४५, ४६, ४९
'बेचाळीसची चळवळ' १७७
बेलसरे खडेराव १६
बोस सुभाष ४५
ब्राइस रीअन ९९
'ब्राह्मणेतर चळवळ व पक्ष' ६५, ७५, ७७, ७८

### भ

भाटे गो चि. १५, ८३
'भांडवलशाही अर्थव्यवस्था' १८१, ८२
भांडारकर डॉ. ३, १३, ५७
भानु चिं. गं. ८
'भारतीय समाजशास्त्र' ८६
भालेकर कृष्णराव ४३-५२, ५४-६३
भिडे ( रा. ब. ) ३, २९, ३३
भोपटकर भालाकार ७०

### म

'मजूर' ७१-७३
'मनुस्मृति' ८७, ८८, ९०, ९१
'मराठा' १८, १९
महंमद पैगंबर ९८, ९९
महाजनी ह. रा. १६९, ७१
'महा. टाइम्स' ( दि. ७८ ) ७९
'महा. ज्ञानकोश' ८१-८७, ९८, १००, १, ४-९, ११-१४
माझिनी १५०, ६१, ६४-६६
'मानसशास्त्र' १४३, ४४
माने दिनकरराव ६८, ७७
मामा परमानंद ५३
'मार्क्सवाद' १२७, २८, ६५-६९, ७२, ७५, ८०, ८४
'मिथ ऑफ द माइंड' १४३
मिराशी वा. वि. ८२
'मुंबई दंगा' ३१, ३२, ३६
मेथा फिरोजशहा ३३-३६

'मौज' (दिवाळी अंक) ६४, ११७, २४, ४९
म्हस्के गंगाधर भाऊ ५५

### य–र

यंदे दा. सा. ५५, ५८
रमाबाई पंडिता १९, २९, ५४, ५५
'रशियन राज्यक्रांति' १०५, ६, ६६, ६९, ७६
'रसिक' (दिवाळी अंक) २२
राजवाडे वि. का. १०१, ४१, ४२
राधाकृष्णन १४५
रानडे केशवराव ३३, ३४
रानडे न्यायमूर्ती १३, २१, २७, २८, ३१–३३, ३५, ३९, ५७
'राष्ट्रवाद' १३२, ३३, ५६–५८, ६२, ६३
रॉबिन्सन डॉ. १२०, २७, ४०
रोकडे माधवराव ६१, ६२

### ल

लजपतराय लाला १५५
लाड संतुजी ५१
लुई फिशर १७९
लेले भाऊसाहेब ८
लेस्ली फार्बर १४३
लोकहितवादी ६०
लोखंडे नारायणराव ४५, ४९–५६, ६३

### व

'वज्रसूची' ४२, ४३
वर्दे श्री. म. ८२
वाच्छा ३३, ३४
'वादविवेचनमाला' १७५, ७६
'विजयी मराठा' ६७
विनोबा (भावे) १३०, ३१, ६६
विल हर्बर्ग १४५
विवेकानंद ८७
वेडरबर्न १५५
'वेश्याव्यवसाय' १३९, ४०
व्हॅन ड व्हेल्ड १४१

### श

शंकराचार्य २४, २६, २७
'शत्रूच्या शिबिरात' १५२, ५५, ६४, ६६
'शास्त्रवाद' १६०–६२
शाहूमहाराज ४१, ६५–६७, ७५, ९६
शिंदे अलिजाबहाद्दर ६७
शिंदे वि. रा. ७६, ९५
शूकिंग लेव्हिन १११
'शेतकऱ्यांचा आसूड' ५२–५४
'शेतकऱ्यांचा कैवारी' ५६, ६४
शोपेनावर १४३
'श्रीशिव स्मा. पुराण' ६९
'श्रीशिवाजी स्मारक' ६७

### स

'संग्राम' ७२
'संततिनियमन' १२०, २७
'सत्तावनचे स्वा. समर' १५४, ५५
'सत्यशोधक का खिस्तशोधक' ७२
'सत्यशोधक चळवळ व समाज' ४२–४६, ५०, ५७, ५९–६४, ७४, ११८
'समग्र टिळक वाङ्मय खंड' २५, ३९
'समग्र फुले' ५३, ५५, ६४
'समग्र सावरकर वाङ्मय' १५०–५३, ५५, ५७–६४, ६६
'संमति वयाचे बिल' १, ३, ४, ५, १०, २०.

, समागमस्वातंत्र्य ' १३४–३६
' समाजवाद ' १०६, ७, २८, २९, ६६, ६८, ६९, ७३, ७४, ७६, ८४
' समाजवादाची वाटचाल ' १७५
' समाजस्वास्थ्य ' ११८–४९
' समान नागरी कायदा ' १०२, ३१
ससाणे ग्या. कृ. ४३
' संस्कृत इं. शब्दकोश ' १३, २१
' सायन्स अँड रिलिजन ' १४४
' सायमन कमिशन '७६
' सार्व. सभा ' ३४, ३५
' सावरकर चरित्र ' १५४, ५९, ६५
सावरकर वि. दा. ४३, १५०–६७
' सुधारक ' ४, ६, ७, १०, २१–२८
सोनी गतपतराव ८
' सोबत ' ४, १२
' सोव्हि. कम्युनिझम-ए न्यू सिव्हिलिझेशन' १७९
' सोशॅलिझम अथवा समाजवादाचा ओनामा ' १७३
स्टालिन १७९
' स्त्री ' ३
' स्त्रीधर्मनीति '१९
' स्त्रीपुरुष तुलना ' ५४
' स्मृतिचित्रे ' १४८

ह

' हद्दपार ' १४८
हरदयाळ लाला १५३
हाइंडमन १६६
हायेक १८१
हिटलर-मुसोलिनी १२६, २७
' हितोपदेश ' ( भालेकर ) ५१
' हिंदुमहासभा ' १५३, ५४, ७२
' हिंदुराष्ट्रवाद ' १५७, ५८
हेन्री कॉटन १५५

क्ष

क्षीरसागर श्री. के. ८७

ज्ञ

' ज्ञानप्रकाश ' ४, ५, १०, ११, ३ ३६–३८, ४६, ७८, ७९

REFBK-0022669